अध्याय अकरावा.

श्रीगणेशाय नमः ।। ॐ नमो श्रीगुरु सच्चिद्‌घन । वरुषताहे स्वानंदजीवन । मुमुक्षुमयूर आनंदले जाण । हरिखें उड्डाण करिताती ।। १ ।। तो सजल देखोनियां मेहो । सोहंभावें फोडिती टाहो । रोमांचपिसी पसरूनि पहा हो । सत्वें लवलाहो नृत्याचा ।। २ ।। नाचे स्वानंदाचेनि मेळें । तेणें सर्वांगीं निघाले डोळे । पिसें देखणीं जाहलीं सकळें । तीं शिरीं गोपाळें वाहिलीं ।। ३ ।। तो मेघ देखोनि सन्मुख । आर्त चातक पसरिती मुख । विंदुमात्रें पावले सुख । नित्य निर्दोख ते जाहले ।। ४ ।। आर्ततृषा तत्काळ वोळे । निवाले तेणें स्वानंदजळें । मग हरिखाचेनि कल्लोळें । सुखसोहळे भोगिती ।। ५ ।। सुभूमि देखोनि निर्मळ । जाणोनि वर्षती काळवेळ । वर्षों लागले जी प्रबळ । जळकल्लोळ अनिवार ।। ६ ।। तेणें वोळलेनि कृपाभरें । शिष्यसरितेसी पूरु भरे । विकल्पवोसणें एकुसरें । महापूरें वाहाविलीं ।। ७ ।। तेणें प्रवाह निर्मळजळें । चिदैक्यसागरीं सरिता मिळे । मग समरसोनि तेणें जळें । राहे निश्चळें निजरूपें ।। ८ ।। वैराग्यरावें शुद्ध केली । पृथ्वी निजवोला वोलली । कठिणत्वेंविण मार्दवा आली । नाहीं अंकुरली बहुवीजें ।। ९ ।। अखंड वर्षतां जळमेळीं । वासनेचीं ढेपें विरालीं । सद्भावाची वोल जाली । वाफ लागली बोधाची ।। १० ।। तेथें न पेरितांचि जाण । सहज निजबीजें परिपूर्ण । अंकुरली आपणिया आपण । सिद्ध संपूर्ण स्वभावें ।। ११ ।। ते परम कृपेचिये पुष्टी । स्वानंदें पिकली समदृष्टी । परमानंदें कोंदली सृष्टी । ऐक्यें सवसाटी जीवशिवां ।। १२ ।। फिटला दुःखाचा दुष्काळ । जाला सुखाचा सुकाळ । वोळला

सच्चिद्घनस्वरूप सद्गुरूला नमस्कार असो. हे गुरो, तूं सत् व चित्‌रूप मेघ आहेस, स्वानंदरूप जलाची वृष्टि करितोस. त्यामुळें मुमुक्षुरूपी मयूर आनंदानें नाचूं उडूं लागतात. १ तो जलयुक्त मेघ पाहिला कीं, ते ' सोहं- ' भावानें टाहो फोडितात. आपला रोमांचरूपी पिसारा उभारितात व सत्त्वाचें नृत्य करूं लागतात. २ ते स्वानंदाच्या भरांत नाचत असतां त्यांचें सर्व अंग डोळ्यांनीं भरतें व पिसारा देखणा होतो. म्हणूनच श्रीकृष्ण मयूरपुच्छ आपल्या मस्तकावर धारण करितो. ३ तो मेघ समोर दिसतांच तृषित चातक आपलें मुख पसरून बसतात व त्यांत जलाचा एक थेंब पडतांच ते तृप्त होऊन कायमचे निर्दोष होतात. ४ तृषिताची तहान तत्काल भागते. स्वानंदजलानें ते तृप्त होतात व आनंदाच्या भरांत सुखसोहळा भोगितात. ५ ते मेघ उत्तम व सुपीक जमीन पाहून योग्यकाळीं अनिवार वृष्टि करितात. ६ ही कृपारूपी वृष्टि प्राप्त झाली, म्हणजे शिष्यरूपी नदीला महापूर येतो व तो विकल्पादि लांकडें, केराचें किल्मिष वगैरे सर्व एकदम वाहून नेतो. ७ नंतर ती निर्मल जलप्रवाहाची नदी चिदैक्य समुद्राला जाऊन मिळते व तेथें त्याच्याशीं समरस होऊन आपल्या मूळ आत्मस्वरूपांत स्थिर होऊन रहाते, ८ नंतर वैराग्याच्या राबानें शुद्ध केलेली भूमी आपल्या आंगच्या ओलाव्यानें आपोआप भिजून तिचा कठिणपणा जाऊन ती मऊ होते. परंतु त्यांत बीज रुजून उगवलेलें नसतें. ९ त्या भूमीवर जलाचा सतत वर्षाव झाला म्हणजे वासनारूपी मातीचीं ढेंकळें विरून जातात. सद्भावाचा ओलावा लागून त्यांतून ज्ञानाची वाफ निघूं लागते. १० तेव्हां मग त्यांत आत्मबीज न पेरतांच त्याला सहज अंकुर फुटतात व शेत स्वभावतःच मोठ्या जोमानें पिकतें. त्यांतील दाणा जात्याच भरीव असतो. ११ अशा त्या अपार कृपेच्या पोषणानें पिकाला समदृष्टीचीं कणसें लागतात. सर्व सृष्टि परमानंदानें भरून जाते व जीव आणि शिव यांचें ऐक्य होतें. १२ दुःखरूपी दुष्काळ नाहींसा होऊन सुखाचा

सद्‌गुरु कृपाळु । आनंदकल्लोळु सच्छिष्यां ॥ १३ ॥ वरुषतां निजपर्जन्यधारा । वर्षला नाना अवतारगारा । कार्यानुरूपें तदाकारा । विरोनि निराकारा त्या होती ॥ १४ ॥ त्या पर्जन्याचा वोसाडा । दैवें लागला जडमूढां । तो सरता होय संतांपुढां । अवचटेंसीं तोंडा जैं लागे ॥ १५ ॥ तो महामेघ श्रीहरी । सग्दुरुकृपा वोळे जयावरी । तोचि धन्य चराचरीं । पूज्य सुरनरीं तो कीजे ॥ १६ ॥ गुरुनामें अतिघनवटु । शिष्य तारूनि अतिहळवटु । ज्याचा आदि मध्य शेवटु । न कळे स्पष्टु वेदांसी ॥ १७ ॥ तो सद्‌गुरु श्रीजनार्दनु । वोळलासे आनंदघनु । तेणें एका एकु केला पावनु । सांडवोनु एकपण ॥ १८ ॥ एक तेंचि अनेक । अनेक तेंचि एक । हेंही केलें निष्टंक । स्वबोधें देख बोधोनि ॥ १९ ॥ बोधोनियां निजऐक्यता । ऐक्यें लाविलें भक्तिपंथा । मज प्रवर्तविलें श्रीभागवता । निजकथा गावया ॥ २० ॥ तेचि श्रीभागवतींची कथा । दशमाध्यावो संपतां । ते बद्धमुक्तांची व्यवस्था । उद्धवें कृष्णनाथा पूशिली ॥ २१ ॥ सखोल उद्धवाचा प्रश्न । ऐकोनियां श्रीकृष्ण । निजहृद्‌यींचें गुह्यज्ञान । उद्धवासी जाण सांगेल ॥ २२ ॥ येणें प्रश्नोत्तरश्रवणें । उठे जन्ममरणांचें धरणें । संसाराचें खत फाडणें । फिटलें लाहणें विषयांचें ॥ २३ ॥ मोक्षमार्गींचे कापडी । साधनीं शिणती बापुडीं । तिहीं शीघ्र यावें तांतडी । जिणावया वोढी बंधमोक्षांच्या ॥ २४ ॥ जे कष्टती जपतपसाधनें । शिणती ध्येयध्यानअनुष्ठानें । ते ते शीघ्र या विंदानें । ज्ञानाज्ञानें जिणावया ॥ २५ ॥ ऐशी कथा आहे गहन ॥ श्रोतां व्हावें सावधान । एका विनवी जनार्दन । स्वानंदघन तुष्टला ॥ २६ ॥ अकरावे

सुकाळ होतो. याप्रमाणें दयाघन सद्‌गुरु वृष्टि करूं लागला कीं, सच्छिष्यामध्यें आनंदाच्या लहरी उसळूं लागतात. १३ आत्मज्ञानरूपी पर्जन्याच्या धारा पडूं लागल्या कीं त्याबरोबर अवताररूपी गारांची वृष्टि होते. त्या गारा कार्याप्रमाणें तो तो आकार घेतात व शेवटीं विरून निराकार होतात. १४ त्या पर्जन्याचा शिंतोडा एखाद्या अज्ञ मूढाच्या अंगावर सहज जरी दैवयोगानें उडाला व त्याचा थेंब अकस्मात् त्याच्या मुखांत पडला, तरी तो संतांहूनहि श्रेष्ठ होतो. १५ अशा श्रीहरिरूपी सद्‌गुरुमहामेघाची कृपा ज्यावर होते, तोच सर्व चराचरांत धन्य व देव आणि मानव यांना पूज्य होय. १६ 'गुरु' या नांवावरून तो अतिशय जड भासतो, परंतु स्वतःसह शिष्याला तरून नेण्याइतका हलका आहे. (सर्व ब्रह्मांडाचा नाश होतो, परंतु आत्मस्वरूप नाश न पावणारें, म्हणून त्याला गुरु म्ह० जड म्हटलें. परंतु पाण्यांत जसा अति हलका पदार्थ तरतो, त्याप्रमाणें या भवसागरांत सद्‌गुरु स्वतः न बुडतां व आपल्या भक्तालाहि बुडूं न देतां तारून परतीराला नेतो. म्हणून त्याला हलका असें म्हटलें आहे.) त्याचा आदि, मध्य व अंत वेदांनाहि स्पष्ट कळत नाहीं. १७ तो आनंदघन सद्‌गुरु जनार्दनस्वामी प्रसन्न झाला व त्यानें एकत्व टाकून एकनाथाला पावन केलें. १८ आत्मज्ञानाच्या बोधानें त्यानें एक तेंच अनेक व अनेक तेंच एक हें निश्चित करून दिलें. १९ त्यानें आपल्या ऐक्याचें ज्ञान करून देऊन ऐक्यानेंच भक्तिमार्गाला लावून दिलें व श्रीभागवत ही आपलीच कथा गावयास मला प्रवृत्त केलें. २० तीच भागवताची कथा, दहाव्या अध्यायाच्या शेवटीं उद्धवानें श्रीकृष्णाला बद्ध-मुक्तांची स्थिति सांगण्याविषयीं प्रश्न केला, येथपर्यंत आली. २१ आतां पुढें उद्धवाचा गहन प्रश्न ऐकून श्रीकृष्ण आपल्या अंतःकरणांतील गुह्य ज्ञान उद्धवाला सांगेल. २२ तें या प्रश्न-उत्तरांच्या श्रवणानें श्रोत्यांच्या मागचा जन्म-मरणांचा तगादा नाहींसा करितें, संसाराचा कर्जरोखा फाडून टाकितें व विषयांचें ग्रहण नाहींसें करितें. २३ मोक्षमार्गांतील जे बिचारे यात्रेकरू अनेक साधनें करून थकले असतील त्यांनींहि बंध-मोक्षाची ओढ जिंकण्यासाठीं सत्वर इकडे येण्याची त्वरा करावी. २४ दुसरे जे कोणी जप-तपादि साधनें व ध्येय-ध्यानादि अनुष्ठानें करून शिणले असतील, त्यांनींहि मोठ्या कौशल्यानें ज्ञान व अज्ञान या दोहोंना जिंकण्यासाठीं त्वरेनें यावें. २५ अशी ही कथा मोठी गहन आहे. तरी श्रोत्यानें चित्त सावधान करावें. एकनाथ विनंति करितो कीं, आनंदघन जनार्दनस्वामी प्रसन्न

अध्यायीं जाण । इतुकें सांगेल श्रीकृष्ण । बद्धमुक्तांचें वैलक्षण्य । आणिक लक्षण साधूंचें ॥ २७ ॥ तेणेंच प्रसंगें जाण । सांगेल भक्तीचें लक्षण । अकराही पूजेसी अधिष्ठान । इतुकें निरूपण हरि बोले ॥ २८ ॥

श्रीभगवानुवाच–बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ।
गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बन्धनम् ॥ १ ॥

उद्धवा बद्ध मुक्त अवस्था । जरी सत्य म्हणसी वस्तुतां । तरी न घडे गा सर्वथा । ऐक आतां सांगेन ॥ २९ ॥ बद्ध मुक्त अवस्था । माझे स्वरूपीं नाहीं तत्त्वतां । हे गुणकार्याची वार्ता । संबंधू तत्त्वतां मज नाहीं ॥ ३० ॥ माझ्या निजस्वरूपाच्या ठायीं । बद्धमुक्तता दोनी नाहीं । बद्धता मुक्तता गुणांच्या ठायीं । आभासे पाहीं गुणकार्यें ॥ ३१ ॥ गुण ते समूळ मायिक । मी गुणातीत अमायिक । सत्यासी जैं बाधे लटिक । तैं मृगजळीं लोक बुडाले ॥ ३२ ॥ चित्रींचेनि हुताशनें । जैं जाळिजती पुरें पट्टणें । कां स्वप्नींचेनि महाधनें । वेव्हारा होणें जागृतीं ॥ ३३ ॥ सूर्यासी प्रतिबिंब गिळी । छाया पुरुषातें आकळी । समुद्र बुडे मृगजळीं । तैं मज गुणमेळीं बद्धता ॥ ३४ ॥ जैं जिभेसी केंसु निघे । जैं तळहातीं वृक्षु लागे । डोळ्यांमाजीं पर्वत रिगे । तैं मी गुणसंगें अतिबद्धू ॥ ३५ ॥ आकाश खोंचे साबळीं ।

झाला आहे. २६ या अकराव्या अध्यायांत श्रीकृष्ण बद्ध-मुक्तांचा भेद व साधूंचें लक्षण सांगणार आहे. २७ त्यांतच प्रसंग आणून भक्तीचें लक्षण व अकराहि पूजेचें अधिष्ठान यांचेंहि निरूपण श्रीहरि करणार आहे. २८.

(या अकराव्या अध्यायांत हरीनें बद्ध, मुक्त, साधु व भक्ति यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत.)

—'**एकच** अनादि आत्मा नित्यमुक्त व नित्यबद्ध आहे हें म्हणणें मला विरुद्ध दिसतें,' असें जें उद्धवानें वर म्हटलें आहे, त्यांतील विरोध वस्तुतः आहे कीं, प्रतीतितः आहे ? बंध व मोक्ष यांना वास्तवत्व नाहीं, त्यामुळें वस्तुतः विरोध संभवत नाहीं, असें पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

श्रीभगवान् उवाच–श्रीभगवान् म्हणाले, **बद्धः मुक्तः मे गुणतः न वस्तुतः**–आत्मा बद्ध आहे व मुक्त आहे हें माझ्या अधीन असलेल्या सत्त्वादि गुणरूप उपाधींमुळें आहे. वस्तुतः तो बद्धहि नाहीं व मुक्तहि नाहीं. (अहोपण, त्याला औपाधिकत्व जरी असलें तरी जल व उष्णता या उपाधींमुळें होणाऱ्या तांदुळाच्या खऱ्या परिपाकाप्रमाणें बंध-मोक्षहि सत्य कां नसावेत ? उत्तर–) **गुणस्य मायामूलत्वात्**–गुणाचें मूळ माया असल्यामुळें, **मे बंधनं न**–मला बंधन नाहीं. आणि त्यामुळेंच, **मोक्षः न**–मोक्षहि नाहीं. (अहोपण, तुम्ही हें सर्व शास्त्रांच्या विरुद्ध कसें सांगतां ? उत्तर-) **इति मे व्याख्या**–असा हा मीं केलेला निर्णय आहे. [त्याविषयीं व्यर्थ कुतर्क करूं नकोस. किंवा '**आत्मा बद्धः मुक्तः इति व्याख्या मे गुणतः**–आत्मा बद्ध व मुक्त आहे हें म्हणणें गुणपारतंत्र्यामुळें आहे. कारण गुणांचा नियंता जो आत्मा, त्यामध्यें वस्तुतः बंधहि नाहीं व मोक्षहि नाहीं, असा या श्लोकाचा अन्वय व अर्थ करावा.] १.

हे उद्धवा ! बद्ध व मुक्त या अवस्था खऱ्या आहेत असें जर तूं समजत असशील, तर वास्तविक खरी स्थिति तशी नाहीं. तेंच आतां सांगतों, ऐक. २९ माझ्या स्वरूपामध्यें बद्ध व मुक्त या अवस्थाच नाहींत. हा गुणकार्याचा म्ह० सत्त्व, रज व तम एतद्रूप मायेचा परिणाम आहे. माझ्याशीं त्यांचा कांहीं संबंध नाहीं. ३० माझ्या आत्मस्वरूपांत बद्ध व मुक्त या दोन्ही अवस्था नाहींत. बद्ध व मुक्त हीं दोन्ही गुणांना आहेत व गुणकार्यामुळेंच त्या अवस्था भासतात. ३१ गुण सर्वथा मायिक आहेत. मी गुणांहून भिन्न व मायारहित आहें. सत्याला जर असत्य बाध करूं शकेल तर मग लोक मृगजळांतहि बुडतील, ३२ चित्रांतील आगीनें शहरें व गांवें जळून जातील, किंवा स्वप्नांत मिळालेल्या द्रव्यराशींनीं व्यवहारांत देवघेव करितां येईल, ३३ किंवा सूर्याला त्याचेंच प्रतिबिंब ग्रासून टाकील, किंवा मनुष्याला त्याचीच पडछाया बांधून टाकील, किंवा समुद्र जर मृगजळांत बुडून जाईल, तर मी गुणांच्या समुदायांनीं बद्ध होईन. ३४ किंवा ज्यावेळीं जिभेवर केस येतील, तळहातावर वृक्ष उगवेल, डोळ्यांत पर्वत शिरेल, तेव्हां मी गुणांनीं अतिबद्ध होईन. ३५ किंवा पहार जर आकाशाला

काजळ लागे वारया निडळीं । कां विजूचे कपाळीं । बाशिंग सकळीं बांधावें ॥ ३६ ॥ गगन तुटोनि समुद्रीं बुडे । सपर्वत धरा वारेंनि उडे । सूर्य अडखळोनि अंधारीं पडे । तरी मी सांपडें गुणांत ॥ ३७ ॥ अंतरिक्षगगनीं सरोवर । त्यामाजीं कमळें मनोहर । तो आमोद सेविती भ्रमर । ऐसें साचार जैं घडे ॥ ३८ ॥ तैं मी आत्मा गुणसंगें । नानाविषयभोगसंभोगें । मग त्या विषयांचेनि पांगें । होईन अंगें गुणबद्धू ॥ ३९ ॥ त्रिगुण अंगीकारें वर्ततां । गुणकार्य तदात्मता । तेणें बद्ध मुक्त अवस्था । भासे वृथा भ्रांतासी ॥ ४० ॥ गुणा आत्म्यासी भिन्नता । म्हणसी मानिली तत्त्वतां । परी गुणसंगें आत्मा असतां । अवश्य विकारिता येईल ॥ ४१ ॥ अग्निसंगें पात्र तप्त । पात्रसंगें जळसंतप्त । जळतापें धान्यपाकु होत । तेंवीं विकारवंत नव्हे आत्मा ॥ ४२ ॥ अग्नितापाआंत । आकाश नव्हे संतप्त । तेंवीं गुणसंगा आंत । विकारवंत नव्हे आत्मा ॥ ४३ ॥ नट अंधत्वें अवगला । परी तो आंधळा नाहीं जाला । तैसा आत्मा गुणसंगें क्रीडला । तरी असे संचला निर्गुणत्वें ॥ ४४ ॥ नटु अंधत्वें नव्हे अंधू । आत्मागुणसंगें नव्हे बद्धू । गुण मायिक आत्मा शुद्धू । या त्या संबंधू असेना ॥ ४५ ॥ आत्मा व्यापक गुण परिच्छिन्न । याही हेतू न घडे बंधन । सकळ समुद्राचें प्राशन । केंवीं रांजण करूं शके ॥ ४६ ॥ मोहरीमाजीं मेरु राहे । पशामाजीं पृथ्वी समाये । मुंगी गज गिळोनि जाये । खद्योत खाये सूर्यातें ॥ ४७ ॥ मशकु ब्रह्मांडातें आकळी । पतंगु प्रळयानळ गिळी । तरी आत्मा गुणाचे मेळीं । गुणकल्लोळीं बांधवे ॥ ४८ ॥ यापरी न संभवे बद्धता । बद्धतेसवें गेली मुक्तता । बद्धमुक्तअवस्थांपरता । जाण तत्त्वतां आत्मा मी ॥ ४९ ॥ स्वप्नींचा अत्यंत सुकृती । अथवा महापापी दुष्कृती । दोन्ही मिथ्या जेवीं जागृतीं । तेंवीं बद्धमुक्ती आत्मत्वीं ॥ ५० ॥ हो कां जीवात्म्यासी बद्धता । सत्य नाहीं गा तत्त्वतां । मा मज परमात्म्यासी अवस्था ।

टोंचील, काजळ वाऱ्याच्या कपाळीं लागेल, किंवा विजेच्या कपाळीं जर सगळे बाशिंग बांधतील ३६ किंवा आकाश तुटून समुद्रांत बुडेल, पर्वतासह सर्व पृथ्वी वाऱ्यानें उडून जाईल, किंवा सूर्य अंधारांत अडखळून पडेल, तर मी गुणांत सांपडेन. ३७ अंतरिक्षांतील आकाशांत सरोवर असावें, त्यांत सुंदर कमळें उगवावींत व त्यांतील मधाचें भ्रमरांनीं सेवन करावें, हें जेव्हां खरोखर घडेल, ३८ तेव्हां मी–आत्मा गुणांच्या संगतीनें अनेप्रकारचे विषयभोग भोगून त्या विषयासक्तीनें स्वतः गुणाकडून बांधला जाईन. ३९ त्रिगुणांच्या अधीन होऊन वागलें असतां गुणांचें कार्याशीं तादात्म्य होतें. त्यामुळें भ्रांत मनुष्याला बद्ध व मुक्त या अवस्थांचा खोटाच भास होतो. ४० आत्मा गुणांहून अगदीं पृथक् आहे, हें जरी खरें मानिलें, तरी आत्मा गुणांबरोबर असल्यामुळें त्याच्यांत विकार अवश्य उत्पन्न होईल, असें जर तूं म्हणशील, तर ऐक. ४१ अग्नीच्या संगानें भांडें तापतें, त्या भांड्याच्या संगानें त्यांतील पाणी तापतें, त्या पाण्यामुळें अन्न शिजतें, पण त्यामुळें अग्नीला कांहीं विकार होत नाहीं. त्याचप्रमाणें आत्म्याला गुणांच्या कार्यानें विकारत्व येत नाहीं. ४२ अग्नीच्या उष्णतेनें आकाश तापत नाहीं. त्याचप्रमाणें आत्मा गुणांच्या संगतींत असला तरी विकार पावत नाहीं. ४३ नटानें आंधळ्याचें सोंग घेतलें म्हणजे तो कांहीं खरोखर आंधळा होत नाहीं. त्याप्रमाणें आत्मा गुणांच्या संगानें बद्ध होत नाहीं. ४४ आत्मा शुद्ध आहे व गुण मायिक आहेत. तेव्हां त्या दोहोंचा परस्परांशीं कांहीं संबंध नाहीं. ४५ आत्मा व्यापक आहे व गुण परिच्छिन्न आहेत. ४५ त्यामुळेंहि तो त्यांनीं बद्ध होत नाहीं. रांजण सर्व समुद्रांतील जळ आपल्या पोटांत कसें सांठवूं शकणार ! ४६ किंवा मोहरीमध्यें जर मेरु पर्वत राहील, आपल्या हाताच्या पाशांत पृथ्वी सामावेल, मुंगी हत्तीला ग्रासील, काजवा सूर्याला खाईल, ४७ डांस ब्रह्मांडाला बांधील, पतंग प्रलयाग्नीला गिळील तर आत्मा गुणसमूहांत गुणांकडून बांधला जाईल. ४८ याप्रमाणें आत्म्याला बद्धता संभवतच नाहीं. अर्थात् बंधाबरोबर मुक्तिहि गेली, म्हणून मी आत्मा बद्ध व मुक्त या दोन्ही अवस्थांच्या पलीकडे आहें. ४९ स्वप्नांत एखादें अत्यंत पुण्यकृत्य किंवा महापातक आचरिलें तर जागेपणीं तीं दोन्हीं खोटींच ठरतात. त्याप्रमाणें आत्म्याला बंध व मोक्ष नाहीं. ५० म्हणून जीवात्म्याला बंधन आहे, असें जें

बद्धमुक्तता ते कैंची ॥ ५१ ॥ बिंबीं प्रतिबिंब नाहीं । मध्यें आरिशाचे ठायीं । मळ बैसले ते पाहीं । प्रतिबिंबाचे देहीं लागले दिसती ॥ ५२ ॥ तो मळ्ळ जैं पडे फेडावा । तैं आरिसाचि साहणें तोडावा । परी प्रतिबिंब त्या साहणें धरावा । हें सद्भावा मिळेना ॥ ५३ ॥ जेवीं जीवशिवभेद नाहीं । दोष अंतः-करणाच्या ठायीं । तें चित्त शुद्ध केल्या पाहीं । बंधमोक्ष दोही बोळवण ॥ ५४ ॥ तैसें आविद्यक हें सकळ । गुणकार्य नाना मळ । जीवा अंगीं प्रबळ । मूढमती स्थूळ स्थापिती ॥ ५२ ॥ जैं सत्वगुण निरसी सबळ । तैं आविद्यक फिटती मळ । तेचि सद्विद्या होय निर्मळ । जीवाचि केवळ शिव होय ॥ ५६ ॥ तेव्हां जीवशिव नामें दोनी । जाती मजमाजीं समरसोनी । तैं मीच एकवांचूनी । आन जनींवनीं असेना ॥ ५७ ॥ जीवभावनें मीचि जीवू । शिवभावनें मीचि शिवू । मी एकू ना बहू । माझा अनुभवू मीचि जाणें ॥ ५८ ॥ म्हणी आशंका धरिशी येथ । जरी जीव शिव तूंचि समस्त । तरी ते शुकवामदेवचि कां मुक्त । येरां म्हणत जड जीव ॥ ५९ ॥ तूंचि जीवरूपें तत्त्वतां । तरी हे ऐशी कां विषमता । शुकवामदेवांची अवस्था । वेदशास्त्रार्थां संमत ॥ ६० ॥ तिहीं लोकांमाजीं जाण । वेदवचन तंव प्रमाण । हें बोलणें विलक्षण । अप्रमाण जैं मानिशी ॥ ६१ ॥ हो कां वेद म्हणे जें निश्चित । तें बोलणें माझें निःश्वसित । तो मी स्वमुखीं जें बोलत । तें तूं अयुक्त म्हणतोसी ॥ ६२ ॥ जो मी वेदांचा वेदवक्ता । सकळ शास्त्रांचा मूळकर्ता । त्या माझें वचन म्हणसी वृथा । अतियोग्यता तुज आली ॥ ६३ ॥ वेदांचें जाण त्रिविध बंड । त्रिकांडीं केला तो त्रिखंड । वेदबळें बा पाखंड । वाजवी तोंड अव्हासव्हा ॥ ६४ ॥ भासले बहुसाल मज भेद । वेदबळें नाना वाद । तो वेद माझा

म्हणतात तें खरें नव्हे. मग मज परमात्म्याला बद्ध व मुक्त अवस्था कोठच्या ! ५१ मूळ बिंबांत किंवा त्याच्या प्रतिबिंबांत मलीनता नसते. परंतु आरसा मलीन असला कीं, प्रतिबिंब मलीन दिसूं लागतें. ५२ ती मलिनता जर काढून टाकावयाची असली तर आधीं आरसाच सहाणेवर घांसून स्वच्छ करावा. प्रति-बिंबाला सहाणेवर घासणें केव्हांहि योग्य नव्हे. ५३ त्याचप्रमाणें जीव व शिव यांच्यांत भेद नाहीं. परंतु अंतःकरणांत दोष आहेत. ते चित्तशुद्धीनें नाहींसे केले म्हणजे बंध व मोक्ष दोन्ही जातात. ५४ त्याचप्रमाणें हें सर्व अविद्यात्मक आहे. मूढमती जीवाच्या ठिकाणीं स्थूल गुणांचें कार्यरूप प्रबळ मळ नानाप्रकारें आरोपितात. ५५ पण पुरुष जेव्हां प्रबल सत्त्वगुणानें त्यांचें निरसन करितो, तेव्हांच अविद्येपासून उत्पन्न होणारे दोष नाहींसे होतात. तीच पवित्र सद्विद्या होय. त्यावेळीं जीवच शिव होतो. ५६ जीव व शिव हीं दोन्ही नांवें माझ्यामध्यें समरस होतात व माझ्या एकट्यावांचून या जगांत किंवा रानांत कांहींहि उरत नाहीं. ५७ जीवभावनेनें मीच जीव आहें व शिव या भावानें मीच शिव आहें, मी एक नाहीं व अनेक नाहीं. माझा अनुभव मीच जाणें. ५८ आतां तूं अशी शंका घेशील कीं, तूंच जर जीव व शिव हें सर्व आहेस, तर मग शुक-वामदेवादिकच कायते मुक्त व इतर सर्व जड जीव बद्ध असें कां म्हणतात ? ५९ तूंच जर खरोखर जीवरूपानें असतोस तर मग अशी विषमता कां असावी ! शुक-वामदेवादिकांसारख्या जीवन्मुक्त सिद्धांची स्थिति वेद व शास्त्रें यांसहि संमत आहे ६० आणि वेदवचन तर त्रैलोक्यांत प्रमाण आहे. पण तुझें हें बोलणें विलक्षण आहे, त्यामुळें तें अप्रमाण आहे, असें जर तूं म्हणशील तर तसेंच कां होईना ! ६१ तथापि वेद जें सांगतो तें जर खरें आहे व वेदाची वाणी हे माझे श्वासोच्छ्वासच आहेत तर मग मी स्वतः जें बोलतों तें तूं अप्रमाण कां म्हणतोस ! ६२ मी जो वेदांना वदविणारा, सर्व शास्त्रांचा मूळ कर्ता, त्या माझें बोलणें तूं अयोग्य म्हणतोस. तेव्हां तूं फारच विद्वान् आहेस ! ६३ वेदांचे तीन प्रकार आहेत. त्यांचे कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड असे तीन विभाग केले आहेत. त्यामुळें पाखंडी, नास्तिक लोक वेदवाक्यांचा आधार दाखवून अद्वातद्वा बडबडत सुटतात. ६४ पण ज्यांत अनेकप्रकारचे मतभेद भासतात व ज्याच्या बळावर नानातऱ्हेचे वाद उपस्थित होतात तो वेद माझा परोक्षवाद म्ह० केवल शब्दज्ञान आहे. आत्मानुभवाची योग्यता त्याहून वेगळीच आहे. तेव्हां केवल वेदवचनांवरून

परोक्षवाद । तेणें तत्त्वावबोध केवीं होय ।। ६५ ।। शब्दज्ञान ब्रह्मज्ञान । बाह्यदृष्टी समसमान । जेवीं वाल आणि वालभर सुवर्ण । तुकितां पूर्ण समता आली ।। ६६ ।। परी वाला सुवर्णा समता । मोलें कदा नव्हे तत्त्वतां । तेवीं वेदवादयोग्यता । ब्रह्मानुभविता सम नव्हे ।। ६७ ।। जो मी हरिहरां प्रमाण । त्या माझें वचन अप्रमाण । तूं म्हणशी हा ज्ञानाभिमान । हेंही जाणपण सांडावें ।। ६८ ।। माझें वचन सत्याचें सत्य । सत्य मानूनि निश्चित । येणें भावें साधे परमार्थ । हें ब्रह्मलिखित मद्वाक्य ।। ६९ ।। उद्धवा मज पाहतां । वसिष्ठवामदेवादि समस्तां । न देखे बद्ध आणि मुक्तता । हा माझा तत्त्वतां निजबोधु ।। ७० ।। मुक्तांचिये दृष्टीं । मुक्तच दिसे सकळ सृष्टी । तेथें शुकवामदेवांची गोष्टी । वेगळी पाठी केवीं राहे ।। ७१ ।। बद्धमुक्तांहूनि भिन्न । परमात्मा मी चिद्घन । जरी म्हणसी जीवासी बंधन । तेंही सत्यत्वें जाण घडेना ।। ७२ ।।

शोकमोहौ सुखं दुःखं देहोत्पत्तिश्च मायया । स्वप्नो यथाऽऽत्मनः ख्यातिः संसृतिर्न तु वास्तवी ।। २ ।।

दोन मुहूर्तें स्वप्नवृत्ती । त्यामाजीं देखे जन्मपंक्ती । तेथें पावला नाना याती । तेवीं मिथ्या प्रतीती भवभावां ।। ७३ ।। नसता आभासु मावळे ठायीं । त्यालागीं हाहाकारू उठे देहीं । गेले मेले नाहीं नाहीं । शोक पाहीं त्या नांव ।। ७४ ।। भग्नपात्रीं भरिलें जळ । तेथें बिंबलें चंद्रमन्डळ । तें पात्र पोटेंशीं धरी बाळ । रत्न प्रबळ हें माझें ।। ७५ ।। जळ गळोनि जाय सकळ । चंद्रमा हरपे तत्काळ । त्यालागीं तळमळी तें बाळ । शोकु केवळ या नांव ।। ७६ ।।

तत्त्वज्ञान कसें होणार ! ६५ शब्दज्ञान व ब्रह्मज्ञान हीं दोन्हीं वरून पहाणारास सारखींच दिसतात; परंतु एकाच ताजव्यांत ठेवलेले वाल व सोनें हीं दोन्ही वजनांत जरी सारखींच भरतात ६६ तरी सोनें व वाल यांची किंमत मात्र केव्हांहि सारखी होत नाहीं, त्याचप्रमाणें वेदवादाची योग्यता व ब्रह्मज्ञानाचा अनुभव हीं दोन्हीं समान नाहींत. (ब्रह्मज्ञान सुवर्णासारखें अमूल्य आहे.) ६७ मी जो हरिहरांसहि प्रमाण आहें त्या माझें वचन जर तूं अप्रमाण म्हणशील तर हा केवळ तुझा ज्ञानाभिमान आहे. म्हणून तूं हाहि अभिमान टाकून दे. ६८ माझें वचन सत्याहूनहि सत्य आहे, असें खात्रीनें समज. या भावनेनेंच परमार्थ साधतो. हें माझें वचन ब्रह्मलिखित समज. ६९ हे उद्धवा ! मला वसिष्ठ-वामदेवादि कोणामध्येंच बद्ध व मुक्त या दोन्ही अवस्था दिसत नाहींत. हेंच माझें खरें आत्मज्ञान आहे. ७० मुक्तांच्या डोळ्यांना सर्व जगत् मुक्तच दिसतें; मग शुक-वामदेवादिकांची गोष्ट वेगळी सांगण्याचें काय कारण उरलें ! ७१ मी परमात्मा चिद्घन बद्ध व मुक्त या दोहोंहून अगदीं भिन्न आहें. आतां जीवाला बंधन असतें असें जर तूं म्हणशील तर तेंहि खरें नाहीं. ७२.

—याप्रमाणें कारणभूत गुणांना मायाममत्व असल्यामुळें त्यांचा कार्यरूप संसारहि मायाच आहे. याचा विस्तार करितात—

शोकमोहौ सुखं दुःखं देहोत्पत्तिः च मायया—शोक, मोह, सुख, दुःख व देहाची उपत्ति मायेनें होते. **यथा स्वप्नः आत्मनः ख्यातिः**—ज्याप्रमाणें स्वप्न हा बुद्धीचाच अन्यथा परिणाम आहे त्याप्रमाणें शोक-मोहादि हा मायाविवर्त आहे. **संसृतिः वास्तवी न तु**—संसार वास्तविक नाही. २.

स्वप्न दोन घटकाच असतें; परंतु तेवढ्या वेळांत आयुष्यांतील असंख्य गोष्टी दिसतात व निरनिराळ्या जातींत जन्म झालेला दिसतो, त्याचप्रमाणें संसार व त्यांतील विषय यांची प्रतीति मिथ्याच आहे. ७३ आभास स्वरूपांत मावळतो व त्यामुळें गेले, मेले, नाहीं, नाहीं असा हाहाकार होतो. यालाच शोक हें नांव आहे. ७४ फुटक्या भांड्यांत पाणी भरलें व त्या पाण्यांत चंद्राचें प्रतिबिंब पडलें, म्हणजे लहान बालक हें माझें रत्न म्हणून तें भांडें पोटाशीं घट्ट धरून ठेवितें. ७५ परंतु त्यांतील सर्व पाणी गळून गेलें म्हणजे चंद्रबिंब आपोआप नाहींसें होतें, तेव्हां त्या बालकाला मोठी तळमळ वाटते. यालाच शोक असें म्हणतात. ७६

अथवा घटचंद्र धरूं जातां । तो न ये बालकाचे हाता । यालागीं करी जे जे व्यथा । शोक सर्वथा या नांव ॥ ७७ ॥ काढावया आरशांतील धन । करी दर्पणामाजीं खनन । फुटल्या नागवलों म्हणे जाण । शोक दारुण या नांव ॥ ७८ ॥ नसते वस्तूच्या ठायीं जाण । मी माझें हा अभिमान । तेंचि मोहाचें लक्षण । ममता दारुण ते संधी ॥ ७९ ॥ देखोनि मृगजळाचें तळें । येणें पिकती रायकेळें । यालागीं मृगतृष्णेचीं जळें । औटकाळें राखतू ॥ ८० ॥ मृगजळाकडे कोणी भंवे । त्यासीं सक्रोधें भांडूं धांवे । अतिमोहित मोहस्वभावें । विवेकू न करवे सत्याचा ॥ ८१ ॥ तेवीं पुत्रापासोन सुखप्राप्ती । माता पिता होईल म्हणती । शेखीं पुत्र अंगोठा दाविती । केवळ भ्रांतिमोहो ॥ ८२ ॥ गंधर्वनगरीची रचना । देखोनि अभिलाष होय मना । ते घ्यावया मेळवी सेना । नानासूचनाउपायें ॥ ८३ ॥ तैसा मिथ्या देहीं अभिमान । देहसंबंधाची ममता गहन । हेचि मोहाचें मूळ लक्षण । ममताभिमान प्राणियां ॥ ८४ ॥ एवं अहं आणि ममता । हेचि मोहाची माता पिता । त्यांचेनि उत्तरोत्तर वाढतां । जनमोहिता व्यामोहो ॥ ८५ ॥ प्रियविषयीं आसक्ति देख । याची नित्यप्राप्ती अनेक । त्याचि नांव म्हणती सुख । जेवीं चाखितां विख अतिमधुर ॥ ८६ ॥ विषयप्राप्तीं जो हरिख । तया नांव म्हणती सुख । विषय-विनाश तेंचि दुःख । परम असुख त्या नांव ॥ ८७ ॥ शोक मोह सुख दुःख । येणेंचि देहाची प्राप्ती देख । देहाभिमानें देह अनेक । दुःखदायक भोगवी ॥ ८८ ॥ जो जेणें तीव्रध्यानें मरे । तो तेंचि होऊनि अवतरे । कां जो निमे अतिद्वेषकारें । तो द्वेषानुसारें जन्मतू ॥ ८९ ॥ सर्प मुंगुस पूर्ववृत्ती । वैराकारें जन्म पावती । जे जे वासना उरे अंतीं । ते ते गती प्राण्यासी ॥ ९० ॥ यालागीं हृदयामाजीं निश्चितीं । जे सबळ वासना उठे अंतीं । तो तो प्राणी पावे तिये गती । श्रुति बोलती पुराणें ॥ ९१ ॥

किंवा पाण्यांत पडलेलें चंद्राचें प्रतिबिंब धरावयास जाऊन तें हातीं आलें नाहीं, म्हणजे मुलाच्या मनाला जी व्यथा होते त्यालाच शोक असें नांव आहे. ७७ आरशांतील धन काढून घेण्यासाठीं आरसाच खोदला व तो फुटला म्हणजे माझें नुकसान झालें म्हणून आक्रोश करणें, यालाच दारुण शोक म्हणतात. ७८ नसलेल्या वस्तूवर 'मी व माझें' असा अभिमान ठेवणें हें मोहाचें लक्षण आहे. त्यावेळीं भयंकर ममता उत्पन्न होते. ७९ मृगजलाचें तळें पाहून त्या पाण्यानें राजेळीं केळीं पिकतील, या आशेनें त्या तळ्याचें रक्षण करीत क्षणभर बसावें ८० व त्या मृगजलाकडे कोणीं जरा नजर टाकिली कीं त्याच्याशीं क्रोधानें भांडावयास उठावें. भ्रांतीनें इतकें मोहान्धत्व येतें. सत्याचा विचार करवत नाहीं. ८१ त्याचप्रमाणें आई-बाप पुत्रांपासून सुखप्राप्ति होईल अशी आशा करितात, पण अखेरीस ते पुत्र आंगठा दाखवून लेशमात्र सुख देत नाहींत. अर्थात् हा पुत्रांवरील मोह केवळ भ्रामक आहे. ८२ मेघांतील गंधर्व-नगरीची रचना पाहून मनांत अभिलाष उत्पन्न व्हावा व ती नगरी हस्तगत करण्यासाठीं अनेक उपाय व कल्पना योजून सैन्य जमा करावें, ८३ त्याचप्रमाणें देहावरील अभिमान व्यर्थ आहे. देहाविषयीं ममता मोठी कठिण आहे. प्राण्यांची ममता आणि अभिमान हेंच मोहाचें मूळ लक्षण आहे. ८४ याप्रमाणें ममता व अहंकार हेच मोहाचे आई-बाप आहेत. त्यांची जशी वाढ होते तसा मोह जास्त जास्त वाढतो. ८५ आवडत्या विषयांवर आसक्ति असते व त्याची अनेकप्रकारें सतत प्राप्ति झाली म्हणजे त्यालाच सुख म्हणतात, पण विषाची चव घेतांना त्याला अतिमधुर म्हणण्यासारखेंच हें आहे. ८६ विषयप्राप्तीनें जो आनंद होतो, त्यालाच सुख असें म्हणतात व विषयांचा नाश हेंच दुःख, त्यालाच असुख असें म्हणतात. ८७ शोक, मोह, सुख, दुःख यांनींच देहप्राप्ति होते. देहाभिमानामुळें अनेक दुःखदायक जन्म घ्यावे लागतात. ८८ जो प्राणी ज्या गोष्टीचा सारखा ध्यास लागून मरण पावतो, तो तेंच होऊन दुसरा जन्म घेतो. किंवा जो अत्यंत द्वेषानें मरतो तो त्या द्वेषानुसारच जन्माला येतो. ८९ सर्प व मुंगुस यांची पूर्व-जन्मीची वृत्ति वैराची असते, म्हणून ते वैरभावानें जन्मतात. मरणकालीं जशी वासना रहाते, त्याप्रमाणें जीवाला पुढला जन्म मिळतो. ९० अंतःकरणांत अंतकाळीं जी वासना प्रबल होते, त्याप्रमाणें त्या प्राण्याला पुढला जन्म प्राप्त होतो, असें श्रुति व पुराणें सांगतात. ९१ मनुष्याच्या बरोबर असलेली त्याची छाया जशी मिथ्या, तशीच ब्रह्मामध्यें

पुरुषासवें वृथा छाया । तैशी ब्रह्मीं मिथ्या माया । ते उपजवी गुणकार्या । देह भासावया मूळ ते ॥ ९२ ॥ जेवीं कां स्वप्नीं एकलें मन । नानाकार होय आपण । तेवीं चैतन्याचें अन्यथाभान । तें हें जाण चराचर ॥ ९३ ॥ एवं वस्तुतां संसार नाहीं । तेथें सुखदुःख कैंचें कायी । देहेंवीण छाया पाहीं । कोणे ठायीं उपजेल ॥ ९४ ॥ जें उपजलेंच नाहीं । तें काळें गोरें सांगों कायी । अवघें स्वप्नप्राय पाहीं । वस्तुतां नाहीं संसारू ॥ ९५ ॥ इहीं दोहीं श्लोकीं अगाधू । परिहरिला वस्तुविरोधू । आतां प्रतीतीनें जो अनुरोधू । तो सत्या बाधू करूं न शके ॥ ९६ ॥ डोळां अंगुळी लाविती । तेणें दोन चंद्र आभासती । गगनीं दों चंद्रां नाहीं वस्ती । मिथ्या प्रतीती निराकारीं ॥ ९७ ॥

विद्याऽविद्ये मम तनू विद्ध्युद्धव शरीरिणाम् । मोक्षबन्धकरी आद्ये मायया मे विनिर्मिते ॥ ३ ॥

निजबोधें येत बोधा । ब्रह्माहमस्मि स्फुरे सदा । तें जाण शुद्ध विद्या । जे अविद्याछेदक ॥ ९८ ॥ मी पापी मी सदा निर्दैवो । ऐसा नित्य स्फुरे भावो । तेचि सबळ अविद्या पहा हो । जे नाना संदेहो उपजवी ॥ ९९ ॥ एकीं जीवातें घाली बंदीं । एकी जीवाचें बंधन छेदी । या दोनी माझ्या अवस्थाशक्ति अनादी । जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ १०० ॥ तूं चिन्मात्र चैतन्यघन । चित्स्वरूपें वृत्तिशून्य । तुज शक्ती कैंच्या जाण । निर्धर्मकपणें सर्वदा ॥ १ ॥ उद्धवा हे आशंका वायां । कारण नाहीं करावया । या शक्ती जन्मवी माझी माया । जे न ये आया सुरनरां ॥ २ ॥ सत् म्हणों तरी तत्काळ नासे । असत्

असलेली मायाहि मिथ्याच आहे. ती माया गुणांचें कार्य उत्पन्न करिते. देह भासण्याचें मूळ तेंच आहे. ९२ ज्याप्रमाणें स्वप्नांत एकटेंच असलेलें मन स्वतः अनेक आकारांचें होतें, त्याचप्रमाणें चैतन्याचा मिथ्याभास हेंच चराचर विश्व होय. ९३ जेथें वास्तविक संसारच नाहीं, तेथें सुख व दुःख तरी कोठचें ! देहावांचून छाया कशी व कोठें पडणार ! ९४ खरोखर हें सर्व स्वप्नवत् आहे. जें मुळीं उत्पन्नच झालें नाहीं, तें काळें किंवा गोरें किंवा कसें म्हणून सांगावें ! यास्तव खरोखर संसार नाहीं. ९५ या दोन श्लोकांत अगाध वस्तुविरोधाचा परिहार केला. आतां अनुभवानें भासणारा जो विरोध तो सत्याचा बाध करूं शकत नाहीं. ९६ आपण डोळ्यांसमोर बोट धरून चंद्राकडे पाहूं लागलें असतां दोन चंद्र दिसतात; परंतु खरोखर आकाशांत कांहीं दोन चंद्र नाहींत. तसाच निराकारांतहि मिथ्याभास होतो. ९७.

——यास्तव यांत वस्तुतः विरोध नाहीं. प्रतीतितः भासणारा जो विरोध तो औपाधिकाहि संभवतो, असें आतां सांगतात——

हे उद्धव–हे उध्दवा ! **विद्याविद्ये मम तनू**–विद्या व अविद्या या बंध व मोक्ष यांना सिद्ध करणाऱ्या माझ्या दोन शक्ति आहेत. **शरीरिणां मोक्षबंधकरी**–या प्राण्यांच्या बंधाला व मोक्षाला उत्पन्न करणाऱ्या आहेत. **मे मायया विनिर्मिते**–कारण मायावृत्तिरूप असल्यामुळें माझ्या मायेनें त्या उत्पन्न केलेल्या आहेत. (अहोपण, त्यांना जर कार्यत्व असेल तर बंध व मोक्ष यांना अनादित्व संभवणार नाहीं. उत्तर–) आद्ये–त्या दोन्ही अनादि आहेत. (यास्तव जोंवर मी अविद्येला प्रवृत्त करितों तोंवर बंध व जेव्हां विद्येला प्रवृत्त करितों तेव्हां मोक्ष स्फुरतो, असा यास्त भावार्थ. भवपाशानें बंधक व भवपाशापासून मोचक याप्रमाणें कैवल्य देणारा परब्रह्मरूप सनातन विष्णूच आहे, असें स्कंदपुराणांतहि सांगितलें आहे.) ३.

जिचा आत्मज्ञानानेंच प्रत्यय येतो, 'ब्रह्मास्मि' अशी सतत स्फूर्ति होते, तीच शुद्ध विद्या आहे, असें जाण आणि तीच अविद्येचा छेद करणारी आहे. ९८ मी पातकी, मी दुर्दैवी, अशी जी नित्य भावना होते, तीच प्रबल अविद्या होय. तीच अनेक संशय उत्पन्न करिते. ९९ अविद्या जीवाला बंधांत घालिते व विद्या जीवाचें बंधन तोडून टाकिते. या दोन्ही अवस्था माझ्या अनादि शक्ति आहेत, असें तूं निश्चयानें जाण. हे उद्धवा ! १०० 'तूं चिन्मात्र, चिद्घन, चित्स्वरूप व त्यामुळेंच वृत्तिशून्य, असा सदासर्वदा धर्मरहित असतांना तुझ्या शक्ति कशा संभवतात !' १ असें जर तूं म्हणशील तर हे उद्धवा ! असा संशय घेण्याचें कांहीं कारण नाहीं. माझी माया या शक्ति उपजविते. ती देव व मानव यांच्या आटोक्यांत येत नाहीं. २ तिला सत् म्हणावें तर ती तत्काल नाश पावते

म्हणों तरी आभासे । जिणें नामरूपांचें पिसें । लाविलें असे जगासी ॥ ३ ॥ नातुडे संतासंतबोली । माया अनिर्वचनीय जाली । तिणें विद्या अविद्या इयें पिलीं । वाढविलीं निजपक्षीं ॥ ४ ॥ आजिकाळीं केल्या नव्हती । विद्या अविद्या अनादिशक्ती । बंधमोक्षांतें भासविती । या दोनी शक्ति मायेच्या ॥ ५ ॥ ते माया तूं म्हणसी कोण । तुझी कल्पना ते माया पूर्ण । बद्धमुक्ततास्फुरण । तीमाजीं जाण स्फुरताती ॥ ६ ॥ बंधमोक्षांची राहती स्थिती । ते मी सांगेन तुजप्रती । ऐक उद्धवा निश्चितीं । यथानिगुतीं निवाडें ॥ ७ ॥ स्वप्नीं न देखे आराधन । ज्यासी नाहीं माझें भजन । अविद्या त्यामाजी संपूर्ण । प्रबळ जाण वाढत ॥ ८ ॥ जो माझ्या ठायीं अतिसादर । भजनशीळ आठौ प्रहर । ते ब्रह्मविद्येचें घर । तेथ निरंतर ते वाढे । जेथ माझा भजनाचा उल्हासू । तेथ अविद्येचा निरासू । तोचि ब्रह्मविद्येचा प्रवेशू । हा अतिविश्वासू भक्तांचा ॥ ११० ॥ येथ बद्धाचे कारण । आणि मोक्षाचें साधन । भक्तीचें दृढ स्थापन । अर्थास्तव जाण बोलिलों ॥ ११ ॥ ज्या बंधमोक्षां दोनी वृत्ती । त्या तूं मायेच्या म्हणसी शक्ती । तेव्हां माया जाली मोक्षदाती । हें केवीं श्रीपति घडेल ॥ १२ ॥ जरी माया जाली मोक्षदाती । तरी कां करावी तुझी भक्ती । हेंचि सत्य गा श्रीपती । सांग निश्चितीं निवाडू ॥ १३ ॥ कृष्ण म्हणे उद्धवासी । स्वयें चलन नाहीं छायेसी । तेवीं सामर्थ्य नाहीं मायेसी । केवीं मोक्षासी ते देईल ॥ १४ ॥ जो मायेचा नियंता । तो विष्णु मोक्षाचा दाता । तोडूनि जीवाची बद्धता । सायुज्यता देतसे ॥ १५ ॥ म्हणशी अविद्या कामकर्मादृष्टें । जीवासी बंधन लागे मोटें । तें ब्रह्मविद्या निष्कर्में तुटे । हा बोध करी नेटें गुरु श्रुतिद्वारा ॥ १६ ॥ येथ विष्णु काय जाला कर्ता । मा तो होईल मोक्षदाता । हें विकल्पाची वार्ता । न घडे सर्वथा उद्धवा

व असत् म्हणावें तर ती भासते. तिनें जगाला नांव व रूप यांचें वेड लाविलें आहे. ३ मायेला सत् किंवा असत् म्हणतां येत नाहीं. म्हणून ती माया अनिर्वचनीय आहे, (माया म्ह० कल्पना. तिच्यामुळें बंध व मोक्ष भासतात. अर्थात् ते काल्पनिक आहेत.) त्या मायेनें विद्या व अविद्या हीं दोन पिलें आपल्या पंखाखालीं वाढविलीं. ४ विद्या व अविद्या या आजकालच्या नाहींत. त्या अनादिशक्ति आहेत. मायेच्या या दोन्ही शक्ति बंध व मोक्ष भासवितात. ५ आतां तूं म्हणशील कीं, ती माया कोण आहे ! तर ऐक. तुझी कल्पनाच माया आहे. तिच्यापासूनच बद्ध व मुक्त या अवस्था स्फुरतात. ६ हे उद्धवा ! आतां मी तुला बंधमोक्षाचें स्वरूप स्पष्टपणें व सविस्तर सांगतों, तें तूं निश्चयानें ऐक ! ७ ज्याला स्वप्नांतहि माझी आराधना ठाऊक नाहीं, माझें भजन माहीत नाहीं, त्याच्यामध्यें अविद्या म्ह० पूर्ण अज्ञान त्वरेनें वाढत असतें ८ आणि जो माझ्यांत अत्यंत सादर व आठहि प्रहर भजनशील असतो, तें ब्रह्मविद्येचें साक्षात् घरच होय. त्याच्यांत विद्या जोरानें वाढत असते. ९ जेथें माझ्या भजनाची हौस असते तेथें अविद्या आपणच नाहींशी होते. तोच ब्रह्मविद्येचा प्रवेश आहे, असा भक्तांचा दृढ विश्वास असतो. ११० येथपर्यंत भक्तीची दृढ स्थापना व्हावी या हेतूनें मीं बंधाचें कारण व मोक्षाचें साधन सांगितलें. ११ (यावर उद्धवानें विचारिलें कीं) 'बंधमोक्षाच्या ज्या दोन वृत्ति आहेत त्यांना तूं मायेच्या शक्ति म्हणतोस. तेव्हां माया मोक्ष देणारी झाली. हे श्रीपते ! पण असें कसें होईल, १२ कारण माया जर मोक्षदात्री झाली तर मग तुझी भक्ति करण्याचें तरी काय कारण ! तेव्हां खरें काय आहे, त्याचा निश्चित निर्णय करून सांग.' १३ तेव्हां श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले कीं, छायेला स्वतःची गति नाहीं. पदार्थांत चलन झालें तर छाया हालते. त्याप्रमाणें मायेला स्वतःचें सामर्थ्य नाहीं. ती मोक्ष कसा देईल ! १४ मायेचा नियंता जो विष्णु तो मोक्ष देणारा आहे, तो जीवाची बद्धता तोडून त्यास सायुज्य मुक्ति देतो. १५ यावर तूं असें म्हणशील कीं, अविद्या आणि काम, कर्म व अदृष्ट यांनीं जीवाला मोठें बंधन प्राप्त होतें व तें ब्रह्मविद्या याच निष्कर्मानें तुटतें. गुरूहि श्रुतिद्वारां हाच उपदेश निश्चयानें करितात. १६ यांत विष्णु काय कर्ता झाला ! मग तो मोक्ष देणारा तरी कसा होईल ! हे उद्धवा ! असा विकल्प तूं मनांतहि आणूं नकोस. १७ कारण गुरु हा विष्णूच, श्रुत्यर्थहि विष्णूच व शमदमादि साधनेंहि विष्णूच होय, असें तूं

॥ १७ ॥ गुरुरूपें विष्णु जाण । श्रुत्यर्थ विष्णूचि आपण । शमदमादि साधन । तेंही जाण विष्णूचि ॥ १८ ॥ शिष्यबुद्धीसी बोधकता । विष्णुचि जाण तत्त्वतां । यापरी गा निजभक्तां । मोक्षदाता श्रीकृष्ण ॥ १९ ॥ त्या मोक्षाचा जो परिपाक । ते समाधि श्रीविष्णुचि देख । समाधीचें समाधिसुख । आवश्यक श्रीविष्णू ॥ १२० ॥ परमात्मा परिपूर्ण । तो मी विष्णु ब्रह्म सनातन । भक्तभवपाशमोचन । कृपाळू जाण करीतसें ॥ २१ ॥ गत श्लोकींचेनि अनुवादें । 'शरीरिणाम्' येणें पदें । जीवासी बद्धपण उद्बोधें । तेंही विनोदें निवारितों ॥ २२ ॥ एकासीच बद्धमुक्तता । घडे न घडे तत्त्वतां । या उद्धवाच्या प्रश्नार्थां । विशद आतां करीतसें ॥ २३ ॥

एकस्यैव ममांशस्य जीवस्यैव महामते । बन्धोऽस्याविद्ययाऽनादिर्विद्यया च तथेतरः ॥ ४ ॥

रितीवाढी असे अग्नीशी । तेथ फुणगे उसळले आकाशीं । रितीवाढी नाहीं स्वरूपासी । असंभाव्यासी ठावो कैंचा ॥ २४ ॥ जेणें पाविजे निजबोधातें । ते बुद्धी उद्धवापाशीं वर्ते । यालागीं कृष्ण म्हणे महामते । उद्धवातें अतिप्रीतीं ॥ २५ ॥ अतिप्रीतीं पुरस्करून । उद्धवासी म्हणे सावधान । ये श्लोकींचा अर्थ गहन । ते धारणा जाण धरावी ॥ २६ ॥ यालागीं कृष्ण जगजेठी । उद्धवाची पाठी

खात्रीनें जाण. १८ शिष्याच्या बुद्धीला होणारें ज्ञानहि विष्णुरूपच आहे. याप्रमाणें आपल्या भक्तांना मोक्ष देणारा श्रीकृष्णच आहे. १९ मोक्षाची पूर्णावस्था जी समाधि तोहि विष्णुच आहे आणि समाधींतील समाधिसुखहि वास्तविक श्रीविष्णूच आहे. १२० जो परिपूर्ण परमात्मा, सनातन ब्रह्म, विष्णू, तोच मी आहें. मी दयाळुत्वानें भक्तांना संसारपाशांतून मुक्त करितों. २१ आतां मागील तिसऱ्या श्लोकांतील 'शरीरिणाम्' या पदाचा अनुवाद करून जीवाला येणारें जें बद्धत्व त्याचेंहि मी सहज निरसन करितों. २२ एकालाच बंध व मोक्ष वस्तुतः घडतो किंवा नाहीं, या उद्धवाच्या प्रश्नाचें उत्तर आतां स्पष्ट करून सांगतों. १२३.

—पूर्व श्लोकांत 'शरीरिणाम्' असा बहुवचनीं निर्देश केलेला असल्यामुळें विषयभेदानें अविरोध सांगितला. आतां भ्रांतीची व्यावृत्ति करणारे भगवान् बंध-मोक्षव्यवस्थेचें उपपादन करितात—

हे महामते—हे बुद्धिमान् उद्धवा ! अस्य एकस्य एव मम अंशस्य जीवस्य अविद्यया एव अनादिः बंधः—या एकाच माझ्या अंशाला म्ह० जीवालाच [मला नव्हे] अविद्येनेंच हा अनादि बंध आहे, तथा विद्यया च इतरः—त्याचप्रमाणें विद्येनें त्यालाच मोक्ष आहे. [आत्मा जरी एक, अभिन्न, अद्वितीय आहे तरी बंध मज आत्म्याला नाहीं, तो जीवालाच आहे. आत्मा जर एक आहे तर जीव त्याहून निराळा कोण ! व बंध, मोक्ष, सुख, दुःख इत्यादि व्यवस्था कशी ? या शंकेचें निरसन करण्यासाठीं त्या जीवाला माझा अंश असें म्हटलें आहे. त्यांतील आशय असा —ज्याप्रमाणें एकच असलेल्याहि चंद्रादि पदार्थांचा जलादि उपाधीमुळें बिंब—प्रतिबिंबरूप भेद दिसतो, जलामुळेंच चलनादिधर्म प्रतिबिंबाच्याच ठिकाणीं प्रतीत होतात, प्रतिबिंबांचाहि उपाधिभेदानेंच भेद होत असल्यामुळें एक घट फुटला असतां त्यांतील प्रतिबिंबाचेंच बिंबाशीं ऐक्य होतें, इतर घटांतील प्रतिबिंबाचें होत नाहीं, त्याप्रमाणें अविद्येमध्यें प्रतिबिंबित झालेल्या मदंशरूप जीवाचा अविद्याकृत बंध, उपाधीमुळें भेद व सुख-दुःखादि व्यवस्था संभवते. याविषयीं गौडपादाचार्यांनीं 'ज्याप्रमाणें एक घटाकाश, धूळ, धूर इत्यादिकांनीं युक्त झालें असतां सर्व घटाकाश त्यांनीं युक्त होत नाहींत, त्याप्रमाणें जीव परस्पर सुखदुःखांनीं युक्त होत नाहींत.' असें सांगितलें आहे. मां. भा. ३-५ पृ. १४८ पहा. हें अतिरहस्य आपल्या बुद्धीनेंच निश्चित करावें हें सुचविण्यासाठीं उद्धवाला 'महामते' असें म्हटलें आहे.] ४.

काष्ठांच्या संयोग-वियोगामुळें अग्नि कमी होतो व वाढतो, त्याच्या ठिणग्या आकाशांत उडतात. परंतु अग्नीच्या मूळस्वरूपांत कांहीं कमी-जास्त विकार होत नाहीं. त्याचप्रमाणें आत्मस्वरूपामध्यें कधीं वाढ होत नाहीं व तें कधीं कमी होत नाहीं. तेव्हां त्याचा अंश भासावयास अवकाश कोठचा ! २४ ज्या बुद्धीनें आत्मज्ञान प्राप्त होईल अशी बुद्धि उद्धवापाशीं असल्यामुळें श्रीकृष्ण अत्यंत प्रेमानें उद्धवाला हे महामते ! २५ असें संबोधून मोठ्या प्रीतीनें म्हणाले कीं, नीट लक्ष देऊन ऐक. या श्लोकाचा अर्थ फार गहन आहे. तो चांगला ध्यानांत धर. २६ नंतर जगच्छ्रेष्ठ श्रीकृष्णानें उद्धवाची पाठ थोपटून म्हटलें कीं, तुजवर माझी कृपा आहे

थापटी । अतिगुह्याची गुह्य गोष्टी । तुझे कृपेसाठीं मी बोलतों ।। २७ ।। पाठी थापटावयामिसें जाण । करीत स्वशक्तिसंचरण । तेणें अद्वयबोधलक्षण । उद्धवासी जाण प्रकाशी ।। २८ ।। जीवु एकचि त्रिजगतीं । हें जाण उद्धवा निश्चितीं । जेवीं नाना दीपांचिया दीप्ती । तेजाची ज्योति अभिन्न ।। २९ ।। दोनी दीप एक होती । तैशीं टिवळी ऐक्या न येती । जडत्वापाशीं भेदप्राप्ती । ऐक्यवृत्तीं अजडत्वीं ।। १३० ।। चंदनकुटके बहुवस । परी सर्वां एकुचि सुवास । तेवीं जीवरूपें मी अविनाश । परमपरेश आभासें ।। ३१ ।। जीवरूपें तूं श्रीकृष्ण । हें सत्य मानावें वचन । तैं भवपाशादि बंधन । तुजचि जाण आदळलें ।। ३२ ।। ऐशी कल्पिशी जरी वार्ता । ते मज न घडे गा सर्वथा । जेवीं शरीरासी प्राण चाळिता । शरीरअवस्था त्या नाहीं ।। ३३ ।। लिंगशरीरीं स्वयंभ । जीव तो मदंशें प्रतिबिंब । त्यासी देहादि बंधनभाव । मिथ्या विडंब आभासे ।। ३४ ।। घटें आवरिला अवकाश । त्या नांव म्हणती घटाकाश । घटभंगें त्या नव्हे नाश । तेवीं मी अविनाश जीवत्वीं ।। ३५।। थिल्लरीं प्रतिबिंबला सविता । तो गगन सांडोनि थिल्लराआंतौता । नाहीं रिघाला तत्त्वतां । तेवीं मी जीवत्वा अलिप्त ।। ३६ ।। रवि थिल्लरीं बिंबला दिसे । तेवीं मी लिंगदेहीं आभासें । मिथ्या तेथींचें भोगपिसें । तें बंधन कैसें मज लागे ।। ३७ ।। येथें बोलणें न लगे बहु । प्रतिबिंबा नांव जीवू । मुख्य बिंब तो मी शिवू । विशद उगवू हा जाण ।। ३८ ।। तळाव विहिरी नाना थिल्लरीं । सूर्यु प्रतिबिंबे त्यांमाझारीं । तितुकीं रूपें दिवाकरीं । पाहतां अंबरीं तंव नाहीं ।। ३९ ।। तैसें एकासी जें अनेकत्व । तें मिथ्या जाण जीवत्व । हें भागवताचें निजतत्त्व । शुद्ध सत्व ज्ञानाचें ।। १४० ।। थिल्लरीं प्रतिबिंबला सविता । चंचल निश्चल मळिनता । हे थिल्लराचे गुण तत्त्वतां । प्रतिबिंबमाथां मानिती ।। ४१ ।। तेवीं शिवासी बाधकता । पाहतां नाहीं गा

म्हणूनच ही मी अत्यंत गुह्यांतील गुह्य गोष्ट तुला सांगतों. २७ उद्धवाची पाठ थोपटण्याच्या निमित्तानें भगवानानें आपल्या शक्तीचाच त्याच्या अंगांत संचार करविला व त्यामुळें उद्धवाच्या अंतःकरणांत अद्वैतज्ञानाचें लक्षण प्रकट केलें. २८ हे उद्धवा ! ज्याप्रमाणें नानादीपांच्या दीप्तीमध्यें तेजाची एकच ज्योति असते त्याप्रमाणें या त्रैलोक्यांत आत्मा एकच आहे, हे तूं निश्चयानें जाण. २९ दोन ज्योति एक होतात पण दोन पणत्या एक होत नाहींत. भेद जडामध्यें असतो व ऐक्यवृत्ति अजडांत असते. १३० चंदनाचे पुष्कळ तुकडे असले तरी त्यांचा सुगंध एकच आहे, त्याप्रमाणें मी अविनाशी परमात्मा जीवरूपानें भासतों. ३१ 'पण तूं श्रीकृष्णच जीवरूप आहेस, हें वचन जर खरें मानावें तर संसारपाशादि बंध तुलाच प्राप्त होतात,' ३२ असें जर तूं समजशील तर मला तें बंधन केव्हांहि घडत नाहीं. प्राण शरीराची हालचाल करवितो, पण शरीराची अवस्था त्याला नाहीं. ३३ सूक्ष्मदेहांतील स्वयंभू जीव माझ्याच अंशाचें प्रतिबिंब आहे. त्याला देहादिक बंधन मिथ्याच भासतें. ३४ घटानें आकाश व्यापिलें म्हणजे त्याला घटाकाश म्हणतात. तो घट फुटला तरी आकाशाचा नाश होत नाहीं. त्याप्रमाणें मी जीवत्वानें अविनाशी असतों. ३५ डबक्यांत सूर्याचें प्रतिबिंब पडलें म्हणजे सूर्य कांहीं आकाश सोडून डबक्यांत प्रवेश करीत नाहीं. त्याप्रमाणें मी जीवभावाहून अलिप्त आहे. ३६ सूर्य जसा डबक्यांत प्रतिबिंबित झालेला दिसतो, तसा मी सूक्ष्मदेहांत भासतों. त्यांतील सर्व भोगांचें वेड मिथ्या आहे. त्यानें मी बद्ध कसा होईन ! ३७ आतां जास्त बोलणें नको. प्रतिबिंबाचें नांव जीव व मुख्य बिंब तो मी शिव. हा जीव-शिवांचा मुख्य उलगडा आहे. ३८ अनेक तळीं, विहिरी, डबकीं या सर्वांत सूर्याचें प्रतिबिंब दिसतें; परंतु आकाशांत सूर्याचीं कांहीं तेवढीं वास्तविक रूपें नसतात. ३९ त्याचप्रमाणें एकाला आलेलें जें अनेकत्व तेंच मिथ्या जीवत्व आहे, असें जाण. भागवताचें हें मुख्य तत्त्व व ज्ञानाचें शुद्ध सत्त्व आहे. १४० डबक्यांत सूर्य प्रतिबिंबित होतो, चंचलता, निश्चलता व मलिनता हे वस्तुतः त्या डबक्याचे गुण आहेत, पण लोक भ्रमानें ते प्रतिबिंबाचे मानितात. ४१ त्याचप्रमाणें विचार करून पाहतां शिवाला बाधकत्व मुळींच नाहीं. पण वस्तुतः

सर्वथा । हें अविद्याकार्य तत्त्वतां । जीवांचे माथां मानिती ॥ ४२ ॥ एवं मिथ्या जीवभेद सर्वथा । त्यासी बद्धता आणि मुक्तता । विद्या अविद्या निजपक्षपाता । दावी तत्त्वतां निजकर्में ॥ ४३ ॥ त्या जीवभासासी प्रस्तुत । नित्यबद्ध नित्यमुक्त । एकासी दोनी अवस्था येथ । असें दावित विद्या अविद्या ॥ ४४ ॥ जेवीं जळीं बिंबला सविता । त्या जळाची चंचळनिश्चळता । या प्रतिबिंबासीच अवस्था । मुख्य सविता तें नेणे ॥ ४५ ॥ तेवीं जीवांची बद्धमुक्तता । परमात्म्यासी न लगे सर्वथा । जेवीं कां अंधारींच्या खद्योता । न देखे सविता कल्पांतीं ॥ ४६ ॥ जळीं आकाश दिसे बुडालें । परी तें कांहीं झालें नाहीं वोलें । तेवीं अविद्येसी अलिप्त ठेलें । असे संचलें निजरूप ॥ ४७ ॥ एक बद्ध एक मुक्त । हें जीवाचिमाजीं भासत । तेंही मी सांगेन निश्चित । सावचित्त परियेसीं ॥ ४८ ॥ सहस्रघटीं जळ भरितां । एकचि सहस्रधा दिसे सविता । तेथ येचि घटींची अवस्था । त्या घटस्था लागेना ॥ ४९ ॥ तेथ जो घट होय चंचळु । त्यांतील प्रतिबिंब लागे आंदोळुं । परी दुजे घटीं जें निश्चळु । तें नव्हे चंचळु याचेनी ॥ १५० ॥ तेथ एकें दैवबळें । सूक्ष्म छिद्रें घटें जळ गळे । तें प्रतिबिंब निजबिंबीं मिळे । येर सकळें तैसींचि ॥ ५१ ॥ तेवीं गुरुकृपाउजियेडें । ज्याचें लिंगदेह विघडे । त्यासी परमात्म्यासी ऐक्य घडे । येर बापुडें देहबंदीं ॥ ५२ ॥ हेंचि निरूपण पुढें । श्लोकसंगतीं सुरवाडें । तें मी सांगेन वाडेंकोडें । अतिनिवाडें निश्चित ॥ ५३ ॥

अथ बद्धस्य मुक्तस्य वैलक्षण्यं वदामि ते । विरुद्धधर्मिणोस्तात स्थितयोरेकधर्मिणि ॥ ५ ॥

अविवेकी लोक हें अविद्येचें कार्य जीवावर आरोपितात. ४२ याप्रमाणें जीवभेद सर्वथा मिथ्या आहे. परंतु विद्या व अविद्या आपापल्या पक्षपातानें जीवाला त्याच्या कर्मानुसार बद्धत्व व मुक्तत्व दाखवितात. ४३ विद्या आणि अविद्या त्या एकाच जीवभासाला नित्यबद्ध व नित्यमुक्त अशा या दोन्ही अवस्था दाखवितात. ४४ जलांत सूर्याचें प्रतिबिंब पडलें असतां त्या जलाची चंचलता व निश्चलता या दोन अवस्था त्या प्रतिबिंबांतच दिसतात. मुख्य सूर्य त्यांतील कांहीं जाणत नाहीं. ४५ ज्याप्रमाणें सूर्य अंधारांतील काजव्याला कल्पांतींहि पहात नाहीं, त्याप्रमाणें जीवाची बंध-मुक्त-अवस्था परमात्म्याला केव्हांहि लागत नाहीं. ४६ आकाश ज्याप्रमाणें पाण्यांत बुडालेलें दिसतें, परंतु तें कांहीं खरोखर त्या पाण्यानें भिजत नाहीं त्याप्रमाणें आत्मस्वरूप अविद्येपासून अलिप्त व स्वस्वरूपांतच स्थित असतें. ४७ आतां एक बद्ध व एक मुक्त हा जीवांतलाच भास आहे, हें मी निश्चित सांगतों, तें लक्षपूर्वक ऐक. ४८ हजार घटांत पाणी भरून ठेविलें तर एकच सूर्य त्या हजार घटांत प्रतिबिंबित होऊन त्यांचीं हजार रूपें भासतात. परंतु एका घटाची अवस्था दुसऱ्या घटाला लागत नाहीं. ४९ कारण त्यांतील जो घट चंचल होतो, त्यांतील प्रतिबिंबहि हालूं लागतें पण दुसऱ्या घटांत निश्चल असतें. एक हललें म्हणून तें कांहीं हलत नाहीं, तें निश्चलच रहातें. १५० त्यांतील एखाद्या घटाला बारीकसें भोंक पडलें तर त्यांतील पाणी गळून जातें व प्रतिबिंब बिंबांत मिळतें. परंतु इतर घटांतील प्रतिबिंबें तशींच रहातात. ५१ त्याप्रमाणें सद्गुरुकृपेचा उदय झाला असतां सूक्ष्म देह नाहींसा होतो. त्या जीवाचें परमात्म्याशीं ऐक्य होतें व इतर बिचारे जीव देहाच्या बंदिवासांत पडून रहातात. ५२ हेंच निरूपण पुढें श्लोकाच्या अनुरोधानें मी अति प्रेमानें, आनंदानें व अगदीं स्पष्ट करून सांगणार आहें. १५३.

—याप्रमाणें भेद व सुख-दुःख यांच्या व्यवस्थेचें उपपादन करून बद्ध व मुक्त कसे वागतात, असा जो उद्धवानें त्यांच्या वैलक्षण्याविषयीं प्रश्न केला आहे, त्याचें उत्तर सांगतात—

अथ—आतां, हे तात—बा उध्दवा ! बद्धस्य मुक्तस्य वैलक्षण्यं ते वदामि—बद्ध व मुक्त यांचें वैलक्षण्य मी तुला सांगतों. (हें वैलक्षण्य दोन प्रकारचें आहे. एक जीव व ईश्वर यांचें व दुसरें जीवांचें परस्पर. त्यांतील जीव व ईश्वर यांचें वैलक्षण्य पुढील अडीच श्लोकांनीं सांगतात—) विरुद्धधर्मिणोः—शोक व आनंद या विरुद्धधर्मांनीं युक्त असलेल्या, एकधर्मिणि स्थितयोः—एका शरीरामध्यें नियंता व नियम्य या स्वरूपानें स्थित असलेल्या जीवेश्वरांचें वैलक्षण्य मी तुला सांगतों. ५.

येणेंचि प्रसंगें जाण। मागील तुझे जे प्रश्न। बद्धमुक्तांचें लक्षण। तेंही निरूपण सांगेन ॥ ५४ ॥ दोघांही देहीं असतां। दिसे विरुद्ध धर्म स्वभावतां। एक तो सदा सुखी सर्वथा। एक दुःखभोक्ता अहर्निशीं ॥ ५५ ॥ येथ विलक्षणता दों प्रकारीं। एक तो जीव ईश्वरामाझारीं। एक ते जीवासी परस्परीं। बद्धमुक्त निर्धारीं निर्धास्त ॥ ५६ ॥ पहिली जीवेश्वरांची कथा। तुज ती सांगेन विलक्षणता। मग जीवाची बद्धमुक्तता। विशद व्यवस्था सांगेन ॥ ५७ ॥ जीवेश्वरांचें वैलक्षण्य। अडीच श्लोकीं निरूपण। स्वयें सांगताहे नारायण। भाग्यपूर्ण उद्धवाचें ॥ ५८ ॥

सुपर्णावेतौ सदृशौ सखायौ यदृच्छयैतौ कृतनीडौ च वृक्षे।

एकस्तयोः खादति पिप्पलान्नमन्यो निरन्नोऽपि बलेन भूयान् ॥ ६ ॥

सुपर्ण म्हणतां पक्षी। ये वृक्षींचा जाय ते वृक्षीं। तैसा देही देहांतरातें लक्षी। यालागीं पक्षी म्हणिजेत ॥ ५९ ॥ पक्ष्यांच्या ऐशियाच गती। हा देह सांडूनि त्या देहा जाती। पक्षी म्हणावया हे उपपत्ती। जाण निश्चितीं उद्धवा ॥ १६० ॥ एवं आत्मा देहाहूनि भिन्न। तें सांगितलें उपलक्षण। देहात्मवादाचें खंडन। प्रसंगीं जाण दाखविलें ॥ ६१ ॥ आत्मा देह सर्वथा न घडे। देहबुद्धि धरणें तें तंव कुडें। हें उद्धवासी फाडोवाडें। निजनिवाडें दावित ॥ ६२ ॥ देहबुद्धीचिया पोटीं। जन्ममरणांचिया कोटी। स्वर्गनरकांची आटाटी। देहबुद्धि गांठी जीवशिवपणें ॥ ६३ ॥ दोघेही चिद्रूपें सारिखे। कधीं नोहे आनासारिखे। अनादि हे दोघे सखे। अतिनेटके जिवलग ॥ ६४ ॥ काळें अकाळें सकाळें। नव्हता येरयेरांवेगळे। एकत्र

बद्ध व मुक्त यांच्या लक्षणाविषयीं तुझे जे मागील दोन प्रश्न आहेत त्यांचें याच प्रसंगानें आतां निरूपण करितों. ५४ आत्मा व जीव हे दोघेंहि देहांत असून त्यांचे स्वभाव परस्परांविरुद्ध दिसतात. एक सदासर्वदा सुखी असतो व दुसरा रात्रंदिवस दुःख भोगीत असतो. ५५ त्यांची दोन प्रकारची विलक्षणता आहे. एक जीव ईश्वरामध्यें आसक्त असतो व बाकीचे जीवांमध्यें परस्पर आसक्त असतात. हेंच तूं बद्ध व मुक्त यांचें लक्षण निशंकपणें जाण. ५६ तेव्हां आतां प्रथम जीवेश्वराची कथा व त्यांचा भेद मी तुला सांगतों. नंतर जीवाचे बंध व मोक्ष स्पष्ट करून सांगेन. ५७ पुढील अडीच श्लोकांत नारायण स्वतः जीव व ईश्वर यांचा भेद सांगत आहेत, हें उद्धवाचें मोठेंच भाग्य होय. १५८.

एतौ सुपर्णौ–हे दोन पक्षी आहेत. (वृक्षाहून पक्षी जसे भिन्न त्याप्रमाणें जीव व अंतर्यामी ईश्वर हे दोघे देहांहून भिन्न आहेत.) सदृशौ–चिद्रूपत्वामुळें परस्परांसारखे आहेत. सखायौ–अवियोगामुळें व दोघांचें एकमत असल्यामुळें ते एकमेकांचे मित्र आहेत. यदृच्छया तौ वृक्षे कृतनीडौ च–अनिर्वाच्य मायेनें विनाशधर्मीं देहांत या दोघांनीं आपलें रहाण्याचें स्थान केलें आहे. (सु. गी. १५–१ पृ. २७७) तयोः एकः पिप्पलान्नं खादति–त्या दोहोंतील एक जीव भोग्य कर्मफल भोगितो. अन्यः निरन्नः अपि बलेन भूयान्–दुसरा ईश्वर कर्मफल भोक्ता नसूनहि निजानंदानें तृप्त व ज्ञानादिशक्तीनें अधिक आहे. [याविषयीं 'द्वा सुपर्णा०' ही श्रुति. मुं. भा. ३–१ पृ. ६७ पहा.] ६.

सुपर्ण म्हणजे पक्षी. तो एका वृक्षावरून दुसऱ्या वृक्षावर जातो. त्याप्रमाणें देहधारी जीवहि एका शरीरांतून निघून दुसऱ्या शरीरांत जातो. म्हणून त्याला पक्षी म्हटलें आहे. ५९ पक्ष्यांसारख्याच गतीनें हा जीव एक देह सोडून दुसऱ्या देहांत प्रवेश करितो. हाच त्याला पक्षी म्हणण्याचा हेतु आहे. १६० याप्रमाणें आत्मा देहाहून भिन्न आहे. आत्मनिरूपणप्रसंगानें देहात्मवादाचें खंडण कसें करावें याचीहि युक्ति मीं तुला सांगितली. ६१ आत्मा तोच देह असें केव्हांहि घडणार नाहीं. करितां देहबुद्धि धरणें हें खोटें आहे, असें भगवान् उद्धवाला स्पष्टपणें व आपल्या निर्णयानें दाखवीत आहे. ६२ देहबुद्धि ठेविली कीं कोट्यवधि जन्म-मरणांचे फेरे व स्वर्ग-नरकांची दगदग पाठीस लागलीच. देहबुद्धीच जीव व शिव हा भेद उत्पन्न करिते. ६३ ते दोघेहि चिद्रूपानें सारखेच आहेत. ते जड देहादिकांसारखें कधींहि होत नाहींत. ते दोघे अनादि जिवलग स्नेही आहेत. ६४ ते वेळीं-अवेळीं कधींच परस्परांपासून

वर्तती खेळेमेळें । निजप्रांजळें सख्यत्वें ।। ६५ ।। प्रभादीपु द्वडिना वेगळा । दीपु प्रभेसी नव्हे निराळा । तेवीं जीवशिवांचा मेळा । एकत्र स्वलीळा नांदती स्वयें ।। ६६ ।। जीवु इच्छी जें जें कांहीं । तें तें वासनेसरिसें पाहीं । ईश्वर पुरवी सर्वही । विमुख कांहीं हों नेणे ।। ६७ ।। अंतकाळीं जें जीव मागे । तें अलोट ईश्वर देवों लागे । आणि ईश्वरआज्ञेचेनि योगें । जीवु सर्वांगें वर्तत ।। ६८ ।। ईश्वर आज्ञा विशुद्धी । जीवें जीव सर्वस्वें वंदी । होय नव्हे न म्हणे कधीं । अभिनव सिद्धी सखेपणाची ।। ६९ ।। नवल सख्यत्वाची परी । ईश्वरू जैसें जैसें प्रेरी । जीवू तैसें तैसें करी । निमेषभरी ढळेना ।। १७० ।। निमेष आरंभोनि जन्मवरी । जीवू ईश्वराची आज्ञा करी । ईश्वरू जीवाचा साहाकारी । परस्परीं निजसख्यें ।। ७१ ।। जीवु अत्यंत अडलेपणें । ईश्वरासी धांव धांव म्हणे । तो तत्काळ पावे धांवणें । करी सोडवणें जीवाचें ।। ७२ ।। एवं शिवाचे आज्ञे जीवू राहे । जीवपण गेलिया शिवीं समाये । जीवालागीं हा शिवपणा वाहे । येरवीं राहे सांडूनी ।। ७३ ।। ऐसें सखेपण यांचें । केवीं अनुवादवे वाचे । उद्धवा हें मीचि जाणें साचें । या सखेपणाचें सौजन्य ।। ७४ ।। जीव ईश्वराआधीन । हें दृढ केलें संस्थापन । अनीश्वरवादाचें खंडन । प्रसंगें जाण दाविलें ।। ७५ ।। अनीश्वरवादू खंडितां । खंडिली कर्मपाखंडवार्ता । कर्मपाखंडाच्या मता । ईश्वरता न मानिती ।। ७६ ।। म्हणती चित्तधर्म ईश्वरासी । तंव चिद्रूपता स्थापूनि त्यासी । निराकारिलें चित्त-धर्मासी । अनायासीं चिद्रूपें ।। ७७ ।। नानापरींचें अतिचिंतन । त्याचि नांव चित्त जाण । चित्तेंवीण निश्चळपण । तेंचि चैतन्य उद्धवा ।। ७८ ।। धर्माधर्म न विचारितां । म्हणती ईश्वरु मोक्षदाता । हे भक्त-पाखंडी कथा । स्थापूनि चिद्रूपता निवारी ।। ७९ ।। टिळे माळा मुद्रा धारणें । लावूनि संतांसी निंदिलें

वेगळे होत नाहींत. ते केव्हांहि एकमेकाला प्रतिकूल होत नाहींत. खेळी-मेळीनें एकत्र रहातात. आपल्या सोज्ज्वल मित्रत्वानें एकत्र मिळून-मिसळून रहातात. ६५ दिव्याची प्रभा जशी त्याला सोडून कधीं रहात नाहीं व दिवा प्रभेला सोडून दूर जात नाहीं, त्याप्रमाणें हा जीव-शिवांचा मेळा आहे. ते आपल्या लीलेनें एकत्र नांदतात. ६६ जीव आपल्या वासनानुरूप जें जें कांहीं इच्छितो, तें तें सर्व ईश्वर पुरवितो. तो त्याला प्रतिकूल कधींच होत नाहीं. ६७ अंतकालीं जीव जें कांहीं मागतो तें ईश्वर हवें तेवढें देऊं लागतो. ईश्वराच्या आज्ञेप्रमाणें जीव सर्वस्वीं वागत असतो. ६८ ईश्वराची आज्ञा जीव मनापासून मान्य करितो. होय, नाहीं कधींहि म्हणत नाहीं. ही त्यांच्या अकृत्रिम स्नेहाची मोठी खूण आहे. ६९ त्यांच्या अलोट प्रेमाचें हेंच मोठें आश्चर्य आहे! ईश्वर जशी जशी प्रेरणा करितो तसा तसा जीव वागत असतो. त्यापासून क्षणभरहि ढळत नाहीं. १७० जन्मापासून मरेपर्यंत जीव ईश्वराची आज्ञा प्रमाण मानितो. ते दोघे परस्परांचें अत्यंत स्नेही असल्यामुळें ईश्वर जीवाचा साह्यकर्ता आहे. ७१ जीव अतिशय अडचणींत सांपडला कीं, ईश्वराचा 'धांव, धांव' असा धांवा करितो. तेव्हां ईश्वर तत्काळ धांवत येऊन जीवाला संकटांतून सोडवितो. ७२ याप्रमाणें शिवाच्या आज्ञेंत जीव रहातो व जीवपणा नाहींसा झाला कीं, तो शिवांत एकरूप होतो. जीवासाठींच तो शिवपणा धारण करितो. एरवीं तो आपला शिवपणा सोडून स्वरूपांतच रहातो. ७३ असें यांचें मित्रत्व आहे. वाणीनें त्याचें कसें वर्णन करावें! हे उद्धवा! या स्नेहाचें सौजन्य मीच काय तो एक जाणें. ७४ जीव ईश्वराच्या अधीन आहे, हें सिद्ध केलें व त्याच प्रसंगानें अनीश्वरवादाचेंहि खंडन करून दाखविलें. ७५ अनीश्वरवादाचें खंडन करीत असतांच नास्तिकांच्या कर्मपाखांडवादाचेंहि खंडन झालें. कर्मपाखांडमतवादी ईश्वराचें अस्तित्व मानीत नाहींत. ७६ तार्किक इच्छा, द्वेष व प्रयत्न हे ईश्वराचे नित्यधर्म आहेत असें म्हणतात; पण येथें ईश्वराची चिद्रूपता प्रस्थापित करून चिद्रूपत्वानेंच त्याच्या चित्तधर्माचें अनायासानें निराकरण केलें. ७७ हे उद्धवा! नानाप्रकारचें जें चिंतन त्यालाच चित्त असें म्हणतात व चिंतनरहित निश्चलत्व तेंच चैतन्य. ७८ धर्माधर्माचा विचार न करितां ईश्वरालाच मोक्षदाता समजणाऱ्या पाखांडी भक्तांचें हें म्हणणें चित्स्वरूपाच्या सिद्धीनें खोडिलें. ७९ स्वतः टिळे लावून, मुद्रा धारण करून जो संतांची निंदा करितो व

जेणें । पाप राहटे भक्तपणें । त्यासी नारायणें नुद्धारिजे ॥ १८० ॥ अंतरींचें सर्व जाणता मी । यालागीं नांवें अंतर्यामी । तो मी शाब्दिकवचनधर्मी । चाळविला अधर्मीं केवीं जाये ॥ ८१ ॥ मी ज्ञानस्वरूप तत्त्वतां । सर्वद्रष्टा सर्वज्ञाता । तो मी धर्माधर्म न विचारितां । मोक्षदाता हें न घडे ॥ ८२ ॥ धरोनियां भक्तभावो । पाप राहाटे जो स्वयमेवो । याचि नामीं दांभिक पहा हो । त्यातें देवो नुद्धरी ॥ ८३ ॥ सदृशौ आणि सखायौ । धरोनि या पदांचा अन्वयो । पाखंडमात्रातें पहा हो । स्वयें देवो उच्छेदी ॥ ८४ ॥ निरसोनि नाना मतांतरें । स्वमत करावया खरें । श्लोकींचीं पदें अतिगंभीरें । शार्ङ्गधरें वर्णिलीं ॥ ८५ ॥ ते दोनी मिळोनियां पक्षी । नीड केलें देहवृक्षीं । वृक्ष म्हणिजे कोणे पक्षीं । तींही लक्षीं लक्षणें ॥ ८६ ॥ जननीउदर तेंचि आळ । पित्याचें रेत बीज सकळ । गर्भाधान पेरणी केवळ । संकल्पजळ वृद्धीसी ॥ ८७ ॥ सोहंभावाचा गुप्त अंकुरू । त्रिगुणभूमीं तिवना डिरु । कोहंभावें वाढला थोरू । वृक्ष साकारू तेणें जाला ॥ ८८ ॥ करचरणादि नाना शाखा । प्रबळबळें वाढल्या देखा । अधऊर्ध्व नखशिखा । वृक्षाचा निका विस्तारू ॥ ८९ ॥ तया देहबुद्धीचीं दृढ मूळें । विकल्पपारंब्या तेणें मेळें । भूमीं रुतल्या प्रबळबळें । कामाचे कोंवळे फुटती कोंब ॥ १९० ॥ तेथ कर्मांचीं पानें । निबिड दाटलीं अतिगहनें । मोहममतेचे घोंस तेणें । सलोभपणें दाटले ॥ ९१ ॥ ज्या उंचावल्या थोर शाखा । त्या फळीं फळोनि सुखदुःखां । उतरल्या जी अधोमुखा । अधःपतनें देखा लोळती ॥ ९२ ॥ ऐशिया वृक्षामाजीं जाण । अतिगूढ गुप्त गहन । नीड केलें हृदयस्थान । जीवशिव आपण बैसावया ॥ ९३ ॥ जेथ जीवपरमात्मा वसती । तरी देहाची जाली सत्य प्राप्ती । ऐसें कोणी कोणी म्हणती । तें मत श्रीपति निराकारी ॥ ९४ ॥ पुरुषासवें लटिकी छाया । तोडितां मोडितां नाडळे घाया । तैशी अनिर्वचनीय

भक्ताचें सोंग आणून पाप आचरितो, त्याचा नारायण केव्हांहि उद्धार करीत नाहीं. १८० मी अंतःकरणांतील सर्व जाणितों, म्हणून मला अंतर्यामी बोलतात. त्या माझ्याविषयीं या वावदुकांनीं केवल शब्दांनीं कितीहि जरी विकल्प केले, तरी मी त्यांच्या विकल्परूप अधर्मांनीं युक्त कसा होणार ! ८१ मी तत्त्वतः ज्ञानस्वरूप, सर्वसाक्षी, सर्वज्ञ आहें. तेव्हां मी धर्माधर्मांचा विचार न करितां मोक्षदाता कसा होईन ! ८२ भक्तपणाचा डौल आणून जो स्वतः पाप आचरितो, त्याला दांभिक असें म्हणतात. त्याचा देव उद्धार करीत नाहीं. ८३ श्लोकांतील 'सदृशौ सखायौ' या दोन पदांनीं म्ह० समान व स्नेही या दोन शब्दांनीं देव स्वतःच सर्व पाखांड्यांचें खंडण करितो. (ही सविस्तर श्रुति मुं. भा. ३–१. पृ. ६७ पहा.) ८४ अनेक प्रकारच्या भिन्नभिन्न मतांचें निरसन करून स्वतःचें मत स्थापन करण्यासाठीं शार्ङ्ग नांवाचें धनुष्य धारण करणाऱ्या अति गंभीर विष्णूनें श्लोकांतील पदाचें वर्णन केलें आहे. ८५ जीव व आत्मा अशा त्या दोन पक्ष्यांनीं मिळून देहरूपी वृक्षावर एक घरटें केलें. देहाला वृक्षाची उपमा कां दिली, त्याचीं लक्षणें आतां ऐक. ८६ मातेचें उदर हेंच आळें, पित्याचें वीर्य हें सर्व बीज, गर्भाधान ही पेरणी, संकल्प हेंच त्याच्या वाढीसाठीं जल. ८७ मग त्याला 'सोहं' भावाचा गुप्त अंकुर फुटतो. सत्त्व, रज व तम या तीन गुणरूप भूमीपासून त्याचेच तीन भाग होतात व 'कोहं-' भावानें तो वाढतो व साकार वृक्ष होतो. ८८ त्याला हात, पाय इत्यादि अवयवांच्या अनेक शाखा फुटतात. त्याला खालीं वर नखें, शेंडी वगैरे येऊन वृक्ष घेरदार होतो. ८९ त्याचीं देहबुद्धीचीं मूळें दृढ होतात व त्याच्या बरोबर विकल्पाच्या पारंब्या लोंबूं लागतात. त्या जोरानें जमिनींत रुतून त्यांना वासनेचे कोवळे कोंब फुटतात. १९० व कर्मांचीं दाट पानें येऊन त्याचीं निबिड अरण्यें बनतात. त्याला मोह-ममतेचें भरीव घोंस येऊन ते लोभानें दाटतात. ९१ त्याच्या ज्या उंच उंच शाखा असतात, त्यांना सुख-दुखांचीं फळें येऊन त्या डहाळ्या खालीं लोंबकळतात. ९२ अशा वृक्षांच्या अतिशय गुप्त व अवघड जागीं म्ह० हृदयांत या जीव-शिवांनीं आपलें रहाण्याचें घरटें केलेलें असतें; ९३ 'तर मग जेथें जीव व परमात्मा यांची वस्ती होते त्या देहाची प्राप्ति खरीच झाली,' असें कित्येक म्हणतात. श्रीकृष्ण त्याहि मतांचें खंडण करितात. ९४ मनुष्याच्या बरोबर असलेली त्याची सांवली मिथ्या आहे; त्यामुळें तिच्या-

माझी माया। तेणें यदृच्छया नीड केलें ॥ ९५ ॥ जेवीं स्वप्नगृहाचारु निद्रिता। तेवीं जीवात्मा नीडीं बसतां। हें मायामय सर्वथा। नव्हे वस्तुतां साचार ॥ ९६ ॥ येणें निरूपणें गोविंदू। नैयायिक मताचा कंदू। समूळ केला त्याचा उच्छेदू। देहसंबंधु मिथ्यात्वें ॥ ९७ ॥ ऐशियाहि या वृक्षासी। जन्मादि निमिषोन्मेषीं। काळु छेदीतसे अहर्निशीं। बाळादि वयसांसी छेदकू ॥ ९८ ॥ तया वृक्षाचीं फळें। तुरटें तिखटें तोंडाळें। पक्कें अपक्कें सकळें। ज्यांसी पिप्पलें म्हणताती ॥ ९९ ॥ त्या दों पक्ष्यांमाजीं तत्त्वतां। जो जीवपणें बोलिजेता। तो या कर्मफळांचा भोक्ता। जीं नाना व्यथादायकें ॥ २०० ॥ जीं फळें खातां पोट न भरे। खादल्या दारुण दुर्जरें। जेणें भवचक्रीं पडोनि फिरे। तरी अत्यादरें सेवितू ॥ १ ॥ दुजा फळें खातां खुणा वारी। जीवासी त्या फळाची गोडी भारी। अखंड जाहला फळाहारी। वारिलें न करी शिवाचें ॥ २ ॥ फळें सेवितां अहर्निशीं। तिळभरी शक्ति नाहीं जीवासी। अशक्त देखोनियां त्यासी। काळ पाशीं बांधितु ॥ ३ ॥ जो इयें सेवी कर्मफळें। तो तत्काळ बांधिजे काळें। दुजा कर्मफळा नातळे। त्यातें देखोनि पळे काळि-काळू ॥ ४ ॥ जो कर्मफळातें न सेवितू। तो ज्ञानशक्तीनें अधिक अनंतू। सदा परमानंदें तृप्तु। असे डुल्लतू स्वानंदें ॥ ५ ॥ उद्धवासी होय निजबोधू। यालागीं जीवशिवांचा भेदू। अत्यादरें सांगे गोविंदू। निजात्मबोधू प्रांजळु ॥ ६ ॥

आत्मानमन्यं च स वेद विद्वानपिप्पलादो न तु पिप्पलादः।
योऽविद्यया युक् स तु नित्यबद्धो विद्यामयो यः स तु नित्यमुक्तः ॥ ७ ॥

वर प्रहार करून तिला मोडतां किंवा तोडतां येत नाहीं. त्याप्रमाणें माझी माया अनिर्वचनीय आहे. तिनें तेथें सहज घरटें केलें. ९५ निजलेल्या माणसाचें जसें स्वप्नांतील वर्तन, तसेंच या जीवात्म्याचें घरट्यांतील रहाणें आहे. हें सर्वथा मायामय आहे. वास्तविक खरें नाहीं. ९६ याप्रमाणें देहसंबंध मिथ्या आहे. असें निरूपण करून गोविंदानें नैयायिकांच्या मुख्य सिद्धान्ताचा समूळ उच्छेद केला. ९७ अशा या देहरूपी वृक्षाला काळ जन्मापासून रात्रंदिवस क्षणोक्षणीं तोडीत असतो. बाल्य, तारुण्य व वार्धक्य या अवस्थांचा काळच छेदक आहे. ९८ या वृक्षाचीं जीं तुरट, तिखट, पिकलेलीं, कच्चीं फळें त्या सर्वांना 'पिप्पलें' असें म्हणतात. ९९ त्या दोन पक्ष्यांतील ज्याला जीव असें नांव आहे तो नानाविध, दुःखदायक अशा या कर्मफलांचा भोक्ता आहे. २०० जीं फळें खाल्लीं असतां तृप्ति कधींहि होत नाहीं, जी खाऊन पचत नाहींत उलट त्यामुळें संसारचक्राच्या फेऱ्यांत भ्रमण करावें लागतें तरीहि हा जीव त्यांचें मोठ्या आवडीनें सेवन करितो. १ जीव तीं फळें खात असतां आत्मा खुणेनें त्याचें निवारण करीत असतो. (एखादें दुष्कर्म करतेवेळीं मन कचरत असतें, हा सर्वांचाच अनुभव आहे.) परंतु जीवाला त्या फळाची अतिशय चटक लागलेली असते. त्यामुळें तो शिवाच्या सूचनेकडे दुर्लक्ष करून सतत फळांचेंच सेवन करीत बसतो. २ रात्रंदिवस तीं फळें खाऊनहि जीवाच्या अंगांत शक्ति मुळींच रहात नाहीं. तेव्हां त्याला अशक्त झालेला पाहून काळ आपल्या पाशानें बांधितो. ३ हीं कर्मफळें जो जीव खातो, त्याला काळ तत्काळ बांधितो व जो आत्मा त्या फळांना स्पर्शहि करीत नाहीं, त्याला भिऊन काळ पळून जातो. ४ जो कर्मफलांचें सेवन करीत नाहीं, तो आपल्या ज्ञानशक्तीनें जीवाहून श्रेष्ठ म्ह० अनंतच आहे. तो सर्वदा परमानंदानें तृप्त होऊन, स्वानंदांत डुलत असतो. ५ उद्धवाला आत्मज्ञान होण्यासाठीं गोविंदानें जीव व शिव यांचा हा भेद व आत्मज्ञानाचा उपदेश अत्यंत आदरानें स्पष्टपणें सांगितला. २०६.

—आतां त्याचें बलाधिक्यच सांगतात—

सः विद्वान् अपिप्पलादः आत्मानं अन्यं च वेद–तो सर्वज्ञ, अभोक्ता ईश्वर स्वतःला व त्या जीवालाहि जाणतो, **पिप्पलादः न तु**–पण कर्मफलभोक्ता स्वरूपालाहि जाणत नाहीं व ईश्वरालाहि जाणत नाहीं, **यः अविद्यया युक् सः तु नित्यबद्धः**–जो अविद्येनें युक्त असतो तो अनादि बद्ध असतो. **यः तु अविद्यामयः सः नित्यमुक्तः**–पण जो विद्याप्रधान असतो तो नित्यमुक्त आहे. [कारण माया त्याला आवरण घालूं शकत नाहीं व ती आपल्या आश्रयाला मोहित करूं शकत नाहीं.] ७.

जो कर्मफळातें न सेविता । जो स्वरूपाचा जाणता । द्रष्टा हे प्रपंचाचा तत्त्वतां । अलिप्तता निजज्ञानें ॥ ७ ॥ जीवु प्रपंचाचा ज्ञाता । परी परमात्मा नेणे तत्त्वतां । यालागीं भोगी भवव्यथा । कर्मफळें खातां अतिबद्ध ॥ ८ ॥ जो कर्मफळें सेवी बापुडा । तो अंधपंगू जाहला वेडा । मी कोण हें नेणे फुडा । पडिला खोडा देहाचे ॥ ९ ॥ देहसंबंधाआंतू । प्रतिपदीं होय आत्मघातू । नाहीं जन्ममरणासी अंतू । दुःखी होतू अतिदुःखें ॥ २१० ॥ नश्वर विषयांचा छंदू । तेणें जीवु जाहला अतिबध्दू । हा अविद्येचा संबंधू । लागला सुबध्दू देहवंतां ॥ ११ ॥ जितुकी विषयाची अवस्था । तितुकी जीवासी नित्यबध्दता । जो विषयातीत सर्वथा । नित्यमुक्तता ते ठायीं ॥ १२ ॥ जो विद्या-प्राधान्यें नित्यमुक्तु । जो ज्ञानशक्तीनें शक्तिमंतु । सर्वव्यापकू सर्वीं अलिप्तु । तो नित्यमुक्तु बोलिजे ॥ १३ ॥ सांगीतली जीवाची नित्यबध्दता । प्रगट केली शिवाची मुक्तता । जीवाची जे बद्धमुक्तता । तेही आतां सांगतू ॥ १४ ॥ उद्धवाप्रती श्रीकृष्ण । बद्धमुक्तांचें लक्षण । दोघांचीही उणखूण । विचित्र जाण सांगेल ॥ १५ ॥

देहस्थोपि न देहस्थो विद्वान् स्वप्नाद्यथोत्थितः । अदेहस्थोऽपि देहस्थः कुमतिः स्वप्नदृग्यथा ॥ ८ ॥

बद्धमुक्तांचें मिश्र लक्षण । तीं श्लोकीं सांगेल जाण । केवळ मुक्तांचें सुलक्षण । गोड निरूपण सात श्लोकीं ॥ १६ ॥ देहीं असोनि देहबुद्धि नाहीं । हें मुक्ताचें मुक्तलक्षण पाहीं । यालागीं देहीं असोनि विदेही । म्हणिये पाहीं या हेतू ॥ १७ ॥ स्वप्नींचें राज्य आणि भीक । जागृतीं मिथ्या

जो कर्मफळाचें सेवन करीत नाहीं व जो आत्मस्वरूपाला जाणतो तोच खरोखर प्रपंचाचा द्रष्टा असून आत्मज्ञानानें त्यापासून अलिप्त असतो. ७ जीव प्रपंच जाणणारा आहे; पण तो परमात्म्याला तत्त्वतः जाणत नाहीं. त्यामुळें तो संसाराची व्यथा भोगितो व कर्मफळें भोगण्याच्या आसक्तीनें अतिशय बद्ध होतो. ८ तो कर्मफळें चाखितो. तो बिचारा आंधळा, पांगळा, वेडा होतो. मी कोण हें त्याला कळत नाहीं व देहाच्या अटकेंत सांपडतो. ९ देहसंबंधांत क्षणोक्षणीं आत्मघात होत असतो. जन्म-मरणाला अंत नाहींसा होतो, त्यामुळें जीव दुःखानें तळमळत असतो, २१० नश्वर विषयांच्या छंदानें तो अत्यंत बद्ध होतो. याप्रमाणें हा अविद्येचा संबंध देहधारण करणारास दृढ बंधांत टाकितो. ११ विषयाची जेवढी आवड, तेवढा जीव नित्य बद्ध होतो. आणि जो विषयांपासून सर्वथा अलिप्त असतो त्याच्याच ठिकाणीं नित्य मुक्तता असते. १२ जो विद्येच्या प्राधान्यानें नित्यमुक्त असतो, जो ज्ञान-शक्तीनें समर्थ असतो, जो सर्वव्यापी व सर्वांपासून अलिप्त असतो, त्यालाच नित्यमुक्त असें म्हणतात. १३ याप्रमाणें जीवाचा नित्यबंध सांगितला व शिवाचा नित्य मोक्ष दाखविला. आतां जीवाची जी बद्ध-मुक्तता, ती सांगतो. १४ श्रीकृष्ण उद्धवाला बद्ध-मुक्तांचें लक्षण व त्या दोघांचें वैलक्षण्य सांगत आहे. २१५.

—आतां या पुढील दहा श्लोकांनीं बद्ध-मुक्त जीवांचेंच परस्पर वैलक्षण्य सांगतात—

यथा स्वप्नात् उत्थितः तथा विद्वान् देहस्थः अपि देहस्थः न—ज्याप्रमाणें स्वप्न पाहून जागा झालेला मनुष्य स्मरणाचा विषय होणाऱ्या स्वप्नदेहांत स्थित असूनहि त्या देहांत नसतो. कारण त्यावेळीं त्या देहांतील सुख-दुःखादिकांचा अभाव असतो. त्याप्रमाणें मुक्त विद्वान् प्रारब्ध संस्कारांच्या बलानें देहामध्यें असूनहि वस्तुतः देहांत नसतो. **यथा स्वप्नदृक् तथा कुमतिः अदेहस्थः अपि देहस्थः**—ज्याप्रमाणें स्वप्नदेहांत स्वप्न पहाणारा त्या देहांत नसूनहि त्यांतील सुख-दुःखांचा अनुभव घेत असल्यामुळें त्या देहांत असतो, त्याप्रमाणें अविद्वान् वस्तुतः देहामध्यें स्थित नसूनहि त्या देहांतील सुख-दुःखांचा अनुभव घेत असल्यामुळें त्यांत असतो. ८.

आतां या तीन श्लोकांत बद्ध-मुक्ताचें मिश्रलक्षण श्रीकृष्ण सांगणार आहे व त्याच्या पुढल्या सात श्लोकांत केवळ मुक्तांच्या उत्तम लक्षणांचें गोड निरूपण करणार आहे. १६ देहांत असून देहबुद्धि नसणें हेंच मुक्ताचें मुख्य लक्षण आहे. यासाठीं तो देही असूनहि त्याला देहातीत म्हणतात. १७ स्वप्नांतील राज्यप्राप्ति किंवा

दोन्हीं देख। तैसें देहादि जें सुख दुःख। तें मिथ्या देख मुक्तांसी॥ १८॥ जो स्वप्नीं मरोनि जाळिला। तो जागृतीं नाहीं राख जाहला। तैसा प्रपंच मिथ्या जाणीतला। मुक्त बोलिला त्या नांव॥ १९॥ स्वप्नींचें साधकबाधक। जागृतीं आठवे सकळिक। त्याचे बाधीना सुखदुःख। तैसें संसारिक मुक्तासी॥ २२०॥ आतां ऐक बद्धाची हे स्थिती। तो वस्तुतां असे देहातीतीं। परी मी देह मानीं कुमती। दुःखप्राप्ती तेणें त्यासी॥ २१॥ जळीं देखे प्रतिबिंबातें। मी बुडालों म्हणोनि कुंथे। कोणी काढा काढा मातें। पुण्य तुमतें लागेल॥ २२॥ स्वप्नीं घाय लागले खड्गाचे। तेणें जागृतीं म्हणे मी न वांचे। ऐसें निबिड भरिते भ्रमाचें। तें बद्धतेचें लक्षण॥ २३॥ स्वप्नींचें सुखदुःख नसतें। तें स्वप्नभ्रमें भोगितां कुंथे। तेवीं देह मी म्हणोनि येथें। नाना दुःखांते भोगितू॥ २४॥ स्वस्वरूपाचें विस्मरण। तेणें विषयासक्ति दृढ जाण। संकल्पविकल्प अतिगहन। तेंचि लक्षण बद्धाचें॥ २५॥ आणिकें लक्षणें त्याची आतां। सांगतु असें तत्त्वतां। भोग भोगोनि अभोक्ता। ते मुक्तावस्था परियेसीं॥ २६॥

इन्द्रियैरिन्द्रियार्थेषु गुणैरपि गुणेषु च। गृह्यमाणेष्वहं कुर्यान्न विद्वान्यस्त्वविक्रियः॥ ९॥

अवशेष प्रारब्धगती। मुक्तांचे देहीं दिसे वस्ती। परी जागृतीं स्वप्न सुषुप्तीं। देहस्थिती नातळे॥ २७॥ छाया पुरुषाचेनि चळे। ते छायेसी पुरुष नातळे। तेवीं मिथ्या देह मुक्ताजवळें। कल्पांतकाळें येवों न शके॥ २८॥ आपुले छायेसी जाण। जेवीं बैसों न शकें आपण। तेवी मायादि तिन्ही गुण। जवळी असोन स्पर्शेना॥ २९॥ इंद्रियद्वारा यथानिगुतीं। प्राप्त विषयांते सेविती। परी

भिक्षांदेही हीं दोन्ही जागेपणीं सारखींच मिथ्या वाटतात. त्याप्रमाणें देहाचें सुख व दुःख हें मुक्ताला सारखेंच मिथ्या वाटतें. १८ स्वप्नांत एखादा मनुष्य मरण पावला व त्याला जाळूनहि टाकिलें तर जागेपणीं त्याची कांहीं खरोखर राख झालेली दिसत नाहीं. त्याप्रमाणें जो प्रपंचाला स्वप्नासारखा मिथ्या मानितो तो 'मुक्त' असें म्हटला जातो. १९ स्वप्नांत पाहिलेलें अनुकूल, प्रतिकूल वगैरे सर्व जागेपणीं चांगलें आठवतें; परंतु त्यामुळें कांहीं सुख-दुःख होत नाहीं. त्याचप्रमाणें मुक्ताला प्रपंचांतील गोष्टीमुळें सुख-दुःख होत नाहीं. २२० आतां बद्धाची स्थिति ऐक. वास्तविक तो देहातीत असतो; परंतु तो मंदमती स्वतःला देही समजतो व त्यामुळें त्याला दुःख होतें. २१ तो पाण्यांतील आपलेंच प्रतिबिंब पाहून स्वतःला 'बुडालों' असें समजतो आणि 'अरे मी बुडलों, मला कोणी बाहेर काढा, मला यांतून वांचवा, तुम्हांला पुण्य लागेल' असें कुंथून कुंथून ओरडत सुटतो. २२ स्वप्नांत तलवारीचे घाव लागले तर जागेपणीं 'मी आतां वांचत नाहीं' असें बडबडतो. असें हें जें भ्रमाचें दाट पटल तेंच बद्धतेचें लक्षण आहे. स्वप्नभ्रमानें स्वप्नांतील मिथ्या सुख-दुःख भोगतेवेळीं जसें व्यथित व्हावें तसाच हा अविवेकी या लोकीं 'देहच मी' असें मानून अनेकप्रकारचीं दुःखें भोगितो. २४ तो आत्मस्वरूपाला विसरतो; त्यामुळें विषयासक्ति प्रबळ वाढते. संकल्प-विकल्प हेंच बद्धाचें लक्षण आहे. २५ आतां त्याचीं आणखीं दुसरीं लक्षणें सांगतों. भोग भोगूनहि अभोक्ता, अशी मुक्तावस्था कशी प्राप्त होते, तें ऐक. २२६.

—पुढील दोन श्लोकांनीं याविषयीं हेतुत्वानें बद्ध-मुक्तांचें आणखी एक वैलक्षण्य सांगतात—

इंद्रियैः इंद्रियार्थेषु गृह्यमाणेषु अपि यः तु विद्वान् सः न अहं कुर्यात्—इंद्रियांकडून विषयांचें ग्रहण केलें जात असतांनाहि जो विद्वान् असतो, तो मी विषयांचें ग्रहण करितों असें कधींहि म्हणत नाहीं, कारण गुणैः गुणेषु च—इंद्रिय-रूप गुणांकडून विषयरूप गुणांचें ग्रहण केलें जातें असें तो समजतो आणि म्हणूनच, अविक्रियः—रागादि विकाररहित असतो. (सु. गी. ३–२८ पृ. ६९.) ९.

मुक्त जीवाच्या देहांत प्रारब्धगतीचा कांहीं अवशेष उरलेला दिसतो. परंतु त्याला जागृतींत, स्वप्नांत व सुषुप्तींत देहाचें भानहि नसतें. २७ पुरुष चालूं लागला म्हणजे त्याची छाया चालते, परंतु तो त्या छायेला स्पर्शहि करीत नाहीं. त्याप्रमाणें मुक्तापाशीं मिथ्या देहबुद्धि कल्पांतींहि येत नाहीं. २८ ज्याप्रमाणें आपल्या स्वतःच्याच सावलींत आपल्याला बसतां येत नाहीं, त्याप्रमाणें मायादि तीन गुण जवळ असूनहि तो मुक्त त्यांना स्पर्शहि करीत नाहीं. २९ इंद्रियांच्या द्वारा प्रसंगप्राप्त विषयांचें तो सेवन करितो; परंतु 'मी सेवन केलें'

सेविलें ऐसेंही नेणती । विषयस्फूर्ती स्फुरेना ॥ २३० ॥ गुण पोखिती गुणावस्था । इंद्रियें घेती इंद्रियार्था मी उभयसाक्षी अकर्ता । चिन्मात्रता अलिप्त ॥ ३१ ॥ तो इंद्रियांचेनि खेळेंमेळें । सुखें विषयांमाजीं जरी लोळे । तरी विकाराचेनि विटाळें । कदाकाळें मैळेना ॥ ३२ ॥ जेथ कामाची अतिप्रीती । तेथ लोभाची दृढ वस्ती । अथवा कामाची जेथ अप्राप्ती । तेथ महाख्याती क्रोधाची ॥ ३३ ॥ मुक्त जाहला नित्य निष्काम । क्रोध लोभेंसी निमाला काम । तो स्वयें जाहला आत्माराम । विश्रामधाम जगाचें ॥ ३४ ॥ एवं मुक्ताच्या ठायीं जाण । उपजों न शके पापपुण्य । कामक्रोधादिवृत्तिशून्य । जाहला परिपूर्ण चिद्‍ब्रह्म ॥ ३५ ॥ मुक्ताचीं विषयस्थिती । विषयीं स्फुरे ब्रह्मस्फूर्ती । यालागीं पापपुण्यें नुपजती । नित्यमुक्ति तेणें त्यासी ॥ ३६ ॥ ऐसी मुक्तांची हे कथा । ऐक बद्धाची हे वार्ता । अकर्तांचि म्हणे मी कर्ता । येणेंचि सर्वथा गुंतला ॥ ३७ ॥

दैवाधीने शरीरेऽस्मिन् गुणभाव्येन कर्मणा । वर्तमानोऽबुधस्तत्र कर्तास्मीति निबध्यते ॥ १० ॥

अदृष्टाआधीन जें शरीर । तेथ आलियाहि हरिहर । अन्यथा न करवे अणुमात्र । हें वेदशास्त्रसंमत ॥ ३८ ॥ देही ज्या गुणाचें प्राधान्य । तैसेंचि कर्म निपजे जाण । इंद्रियें गुणाधीन । तदनुसारें जाण वर्तती ॥ ३९ ॥ एवं दैवगुणें देहवर्तन । तेथ मी कर्ता म्हणवी आपण । तेंचि त्यासी दृढ बंधन । आपण्या आपण घातक ॥ २४० ॥ नळीमाजिल्या चण्याच्या आशा । वानरें मुठी धरणें तोचि फांसा । तेवीं देहींच्या विषयविलासा । अभिमानें तैसा गुंतला ॥ ४१ ॥ जो देहातीत वस्तुतां । जो गुणकर्मांचा अकर्ता ।

याचें त्याला भान नसतें व विषयांची स्फूर्तिहि नसते. २३० गुण गुणांच्या अवस्थांचें पोषण करितात, इंद्रियें विषयांचा उपभोग घेतात. मी त्या दोहोंचाहि साक्षी अकर्ता आहें, असें समजून तो चित्स्वरूपत्वानें अलिप्त रहातो. ३१ तो इंद्रियांच्या संगतींत हंसत—खेळत विषयांमध्यें लोळतो; परंतु विकाराच्या विटाळानें कधींकाळींहि मळीन होत नाहीं. ३२ जेथें विषयांची अति प्रीति, तेथें लोभाची कायमची वस्ती असते किंवा जेथें इष्टवस्तूची प्राप्ति होत नाहीं तेथें क्रोधाचा करडा अम्मल असतो. ३३ परंतु मुक्त नित्य निष्काम असल्यामुळें क्रोध-लोभासह त्याची वासना नाहींशी होते. ३४ तो स्वतःच आत्माराम होऊन सर्व जगाचें विश्रान्तिस्थान बनतो. ३५ याप्रमाणें मुक्तामध्यें पाप-पुण्यच उत्पन्न होऊं शकत नाहीं. तो काम-क्रोधादिवृत्तिशून्य असल्यामुळें परिपूर्ण चिद्‍ब्रह्म होतो. मुक्ताचें विषयसेवन असेंच असतें कीं त्याला त्यांत ब्रह्मच स्फुरतें, त्यामुळें पुण्य-पाप न लागतां त्याला नित्य मुक्ति प्राप्त होते. ३६ अशी ही मुक्ताची कथा आहे. आतां बद्धाचा वृत्तान्त ऐक. तो अकर्ता असूनहि स्वतःला कर्ता समजतो व त्यामुळें सर्वथा गुंतून पडतो. २३७.

अबुधः दैवाधीने अस्मिन् शरीरे वर्तमानः गुणभाव्येन कर्मणा तत्र कर्ता अस्मि इति निबध्यते—पण अविद्वान् प्रारब्धाधीन असलेल्या या शरीरांत राहून इंद्रियांकडून होणाऱ्या कर्मानें त्या देहादिकांत मी यांचा कर्ता आहें अशा अभिमानानें अत्यंत बद्ध होतो. (सु. गी. ३–२७ पृ. ६९ पहा.) [या तीन श्लोकांनीं ' बद्ध व मुक्त कसे रहातात ' या प्रश्नाचें उत्तर ' मुक्त शरीरांत सुख-दुःखशून्य व निरभिमान रहातो, आणि बद्ध सुख-दुःखांनीं युक्त व साभिमान राहातो ' असें उत्तर सांगितलें.] १०.

हा देह दैवाच्या अधीन आहे. तेथें हरि-हर जरी आले, तरी त्यांना त्यांत रेसभरहि बदल करितां येत नाहीं. हें वेदशास्त्रसम्मत आहे. ३८ सत्त्व, रज व तम या तीन गुणांपैकीं ज्या गुणाचें शरीरांत आधिक्य असेल, त्याप्रमाणें कर्म उत्पन्न होतें. इंद्रियें गुणांच्या अधीन असल्यामुळें त्याच्या अनुसार तीं वागत असतात. ३९ याप्रमाणें देह पूर्वकर्मानुसार वागत असतां जीव ' मी कर्ता ' असें स्वतःला म्हणवून घेतो, तेंच त्याला दृढबंधन होतें व तो आपणच आपला घात करितो. २४० वानर नळींतील चण्याच्या आशेनें नळी हातांत धरितांच जसा फांसांत अडकतो, त्याप्रमाणें जीव देहांतील विषयविलासांत अभिमानानें गुंतून पडतो. ४१ जो वास्तविक देहातीत व गुण-कर्मांचा अकर्ता असतो, तोच, ' मी देह, मी कर्मकर्ता ' असें

तो म्हणे मी देह मी कर्म कर्ता । अहंममता भूलला ॥ ४२ ॥ जो न करितांचि चोरी । मी चोर म्हणे राजद्वारीं । तो मारिजे लहानथोरीं । तैशी परी जडजीवां ॥ ४३ ॥ प्रकृतीचें कर्म आपुले माथां । घेऊनि नाचे अहंममता । तेणें अभिमानें दृढ बद्धता । आकल्पांता अनिवार ॥ ४४ ॥ तळीं मांडूनि काजळा । वरी ठेविला स्फटिकु सोज्वळा । श्वेतता लोपूनि दिसे काळा । तेवीं आंधळा जीवू झाला ॥ ४५ ॥ कां आंधळें मातलें हातिरूं । नेणे निजपतन निर्धारूं । तैसा जीव लागे कर्म करूं । पतनविचारू तो न देखे ॥ ४६ ॥ मी देह मी कर्म कर्ता । मी ज्ञाता मी विषयभोक्ता । ऐशी जे कां देहात्मता । दृढबद्धता तिये नांव ॥ ४७ ॥ एवं बद्धमुक्तवर्तन । विशद केलें निरूपण । आतां केवळ मुक्ताचें लक्षण । आवडीं श्रीकृष्ण सांगतु ॥ ४८ ॥ ज्ञानिया तो तंव आत्मा माझा । हे अतिप्रीती गरुडध्वजा । हें गुह्य सांगितलें कपिध्वजा । रणसमाजा रणरंगीं ॥ ४९ ॥ तेंचि आतां उद्धवाप्रती । अत्यादरें सांगे श्रीपती । ज्ञानियांची मुक्तस्थिती । यथानिगुतीं निजगुह्य ॥ २५० ॥ ज्ञानलक्षणें सांगतां । धणी नुपरे श्रीकृष्णनाथा । निरूपणमिसें ज्ञानकथा । मागुतमागुतां सांगतु ॥ ५१ ॥ या लागीं ज्ञानभक्तांची गोडी । श्रीकृष्णचि जाणे फुडी । कृष्णभजनाची आवडी । भक्त ते गोडी जाणती ॥ ५२ ॥ आधींच तंव हे मुक्तांची कथा । वरी श्रीकृष्णासारिखा वक्ता । उद्धवाचें भाग्य वर्णितां । न वर्णवे सर्वथा शेषादिकां ॥ ५३ ॥ उद्धव अर्जुनासमान । त्याहूनि हा दिसे गहन । ते परस्परें नरनारायण । गुह्य ज्ञान बोलिले ॥ ५४ ॥ तेचि उलथूनि ज्ञानकथा उद्धवासी होय सांगता । उद्धवाऐसें भाग्य तत्त्वतां । न दिसे सर्वथा आनासी ॥ ५५ ॥ जेणें सांडूनि निजधामा । मागें ठेवूनि आपुल्या कामा । उद्धव आवडला पुरुषोत्तमा । त्याचिया प्रेमा विगुंतला ॥ ५६ ॥ यालागीं उद्धवाचें शुद्ध पुण्य । जगीं उध्दवुचि धन्य धन्य । जया-

---

म्हणून अहं-ममतेला माळतो. ४२ एखाद्यानें चोरी न करितांच राजवाड्यापुढें जाऊन 'मी चोर आहें' असें म्हणावें व मग लहान-मोठ्यांच्या हातचा मार खावा, त्याप्रमाणें या जड-जीवाची अवस्था आहे. ४३ तो मायेचें कर्म आपल्या डोकीवर लादून घेऊन अहं-ममतेनें नाचतो, त्या अभिमानामुळें बद्धता दृढ होऊन ती कल्पांतापर्यंत अनिवार होते. ४४ जमिनीला काजळ लावून त्यावर स्वच्छ स्फटिक ठेवावा, म्हणजे तो जसा आपला शुभ्रपणा सोडून काळा दिसूं लागतो, त्याप्रमाणें हा जीव आंधळा झालेला आहे. ४५ किंवा आंधळा हत्ती मत्त झाला म्हणजे विचार न करितां खड्डयांत उडी टाकितो, त्याप्रमाणें जीव पतनाचा विचार न करितां कर्म करूं लागतो. ४६ 'मी देह, मी कर्मकर्ता, मी ज्ञानी, मी विषयांचा भोक्ता,' अशी जी देहात्मबुद्धि तिलाच 'दृढबद्धता' म्हणतात. ४७ याप्रमाणें बद्ध व मुक्त जीवांचें वर्तन स्पष्ट करून सांगितलें. आतां श्रीकृष्ण केवळ मुक्ताचें लक्षण मोठ्या आवडीनें सांगत आहे. ४८ 'ज्ञानी तर माझा आत्माच आहे' हें गुप्त रहस्य भगवानानें अर्जुनाला कुरुक्षेत्रांतील युद्धप्रसंगीं भगवद्गीतेंत सांगितलेंच आहे. (सु. गी. ७–१७ पृ. १५३.) ४९ तीच ज्ञान्यांची मुक्तावस्था म्ह० आपलें रहस्य श्रीपति उद्धवाला अति आदरानें आतां सांगत आहे. २५० ज्ञानाचीं लक्षणें सांगतांना श्रीकृष्णाची तृप्तिच होईना. म्हणून निरूपणाच्या मिषानें श्रीकृष्ण ज्ञानकथा पुनः पुनः सांगत आहे. ५१ यास्तव ज्ञानीभक्तांचें माधुर्य श्रीकृष्णच काय तें खरोखर जाणितो व श्रीकृष्णभजनाच्या आवडीची गोडी त्याचे भक्तच जाणतात. ५२ आधींच ही मुक्ताची कथा व त्यांत श्रीकृष्णासारखा वक्ता तेव्हां उद्धवाच्या भाग्याचें वर्णन शेषादिकांसहि करितां येणें शक्य नाहीं. ५३ उद्धव अर्जुनासारखाच, किंबहुना त्याहूनहि श्रेष्ठ. कारण श्रीकृष्ण व अर्जुन नर-नारायणाचे अवतार असल्यामुळें श्रीकृष्णानें अर्जुनाला गुह्य ज्ञान सांगितलें. ५४ परंतु उद्धवाची गोष्ट तशी नाहीं. कारण तो केवल भक्त असूनहि त्याला तेंच गूढ ज्ञान सांगितलें. यावरून उद्धवासारखा भाग्यवान् दुसरा कोणीच नाहीं. ५५ ज्यानें आपलें निवासस्थान वैकुंठहि सोडिलें, आपलें इतर महत्त्वाचें कार्य बाजूला ठेविलें, त्या पुरुषोत्तमाला उद्धव इतका आवडला कीं, तो त्याच्याच प्रेमांत गुंतून राहिला. ५६ तेव्हां उद्धवाचें पुण्य केवढें थोर ! जगांत उद्धवच धन्य धन्य होय. ज्याच्यावर स्वतः नारायणानें

लागीं स्वयें नारायण। स्वानंदघन वोळला ॥ ५७॥ जो नातुडे योगयागसंकटीं । तो उद्धवाच्या बोलासाठीं । जेवीं व्याली धेनु वत्सा चाटी । तेवीं गुह्य गोठी सांगतु ॥ ५८ ॥ जो निजकुळासी काळू । तो उध्दवासी अतिस्नेहाळू । बापु भक्तकाजकृपाळू । ज्ञानकल्लोळू तुष्टला ॥ ५९ ॥ यालागीं उद्धवाचें नांव घेतां । श्रीकृष्ण निवारी भवव्यथा । ऐशी भक्तप्रीती भगवंता । भक्तांतें स्मरतां हरी तारी ॥२६०॥ मुक्ताचीं लक्षणें निर्धारितां । लाभे आपुली निजमुक्तता । एकाजनार्दनु विनवी संतां । मुक्तकथा हरि बोले ॥ ६१ ॥ कृष्णु उद्धवासी म्हणे मी तुज । सांगेन आपुलें निजगुज । मुक्तलक्षणाचें भोज । नवल चोज परियेसीं ॥ ६२ ॥

एवं विरक्तः शयन आसनाटनमज्जने । दर्शनस्पर्शनघ्राणभोजनश्रवणादिषु ॥ ११ ॥

ऐकें मुक्ताचें लक्षण । आसन भोजन शयन । दर्शन स्पर्शन घ्राण । अटन मज्जन करी कैसें ॥ ६३ ॥ मागील श्लोकार्थु संपतां । प्रकृतिकर्मअभिमानता । तेणें लागली दृढबद्धता । तो अहंकारू ज्ञाता नातळे ॥ ६४ ॥ सर्वकर्मीं स्वभावतां । ज्ञात्याची निरभिमानता । ते मी समूळ सांगेन कथा । सावधानता अवधारीं ॥ ६५ ॥ जेवीं छायेचा मानापमान । पुरुषा न बाधी अणुप्रमाण । तेवीं देहाचें कर्माचरण । निरभिमान मुक्तासी ॥ ६६ ॥ स्वाधिष्ठान तेंचि आसन । अखंड त्यावरी आरोहण । तेथें येवोंचि नेणे अभिमान । बैसलें मन उठीना ॥ ६७ ॥ नवल आसनाचें महिमान । हारपोनि गेलें विस्मरण । कदा एकांतु नोसंडे जाण । हें सहजासन मुक्ताचें ॥ ६८ ॥ जें आसनींचें समाधान ।

स्वानंदरूपी पर्जन्याची वृष्टि केली, ५७ जो योग, यज्ञ इत्यादिकांनींहि प्राप्त होत नाहीं, तो भगवान्, उद्धवावरील प्रेमानें व्यालेली गाय जशी आपल्या वासरला वात्सल्यप्रेमानें चाटिते, त्याप्रमाणें गुह्य गोष्ट सांगूं लागला. ५८ जो श्रीकृष्ण आपल्या कुळाचा संहारकर्ता झाला तोच अतिशय प्रेमळ, भक्तकाजकैवारी, ज्ञानसागर उद्धवावर प्रसन्न झाला. ५९ यास्तव उद्धवाचें नांव घेतांच श्रीकृष्ण संसारव्यथेचें निवारण करितो, असें भगवानाचें भक्तावरील प्रेम आहे. भक्तांचें स्मरण करितांच हरि त्यांचें रक्षण करितो. २६० जी मुक्तांची कथा ऐकतांच आपल्याला मुक्ति प्राप्त होते, तीच मुक्तकथा हरि आतां सांगत आहे, अशी एकनाथ जनार्दन संतांना विनंति करितो. ६१ श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले कीं, मी तुला आतां आपलें गुह्य असें मुक्तांच्या लक्षणाचें महत्त्व सांगतों, तें आश्चर्य ऐक. २६२.

—पुढील तीन श्लोकांनीं आणखी एक वैलक्षण्यच सांगणारे भगवान् ‘ बद्ध व मुक्त भोग कसे घेतात ’ या प्रश्नाचें उत्तर सांगतात—

एवं शयने आसनाटनमज्जने दर्शन-स्पर्शन-घ्राण-भोजन-श्रवणादिषु विरक्तः (विद्वान्)—याप्रमाणें निजणें, बसणें, फिरणें, स्नान करणें, पहाणें, स्पर्श करणें, वास घेणें, भोजन करणें, ऐकणें इत्यादिकांविषयीं हीं देहादिकांचींच कर्मे मला बद्ध करितात, अशा समजुतीनें विरक्त झालेला पुरुष विद्वान् होय. ११.

आतां मुक्ताचें लक्षण ऐक. त्याचें बसणें, निजणें, जेवणें, पहाणें, स्पर्श करणें, वास घेणें, फिरणें, स्नान, करणें, कसें असतें तें सांगतो. ६३ मागील श्लोकाच्या शेवटीं मायाकर्माच्या अभिमानामुळें दृढबंधन प्राप्त होतें, परंतु ज्ञानी तो अभिमानच धरीत नाहीं, असें सांगितलें. ६४ ज्ञानी स्वभावतःच सर्वकर्मांविषयीं निरभिमानी असतो, हीच कथा आतां समग्र सांगतों, ती लक्ष देऊन ऐक. ६५ आपल्या छायेचा कोणी मान केला किंवा अपमान केला तर त्यापासून पुरुषाला जसा रेसभरहि हर्षविषाद वाटत नाहीं त्याप्रमाणें देहाच्या कर्माचरणामध्यें मुक्त अभिमान धरीत नाहीं. ६६ आत्मस्वरूप हेंच त्याचें आसन. त्यावर तो सतत बसलेला असतो. तेथें अभिमान प्रवेशच करूं शकत नाहीं. ६७ या आसनाचा प्रभाव कांहीं विलक्षण आहे. तेथें विस्मरणाचाहि विरस पडतो. एकान्ताचा कधीं भंग होत नाहीं. हेंच मुक्ताचें सहजासन आहे. ६८ त्या आसनावरील जें समाधान तें

समाधि आणि व्युत्थान । करी दोहींची बोळवण । हें चालतें आसन मुक्ताचें ॥ ६९ ॥ जें बैसल्या आसनीं समाधान । त्याचि स्थिति गमनागमन । उठिलों बैसलों नाठवे जाण । चालतेपण स्फुरेना ॥ २७० ॥ चालतांही चपळ पदीं । मी चालतों हे नाठवे बुद्धी । चालतां न मोडे समाधी । हे लक्षण-सिद्धी मुक्ताची ॥ ७१ ॥ जरी त्रैलोक्य हिंडिनला । तरी ठायींहूनि नाहीं हालिला । ऐसा न चलोनि मुक्त चालला । जेवीं अभ्रें धांवला दिसे चंद्र ॥ ७२ ॥ कुलालचक्रीं बैसली माशी । ते न हालतां भंवे चक्रासरसी । मुक्ताची गमनसिद्धि तैशी । देहगमनेंसीं आभासे ॥ ७३ ॥ देहो प्रारब्धास्तव हिंडे । बैसका स्वस्वरूपींचि न संडे । जेवीं रथीं धांवतां सवेग घोडे । निद्रा न मोडे रथस्थाची ॥ ७४ ॥ ऐसें न चळतां जें चळण । तें जाण मुक्ताचें गमन । आतां ऐक त्याचें स्नान । निमज्जन निजरूपीं ॥ ७५ ॥ स्नान करी गंगाजळें । परी गंगोदकातें नातळे । मन चित्स्वरूपीं केलें सोवळें । तें वोवळें हों नेणे ॥ ७६ ॥ त्यासी निजस्वरूपीं नाहतां । जाली परम पवित्रता । तीर्थें मागती चरणतीर्था । ऐशी सुस्नातता मुक्ताची ॥ ७७ ॥ तो चिन्मात्रचि देखे जीवन । अखंड चिद्रूपीं अवगाहन । इतर म्हणती केलें स्नान । त्यासी निमज्जन निजरूपीं ॥ ७८ ॥ त्याचे चरणींचे रजःकण । लाहोनि धरा परम पावन । त्याचेनि प्राणसंगें जाण । पवित्रपण वायूसी ॥ ७९ ॥ त्याचेनि चरणस्पर्शें तत्त्वतां । पवित्र जाल्या गंगादि सरिता । त्याचेनि जठरसंगें सर्वथा । अतिपवित्रता अग्नीसी ॥ २८० ॥ त्याच्या हृदयावकाशीं आकाश । सगळें राहिलें सावकाश । तेणें पवित्र जाहलें आकाश । अलिप्त उदास सर्वत्र ॥ ८१ ॥ जे चढोनि बैसले वैकुंठीं । ते सदा वांछिती तयाची भेटी । वेद ऐकों धांवे गोठी । तो पहावया दिठीं देव येती ॥ ८२ ॥ एवं चित्स्वरूपीं करोनियां स्नान । जाला सर्ववंद्य अतिपावन । हें

समाधि व व्युत्थान म्ह० समाधींतून उठणें, या दोहोंची बोळवण करितें. असलें समाधान हेंच मुक्ताचें चालतें आसन आहे. ६९ बसलेल्या आसनावरील जें समाधान तेंच गमन व अगमन या दोन्हीं प्रसंगीं रहातें. त्याला उठलों व बसलों हें आठवत नाहीं व चालतेपणहि स्फुरत नाहीं. २७० गडबडीनें चालत असतांहि 'मी चालत आहें' हें ज्याच्या बुद्धीला कळत नाहीं. म्ह० चालतांनाहि ज्याची समाधि मोडत नाहीं, त्याच्यामध्यें मुक्त-लक्षण सिद्ध असतें. ७१ मेघामुळें चंद्र जसा धांवत असलेला दिसतो, त्याप्रमाणें मुक्त त्रैलोक्यांत जरी फिरत असला तरी आपल्या आत्मस्वरूपापासून ढळत नाहीं. तसाच मुक्त न चालतांहि चालतो. ७२ कुंभाराच्या चाकावर बसलेली माशी स्वतः न चालतांहि त्या चक्राबरोबर सारखी फिरत असते, त्याप्रमाणें मुक्ताची गमनसिद्धि आहे. देहाच्या गमनाबरोबर ती भासते. ७३ प्रारब्धाप्रमाणें देह फिरत असतो. परंतु मुक्त जीवाचें आत्मस्वरूपांतील आसन ढळत नाहीं. ज्याप्रमाणें रथाचे घोडे भरधांव चालत असले तरी रथांत निजलेल्या माणसाची झोंपमोड होत नाहीं, ७४ त्याप्रमाणें स्वतः आत्मस्वरूपापासून च्युत न होतां फिरणें हेंच मुक्ताचें गमन आहे. आतां त्याचें आत्मस्वरूपांत बुडी मारून होत असलेलें स्नान ऐक. ७५ तो गंगेच्या पाण्यांत स्नान करितो. परंतु गंगोदकाला स्पर्शहि करीत नाहीं. चित्स्वरूपानें सोवळें केलेलें त्याचें मन कदापि ओवळें होत नाहीं. ७६ तो आत्मस्वरूपांत स्नान करितांच परम पवित्र होतो. क्षेत्रांतील तीर्थें त्याचें चरणतीर्थ मागूं लागतात. असें मुक्ताच्या स्नानाचें माहात्म्य आहे. ७७ तो चिन्मात्रालाच जळ समजतो व त्या चिद्रूपांतच सतत बुडी मारून बसतो. इतर लोक त्याला स्नान केलें म्हणतात. परंतु तो आत्मस्वरूपांतच बुडालेला असतो. ७८ त्याच्या चरणाच्या धुळीचे कण लागल्यानें पृथ्वी पवित्र होते आणि त्याच्या उच्छ्वासानें वायु पावन होतो. ७९ त्याच्या चरणस्पर्शानें गंगेसारख्या नद्या पवित्र होतात. त्याच्या जठराच्या संगतीनें अग्नीला पावकत्व येतें. २८० त्याच्या हृदयाच्या पोकळींत सर्व आकाश भरून राहिलें आहे. त्याच्यायोगानेंच आकाश सर्वत्र उदास, अलिप्त व पवित्र झालें आहे. ८१ जे वैकुंठांत जाऊन बसलेले असतात, तेहि सर्वदा मुक्त जीवाच्या भेटीची इच्छा करितात. त्याच्या गोष्टी ऐकण्यास वेद धांवत येतात. देव स्वतः त्याला पहावयास येतात. ८२ याप्रमाणें तो मुक्त चित्स्वरूपांत स्नान

मुक्ताचें स्नानलक्षण । आतां निरीक्षण तें ऐक ॥ ८३ ॥ अवघें चराचर देखतां । तो देखोनिहि न देखता । दृष्टीसी दृश्यासी अलिप्तता । दृश्य देखतां हरि दिसे ॥ ८४ ॥ दृश्यें दुमदुमित दिसे सृष्टी । परी दृश्य न पडे त्याचे दृष्टीं । होतांही दृश्येंसीं भेटी । पडे मिठी अदृश्यीं ॥ ८५ ॥ दृष्टि प्रकाशे देखणेपणीं । तें देखणें देखे दृश्यस्थानीं । जेवीं डोळयां डोळा दर्पणीं । निजदर्शनीं देखतू ॥ ८६ ॥ डोळेनि दर्पणु प्रकाशे । त्यामाजीं डोळेनि डोळा दिसे । मुक्ताचें देखणें तैसें । आपणयाऐसें जग देखे ॥ ८७ ॥ दृश्य द्रष्टा दर्शनीं । त्रिपुटी गेली हारपोनी । देखणें देखे देखणेंनी । देखणा होऊनी सर्वांगें ॥ ८८ ॥ होतां नाना पदार्थेंसीं भेटी । तें देखणेपण दृश्य लोटी । दृश्यातीत निजदृष्टीं । सुखें सृष्टी देखतू ॥ ८९ ॥ मुक्ताची हे देखती स्थिती । देखणेपणें यथानिगुतीं । उद्धवा ये दृष्टीची ज्यासी प्राप्ती । तोचि त्रिजगतीं पावन ॥ २९० ॥ या दृष्टीं जे नित्य वर्तत । ते जाण पां परम मुक्त । या दृष्टीं जे मज पाहत । परम भागवत प्रिय माझे ॥ ९१ ॥ परादिवाचांमाजीं वचन । उपजे तेथ याचें श्रवण । श्रोता वक्ता कथाकथन । अवघें आपण होऊनि ऐके ॥ ९२ ॥ शब्दजातेंसीं कान । अखंड जडले सावधान । श्रवणामाजीं हारपे गगन । परम समाधान श्रवणाचें ॥९३॥ ऐकतां लौकिक शब्द । कां नारायण उपनिषद । परिसतां नाम हरिगोविंद । अर्थावबोध समत्वें ॥ ९४ ॥ बोलातें जो बोलविता । तोचि श्रवणामाजीं श्रोता । येणें अन्वये श्रवण करितां । शब्दीं निःशब्दता अतिगोड ॥ ९५ ॥ जो जो श्रवणीं पडे शब्दू । तो तो होत जाय निःशब्दू । यापरी श्रवणीं परमानंदू । स्वानंदबोधू मुक्ताचा ॥ ९६ ॥ अकारादि वर्णत्रिपुटी । प्रणवू मूळशब्दसृष्टी । तो ओंकार ब्रह्मरूपें उठी । हे श्रवणसंतुष्टी मुक्ताची ॥ ९७ ॥ श्रवणीं पडतां शब्दज्ञान । सहजें शाब्दिक

करून अत्यंत पावन व जगाला वंद्य होतो. हें मुक्ताच्या स्नानाचें लक्षण झालें. आतां त्याचें निरीक्षण कसें असतें, तें ऐक. ८३ हें सारें चराचर विश्व पाहूनहि तो तें न पहाणारा असाच असतो. त्याच्या दृष्टीला दृश्याचा लेप लागत नाहीं. त्यानें दृश्य पाहिलें कीं, तेथें हरिच दिसतो. ८४ ही सर्व सृष्टि गजबजलेली असते. परंतु त्याच्या नजरेला दृश्य दिसत नाहीं. कारण दृश्याची भेट होतांच अदृश्य होतें. ८५ ज्याप्रमाणें मनुष्य आरशांत आपल्या डोळ्यानेंच डोळ्याला पहातो त्याप्रमाणें दृष्टि चैतन्यानें प्रकाश पावते व दृश्यस्थानीं चैतन्यालाच पहाते. ८६ डोळ्यांनीं आरसा दिसतो. त्यांतील डोळाहि डोळ्यानेंच दिसतो मुक्ताचें पहाणेंहि तसेंच आहे. तो स्वतः-सारखेंच सर्व जगत् पहातो. ८७ दृश्य, द्रष्टा व दर्शन ही त्रिपुटी नाहींशी होते. मग सर्वांगानें चैतन्य होऊन त्या चैतन्यानेंच चैतन्य पहातो. ८८ अनेक पदार्थ पुढें आले असतां चैतन्य त्या दृश्याला दूर घालवितें आणि दृश्यातील निजदृष्टीनें सृष्टीला सुखानें पहातें. ८९ ही मुक्ताची पहाण्याची रीत आहे. हे उद्धवा! चैतन्यरूपानें या दृष्टीची ज्याला प्राप्ति होते तोच त्रिभुवनांत पावन होय, २९० या दृष्टीनें जे नेहमीं वागतात ते परम मुक्त होत, असें समज. जे या दृष्टीनें मला पहातात, ते श्रेष्ठ भक्त मला अत्यंत प्रिय होतात ९१ परादि-वाणींचा शब्द जेथें निघतो तेथेंच त्याचे कान असतात. श्रोता, वक्ता, कथानिरूपण इत्यादि सर्व तो स्वतः होऊन ऐकतो ९२ त्याचे कान सर्व शब्द ऐकण्यास अखंड सावधान होऊन रहातात. श्रवणामध्यें आकाश लोपून जातें श्रवणाचें असें परम समाधान आहे. ९३ लौकिक शब्द कानीं पडले किंवा नारायणाचें नांव ऐकिलें किंवा उप. निषद्; हरि गोविंद, हीं नावें श्रवण केलीं तरी त्याला सर्वांचा अर्थबोध सारखाच होतो. ९४ जो शब्द बोल. विणारा तोच कानामध्यें ऐकणारा आहे. याप्रमाणें श्रवण करीत असतां शब्दामध्यें अति मधुर निःशब्दता येते. ९५ जो जो शब्द कानीं पडतो तो तो निःशब्दच होत जातो, याप्रमाणें मुक्ताच्या श्रवणांतहि परमानंद व आत्मबोध भरलेला असतो. ९६ अकार, उकार, मकार या तीन वर्णांच्या त्रिपुटीनें शब्दसृष्टींतील मूळ शब्द जो ओंकार म्ह० प्रणव तो त्याला ब्रह्मरूपानें दिसतो. हेंच मुक्ताचे श्रवणसमाधान होय. ९७ शब्दज्ञान कानीं पडतांच सर्व शब्दसमूह सहज नाहींसा होतो व पूर्ण ब्रह्मच श्रवणांत ठसतें, हेंच मुक्ताचें स्वानंद श्रवण

जाय उडोन । श्रवणीं ठसावे ब्रह्म पूर्ण । स्वानंदश्रवण मुक्ताचें ॥ ९८ ॥ परिसतां उपनिषद् । कां लौकिकादि नाना शब्द । मुक्ताचा पालटेना बोध । श्रवणीं स्वानंद कोंदला ॥ ९९ ॥ एक अद्वितीय ब्रह्म । हें वेदशास्त्रांचें गुह्य वर्म । तें मुक्तांसी जाहलें सुगम । शब्दीं परब्रह्म कोंदलें ॥ ३०० ॥ लौकिक वैदिक शब्द जाण । शब्दमात्रीं ब्रह्म पूर्ण । ऐसें मुक्ताचें हें श्रवण । घ्राणलक्षण परियेसीं ॥ १ ॥ घ्राणासी येतां सुगंधू । मुक्तासी नोहे विषयबोधू । गंधमिसें स्वानंदकंदू । परमानंदू उल्लासे ॥ २ ॥ घ्राण सुमन चंदन । अवघें तो होय आपण । यापरी गंध भोगी जाण । भोक्तेपण सांडोनि ॥ ३ ॥ घ्राणा येतांचि सुवासू । सुवासीं प्रकटे परेशू । तेव्हां सुवासु आणि दुर्वासू । हा विषयविलासू स्फुरेना ॥ ४ ॥ मलयानिलसंगें जाण । जेथ जेथ गंधाचें गमन । तेथ तेथ मुक्ताचें घ्राण । अगम्यपण या भोगा ॥ ५ ॥ जितुका चळता वायू जाण । तितुकें मुक्ताचें घ्राण । यापरी गंधग्रहण । स्वभावें जाण होतसे ॥ ६ ॥ यापरी जाण तत्त्वतां । होय तो गंधाचा भोक्ता । हे घ्राणक्रिया जाण मुक्ता । रसभोग्यता अवधारीं ॥ ७ ॥ रस रसना भोजन । तो स्वयेंचि आहे आपण । हातू न माखितां सर्वापोशन । रसनेविण सेवितू ॥ ८ ॥ षड्रसांचा स्वादू जाणे । परी एकीं चवीं अवघें खाणें । भोक्तेपणा आतळों नेणे । ऐसेनि भोजनें नित्यतृप्तु ॥ ९ ॥ भूक उपजोंचि नेणे । जेवू बैसल्या पुरे न म्हणे । सर्व भक्षी नखातेपणें । उच्छिष्ट होणें त्या नाहीं ॥ ३१० ॥ ताट अन्न आणि आपण । तो न देखे भिन्नपण । रसमिसें स्वानंदपूर्ण । सर्वांगें जाण सेवित ॥ ११ ॥ जंव रसना घेवों जाय रसस्वादू । तंव तेथें प्रकटे परमानंदू । करूनि रसरसने उच्छेदू । निजानंदू सेवितु ॥ १२ ॥ सकळ गोडियांची मूळ गोडी । तेथ बैसली निजआवडी । सेवितां नाना परवडी । तेचि गोडी गोडपणें ॥ १३ ॥ सकळ गोडियां जें गोड आहे । ते गोडीच तो जाला स्वयें । आतां जो जो रसविषयो खाये । तेथ तेथ आहे ते गोडी ॥ १४ ॥ कैसा मुक्ताचा निजबोधू । घेवों जातां

होय. ९८ उपनिषद् किंवा लौकिकादि अनेक शब्द ऐकतांना मुक्ताचें ज्ञान पालटत नाहीं. त्याच्या श्रवणांत स्वानंद भरलेला असतो. ९९ वेद-शास्त्रांचें जें गुह्य वर्म तेंच अद्वितीय ब्रह्म मुक्तांना फार सुलभ झालेलें असतें. शब्दांत परब्रह्मच भरलेलें असतें. ३०० शब्द लौकिक असोत किंवा वैदिक असोत, त्यांत त्याला पूर्णब्रह्म भरलेलें दिसतें. असें मुक्ताचें श्रवण आहे. आतां त्याच्या वासाचें लक्षण ऐक. १ नाकाला जरी सुवास आला तरी त्यानें मुक्ताला गंधविषयाचा बोध होत नाहीं. त्या सुगंधाच्या रूपानें स्वानंदकंदच परमानंदानें त्याच्या अनुभवास येतो. २ नाक, पुष्प, चंदन इत्यादि सर्व तो स्वतःच होतो. याप्रमाणें भोक्तेपणा टाकून तो सुवासाचा भोग घेतो. ३ नाकाला सुवास येतांच त्या सुवासांत परमेश्वर प्रकट होतो. त्यामुळें तो सुगंध आहे किंवा दुर्गंध आहे हें विषयज्ञान त्याला होत नाहीं. ४ मलयपर्वतावरील वायुबरोबर जेथें जेथें सुवास जातो, तेथें तेथें या मुक्ताचें नाक असतें. त्याचें वास घेणें मोठें अतर्क्य असतें. ५ जेवढा वायु वहातो तेवढें मुक्ताचें वास घेणें असतें. ६ याप्रमाणें तो सहज वास घेत असतो. ही मुक्ताची वास घेण्याची क्रिया झाली. आतां त्याचें रससेवन ऐक. ७ रस, रसना, भोजन हें सर्व तो स्वतःच आहे. जिभेवांचून व हात न माखतां तो खात असतो. ८ तो सहाहि रसांचा आस्वाद घेतो; परंतु ते सर्व एकाच चवीनें खातो. भोक्तेपणाला स्पर्शहि न करितां तो या भोजनानें नित्य तृप्त असतो. त्याला भूक लागणें ठाऊक नसतें. तो जेवायला बसला कीं पुरें म्हणत नाहीं व न खातांच सर्व भक्षण करितो. त्याला उष्टेपणा नसतो. ३१० ताट, अन्न व खाणारा आपण, यांत तो भेदच पहात नाहीं. रसाच्या नांवानें तो पूर्ण स्वानंदाचें सेवन करितो. ११ जिभ रसाची गोडी घेण्यास जाते. तों तेथें परमानंद प्रकट होतो व रस आणि रसना या दोहोंचा उच्छेद करून निजानंदाचें सेवन करितो. १२ सर्व गोडपणाचें जें मूळ माधुर्य तेथेंच त्याची सर्व आवड असल्यामुळें त्यानें नानाप्रकारचे पदार्थ खाल्ले तरी सर्वांत त्याला तें एकच माधुर्य आढळतें. १३ सर्व गोडांतील जें गोड तें तो स्वतःच झाला आहे. त्यामुळें तो जेवढा रस खातो त्यांत तीच गोडी असते. १४ मुक्ताचा आत्मबोध

रसस्वादू । रसत्व लोपूनि स्वानंदकंदू । परमानंदू वोसंडे ॥ १५ ॥ यालागीं जो जो रस सेवूं जाये । तो तो ब्रह्मरसूचि होये । मुक्ताची रसना यापरी पाहें । घेत आहे रसातें ॥ १६ ॥ एवं मुक्ताचें जें भोजन । ते करिती क्रिया ऐशी जाण । आतां तयांचें स्पर्शन । तेंही लक्षण परियेसी ॥ १७ ॥ मुक्तासीं लागतांचि जाणा । शीत सांडी शीतळपणा । स्पर्शें उष्ण मुकलें उष्णा । स्पर्शनलक्षणा हे त्याची ॥ १८ ॥ जेवीं कां टेंकितां अग्नीशी । धुरें आणि चंदनाशी । जाळूनि त्यांच्या विकाराशी । आपणाऐशी करी वन्ही ॥ १९ ॥ तेवीं मुक्तासी द्वंद्वें आदळतां । द्वंद्वाची बुडाली द्वंद्वता । तो सर्वीं सर्वपणें असतां । सहजें द्वंद्वता निमाली ॥ ३२० ॥ तेथ कैंचें मृदु कैंचें कठिण । कैंचें शीत कैंचें उष्ण । सर्वीं सर्वात्मा तो जाण । द्वंद्वाचें भान स्पर्शेना ॥ २१ ॥ आगीसी पोळीना उन्हाळा । हींव पीडीना हिमाचळा । तैशी द्वंद्वाची हे माळा । मुक्ताचे गळां पडेना ॥ २२ ॥ सुवर्णाचे अलंकार भले । सुवर्णपेटीमाजीं झांकिले । झांकिले म्हणतां उघडे ठेले । तेवीं द्वंद्वें सकळें परब्रह्म ॥ २३ ॥ त्यासी अंगीं जें जें आदळे । तें अंगचि होय तत्काळें । कांहीं नुरे त्यावेगळें । द्वंद्वें सकळें निमालीं ॥ २४ ॥ हातीं लीलाकमळ सांपडे । तंव कमळीं कमळत्वचि उडे । कमळजन्मा तोही बुडे । करी रोकडें निजरूप ॥ २५ ॥ स्पर्श स्पर्शतें स्पर्शावें । हेही त्रिपुटी न संभवे । किंबहुना आपणचि आघवें । निजस्वभावें होऊनि ठेला ॥ २६ ॥ तो देवपूजा हातीं धरी । तरी मीचि ते देवपूजेभीतरीं । अथवा खेळों रिघाल्या पाथरीं । त्याहीमाझारीं मी त्यासी ॥ २७ ॥ भिंती नानावर्ण चित्राकृती । तेथें जें जें स्पर्शे तें तें भिंती । तेवीं मुक्ताची स्पर्शनस्थिती । पूर्ण अद्वैतीं निजबोधू ॥ २८ ॥ यापरी गा तत्त्वतां । स्पर्शलक्षण वर्ते मुक्ता । त्याचें बोलणें जें सर्वथा । ऐक आतां सांगेन ॥ २९ ॥

कसा असतो, तें पहा. तो रसास्वाद घेऊं लागला असतां त्यांतील रसत्व नाहींसें होऊन स्वानंदकंद परमानंदच भरून जातो. १५ यास्तव ज्या ज्या रसाचें तो सेवन करितो, तो तो ब्रह्मरसच होतो. मुक्ताची रसना याप्रमाणें रसाचें ग्रहण करिते. १६ असें जें मुक्ताचें भोजन तीच क्रिया ते करितात, असें तूं समज. आतां मुक्ताच्या स्पर्शनाचें लक्षण ऐक. १७ थंडी मुक्ताला स्पर्श करितांच आपला गारठा सोडून देते व उष्ण त्याच्या स्पर्शानें आपलें उष्णत्व टाकितें, असें त्याचें स्पर्शनलक्षण आहे. १८ अग्नीचा संग घडतांच चंदन व दुर्गंधयुक्त काष्ठ यांतीलहि सुगंध व दुर्गंध हे गुण नाहींसे करून अग्नि त्यांना आपल्यासारखें बनवितो. १९ त्याप्रमाणें मुक्ताजवळ सुख-दुःखादि द्वंद्वें जातांच तो त्यांचे गुण-धर्म घालवून त्यांना समत्व आणितो. तो सर्वांत सर्वपणानें असल्यामुळें त्याचा द्वंद्वपणा आपणच नाहींसा होतो. ३२० मग तेथें मऊ कशाचें व कठिण कशाचें! थंड कोठचें व उष्ण कोठचें! तो सर्वांत सर्वांचा आत्मा होऊन राहिल्यामुळें त्याला द्वंद्वाचें भानहि स्पर्श करीत नाहीं. २१ अग्नीला उन्हाळा कांहीं पोळीत नाहीं किंवा हिमालयाला शीत बाधत नाहीं. त्याप्रमाणें ही द्वंद्वाची माळ मुक्ताच्या गळ्यांत केव्हांहि पडत नाहीं. २२ सोन्याचे सुंदर सुंदर दागिने केले व ते सोन्याच्याच पेटींत ठेविले तर ते बंद ठेवणें व उघडे ठेवणें सारखेंच आहे. त्याप्रमाणें मुक्ताला सर्व द्वंद्वें परब्रह्मरूपच आहेत. २३ जें जें कांहीं मुक्ताच्या अंगाशीं येऊन भिडतें तें सर्व त्याच्यासारखेंच बनतें. त्याच्याहून वेगळें असें कांहीं रहात नाहीं. सर्व द्वंद्वें नाहींशीं होतात. २४ हातांत लीलाकमल सांपडलें म्हणजे कमलाचें कमलत्वच नाहींसें होतें. ब्रह्मदेवहि त्यांत बुडून जातो व साक्षात् आत्मरूप होतो. २५ स्पर्श, स्पर्श करणारा व स्पर्शाचा विषय ही त्रिपुटीच संभवत नाहीं. किंबहुना तो स्वतःच सर्व होऊन आपल्या स्वभावांत रहातो. २६ त्यानें पूजेला देवाची मूर्ति हातांत घेतली, तर त्यांत आपण स्वतःच आहोंत असें मुक्ताला वाटत असतें. किंवा तो जर दगडांनीं खेळूं लागला तर त्यांतहि 'मीच आहें' असें तो समजतो. २७ भिंतीवर नानाप्रकारचीं चित्रें काढिलीं, तरी जेथें हात ठेवावा तेथें मूळ भिंतच असते. त्याप्रमाणें मुक्ताचें स्पर्श करणेंहि पूर्ण अद्वैत आत्मबोध असतें. २८ मुक्त याप्रमाणें स्पर्शलक्षणानें तत्त्वतः वागत असतो. आतां मुक्ताचें बोलणें कसें असतें, तें सांगतों, ऐक. २९ एखादी सुरस कथा आवडीनें सांगत असतां किंवा लौकिक बोलणें

सुरस कथा सांगे वाडेंकोडें । अथवा लौकिक बोलणें घडे । परी त्याची समाधिमुद्रा न खंडे । मौन न मोडे बोलतां ॥ ३३० ॥ बोलतांही नोमडे मौन । हेचि अनुभवाची आंतुल खूण । शब्दामाजीं निःशब्दगुण । सज्ञान जाण जाणती ॥ ३१ ॥ स्त्रीपुरुषें अबोला चालती । तों अबोला कीं अतिप्रीती । तेवीं मुक्ताची बोलती स्थिति । शब्द शब्दार्थीं निःशब्द ॥ ३२ ॥ जयाची बोलती अक्षरें । अक्षररूपेंचि साचारें । त्याचीं ऐकतां उत्तरें । चमत्कारें मन निवे ॥ ३३ ॥ मी एकु चतुर बोलका । हाही नाहीं आवांका । अथवा रंजवावें लोकां । हेंही देखा स्मरेना ॥ ३४ ॥ निःशब्दीं उठती शब्द । शब्दामाजीं ते निःशब्द । यापरी करितांही अनुवाद । बोलोनि शुद्ध अबोलणा ॥ ३५ ॥ जळामाजीं उपजे तरंग । जळ तरंगींचें निजांग । तेवीं निःशब्दीं शब्द सांग । शब्दाचें सर्वांग निःशब्द ॥ ३६ ॥ वाच्यवाचकता त्रिपुटी । लोपुनि सांगे गोड गोठी । करितां सैराट चावटी । न सुटे मिठी मौनाची ॥ ३७ ॥ म्यां सत्यचि बोलावें । हेंही त्यासी जीवें नाठवे । मिथ्या बोलों लोभस्वभावें । हेंही न संभवे मुक्तासी ॥ ३८ ॥ सत्य मिथ्या जीं बोलणीं । निःशेष प्राशूनि नेलीं दोनी । मुळींच्या मौनें जाला मौनी । नाना वचनीं बोलतां ॥ ३९ ॥ तेथ सैराट हाक देतां । कां सिंहनादें त्या गर्जतां । शब्दीं ठसावली निःशब्दता । मौन सर्वथा मोडेना ॥ ३४० ॥ जरी तो माझें स्तवन करी । तरी मी त्याच्या स्तवनामाझारीं । तो जरी सैरा बडबड करी । त्याहीमाझारीं मी त्यासी ॥ ४१ ॥ जरी त्यासी येऊनि भांडण पडे । परी भांडणही करणें घडे । त्या कलहामाजीं मागेंपुढें । चहूंकडे मज देखे ॥ ४२ ॥ त्याचे वांकडेतिकडे व्यंग बोले । ते जाण ब्रह्मचि केवळ । तया आम्हां अभिन्न मेळ । निजात्मसाक्ष वस्तीसी ॥ ४३ ॥ अवचटें त्याच्या मुखाबाहेरी । ज्यासी म्हणे तुज देवो तारी । त्यासी मी वाउनियां शिरीं । ब्रह्मसाक्षात्कारीं

बोलत असतां त्याच्या समाधिमुद्रेंत कधींच बदल होत नाहीं व बोलतांना त्याच्या मौनाचा भंग होत नाहीं. ३३० बोलतांनाहि मौनभंग होऊं नये, ही अनुभवाची अंतःस्थ खूण आहे. शब्दांतच निःशब्दत्व कसें रहातें तें ज्ञानी जाणतात. ३१ पति-पत्नी परस्परांशीं न बोलतांच वागत असतात. तो त्यांचा अबोला कीं अत्यंत प्रेम ! त्याचप्रमाणें मुक्ताची बोलण्याची स्थिति आहे. त्याचा शब्द शब्दार्थामध्यें बुडून जातो. ३२ तो जीं अक्षरें उच्चारितो तीं खरोखर अक्षरब्रह्मरूपच असतात. त्याची वाणी ऐकतांच मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें. ३३ मीच काय तो एक चतुर, बोलका असा अभिमान त्याला नसतो. किंवा आपल्या बोलण्यानें लोकांचें रंजन करावें असें तो कधीं मनांतहि आणीत नाहीं. ३४ निःशब्द स्वरूपामध्यें शब्द उठतात. शब्दामध्येंहि तें निशब्द स्वरूपच असतें, त्याप्रमाणें तो शब्दांनीं अनुवाद जरी करीत असला तरी बोलून शुद्ध मौनी असतो. ३५ पाण्यामध्यें तरंग उत्पन्न होतात; परंतु त्या तरंगांचें स्वरूप जल असतें. त्याप्रमाणें निःशब्दापासून शब्द उठतात. पण शब्दाचें सर्वांग निःशब्द असतें. ३६ वाच्य, वाचा व वाचकता ही त्रिपुटी लोपून तो गोड गोष्टी सांगतो. त्यामुळें वेडेवांकडे व असंबद्ध भाषण करितांनाहि तो दृढ मौन धरून बसतो. ३७ मी सत्य भाषणच केलें पाहिजे, ' याचें मुक्ताला स्मरणहि नसतें व लोभस्वभावानें मिथ्या भाषण करावें हेंहि मुक्ताच्या ठिकाणीं संभवत नाहीं. ३८ सत्य व मिथ्या हीं दोन्हीं भाषणें त्यानें प्राशन केलेलीं असतात. म्हणून तो मूळच्या मौनानें अनेक वचनें बोलत असतांनाहि मौनी असतो. ३९ त्यानें मोठ्यानें हांक दिली किंवा सिंहासारखी गर्जना केली तरी शब्दांत निःशब्दता भरलेली असल्यामुळें त्याचें मौन मोडत नाहीं. ३४० त्यानें माझी स्तुति केली तरी त्यांतहि मीच असतों. किंवा वायफळ बडबड केली तरी त्यांतहि त्याला मीच दिसतों. ४१ त्याच्यावर भांडण्याचा प्रसंग आला तर तो भांडणहि करितो. परंतु त्या भांडणांतहि मागें पुढें चहूंकडे मलाच पाहतो. ४२ त्याचें बोलणें वेडे-वांकडें किंवा व्यंग जरी असलें तरी तें सारें शुद्ध परब्रह्मच आहे. त्या मुक्तजीवांत आणि आमच्यांत कांहींच भेद नसल्यामुळें आम्हीं दोघेहि एकाच ठिकाणीं वास करितों. ४३ देव तुझें रक्षण करील असे शब्द त्या मुक्ताच्या तोंडून अकस्मात् जरी निघाले तरी मी त्याला आपल्या डोकीवर घेऊन ब्रह्मसाक्षात्का-

पावविं ॥ ४४ ॥ यालागीं त्याच्या वचनाआधीन । मी सर्वथा असें जाण । त्याचें वचन तें प्रमाण । सर्वस्वें जाण मी मानीं ॥ ४५ ॥ आतां तो मी हे ऐशी बोली । बाहेर सवडीं वाढिन्नली । मी तोचि तो हे किली । मागी चोजवली मद्भक्तां ॥ ४६ ॥ यालागीं तो माझा जीवप्राण । मी तयाचें निजजीवन । तयासी मज भिन्नपण । कल्पांतीं जाण असेना ॥ ४७ ॥ एवं तो सगळा मजभीतरीं । मी तया आंतुबाहेरीं । ऐसेनि अभिन्नपणेंकरीं । सुखें संसारीं नांदतू ॥ ४८ ॥ त्याचे मुखींचे जे जे बोल । ते मीचि बोलता सकळ । मुक्ताचें बोलणें केवळ । तुजप्रती विवळ म्यां केलें ॥ ४९ ॥ हातीं कांहीं घेवों जाये । तंव तें घेणें देवो होये । देतां कांहीं देवो पाहे । तेंही होये तद्रूप ॥ ३५० ॥ तेव्हां दान आणि देतेघेते । भिन्नपणें न देखे तेथें । यालागीं करोनियां अकर्ते । यापरी करांतें वर्तवी ॥ ५१ ॥ निजस्वभावें ते कर । जो कांहीं करिती व्यापार । तेथ नकेलेपणाचें सूत्र । सहजीं साचार ठसावे ॥ ५२ ॥ करीं पडलिया शस्त्र । करूं जाणे तो व्यापार । परी मी कर्ता हा अहंकार । अणुमात्र असेना ॥ ५३ ॥ पुढें वोढवलें अवचितें । तरी खेळों जाणे द्यूतकर्मातें । हारी जैत नाठवे चित्तें । निजस्वभावें तें खेळतु ॥ ५४ ॥ वोडवल्या ब्राह्मणपूजा । करूं जाणे अतिवोजा । पूज्यपूजकत्वें भावो दुजा । न मनूनि द्विजां पूजितु ॥ ५५ ॥ धनुर्षी काढूं जाणे वोढी । अनुसंधानें बाण सोडी । अलक्ष लक्षूनि भेदी निरवडीं । परी न धरी गोडी श्लाघेची ॥ ५६ ॥ कैसे कर्म निपजे करीं । जैशा समुद्रामाजीं लहरी । तैसा निजस्वरूपामाझारीं । नाना व्यापारीं निश्चळु ॥ ५७ ॥ सूर्यु मृगजळातें भरी । तैसा व्यापारू निजनिर्विकारीं । परी केलेपण शरीरीं । तिळुभरी असेना ॥ ५८ ॥ सूर्यकांतीं अग्नि खवळे । तें कर्म म्हणती सूर्यें केलें । तैसें हस्तव्यापारें जें जे जालें । नाहीं केलें तें त्याणें ॥ ५९ ॥ सूर्यकांतीं पाडावा अग्नी । हें नाहीं

राळाच नेऊन पोंचवितों. ४४ यास्तव मी सर्वथा मुक्ताच्या शब्दाधीन आहें, असें समज. मी त्याचें वचन सर्वस्वीं प्रमाण मानितों. ४५ आतां तो व मी असें बोलण्याचा प्रघात आहे, इतकेंच. एरवीं तो व मी एकच आहोंत, ही गुरुकिल्ली माझ्या भक्तांना कळलेली आहे. ४६ यासाठीं तो माझा जीव कीं प्राण आहे, मी त्याचें आत्मजीवन आहें. त्याच्यांत व माझ्यांत कल्पान्तींहि भिन्नत्व येत नाहीं. ४७ याप्रमाणें तो सर्वथा माझ्यामध्यें आहे आणि मी त्याला आंतून बाहेरून व्यापिलें आहें. अशा एकत्वानें तो संसारांत सुखानें नांदतो. ४८ त्याच्या तोंडचे जे शब्द असतात ते सर्व मीच बोलत असतों. मुक्ताचें बोलणें कसें असतें, तेंच केवळ मीं तुला स्पष्ट करून सांगितलें. ४९ तो हातानें कांहीं घ्यावयास जातो, तर तें घेणेंच देव होतें. बरें कांहीं देऊं लागला तर देणेंहि तसेंच होतें. ३५० तेव्हां दान, दान देणारा व घेणारा या तिहींस तो भिन्नपणानें पहात नाहीं व दानादि करूनहि तो हातांना अकर्तेपणानें वागवितो. ५१ आपल्या स्वभावानुसार त्याचे हात जो कांहीं व्यवहार करितात त्यांत नकलीपणाचें सूत्र सहजच ठसतें ५२ त्याच्या हातांत शस्त्र पडलें तर तो शस्त्रांचा उपयोग कसा करावा, हें जाणतो. परंतु 'मी कर्ता' असा अभिमान मात्र रेसभरहि धरीत नाहीं. ५३ अकस्मात् जर द्यूत खेळण्याचा प्रसंग ओढवला, तर तो हरणें व जिंकणें हें मनांतहि आणीत नाहीं. तर स्वाभाविकपणें खेळत असतो. ५४ ब्राह्मणाची पूजा प्राप्त झाली तर तीहि यथाविधि करावयास तो जाणतो. तो पूज्य व मी पूजक असा दुजाभाव मनांत न ठेवितां तो ब्राह्मणाचें पूजन करितो ५५ त्याला धनुष्याची दोरी ओढून बाण सोडावयाचा माहीत असतो. तो नेम धरून लक्ष्याचा भेद करितो. परंतु आपली कीर्ति व्हावी अशी इच्छा करीत नाहीं. ५६ समुद्रांत जशा लाटा उत्पन्न होतात, त्याप्रमाणें त्याच्या हातून भिन्न भिन्न कर्में होतात. परंतु तो अनेक प्रकारचीं कर्में करून आत्मस्वरूपांत निश्चल असतो. ५७ सूर्य जसें मृगजळ निर्माण करितो, त्याप्रमाणें स्वतःच्या निर्विकार स्वरूपांत त्याचा व्यापार होतो. परंतु तो कर्तेपणाचा अभिमान तिळभरहि धरीत नाहीं. ५८ सूर्यकांत मण्यांतून किरण येतांच अग्नि प्रदीप्त होतो व तें कर्म सूर्यानें केलें असें म्हणतात. त्याप्रमाणें हातांनीं ज्या ज्या क्रिया घडतात त्या अकर्तेपणानें होतील अशाप्रकारें आपल्या हातांना तो वागवितो. कारण वस्तुतः त्या त्यानें केलेल्याच नसतात.

सूर्याचे मनीं । तेवीं मुक्त निरभिमानी । क्रियाकरणी विचरतु ।। ३६० ।। त्यासी चालऊं जातां पायें । तळीं पृथ्वी नाहीं होये । आपण आपणियावरी पाहे । चालतु जाये स्वानंदें ।। ६१ ।। जळींचा जळावरी तरंग । अभिन्नपणें चाले चांग । तैसा तो निजरूपीं सांग । चालवी अंग चिद्रूपें ।। ६२ ।। तयासी असतांही चरण । आवडी चाले चरणेंविण । करी सर्वांगें गमन । सर्वत्र जाण जालासे ।। ६३ ।। जेवीं अखंड दंडायमान । पायेंवीण चाले जीवन । तेवीं चरणेंविण गमन । नित्य सावधान मुक्ताचें ।। ६४ ।। सर्वथा पायेंवीण । वायूचें सर्वत्र गमन । तैसेंच मुक्ताचें लक्षण । स्वरूपीं जाण सर्वत्र ।। ६५ ।। यापरी न हालतां जाण । त्याचें सर्वत्र गमन । नाठवे चालतेपण । ऐसेंच लक्षण मुक्ताचें ।। ६६ ।। मुळीं आत्मा आत्मी नाहीं जाणा । यालागीं स्त्रीपुरुषभावना । त्यासी सर्वथा आठवेना । दैवें अंगना तो भोगी ।। ६७ ।। नटू नाटकु अवगला । पुरुष स्त्रीवेषें दिसों आला । स्त्रीपुरुषभावो संपादिला । तेवीं हा जाहला गृहस्थु ।। ६८ ।। का अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी । मुक्तासीं जाण तैशापरी । स्त्रीपुरुषाकारीं निजबोधू ।। ६९ ।। जेवीं कां आपुली साउली । आवडीं आपण आलिंगिली । तेवीं मुक्तें स्त्री भोगिली । द्वैताची भुली सांडोनी ।। ३७० ।। छाया कोठें असे कोठें वसे । सरशी असतां ज्याची तो न पुसे । मुक्तासी जाण तैसें । लालुप्य नसे स्त्रियेचें ।। ७१ ।। एवं स्त्रीपुरुषविकारप्राप्ती । त्याची न मोडे आत्मस्थिती । दैवें जाहलिया संतती । आत्मप्रतीति तेथेंही ।।७२।। ‘ आत्मा वै पुत्रनामासी ’ । सत्यत्व आलें ये श्रुतीसी । पुत्रत्वें देखे आपणासी निजरूपेंसीं सर्वदा ।। ७३ ।। स्वयें जनकू स्वयें जननी । स्वयें क्रीडें पुत्रपणीं । आपणावांचूनि जनींवनीं । आणिक कोणी देखेना ।। ७४ ।। एवं स्त्रीपुत्रसंतती । जेवीं आकाशीं मेघपंक्ती ।

---

५९ सूर्यकांत मण्यांतून अग्नि उत्पन्न करावा असें सूर्याच्या ध्यानींमनींहि नसतें; त्याचप्रमाणें मुक्त निरभिमानानें प्राप्त कर्में करीत फिरत असतो. ३६० त्याला त्याचे पाय चालवूं लागले म्हणजे त्याच्या पायांखालीं भूमि नसते. तो स्वतःवरच स्वानंदानें चालत असतो. ६१ जलांतील लहरी जलावरच अभिन्नपणानें फिरत असतात. त्याचप्रमाणें मुक्तहि चिद्रूपानें आत्मस्वरूपांत फिरत असतो. ६२ त्याला पाय असून तो आवडीनें पायांवांचून चालतो. तो सर्वांगानें गमन करितो. कारण तो सर्वरूप झालेला असतो. ६३ ज्याप्रमाणें पाणी पायांवांचूनच अखंड प्रवाहानें चालतें, त्याप्रमाणें मुक्ताचें नित्य समाधान हेंच पायावांचून गमन आहे. ६४ ज्याप्रमाणें पायांवांचून वायु सर्वत्र संचार करितो त्याप्रमाणें मुक्ताचें लक्षण आहे. तो सर्वत्र आत्मस्वरूपानें संचार करितो. ६५ याप्रमाणें जागचें न हलतां त्याचें सर्वत्र गमन आहे. त्याला मी चालतों हें आठवत नाहीं, असें मुक्ताचें लक्षण आहे. ६६ वस्तुतः आत्मा व आत्मी असा भेद नाहीं. त्यामुळें त्याला स्त्री-पुरुष ही भावनाच कधीं होत नाहीं. दैवयोगानें प्राप्त झालेल्या स्त्रीचा तो उपभोग घेतो. ६७ नटानें नाटकाचें शिक्षण घेतलें म्हणजे तो पुरुष असूनहि स्त्रीवेश घेतो. त्यावेळीं स्त्री व पुरुष हे दोन्ही भाव त्याजपाशीं जसे असतात त्याचप्रमाणें हा मुक्त गृहस्थाश्रमी होतो. ६८ किंवा अर्धनारीनटेश्वराच्या स्वरूपांत तोच पुरुष व स्त्रीहि असतो, त्याचप्रमाणें मुक्ताला स्त्री किंवा पुरुष या दोन्ही आकारांत आत्मबोधच होतो. ६९ ज्याप्रमाणें आपल्याच छायेला आपण प्रेमानें आलिंगन द्यावें त्याचप्रमाणें मुक्त द्वैतभावना टाकून स्वस्त्रीबरोबर व्यवहार करितो. ३७० आपली छाया कोठें पडली आहे, कशी पडली आहे याचा विचारहि ती अगदीं सन्निध असल्यामुळें कधीं कोणी करीत नाहीं. त्याप्रमाणें मुक्त स्त्रीवर आसक्त नसतो. ७१ त्यामुळें स्त्री-पुरुषांच्या मनोविकारानेंहि त्याच्या आत्मस्थितीचा भंग होत नाहीं. नशीबानें त्याला संतति झाली तरी त्यांतहि त्याला आत्मानुभवच येत असतो. ७२ त्याच्या ठिकाणीं ‘ आत्मा वै पुत्रनामासि० ’ म्ह० पुत्र हा आपला आत्माच आहे या श्रुतिवचनाला सत्यत्व येतें. कारण तो सर्वदा आपल्या आत्मस्वरूपाला पुत्रत्वानें पहातो. ७३ तो स्वतःच पिता व स्वतःच माता आहे. तो स्वतःच पुत्रत्वानें खेळतो. स्वतःचवांचून तो जगांत व अरण्यांत दुसरें कोणीच पहात नाहीं. ७४ आकाशांत जशा काळानेंच मेघाच्या पंक्ति येतात व काळानेंच नाहींशा होतात, त्याप्रमाणें मुक्ताची स्थिति असते. त्याची स्त्री-पुत्रसंततीहि तशीच

काळ येती काळें जाती । तैशी स्थिति मुक्ताची ॥७५॥ स्त्रीसंभोगीं जें होय सुख । तें सुख मुक्तासी सदा देख । यालागी स्त्रीकामअभिलाख । नाहीं विशेख मुक्तासी ॥ ७६ ॥ जैसें राजहंसापाशीं शेण । तैसें मुक्तापाशीं जाण धन । त्यावरी त्याचें नाहीं मन । उदासीन सर्वदा ॥७७॥ व्याघ्रासी वाढिलें मिष्टान्न । तें त्यासी जैसें नावडे जाण । तैसें मुक्तासी नावडे धन । धनर्घ्यभीपण त्या नाहीं ॥ ७८ ॥ पोतास कापुराचा डळा । जेवीं नातळे काउळा । तेवीं अनर्घ्यरत्नउमाळा । मुक्तें सांडिला थुंकोनी ॥ ७९ ॥ ज्यासी धनलोभाची आस्था । त्यासी कल्पांतीं न घडे मुक्तता । तैसें स्त्रीकामिया सर्वथा । नव्हे परमार्थता निजबोधू ॥ ३८० ॥ मुक्ताचिये निद्रेपाशीं । समाधी ये विश्रांतीसी । शिणली धांवे माहेरा जैशी । तैशी विसाव्यासी येतसे ॥ ८१ ॥ जागृतिस्वप्नसुषुप्तीसी । नातळोनि तींही अवस्थांसी । निजीं निजे निजत्वेंसीं । अहर्निशीं निजरूपें ॥ ८२ ॥ निजीं निजों जातां निर्धारा । तळीं हरपली धरा । वरी ठावो नाहीं अंबरा । ऐशिया सेजारामाजीं निजे ॥ ८३ ॥ नवल निजत्याची वोज । चालतां बोलतां नोमडे नीज । खातां जेवितां अखंड नीज । सहजीं सहज निजरूप ॥ ८४ ॥ निजवितें का उठवितें । दोनी तोचि आहे तेथें । कोण कोणा जागवितें । निजरूपचि तें निजरूपें ॥ ८५ ॥ जागतां निजेशीं वागे । वागतांही नीज लागे । एवं नीजरूप जाहला अंगें । निद्रेचेनि पांगें पांगेना ॥ ८६ ॥ शय्या शयन सेजार । अवघें तोचि असे साचार । आपल्या निजाचें आपण घर । नित्य निरंतर निजीं निजे ॥ ८७ ॥ ऐसें जें जें करूं जाय कर्म । तेथ तेथ प्रकटे परब्रह्म । मुक्तासी एकुही नाहीं नेम । हें मुख्य वर्म मुक्ताचें ॥ ८८ ॥ मुक्तासी नेमबंधन । तैं अंगीं लागलें साधन । साधन असतां मुक्तपण । न घडे जाण सर्वथा ॥ ८९ ॥ मुक्तासी तंव आसक्ती । सर्वदा नाहीं सर्वार्थीं । शेष प्रारब्धाचे स्थितीं । कर्में निपजती निरपेक्षें ॥ ३९० ॥ ज्याचा निमाला अहंकारू । तो माझें

असते. ७५ स्त्रीसंगानें जें सुख प्राप्त होतें, तें मुक्ताजवळ सदाच असतें, त्यामुळें मुक्ताला स्त्रीपासून होणाऱ्या सुखाची विशेष आसक्ति नसते. ७६ राजहंसाजवळ जसें शेण, तसें मुक्ताला द्रव्य. त्यावर दोघांचीहि तिळमात्र आसक्ति नसते. ते त्याविषयीं सर्वथा उदासीन असतात. ७७ वाघापुढें जर मिष्टान्नाचें ताट वाढून ठेविलें तर त्याला तें जसें आवडत नाहीं, त्याप्रमाणें मुक्तला धन आवडत नाहीं. त्याला द्रव्याचा लोभ नसतो. ७८ शुद्ध कापुराची रास असली तरी कावळा जसा त्याला स्पर्शहि करीत नाहीं त्याप्रमाणें मुक्तानें अमूल्य रत्नांचा समूह त्यावर थुंकून टाकून दिलेला असतो. ७६ ज्याला धनलोभाची आवड असते, तो कल्पांतींहि मुक्त होणार नाहीं. त्याचप्रमाणें स्त्रीवर आसक्त असलेल्या जीवासहि खरा आत्मबोध होत नाहीं. ३८० थकलेली स्त्री जशी माहेरीं विश्रांतीला येते तशी समाधि मुक्ताच्य निद्रेजवळ विसावा घ्यावयास येते. ८१ जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांना स्पर्शहि न करितां तो आत्मस्वरूपांत रात्रंदिवस आपल्याच ठिकाणीं निजतो. ८२ तो स्वरूपामध्यें झोपी गेला असतां खालीं पृथ्वी नाहीं व वर आकाश नाहीं, अशा शयनगृहांत तो निजतो. ८३ त्याच्या झोंपेची रीत मोठी आश्चर्यकारक आहे. बोलले, चाललें तरी त्याची झोंप मोडत नाहीं जेवतां-खातांहि तो स्वभावतःच आत्मस्वरूपांत अखंड निजतो. ८४ निजविणारा व उठविणारा दोन्ही तोच असतो. तेथें कोण कोणाला जागविणार ! ८५ तो जागेपणीं निजल्यासारखा वागतो व जागत असतांहि त्याला झोंप लागते. याप्रमाणें तो स्वतःच स्वरूप झाल्यावर निद्रेच्या अधीन होत नाहीं. ८६ शय्या, शयन व शयनगृह हीं तीन्ही तोच होतो. तो आपल्या आत्मस्वरूपाचें स्वतःच घर असल्यामुळें नित्य निरंतर आत्मस्वरूपांतच निजतो. ८७ याप्रमाणें तो जें जें कर्म करूं लागतो त्यांत परब्रह्म प्रकट होतें. मुक्ताला एकहि नियम नाहीं. हेंच त्याचें मुख्य वर्म आहे. ८८ मुक्ताला जर नियमाचें बंधन असेल तर मग त्याला साधनें चिकटलींच. साधन आलें कीं सर्वथा मुक्ति नाहीं. ८९ तेव्हां मुक्ताला आसक्ति नाहीं. त्याच्या अवशिष्ट प्रारब्धानुसार तो निरपेक्ष कर्में करीत असतो. ३९० ज्याचा अहंकार नाहींसा झाला

स्वरूप साचारू । ये अर्थीं न लागे विचारू । वेदशास्त्रसंमत ॥ ९१ ॥ जो नित्यमुक्तु निर्विकारी । तो वर्ततां वर्ते मजमाझारीं । मी तया आंतुबाहेरीं । जेवीं सागरीं कल्लोळ ॥ ९२ ॥ यापरी जाला जो परब्रह्म । त्यासी स्वप्नप्राय धर्माधर्म । बांधूं न शके इंद्रियकर्म । हें त्याचें वर्म तो जाणे ॥ ९३ ॥

न तथा बध्यते विद्वांस्तत्र तत्रादयन् गुणान् । प्रकृतिस्थोऽप्यसंसक्तो यथा खं सविताऽनिलः ॥ १२ ॥

जिहीं इंद्रियीं कर्म करितां । मूर्खासी जाली दृढ बद्धता । तिहीं इंद्रियीं वर्ततां ज्ञाता । नित्यमुक्तता अनिवार ॥ ९४ ॥ मूर्खासी कर्मीं अभिमान । ज्ञाता सर्व कर्मीं निरभिमान । बंधमोक्षाचें कारण । अहंकारू जाण जीवांसी ॥ ९५ ॥ अहंकर्ता अहं भोक्ता । हेंचि मूर्खाची दृढबद्धता । तें प्रकृतिकर्म आपुले माथां । नेघे ज्ञाता अभिमानें ॥ ९६ ॥ तेचि ज्ञात्याची निरभिमानता । तुज म्यां सांगीतली आतां । इंद्रियां विषयो भोगविता । आपुली अभोक्तृता तो जाणे ॥ ९७ ॥ आपुली छाया विष्ठेवरी पडे । अथवा पालखीमाजीं चढे । तो भोगू आपणिया न घडे । तैसेंचि देह कोरडें मुक्तासी ॥ ९८ ॥ मज होआवी विषयप्राप्ती । हेंही ज्ञाते न वांछिती । विषय मिथात्वें देखती । जेवीं का संपत्ति चित्रींची ॥ ९९ ॥ यालागीं असोनियां देहीं । तो नित्यमुक्त विदेही । ज्यासी प्रकृति गुणांच्या ठाईं । अभिमानु नाहीं सर्वथा ॥ ४०० ॥ म्हणसी असोनियां देहीं । कोण्या हेतु तो विदेही । उद्धवा ऐसें कल्पिशी कांहीं । तो दृष्टांतु पाहीं सांगेन ॥ १ ॥ आकाश सर्वांमाजीं असे । सर्व

तो माझेंच स्वरूप आहे, याविषयीं विचारहि करावयास नको. कारण हें वेदशास्त्रसंमत आहे. ९१ जो नित्यमुक्त, निर्विकार तो कसाहि वागत असला तरी माझ्यांतच असतो आणि मी त्याच्या आंतबाहेर समुद्रांतील लाटांप्रमाणें असतों. ९२ याप्रमाणें जो परब्रह्म झाला त्याला धर्माधर्म स्वप्नवत् आहेत. त्याच्या इंद्रियांचे व्यापार त्याला बाधत नाहींत. हें त्याचें रहस्य तोच जाणितो. ३९३.

—तथापि—

विद्वान् तत्र तत्र गुणान् आदयन् तथा न बध्यते—विद्वान् भिन्नभिन्न विषयांचा इंद्रियांकडून उपभोग घेववीत असतांनाहि (त्याच्या साक्षित्वानें स्थित असूनहि तो स्वतः भोग घेत नसल्यामुळें) अविद्वानाप्रमाणें आसन-शयनादिकांमध्यें बद्ध होत नाहीं. (कोणत्या कारणानें ? तेंच आतां पुढील दीड श्लोकानें सांगतात-) तथा खं, सविता, अनिल : तथा प्रकृतिस्थः अपि असंसक्तः—ज्याप्रमाणें आकाश सर्वव्यापी असूनहि कोठें सक्त होत नाहीं किंवा जसा सूर्य जलादिकांमध्यें प्रतिबिंबित झाला तरी लिप्त होत नाहीं, किंवा जसा वायु सर्वत्र संचार करीत असूनहि अलिप्त असतो, त्याप्रमाणें विद्वान् प्रकृतिपरिणामरूप शरीरांत स्थित असूनहि शरीरधर्मांनीं युक्त होत नाहीं. १२.

ज्या इंद्रियांनीं कर्म केलें असतां मूर्खाला दृढबंध प्राप्त होतो, त्याच इंद्रियांनीं ज्ञानी कर्म करीत असतां मुक्त होतो. ९४ मूर्खाला कर्मांचा अभिमान असतो व ज्ञानी सर्व कर्मांविषयीं अभिमानरहित असतो. जीवांच्या बंधमोक्षाचें कारण अहंकार आहे. ९५ 'मी कर्ता' 'मी भोक्ता' हेंच मूर्खाचें दृढबंधन आहे. परंतु ज्ञानी तें मायेचें कार्य अभिमानानें आपल्या डोकीवर केव्हांहि लावून घेत नाहीं. ९६ तीच ज्ञान्याची निराभिमानता मी तुला आतां सांगितली. इंद्रियादिकांकडून विषयभोग घेववून आपलें अभोक्तृत्व तो जाणतो. ९७ आपली छाया विष्ठेवर पडली काय किंवा पालखींत बसली काय, त्याचा भोग आपल्याला घडत नाहीं. त्याप्रमाणें मुक्ताचा देह कोरडा रहातो, ९८ मला विषयांची प्राप्ति व्हावी, असेंहि मुक्त कधीं इच्छीत नाहीं. तो चित्रांतील संपत्तीप्रमाणें विषयांना मिथ्या समजतो. ९९ याप्रमाणें ज्ञानी देहांत असूनहि नित्यमुक्त विदेही असतो. त्याचा मायागुणांच्या कार्यांवर मुळींच अभिमान नसतो. ४०० हे उद्धवा ! तूं जर म्हणशील कीं, तो देहधारण करीत असतांहि त्याला विदेही कोणत्या अर्थानें म्हणावयाचें ! असा तुला संशय येईल तर त्याविषयींहि दृष्टान्त सांगतों, ऐक ! १ आकाश सर्वांत भरलेलें आहे ! तें सर्व पदार्थांना लागलेलें दिसतें. परंतु तें एकाहि

पदार्थीं लागलें दिसे । परी एकेंही पदार्थदोषें । मलिन कैसें हों नेणे ॥ २ ॥ त्या गगनाचेपरी पाहीं । ज्ञाता असोनियां देहीं । देहकर्माच्या ठायीं । अलिप्त पाहीं सर्वदा ॥ ३ ॥ प्रचंड आणोनि पाषाणीं । आकाश न चेंपे चेंपणी । तेवीं क्षोभलियाहीं प्रकृतिगुणी । ज्ञाता जडपणीं न बंधवे ॥ ४ ॥ आकाश असोनियां जनीं । कदा रुळेना जनघसणीं । तैसा प्रकृतिकर्मीं वर्तोनी । प्रकृतिगुणीं अलिप्त ॥ ५ ॥ गगन जळीं बुडालें दिसे । परी तें जळामाजीं कोरडें असें । तेवीं पुत्रकलत्रीं ज्ञाता वसे । तेणें दोषें अलिप्त ॥ ६ ॥ आकाशा मसी लावूं जातां । मसीं माखे तो लाविता । तेवीं मुक्तासी दोषी म्हणतां । दोष सर्वथा म्हणत्यासी ॥ ७ ॥ शीत उष्ण पर्जन्यधारा । अंगीं न लागती अंबरा । तेवीं नाना द्वंद्वसंभारा । मुक्ताचा उभारा निर्द्वंद्व ॥ ८ ॥ येऊनि नाना मेघपटळें । विगडगर्जनें गगन झांकोळे । त्यामाजीं असोनिया वेगळें । गगन नातळे मेघातें ॥ ९ ॥ तेवीं मोहममतेच्या कडाडी । मुक्तासी करिती ताडातोडी । ते तंव त्यास न लगे वोढी । परापरथडी अलिप्तु ॥ ४१० ॥ गगनासी आगी लावूं जातां । अग्नि विझोनि जाय सर्वथा । तेवीं त्रिगुणीं मुक्तासी बांधतां । गुण सगुणता निमाली ॥ ११ ॥ प्रळयवायूचेनि झडाडें । आकाश निजस्वभावें नुडे । सगळा वायू गगनीं बुडे । पाहतां नातुडे गगनींही ॥ १२ ॥ तेवीं अविद्या निजस्वभावता । मुक्तासी न करवेचि बद्धता । अविद्या नांवें मिथ्या वार्ता । मुक्त तत्त्वतां देखेना ॥ १३ ॥ गगनाच्या ऐशी अलिप्तता । सर्व कर्मीं वर्ते तो ज्ञाता । जनीं अलिप्त वर्ते सविता । तेवीं मुक्तता अवधारीं ॥ १४ ॥ घृतमद्यजळांआंतौता । बिंबोनि अलिप्त सविता । तेवीं बाल्य तारुण्य वृद्धता । वयसा चाळितां अलिप्त ॥ १५ ॥ नातरी सूर्याचेनि

पदार्थांच्या दोषानें मलीन होत नाहीं. २ आकाशाप्रमाणें ज्ञानी देहांत असूनहि देहकर्मांपासून सर्वदा अलिप्त असतो. ३ प्रचंड दगड आणून त्याच्याखालीं आकाशाला जरी चेपलें तरी तें जसें चेपलें जात नाहीं, त्याप्रमाणें माया गुणांसह कितीहि जरी क्षुब्ध झाली, तरी तिच्या जडपणानें ज्ञानी केव्हांहि बद्ध होत नाहीं. ४ आकाश जनांत असूनहि लोकांच्या घर्षणानें जसें घासलें जात नाहीं, त्याप्रमाणें ज्ञानी प्रकृतीचीं कर्में करीत असूनहि तिच्या गुणांपासून अलिप्त असतो. ५ आकाश पाण्यांत बुडालेलें दिसतें; परंतु तें जसें पाण्यामध्यें कोरडेंच असतें, त्याप्रमाणें ज्ञानी स्त्रीपुत्रादिकांत रहात असला तरी त्यांच्या गुण-दोषांनीं अलिप्तच असतो. ६ आकाशाला काजळ फासावयास गेलें असतां फासणाराच जसा काजळानें माखला जातो व आकाश निर्मळच रहातें, त्याप्रमाणें ज्ञान्याला दोषी म्हटलें तर तसें म्हणणाराच दोषी होतो व ज्ञानी निर्दोषी असतो. ७ शीत, उष्ण किंवा पावसाच्या धारा आकाशाला स्पर्श करीत नाहींत. त्याप्रमाणें अनेक द्वंद्वसमुदायांत ज्ञानी द्वंद्वरहित रहातो. ८ अनेक मेघांचीं पटलें व विजेचा कडकडाट आकाशाला व्यापून टाकितात. परंतु आकाश मेघाला किंवा विजेला स्पर्शहि करीत नाहीं. ९ त्याचप्रमाणें मुक्ताला मोह-ममतेच्या ऊर्मी चंचल करूं पहातात, पण तो त्यांत सांपडत नाहीं, तर परतीरीं अलिप्त असतो. ४१० आकाशाला आग लावूं गेलें असतां अग्नीच जसा सर्वथा विझून जातो, त्याप्रमाणें तीन गुणांनीं मुक्ताला बांधावयास गेलें असतां गुणांचें गुणत्वच नाहींसें होतें. प्रलय-काळच्या झंझावातानें आकाश जसें उडून जात नाहीं, तर तें आपल्या स्वाभाविक स्थितींत जागेवरच असतें. उलट सर्व वायूच आकाशांत बुडून जातो व आकाशांतहि सांपडत नाहीं, १२ त्याप्रमाणें अविद्या आपल्या स्वभावानुसार मुक्ताला बद्ध करूं शकत नाहीं. अविद्येच्या नांवावरूनच ती मिथ्या ठरत असल्यामुळें मुक्त तिला खरोखर पहात नाहीं. १३ जो आकाशाप्रमाणें सर्व कर्मांमध्यें अलिप्त रहातो तोच खरा ज्ञानी. सूर्य जसा सृष्टी-पासून अलिप्त रहातो त्याप्रमाणे मुक्त अलिप्त असतो, असें तूं समज. १४ तूप, मद्य व जळ या तिहींत प्रतिबिंब पडलें तरी सूर्य त्यापासून जसा अलिप्त असतो, तसा मुक्त बाल्यावस्थेंत, तारुण्यांत व वार्धक्यांत प्राप्तविषय भोगून अलिप्त असतो. १५ किंवा सूर्याच्या प्रकाशानें शुभ अथवा अशुभ कर्म वाढतें; परंतु सूर्य त्याच्या दोषांपासून

प्रकाशें । शुभाशुभ कर्म वाढलें असे । सविता अलिप्त तेणें दोषें । निजप्रकाशें प्रकाशकू ।। १६ ।। तेवीं आश्रमधर्मीं असतां । नित्यादि कर्मं आचरितां । मुक्तासी नाहीं कर्मबद्धता । अकर्तात्मता निजबोधें ।। १७ ।। सूर्यकांतीं सविता । अग्नि उपजवूनि अकर्ता । तैसा निजतत्त्वाचा ज्ञाता । करोनि अकर्ता कर्मांचा ।। १८ ।। जळीं सविता प्रतिबिंबला । परी तो नाहीं बोला झाला । तैसा स्त्रीसंगें प्रजा व्याला । नाहीं मुकला ब्रह्मचर्या ।। १९ ।। सवित्याचें अलिप्तपण । तें निरूपिलें निरूपण । आतां देहीं असोनि अलिप्तपण । तेंही लक्षण अवधारीं ।। ४२० ।। जेवीं देहामाजीं असे प्राण । प्राणास्तव देहचलन । देहदोषा नातळे प्राण । अलिप्त जाण सुखदुःखा ।। २१ ।। तैसा मुक्त असोनि संसारीं । संसारव्यवहार सर्व करी । परी संसारदोषु अंगावरी । तिळहीभरी लागेना ।। २२ ।। वायू सर्वांतें स्पर्शतु । परी स्पर्शदोषांसी अलिप्तु । तेवीं अहंममता नातळतु । मुक्त वर्ततु देहगेहीं ।। २३ ।। वायूसी जेवीं सर्वत्र गमन । परी कोठें आसक्त नव्हे जाण । तेवीं विषयीं न होनि आपण । विषयसेवन मुक्ताचें ।। २४ ।। वायूसी एके ठायीं नाहीं वस्ती । मुक्तासी देहगेहीं नाहीं आसक्ती । वायूसी नभामाजीं विश्रांती । मुक्तासी गुणातीतीं विश्राम ।। २५ ।। एवढें जें अगाधपण । तें मुक्ताचें मुक्तिकारण । उद्धवासी म्हणे श्रीकृष्ण । प्रथम जाण विवेकु ।। २६ ।।

वैशारद्येक्षयाऽसङ्गशितया छिन्नसंशयः प्रतिबुद्ध इव स्वप्नान्नानात्वाद्विनिवर्तते ।। १३ ।।

विवेकें बुद्धि अतिसंपन्न । त्यासी उपजे नित्यानित्यज्ञान । परी तें खिरंगटलें असे जाण । वैराग्येंवीण वाढेना ।। २७ ।। विवेकेंवीण वैराग्य गहन । तें केवळ आंधळें जाण । तेणें आपुलें

अलिप्तच राहून आपल्या स्वयंतेजानें प्रकाशत असतो. १६ त्याप्रमाणें मुक्त गृहस्थाश्रमांत राहून नित्य नैमित्तिक कर्मे आचरीत असला तरी तो त्या कर्मांनीं बद्ध होत नाहीं. तो आत्मज्ञानानें अकर्ताच असतो. १७ सूर्य जसा सूर्यकांत मण्यांतून अग्नि उत्पन्न करून स्वतः अकर्ताच रहातो, तसा आत्मज्ञानी कर्में करून अकर्ता असतो. १८ पाण्यांत सूर्याचें प्रतिबिंब पडतें; परंतु सूर्य त्या पाण्यानें जसा भिजत नाहीं त्याप्रमाणें मुक्त स्त्रीपासून संतति उत्पन्न करूनहि स्वतःच्या ब्रह्मचर्याला मुकत नाहीं. १९ सूर्याच्या अलिप्तपणाचें निरूपण केलें. आतां देहांत असून मुक्त अलिप्त कसा असतो, तें सांगतों ऐक. ४२० शरीरांत प्राण असतो त्या प्राणांमुळें देहाचे व्यापार होत असतात; परंतु प्राण देहाच्या दोषांना स्पर्श करीत नाहीं. तो जसा देहाच्या सुख-दुःखापासून अलिप्त असतो, २१ तसा मुक्त संसारांत राहून सर्व व्यवहार करितो; परंतु तो संसारांतील दोषानें तिळभरहि लिप्त होत नाहीं. २२ वायु सर्वांना स्पर्श करितो, परंतु स्पर्शदोषापासून अलिप्त असतो. त्याप्रमाणें मुक्त देहरूपी घरांत अहं-ममता सोडून वागत असतो. २३ वायु जसा सर्व ठिकाणीं वहातो, परंतु आसक्ति कोठेंहि ठेवीत नाहीं, त्याप्रमाणें मुक्त सर्व विषयांचें सेवन करूनहि कशांतहि आसक्त नसतो. २४ वायु जसा एकाच जागेवर रहात नाहीं, त्याचप्रमाणें मुक्तजीवाची देहरूपी घरावर आसक्ति नसते. वायूला जशी आकाशांत विश्रांति, तशी मुक्ताला गुणातीत अवस्थेंत विश्रांति असते. २५ श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले कीं, असें जें गंभीरपण तेंच मुक्त जीवाच्या मोक्षाचें कारण आहे. त्यांत विवेक मुख्य आहे, असें जाण. ४२६.

असंगशितया वैशारद्या ईक्षया छिन्नसंशयः–वैराग्यानें तीक्ष्ण केलेल्या अति निपुण आत्मज्ञानानें ज्याचे संशय व असंभावनादि दोष निवृत्त झाले आहेत, असा ज्ञानी, **स्वप्नात् प्रतिबुद्धः इव**–स्वप्नांतून जागा झालेल्या मनुष्याप्रमाणें, **नानात्वात् विनिवर्तते**–देहादि द्वैतप्रपंचापासून निवृत्त होतो. १३

विवेकानें बुद्धि अतिशय प्रगल्भ होते. त्याला नित्य व अनित्य याचें ज्ञान होतें. परंतु तें ज्ञान खुरटलेलें असतें. तें वैराग्यावांचून वाढत नाहीं. २७ कितीहि तीव्र वैराग्य असलें तरी तें विवेकावांचून केवळ आंधळें आहे.

निजात्मपतन । अंधकूपीं जाण तें पडे ॥ २८ ॥ मातलें हातिरूं अंध । सैरा धांवे सुबद्ध । नेणे निजात्मपतनबाध । तेवीं वैराग्य मंद विवेकेंवीण ॥ २९ ॥ जेथ विवेकवैराग्यसंयोग । तेथ नित्यसंग्रहो अनित्यत्याग । तेंचि सद्विद्यालक्षण खड्ग । झळकत चांग नैराश्यें ॥ ४३० ॥ तेंचि गुरुवचनसाहाणेसी । लावूनि अतितीक्ष्ण केलें त्यासी । घायें छेदिलें संशयासी । संकल्पविकल्पेंसीं समूळ ॥ ३१ ॥ असंभावना विपरीतभावना । निःशेष तुटलिया वासना । निजस्वरूपीं तेव्हां जाणा । जागेपणा तो आला ॥ ३२ ॥ जो अविद्यालक्षण दीर्घ स्वप्न । नानात्वें भोगिता आपण । तो अद्वैतीं जागा जाला जाण । कृपा थापटन गुरुवचनें ॥ ३३ ॥ तेव्हां नानात्वासी नाहीं ठावो । मी माझें हें झालें वावो । फिटला अविद्याभेदसंदेहो । आत्मानुभवो तो भोगी ॥ ३४ ॥ जागा झाल्या स्वप्न भासे । परी तें मिथ्या झालें अनायासें । मुक्तासी जग तैसें दिसे । यालागीं तेणें दोषें अलिप्त ॥ ३५ ॥ एवं मुक्ताचें जें जें वर्तन । तें अलिप्तपणें ऐसें जाण । ' कथं वर्तेत ' हा प्रश्न । प्रसंगें लक्षण सांगीतलें ॥ ३६ ॥ 'कथं विहरेत्' या प्रश्नाचें । उत्तर ऐकावया साचें । उदित मन उद्धवाचें । जाणोनि जीवींचें हरि बोले ॥ ३७ ॥

यस्य स्युर्वीतसङ्कल्पाः प्राणेन्द्रियमनोधियाम् । वृत्तयः स विनिर्मुक्तो देहस्थोऽपि हि तद्गुणैः ॥ १४ ॥

विद्यमानदेहीं असतां । देहस्थ गुण नातळती मुक्ता । पापपुण्यादि हे कथा । सुखदुःखवार्ता तो नेणे ॥ ३८ ॥ सांडिल्या संकल्पविकल्पांसी । कल्पांतींही नातळे त्यासी । जेवीं कां ओकिल्या ओकासी ।

त्यामुळें तसल्या विवेकरहित विरक्ताचा अधःपात होऊन तो अज्ञानांधकारांत पडतो. २८ आंधळा हत्ती मत्त झाला म्हणजे जसा सैरा-वैरा तडक धांवत सुटतो, पण त्यामुळें आपला अधःपात जाणत नाहीं त्याप्रमाणें विवेकावांचून वैराग्य असमर्थ आहे. २९ ज्याच्या ठिकाणीं विवेक व वैराग्य हीं दोन्हीं असतात तेथें नित्य संग्रहहि असतो व नित्य त्यागहि असतो. सद्विद्यारूप तलवार वैराग्यानें चांगली झळकत असते. ४३० ती गुरुवचनरूपी सहाणेवर पाजळून तिला अत्यंत तीक्ष्ण धार लाविली म्हणजे ती संकल्प-विकल्पांसह संशयाला एका घावानें समूळ तोडिते. ३१ असंभावना, विपरीतभावना व सर्व वासना यांचा छेद झाला असतां स्वस्वरूपामध्यें पुरुष जागा झाला आहे, असें समजावें. ३२ जो अज्ञानरूपी दीर्घ स्वप्नांत देहादि प्रपंच भोगीत असतां गुरुवचन याच कृपारूप थापटण्यानें अद्वैतांत जागा झाला, ३३ त्याच्या नानात्वाचा अभाव होतो. 'मी व माझें' ही त्याची भावना नाहींशी होते. अविद्याभेदाचा संशय निवून जातो व तो आत्मानुभव घेतो. ३४ मनुष्य जागा झाल्यावर त्याला स्वप्नाची आठवण असते. परंतु तें सर्व अनायासें मिथ्या ठरतें. त्याप्रमाणें मुक्ताला हें सर्व जगत् अलिप्त दिसतें व त्यामुळें तो त्या दोषानें लिप्त होत नाहीं ३५ याप्रमाणें मुक्ताचें जेवढें वर्तन तेवढें सगळें अलिप्तपणानेंच घडत असतें. तुझ्या 'कथं वर्तेत' म्ह० तो कसा वागतो, या प्रश्नाच्या प्रसंगानें त्याचें लक्षणहि सांगितलें. ३६ आतां 'कथं विहरेत्' म्ह० तो विहार कसा करितो, या प्रश्नाचें उत्तर ऐकण्यास उत्सुक झालेल्या उद्धवाच्या मनांतील आशय जाणून हरीनें बोलण्यास आरंभ केला. ४३७.

—' तो कसा विहार करितो ' या प्रश्नाच्या उत्तरत्वानें आणखी एक वैलक्षण्य सांगतात—

यस्य प्राणेन्द्रियमनोधियां वृत्तयः वीतसङ्कल्पाः स्युः—त्याच्या प्राण, इंद्रियें, मन व बुद्धि यांच्या वृत्ति संकल्पशून्य असतात, सः देहस्थः अपि तद्गुणैः विनिर्मुक्तः हि—तो देहामध्यें जरी स्थित असला तरी संकल्पशून्य प्राणादि वृत्तींनीं विहार करीत असल्यामुळें देहाच्या सुख-दुःखदि गुणांनीं सर्वथा मुक्तच असतो. १४.

मुक्त विद्यमान देहांत असतांहि शरीरांतील गुण त्याला स्पर्श करीत नाहींत. पापपुण्य, सुख-दुख यांतील कशाचीहि वार्ता तो जाणत नाहीं. ३८ ज्याप्रमाणें वांती परत घेण्यास कोणाचेंहि मन घेत नाहीं, त्याप्रमाणें मुक्त

परतोनि कोणासी न घेववे ॥ ३९ ॥ यालागीं मन बुद्धि इंद्रिय प्राण । मुक्ताचीं जालीं संकल्पशून्य । याचिलागीं पाप पुण्य । न लगे जाण मुक्तासी ॥ ४४० ॥ इंद्रियीं विषयक्रीडन । करितां संकल्पशून्य । मुक्तासी मनपणें नाहीं मन । वृत्तिशून्य यालागीं ॥ ४१ ॥ बाळक लेणया प्रमाण नेणे । तरी अंगीं शोभे लेइलेपणें । तेवीं कर्मे विगुंतलीं करणें । मुक्त अकर्तेपणें अलिप्त ॥ ४२ ॥ संकल्पविरहित विहार । तोचि मुक्त जाण पां साचार । 'कथं विहरति' हें उत्तर । थोडेनि फार सांगीतलें ॥ ४३ ॥ म्यां सांगीतलीं जीं जीं लक्षणें । तीं तीं मुक्ताची मुक्तुचि जाणे । आणिकासी व्युत्पत्तीपणें । मुक्त जाणणें हें न घडे ॥ ४४ ॥ सकळ वेदशास्त्रसंपन्न । त्यासीही मुक्त न कळे जाण । देहीं असे ज्यासी देहाभिमान । त्यासी मुक्तलक्षण कळेना ॥ ४५ ॥ म्यां बोलिले लक्षणांची पोथी । साक्षेपें घेऊनि हातीं । जऱ्ही हिंडिन्नला त्रिजगतीं । तऱ्ही मुक्ताची स्थिति कळेना ॥ ४६ ॥ जेणें साचार मुक्त जाणीतला । तोही सत्य जाण मुक्त झाला । अनुमानयोग्यतेच्या बोला । मुक्तु जाणवला हें मिथ्या ॥ ४७ ॥ जेणें सूर्य देखिला यथार्थतां । तो जग देखे तत्प्रकाशता । जेणें मुक्त जाणीतला तत्त्वतां । तो नित्यमुक्तता जग देखे ॥ ४८ ॥ तेथ हा मुक्त हा बद्ध । देखणें हें अतिअबद्ध । ऐसें देखती ते महामंद । अज्ञानांध अज्ञानी ॥ ४९ ॥ मुक्तु न कळे सर्वथा । ऐसें बोलणें ऐकतां । उद्धवासी हों लागली चिंता । तें कृष्णनाथा कळों सरलें ॥ ४५० ॥ मागां सांगीतलीं मुक्तलक्षणें । तीं मुक्तचि जाणे । लौकिकीं मुक्त कळे जेणें । तींही लक्षणें परियेसीं ॥ ५१ ॥ आश्वासावया उद्धवाचें मन । मुक्ताचें जाण तें लक्षण । सांगेन म्हणे श्रीकृष्ण । येरू सावधान सर्वस्वें ॥ ५२ ॥ कळतीं मुक्ताचीं लक्षणें । उद्धवु ऐकावया उदित मनें । तें जाणोनियां श्रीकृष्णें । विचित्र निरूपणें निरूपी ॥ ५३ ॥

एकदां सोडिलेल्या संकल्प-विकल्पांना कल्पांतींहि स्पर्श करीत नाहीं. ३९ यास्तव मुक्ताचें मन, बुद्धि, इंद्रियें व प्राण हीं सारीं संकल्पशून्य असतात. त्यामुळें त्याला पाप-पुण्य लागत नाहीं. ४४० इंद्रियें विषयांचा भोग घेत असतां मुक्त संकल्पशून्य असतो. त्यामुळें त्याच्या मनांत मनपणा नसतो. तें वृत्तिशून्य असतें. ४१ बालकाला दागिन्यांची किंमत कळत नाहीं. परंतु त्याच्या अंगावर दागिने घातले म्हणजे तो त्यांनीं शोभतो. त्याप्रमाणें इंद्रियें विषयांत गुंतलीं तरी मुक्त अकर्तेपणानें त्यापासून अलिप्त रहातो. ४२ जो संकल्प-विकल्पशून्य वागतो तोच खरा मुक्त होय. 'कथं विहरेत' याचें हें थोडक्यांत उत्तर आहे. ४३ मीं मुक्ताचीं जीं जीं लक्षणें सांगितलीं, तीं सर्व मुक्तच जाणें. एखाद्याला विद्वत्तेच्या बळावर मुक्त समजणें योग्य नव्हे. ४४ सर्ववेदशास्त्रसंपन्न असलेल्यालाहि मुक्त म्हणजे काय हें कळत नाहीं. ज्याचा देहावर अभिमान असतो, त्याला मुक्ताचें लक्षण कळत नाहीं. ४५ मीं सांगितलेल्या या मुक्ताच्या लक्षणांचा मोठा ग्रंथ हातांत घेऊन कोणी त्रैलोक्यभर जरी हिंडला तरी त्याला मुक्ताची स्थिति कळणार नाहीं. ४६ ज्यानें खरोखर मुक्त जाणला तो स्वतःच मुक्त झाला, असें समज. अनुभवावांचून शास्त्रीय अनुमान-योग्यतेमुळें जरी एखादा मुक्ताविषयीं बोलूं लागला तरी त्याला मुक्त म्हणजे काय हें कळलें, असें होत नाहीं. ४७ ज्यानें खरोखरीचा सूर्य पाहिला आहे तो त्यानें प्रकाशित केलेलें जगत्‌हि पहातो, त्याप्रमाणें ज्यानें खरोखर मुक्त ओळखला, तो सर्व जगालाहि मुक्तच पहातो. ४८ हा मुक्त, हा बद्ध असें जे समजतात ते मंदमति पुरुष अज्ञानानें अंध झालेले असतात. ४८ 'मुक्त केव्हांहि ओळखतां येत नाहीं' हें वचन ऐकून उद्धवाला मोठी चिंता उत्पन्न झाली आहे. असें श्रीकृष्णाला कधींच कळून चुकलें ४५० व ते म्हणाले कीं, मागें मीं जीं मुक्ताचीं लक्षणें सांगितलीं तीं मुक्तालाच कळतात. आतां मुक्ताचीं लौकिक लक्षणें सांगतों, तीं ऐक. ५१ उद्धवाच्या मनाला धीर देण्यासाठीं श्रीकृष्णानें 'मुक्ताचें तेंहि लक्षण सांगतों. ऐक' असें म्हणतांच उद्धवानें सावधान चित्त केलें. ५२ आतां आपल्याला मुक्तांचीं लौकिक लक्षणें कळतील, म्हणून तीं ऐकण्यास उद्धवाचें मन उत्सुक आहे, असें पाहून श्रीकृष्णानें निराळ्या प्रकारचें निरूपण करण्यास आरंभ केला. ४५३.

यस्यात्मा हिंस्यते हिंस्रैर्येन किंचिद्यदृच्छया । अर्च्यते वा क्वचित्तत्र न व्यतिक्रियते बुधः ॥ १५ ॥

ज्याचिया देहासी जाण । हिंसा करिती हिंसक जन । छेद भेद दंड मंडन । गर्जन तर्जन जऱ्ही केलें ॥ ५४ ॥ तऱ्ही ते देहाची व्यथा । मुक्तासी नाहीं सर्वथा । नाना उपचारीं पूजितां । नेघे श्लाघ्यता सन्मानें ॥ ५५ ॥ देहीं वर्तमान असतां । देहबुद्धि नाहीं सर्वथा । त्यासीच बोलिजे जीवन्मुक्तता । यालागीं देहव्यथा त्या नाहीं ॥ ५६ ॥ जैशी पुरुषासवें छाया असे । पुरुषयोगें चळती दिसे । ते छायेची अहंममता नसे । निजमानसें पुरुषासी ॥ ५७ ॥ तैसाचि मुक्ताचा देहो । मुक्तासवें वर्ते पहा हो । परी त्यासी नाहीं अहंभावो । हा नित्यस्वभावो मुक्ताचा ॥ ५८ ॥ त्यासी चोरू हेरू कातरू । ह्मणोनि दंडू केला थोरू । कां पूजिला ईश्वरू । पुरुष श्रेष्ठतरु म्हणोनी ॥ ५९ ॥ परी पूजितां कां गांजितां । त्याची डंडळीना समता । जेवीं छायेची मानापमानता । न करी व्यथा पुरुषासी ॥ ४६० ॥ देहो व्याघ्रमुखीं सांपडला । दैवें पालकीमाजीं चढला । तो हरुषविषादा नाहीं आला । समत्वें झाला निर्द्वंद्व ॥ ६१ ॥ देहो द्यावया नेतां सुळीं । मी मरतों ऐसें न कळवळी । का गजस्कंदीं पूजिला सकळीं । तेणें सुखावली वृत्ति नव्हे ॥ ६२ ॥ सुख-दुःखादि नाना व्यथा । आगमापायी अविद्यकता । देहाचें मिथ्यात्व जाणता । यालागीं व्यथा पावेना ॥ ६३ ॥ अतिसन्मानु जेथ देखे । तेथ न राहे तेणें सुखें । अपमानाचिये आडकें । देखोनि न फडके ।

—याप्रमाणें बद्ध व मुक्त यांचें स्वसंवेद्य असेंच वैलक्षण्य सांगितलें. आतां 'तो कोणत्या लक्षणांनीं जाणला जातो' या प्रश्नाच्या उत्तरत्वानें इतरांनाहि सुज्ञेय असलेलें त्याचें लक्षण पुढील तीन श्लोकांनीं सांगतात—

यस्य आत्मा हिंस्रैः हिंस्यते–दुर्जनांकडून किंवा अन्य प्राण्यांकडून याचा देह पीडिला जातो, (अथ) वा यदृच्छया येन (केन अपि) किंचित् क्वचित् अर्च्यते–किंवा दुसऱ्या कोणांकडून तो केव्हां केव्हां यदृच्छेनें पूजिला जातो. तत्र बुधः न व्यतिक्रियते–पण त्या दोन्ही अवस्थांमध्यें ज्ञानी सुखी किंवा दुःखी होत नाहीं. [एखादा अंगाला कांटे टोंचीत असला किंवा दुसरा त्याच्या अंगाला चंदनाचा लेप लावीत असला तरी ज्ञानी त्यांतील पहिल्यावर रागावत नाहीं किंवा दुसऱ्यावर संतुष्ट होत नाहीं. तर त्या दोघांविषयींहि सम असतो, असें याज्ञवल्क्यानें म्हटलें आहे.] १५.

श्रीकृष्ण म्हणाले कीं, मुक्ताच्या देहाला क्रूर हिंसकांनीं तोडिलें, मारिलें, ताडिलें किंवा त्याचें मुंडण केलें, ते त्याच्या अंगावर ओरडले, त्यांनीं त्याचा तिरस्कार केला ५४ तरी त्या देहाच्या व्यथा मुक्ताला होत नाहींत. किंवा एखाद्यानें त्याचें मोठ्या आदरानें यथाविधि पूजन केलें, तरी तो त्या सन्मानानें मोठा हर्ष मानीत नाहीं. ५५ देहांत राहूनहि ज्याचा देहावर अभिमान नसतो त्याला देहाची व्यथा जाणवत नाहीं. म्हणूनच त्याला जीवन्मुक्त म्हणतात. ५६ ज्याप्रमाणें मनुष्याच्या बरोबर त्याची छाया असते, ती त्याच्या सारखीच हाल-चाल करीत असते. परंतु त्या छायेवर त्याची यत्किंचित्हि अहं-ममता नसते; ५७ त्याप्रमाणें मुक्ताच्या देहाचा व्यवहार त्याच्याबरोबरच जरी होत असला तरी देहावर त्याचा अभिमान नसतो. मुक्ताचा हा नित्य स्वभाव आहे. ५८ त्याच्यावर चोर, हेर, खिसेकातरू, इत्यादि आरोप ठेवून त्याला दंड केला काय किंवा अत्यंत श्रेष्ठ ईश्वर समजून त्याची पूजा केली काय, तो सारखेंच मानितो. ५९ छायेच्या मान-अपमानानें पुरुषाला जशी व्यथा होत नाहीं तशी शिक्षा भोगतेवेळीं किंवा सत्काराच्या वेळीं त्याच्या मनाची समता मुळींच ढळत नाहीं. ४६० मुक्ताचा देह वाघाच्या तोंडांत सांपडला किंवा पालखींत बसला तरी त्याला त्याचा खेद किंवा आनंद मुळींच वाटत नाहीं. तो समत्वबुद्धीनें द्वंद्वरहित झालेला असतो. ६१ त्याचा देह सुळावर चढविण्यास नेला तरी तो 'मी मरतों' म्हणून विव्हल होत नाहीं, किंवा सगळ्यांनीं मिळून त्याला हत्तीवर बसवून त्याचा बहुमान केला तरी त्यानें त्याची वृत्ति आनंदित होत नाहीं. ६२ सुख-दुःखादि सर्व व्यथा उत्पन्न होऊन नाश पावणाऱ्या अनित्य आहेत, हें तो जाणितो. त्यामुळें देहाचें मिथ्यात्व ओळखून तो व्याकुल होत नाहीं. ६३ जेथें त्याचा अतिशय सत्कार होतो, तेथें तो त्या सुखांतच लुब्ध होऊन रहात नाहीं, किंवा जेथें त्याच्यावर

भयभीतू ॥ ६४ ॥ देहासी नाना विपत्ति होये। तोही त्या देहाचें कौतुक पाहे। देह मी मज व्यथा आहे। हेंही ठावें नोहे मुक्तासी ॥ ६५ ॥ येथवर देहातीतता। दृढ बाणली जीवन्मुक्ता। यालागीं देहदुःखाची व्यथा। त्यासी सर्वथा बाधीना ॥ ६६ ॥ नाना जनपदवार्ता। अतिस्तवनें स्तुति करितां। कां परुषवचनीं निंदितां। मुक्तासी व्यथा उपजेना ॥ ६७ ॥

न स्तुवीत न निन्देत कुर्वतः साध्वसाधु वा। वदतो गुणदोषाभ्यां वर्जितः समदृङ्मुनिः ॥ १६ ॥

निंदेच्या तिखट बाणीं। दृढ विंधिल्या दुर्जनीं। हे असाधू हें नुपजे मनीं। नोबले वचनीं ते दोष ॥ ६८ ॥ भाविक सात्विक साधू। मिळोनि करिती स्तुतिवादू। तूं ईश्वरी पुरुष शुद्धू। हा गुणानुवादू ऐकोनी ॥ ६९ ॥ मी उत्तम हें नुपजे मनीं। उंच नीच नेदखे जनीं। हे साधु लोक भले गुणी। हे मुक्ताची वाणी वदेना ॥ ४७० ॥ साधु असाधु पाहतां जनीं। तो ब्रह्मरूप देखे दोनी। देखतें देखे तद्रूपपणीं। निजात्मदर्शनीं निजबोधू ॥ ७१ ॥ तेथ कोणाची करावी निंदा। कोणाच्या करावें गुणानुवादा। मीचि विश्व हें आलें बोधा। स्तुतिनिंदा निमाली ॥ ७२ ॥ त्यासी आत्मसाक्षात्कारीं विश्राम। नित्य निजात्मपदीं आराम। साधु असाधु हा फिटला भ्रम। स्वयें आत्माराम तो जाला ॥ ७३ ॥ असाधुत्वें निंदावें ज्यासी। तंव आत्मस्वरूप देखे त्यासी। साधु म्हणोनि वर्णितां गुणासी। देखे त्यासी निजरूपें ॥ ७४ ॥ उजव्या वंद्यत्वें शुद्ध भावो। डाव्या निंद्यत्वें निजनिर्वाहो। पुरुषासी दोहींचा समभावो। वंद्य निंद्य पाहाहो समत्वें तैसें ॥ ७५ ॥ तेथ साधु असाधु अनुवादा। वर्जिली स्तुति

अपमानाचा वर्षाव होतो तेथून तो घाबरून पळूनहि जात नाहीं. ६४ देहावर अनेक आपत्ति येतात, पण त्या तो मोठ्या कौतुकानें पहातो. 'मीच देह, मला व्यथा होते' हें मुक्ताला कधीं ठाऊकहि नसतें. ६५ जीवन्मुक्ताच्या अंगीं इतकी विदेहता बाणलेली असते. त्यामुळें त्याला शरीराचे क्लेश मुळींच बाधत नाहींत. ६६ त्याची अत्यंत स्तुति करणारी किंवा कठोर शब्दांनीं निंदा करणारी लोकवार्ता ऐकून मुक्ताच्या मनाला मुळींच सुख किंवा दुःख होत नाहीं. ६७.

साधु-असाधु वा कुर्वतः वदतः वा न स्तुवीत न निन्देत—अनुकूल किंवा प्रतिकूल आचरण करणाऱ्या किंवा भाषण करणाऱ्या लोकांची तो निंदा करीत नाहीं किंवा स्तुति करीत नाहीं. गुणदोषाभ्यां वर्जितः समदृक् मुनिः—असा गुण-दोषांनीं रहित समदृष्टि मुनि मुक्त होय. [जो लौकिक व्यवहारापासून मुक्त झालेला असतो, तो मुक्त होय असा याचा भावार्थ.] १६.

निंदारूपी तीक्ष्ण वाग्बाणांनीं दुर्जनांनीं मुक्ताच्या अंतःकरणाला घरे पाडिले, तरी ते दुष्ट आहेत असें त्याच्या मनांत कधींहि येत नाहीं. किंवा तो त्यांच्या दोषांचा आपल्या तोंडानें उच्चारहि करीत नाहीं. ६८ भक्तिमान् सात्त्विक सज्जनांनीं मिळून 'तूं साक्षात् परम पावन ईश्वर आहेस' अशी त्याची स्तुति केली, तरी आपला गुणानुवाद ऐकून ६९ 'मी श्रेष्ठ आहें' असा विचारहि त्यांच्या मनांत येत नाहीं. तो लोकांकडे उच्च व नीच या भावनेनें पहात नाहीं. हे लोक चांगले, सज्जन, गुणवान् आहेत असें मुक्ताच्या तोंडून केव्हांहि येत नाहीं. ४७० जगांत सज्जन व दुर्जन दिसतांच तो त्या दोघांनाहि ब्रह्मस्वरूपानें पहातो. चैतन्य स्वरूपानेंच सर्व पहातें; त्यामुळें त्याचा बोध सर्वत्र आत्मदर्शनच घेत असतो. ७१ 'मी स्वतःच विश्व आहें' असें अनुभवास आल्यावर निंदा कोणाची करावी व स्तुति कोणाची करावी! त्याच्या त्या दोन्ही वृत्ति शांत होतात. ७२ मुक्ताला आत्मसाक्षात्कारांतच विश्रान्ति व आत्मज्ञानांतच नित्य आराम वाटतो. चांगला व वाईट हा भ्रम नाहींसा होऊन तो स्वतःच आत्माराम होऊन रहातो. ७३ दुर्जन म्हणून एखाद्याची निंदा करावी तर तो मुक्ताला आत्मस्वरूपच दिसूं लागतो. सज्जन म्हणून कोणाची स्तुति करावी तर त्यालाहि स्वस्वरूपानेंच पहातो. ७४ आपलें उजवें अंग वंद्य असल्यामुळें त्याला शुद्ध भाव आहे आणि डावें अंग निंद्य असल्यामुळें त्याज्य आहे असें कोणालाहि वाटत नाहीं. तर त्याच्या दोन्ही अंगांमध्यें त्याचा समभाव असतो. ७५ मुक्तालाहि समत्वामुळें वंद्य व निंद्य असें कोणींच दिसत नाहीं. सज्जन व दुर्जन असें

आणि निंदा । समत्वें पावला समपदा । सुखस्वानंदाचेनि बोधें ।। ७६ ।। मुक्ताची हे ओळखण । यापरी उद्धवा तूं जाण । आतां आणिकही लक्षण । तुज मी खूण सांगेन ।। ७७ ।। प्रकट मुक्ताचें लक्षण । म्यां तुज सांगीतलें जाण । तें लौकिकीं मानी कोण । विकल्प गहन जनाचे ।। ७८ ।। प्रारब्धवशास्तव जाण । एकादें अवचटें दिसे चिह्न । इतुक्यासाठीं मुक्तपण । मानी कोण जगामाजीं ।। ७९ ।। मुक्तु मुक्तपणाची पदवी । सर्वथा जगामाजीं लपवी । जो आपुली मुक्तता मिरवी । तो लोभस्वभावी दांभिकु ।। ४८० ।। शुक वामदेव मुक्त म्हणतां । सर्वांसी न म्हणवे सर्वथा । मा इतराची काय कथा । माझीही मुक्तता न मनिती ।। ८१ ।। म्यां गोवर्धनु उचलिला । दावाग्नी प्राशिला । अघ बक विदारिला । प्रत्यक्ष नाशिला काळिया ।। ८२ ।। जों जों हा देहाडा । तों तों नीच नवा पवाडा । निजसुखाचा उघडा । केला रोकडा सुकाळु ।। ८३ ।। त्या माझें मुक्तपण । न मनिती याज्ञिक ब्राह्मण । इतरांची कथा कोण । विकल्प दारुण लौकिकीं ।। ८४ ।। यालागीं मुक्ताचें मुक्तपण । मुक्तचि जाणे आपण । इतरांसी न कळे तें लक्षण । अति विचक्षण जऱ्ही जाला ।। ८५ ।। मुक्त लौकिकीं वर्तत । जड-मूढ-पिशाचवत । तींहि चिन्हें समस्त । ऐक निश्चित सांगेन ।। ८६ ।।

न कुर्यान्न वदेत्किंचिन्न ध्यायेत्साध्वसाधु वा । आत्मारामोऽनया वृत्त्या विचरेज्जडवन्मुनिः ।। १७ ।।

कायिक वाचिक मानसिक । उद्देशें कर्म न करी एक । जें निपजे तें स्वाभाविक । अहेतुक त्या नांव ।। ८७ ।। हेतु ठेवूनि गुणागुणीं । स्तुतिनिंदेचीं बोलणीं । सांडोनियां जाला मौनी । परी मौनाभिमानीं हेतु नाहीं ।। ८८ ।। जरी तो जाला मौनाभिमानी । तरी मुक्त पडला बंधनीं । यालागीं बोलणें

म्हणावयास त्यानें स्तुति व निंदा टाकूनच दिलेली असते. तो स्वानंदसुखानुभवाच्या बोधानें समत्वानें समपदाला पोंचलेला असतो. ७६ हे उद्धवा ! मुक्ताला ओळखण्याची ही खूण आहे. आतां त्याच्या आणखीहि दुसऱ्या खुणा सांगतों, त्या ऐक. ७७ मुक्ताचें लक्षण मीं तुला स्पष्ट सांगितलें. परंतु तीं लक्षणें लौकिकांत कोण मानणार ! कारण लोकांचे तर्क-वितर्क मोठे विलक्षण असतात. ७८ एखाद्यामध्यें मुक्ताचा एखादा गुण दैवयोगानें सहज दिसला तर तेवढ्यानें त्याला जगांत मुक्त कोण म्हणणार ! ७९ खरा मुक्त आपली मुक्तपणाची योग्यता जगापासून लपवीत असतो व जो मुक्तपणाचा डौल मिरवितो तो लोभी, दांभिक होय. ४८० शुक-वामदेवांचा मुक्तपणाहि सारेच लोक मान्य करीत नाहींत, मग इतरांची काय कथा ! मलाहि कित्येक मुक्त म्हणत नाहींत. ८१ मीं गोवर्धनपर्वत हाताच्या करांगळीवर उचलून धरिला, दावाग्नि गिळला, अघासुर व बकासुर यांच्यासारख्या राक्षसांचा संहार केला. प्रत्यक्ष काळियासर्पाचा नाश केला. ८२ जोंवर मी देहधारण करीत आहें, तोंवर नित्य नवा पराक्रम करीत आहें. मीं आत्मसुखाचा सुकाळ सर्वांपुढें स्पष्ट उभा केला आहे. ८३ पण अशा माझें मुक्तपणहि याज्ञिक ब्राह्मण मान्य करीत नाहींत, तेथें इतरांचा काय पाड ! याप्रमाणें लौकिकांचे तर्क-वितर्क फार भयंकर असतात. ८४ यास्तव मुक्ताचें मुक्तपण ज्ञानीच जाणतो. तो कितीहि अलौकिक असला तरी इतरांना त्याची खूण पटणार नाहीं. ८५ मुक्त लौकिकांत जड, मूढ, पिशाचाप्रमाणें वागत असतो. तींहि त्याचीं सर्व निश्चित लक्षणें सांगतों, ऐक. ४८६.

किंचित् न कुर्यात् न वदेत् साधु असाधु वा न ध्यायेत्—कांहीं करूं नये, कांहीं बोलूं नये, चांगलें किंवा वाईट यांचें चिंतन करूं नये, आत्मारामः मुनिः अनया वृत्त्या जडवत् विचरेत्—तर आत्म्यामध्येंच सर्वदा निमग्न असलेल्या मुनीनें अशा वृत्तीनें जडाप्रमाणें लौकिकांत वागावें [जो देहासंबंधीं कर्मामध्येंहि उदासीन असतो तो मुक्त व इतर सर्व बद्ध होत. मुमुक्षूंचीं हींच सर्व साधनें आहेत, असें जाणावें.] १७.

मुक्त शारीरिक, वाचिक किंवा मानसिक कोणतेंहि कर्म सहेतुक करीत नाहीं. जें कर्म सहज घडत त्याला 'अहेतुक' असें म्हणतात. ८७ त्याच्या हातून जें घडतें तें स्वाभाविक असतें. म्हणून तो गुण व अगुण यांमध्यें दृष्टि ठेवून निंदा-स्तुतिपर जीं भाषणें तीं टाकून मौन धरून बसतो. परंतु मौनाचा अभिमान धरण्याचाहि त्याचा हेतु नसतो. ८८ त्यानें जर मौनाचा अभिमान धरिला तर तो मुक्त बंधनांत पडेल. यास्तव तो वाचाळता व अबोला

न बोलणें दोन्ही। सांडूनि मौनी तो झाला ॥ ८९ ॥ अतद्व्यावृत्तीनें जाण। करावें असंतनिरसन। मग सद्वस्तूचें ध्यान। अखंड जाण करावें ॥ ४९० ॥ तंव पावली सद्गुरूची खूण। उडालें ध्येय ध्याता ध्यान। बुडालें भेदाचें भेदभान। चैतन्यघन कोंदलें ॥ ९१ ॥ मेळवूनि शास्त्रसंभारा। बांधला संतासंत-बांधारा। तो चैतन्याच्या महापुरा-। माजीं खरा विराला ॥ ९२ ॥ तेव्हां बुडालें संतासंतभान। निबिड दाटलें चैतन्यघन। मोडलें मनाचें मनपण। वृत्तिशून्य अवस्था ॥ ९३ ॥ मनें ध्यावें चैतन्यघन। तंव चैतन्यचि जालें मन। सहजेंचि खुंटलें ध्यान। हें मुख्य लक्षण मुक्ताचें ॥ ९४ ॥ चैतन्यीं हरपलें चित्त। जड-मूक-पिशाचवत। लौकिकीं वर्ततां दिसे मुक्त। जाण निश्चित उद्धवा ॥ ९५ ॥ [मुक्त लौकिकीं वर्तत। जढ-मूढ-पिशाचवत। म्हणौनि कळे इत्थंभूत। तेंही चिन्ह यदर्थ सांगेन] ॥ ९६ ॥ नैष्कर्म्य ब्रह्म पावला दृढु। अंतरीं निजबोधें अतिगोडु। बाह्य लौकिकीं दिसे जडु। अचेतन दगडु होऊनि असे ॥ ९७ ॥ उठीबैसी करितें मन। तें स्वरूपीं जालें लीन। पडले ठायींहूनि नुठी जाण। यालागीं जडपण आभासे ॥ ९८ ॥ शब्दब्रह्म गिळोनि वेगें। निःशब्द वस्तु जाला अंगें। निंदास्तुतीचें नांव नेघे। मुका सर्वांगें सर्वदा ॥ ९९ ॥ ब्रह्म सर्वथा न बोलवे कोणा। जरी सांगे तरी दावी खुणा। यालागीं मुका म्हणती जाणा। अबोलणा स्तुतिनिंदा ॥ ५०० ॥ द्रव्यलोभ नाहीं चित्तीं। कदा द्रव्यें नातळती। यालागीं लोक पिशाच म्हणती। जाण निश्चितीं उद्धवा ॥ १ ॥ नवल त्याचें पिसेपण। जगास न करवे जें प्राशन। ते वस्तूचें करी आपोशन। अभक्ष्य जाण भक्षितू ॥ २ ॥ जेथ जगासी गमन नव्हे जाण। तेथ हा करी अगम्यागमन। जगाचें जेथ न रिघे मन। तेथ सर्वांगें जाण हा वेंघे ॥ ३ ॥ न धरी विधिनिषेधविभाग। न करी कर्माकर्मांचा पांग। स्वानंदें नाचवी सर्वांग। यालागीं जग पिसें म्हणे ॥ ४ ॥

दोन्ही टाकून मौनी होऊन बसतो. ८९ अतद्व्यावृत्ति म्ह० 'तें नव्हे' असा असत् वस्तूचा निषेध करून, मिथ्या पदार्थांना दूर करून सद्वस्तु जें परब्रह्म त्याचें अखंड चिंतन करावें. ४९० त्याला सद्गुरूची खूण पटली म्हणजे ध्येय, ध्याता व ध्यान हें सर्व नाहींसें होतें, भेदाचा भेदभाव बुडून जातो व सर्वत्र ब्रह्म भासू लागतें. ९१ शास्त्राचा ढीग रचून, सज्जन दुर्जनांचा जो बंधारा बांधलेला असतो तो चैतन्याच्या महापुरांत साफ वाहून जातो. ९२ तेव्हां संत व असंत ही भावना नाहींशी होऊन सर्वत्र दाट चैतन्य पसरतें व मनाचें मनपण जाऊन वृत्तीची शून्य अवस्था होते. ९३ त्या चैतन्याचें मनानें ध्यान करावें तर मनच चैतन्य झालेलें असतें. त्यामुळें ध्यान करणेंहि सहजच खुंटतें. असें हें मुक्ताचें मुख्य लक्षण आहे. ९४ चित्त चैतन्यांत बुडालें म्हणजे तो मुक्त लौकिकांत जड-मूढ-पिशाचा-प्रमाणें वागत असलेला दिसतो. मुक्त लौकिकांत जड-मूढ-पिशाचासारखा वागतो, त्यावरून तो पूर्णपणें ओळखतां येतो. ९५ यास्तव तेंहि लक्षण यथार्थ सांगतों, ऐक. ९६ तो कर्मत्यागानें ब्रह्मस्वरूप झालेला असतो. आत्मज्ञानानें त्याचें अंतःकरण अत्यंत मधुर होतें; परंतु बाहेरून मात्र तो जड जणुंकाय निर्जीव दगडच बनून रहातो. ९७ संकल्प-विकल्प करणारें मन आत्मस्वरूपांत लीन झालेलें असतें, तें आपल्या स्थिर झालेल्या जागेवरून हालत नाहीं, त्यामुळें जडपणा भासतो. ९८ शब्द तत्काळ ब्रह्माला गिळून स्वतः निःशब्द झालेला असतो. निंदा-स्तुतीचें नांवहि घेत नाहीं, सर्वांगानें सर्वदा मुका म्ह० निष्क्रिय होतो. ९९ ब्रह्म कोणालाहि बोलून दाखवितां येत नाहीं. म्हणून तो कांहीं सांगावयाचें झाल्यास खुणेनें बोलतो. तो कोणाची निंदा किंवा स्तुति करीत नाहीं. म्हणून त्याला मुका म्हणतात. ५०० त्याच्या मनांत द्रव्यलोभ नसतो. तो द्रव्याला कधीं स्पर्शहि करीत नाहीं. यास्तव लोक त्याला पिशाच म्हणतात, हे उद्धवा! हें तूं निश्चित जाण. १ त्याचें वेड कांहीं विलक्षण असतें. जगाला ज्याचें प्राशन करवत नाहीं, त्या परब्रह्माचें तो आकंठ पान करितो. तो अभक्ष्याचें भक्षण करितो. २ जेथें जगाला प्रवेशहि करितां येत नाहीं, त्या अगम्य ठिकाणीं हा मुक्त जात असतो. जगाचें मन जेथें शिरत नाहीं, तेथें हा आपल्या सर्व अंगानें चढतो. ३ तो विधि निषेधाचा भेद मनांतच आणीत नाहीं. कर्म-अकर्मांची खटाटोप करीत नाहीं. स्वानंदानें सर्वांगाला नाचवितो. म्हणून जगत् त्याला वेडा म्हणतें. ४

एवं जड मूक पिशाच । समूळ लक्षणीं तोचि साच । मिथ्या नव्हती अहाचवहाच । वृथा कचकच तो नेणे ॥ ५ ॥ जाण पां मुक्ताच्या ठायीं । कोणे विषयीं आग्रह नाहीं । जो अतिशयेंसी आग्रही । तो बद्ध पाही निश्चित ॥ ६ ॥ जीं बोलिलीं मुक्तांचीं लक्षणें । तींचि साधकाचीं साधनें । सिद्धासी असती सहजगुणें । साधकें करणें दृढनिष्ठा ॥ ७ ॥ बोलिलिया लक्षणां । सिद्धचि भोक्ता जाणा । साधकूहि येथ लहाणा । जो या साधनां साधूं जाणे ॥ ८ ॥ इतर जे पंडिताभिमानी । आम्ही शास्त्रज्ञ ज्ञाते म्हणौनि । ते वाळिले येथूनी । जेवीं सज्जनीं दुर्बुद्धी ॥ ९ ॥ जो न साधी येथींच्या साधना । कोरडा शास्त्राभिमानी जाणा । सदा वांछितां धनमाना । तो येथींच्या ज्ञाना अलिप्त ॥ ५१० ॥ आम्ही कर्मकुशळ याज्ञिक । शास्त्रसंपन्न वेदपाठक । सदा अर्थकामकामुक । त्यांसी हें सुख अप्राप्त ॥ ११ ॥ तिंहीं जे कष्ट केले सर्वथा । ते समस्त जाण जाले वृथा । उद्धवा तेहीविखीं तत्त्वतां । ऐक आतां सांगेन ॥ १२ ॥

शब्दब्रह्मणि निष्णातो न निष्णायात्परे यदि । श्रमस्तस्य श्रमफलो ह्यधेनुमिव रक्षतः ॥ १८ ॥

शब्दब्रह्म वेदशास्त्रार्थ । पढोनि वाचोनि अति पंडित । चारी वेद मूर्तिमंत । सदा तिष्ठत वाचेसी ॥ १३ ॥ संहिता पद क्रम स्वरयुक्त । अरण ब्राह्मण सूत्र निरुक्त । जटा माला ध्वज रथ । पढों जाणत वर्णक ॥ १४ ॥ आयुर्वेद धनुर्वेद । गांधर्ववेदींचा जाणे भेद । काव्यनाटकीं अतिशुद्ध । वेद उपवेद तो जाणे ॥ १५ ॥ व्याकरणीं अतिनेटक । सांख्य पातंजळ जाणे तर्क । शास्त्र जाणे वैशेषिक । कर्ममीमांसक यज्ञांत ॥ १६ ॥ विवर्ण वाचस्पति वेदांत । शास्त्र जाणे वार्तिकांत । तिन्ही प्रस्थानें मूर्तिमंत ।

मुक्ताच्या अंगीं ही जड, मूक, व पिशाचासारखीं लक्षणें मिथ्या नसतात. तो स्वभावतःच तसा वागतो. व्यर्थ भांडणतंटा करणें त्याला आवडत नाहीं. ५ मुक्ताचा कोणत्याच गोष्टींत आग्रह नसतो. जो अति आग्रही, तो निश्चयानें बद्ध जाणावा. ६ हीं जीं मुक्ताचीं लक्षणें सांगितलीं, तींच साधकांचीं साधनें होत, पण सिद्धाला तीं स्वभावतःच प्राप्त होतात व साधकाला दृढ निष्ठा ठेवून संपादावीं लागतात. ७ या लक्षणांचा भोक्ता केवळ एक सिद्धच म्ह० ज्ञानीच असतो, हें खात्रीनें समज. हीं साधनें कशीं साधावीं हें जो जाणतो, तो साधकहि यांचा भागीदार आहे. ८ सज्जन ज्याप्रमाणें दुर्बुद्धीला टाकून देतात त्याचप्रमाणें जे इतर स्वतःला पंडित समजणारे ज्ञानाभिमानी 'आम्हीच काय ते शास्त्रज्ञ ज्ञानी' असें मानतात, ते सर्व विद्वान् या मुक्ताच्या पंक्तींतून दूर सारिले आहेत. ९ येथें सांगितलेलीं हीं साधनें साध्य न करितां जो कोरडा शास्त्राभिमान मिरवितो आणि धन व मान-मान्यता, यांची इच्छा करितो, तो या आत्मज्ञानापासून अलिप्तच रहातो. ५१० आम्ही कर्में करण्यांत मोठे कुशल याज्ञिक, शास्त्रसंपन्न, वेदपठण करणारे, अशा अभिमानानें जे द्रव्य व काम यांची इच्छा करितात त्यास हें आत्मसुख केव्हांहि प्राप्त होत नाहीं. ११ हे उद्धवा ! त्या लोकांनीं कर्मे करण्यांत जे कष्ट केलेले असतात, ते सर्व व्यर्थ होतात. याविषयीं आतां खरा वृत्तान्त सांगतों, तो ऐक. ५१२.

—जो शब्दब्रह्मामध्यें अत्यंत निष्णात असतो व नुसत्या पांडित्याची श्लाघा करितो, पण उक्तसाधननिष्ठ नसतो त्याची निंदा करितात—

शब्दब्रह्मणि निष्णातः यदि परे न निष्णायात्—शब्दब्रह्मामध्यें निष्णात असलेला म्ह० अर्थतः शास्त्रपारंगत असलेलाहि परब्रह्मामध्यें ध्यानादिकांच्या योगानें जर तत्पर न होईल तर, **अधेनुं रक्षतः इव तस्य श्रमः श्रमफलः हि**—भाकड गायीचें रक्षण करणाराप्रमाणें त्याचें शास्त्रश्रम केवळ श्रम हेंच फल देतो. पुरुषार्थामध्यें त्याचें पर्यवसान होत नाहीं. १८.

वेदपठण करून व वेदशास्त्रांचा अर्थ शिकून तो अखेर पंडित होतो. चारी वेद मूर्तिमंत त्याच्या जिभेवर असतात. १३ संहिता, पद, स्वरयुक्त क्रम, अरण, ब्राह्मण, सूत्र, निरुक्त, जटा, माला, ध्वज, रथ, हें सर्व त्याला तोंडपाठ असतें. १४ आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद यांतील सर्व भेद तो जाणितो. काव्य-नाटकांतील मर्म त्याला ठाऊक असतें. वेद व उपवेद त्याला अवगत असतात. १५ तो व्याकरण, सांख्य, योगशास्त्र, न्यायशास्त्र, वैशेषिक शास्त्र या सर्वांत निष्णात असतो. यज्ञांत तर मोठा कर्ममीमांसक असतो. १६ वेदाचें विवरण करण्यांत तर केवळ

पुढां तिष्ठत योग्यत्वें ॥ १७ ॥ शिल्पशास्त्रीं अतिनिपुण । सूपशास्त्रामाजीं प्रवीण । रत्नपरीक्षालक्षण । जाणे आपण वाजिवाह ॥ १८ ॥ आगमींनेटका मंत्रमात्रीं । शैवी वैष्णवी दीक्षेची परी । सौर शाक्त अभिचारी । नाना मंत्रीं प्रवीण ॥ १९ ॥ कोकशास्त्रींचीं अधिष्ठात्री । अतिप्रवीण संगीतशास्त्रीं । प्रबंध करूं जाणे कुसरी । राजमंत्रीं राजसु ॥ ५२० ॥ निघंटु वसे प्रज्ञेपुढां । चमत्कारू जाणे गारुडा । पंचाक्षरी अतिगाढा । वैद्य धडफुडा रसज्ञ ॥ २१ ॥ रसौषधी साधावी तेणें । भूत भविष्य ज्योतिष जाणे । अमरकोश अभिधानें । अठरा पुराणें मुखोद्गत ॥ २२ ॥ प्रश्नावली पाहो जाणें । स्वप्नाध्यावो सांगावा तेणें । इतिहासादि प्रकरणें । जाणे लक्षणें गर्भाचीं ॥ २३ ॥ शब्दज्ञानाची व्युत्पत्ती । जाणे साधकबाधक युक्ती । समयींची समयीं स्फुरे स्फूर्ती । अपर बृहस्पती बोलावया ॥ २४ ॥ जेवीं तळहातींचा आवळा । तेवीं ब्रह्मज्ञान बोले प्रांजळा । परी अपरोक्षसाक्षात्कारीं आंधळा । नेणे जिव्हाळा तेथींचा ॥ २५ ॥ मोराअंगीं अतिडोळसें । अंगभरी भरलीं पिसें । एके दृष्टीवीण आंधळे जैसे । जाहलें तैसें विद्वांसा ॥ २६ ॥ जेथूनि क्षीर स्रवती सड । तेथेंही लागोनि गोचिड । अशुद्ध सेविताती मूढ । तेवी विद्वांस दृढ विषयांसी ॥ २७ ॥ गोचिडाचे मुखीं क्षीर रिघे । तो अशुद्धावांचोनि तें नेघे । तेवीं ज्ञान विकूनि अंगें । विद्वांसू मागे विषयांतें ॥ २८ ॥ सांडूनि सुगंधचंदनासी । आवडीं दुर्गंधा धांवे माशी । तेवीं सांडूनि निजात्मज्ञानासी । पंडित विषयांसी झोंबत ॥ २९ ॥ असोनि कमळआमोदापाशीं । दर्दुर सेविती कर्दमासी । तेवीं सांडूनि निजात्मज्ञानासी । पंडित विषयांसी लोलुप्त ॥ ५३० ॥ करूनि अद्वैतव्युत्पत्ती । तें ज्ञान विकूं देशांतरा जाती । मूर्ख ज्ञात्यातें उपहासिती । तऱ्ही वांछिती सन्मानू ॥ ३१ ॥ सांगतां ब्रह्मनिरूपण । सात्विकाचें परमार्थी मन । व्याख्याता तो वांछी धन । विपरीत ज्ञान विद्वांसा ॥ ३२ ॥

बृहस्पतीच. वार्तिकापर्यंत सर्व शास्त्रांत पारंगत. प्रस्थानत्रयी तर त्याच्यापुढें मूर्तिमंत हजर असते. १७ शिल्पशास्त्रांत तो निपुण असतो. स्वयंपाक शास्त्रांतहि तो प्रवीण असतो. तो रत्नपरीक्षेंत व अश्वविद्येंत चतुर असतो. १८ आगमोक्त मंत्रतंत्रांत तज्ज्ञ, शैवदीक्षा व वैष्णवदीक्षा यांतील सार जाणितो. तो सौर, शाक्त, जारण, मारण, उच्चाटण इत्यादि नानाप्रकारच्या मंत्रांत पटु, १९ शृंगारशास्त्र मुखोद्गत, संगीतशास्त्रांत प्रवीण, काव्य रचण्यांत कुशल, राजकारणांत मुत्सद्दी असतो. ५२० त्याला निघंटु म्ह० वेदाचा शब्दकोश मुखोद्गत. इंद्रजालादि गारुडाचे चमत्कार पूर्ण अवगत असतात. तो प्रख्यात वैद्य व रसायनशास्त्रज्ञ असतो. २१ त्यानेंच औषधी तयार कराव्या. भूत, भविष्य व ज्योतिष सांगण्यांत निष्णात. अमरकोशांतील शब्द व अठरा पुराणें त्याच्या जिभेवर असतात. २२ त्याला प्रश्न पहातां येतात. स्वप्नाध्याय सांगतां येतो. इतिहास व गर्भाचीं लक्षणें तो जाणितो. २३ त्याला शब्दव्युत्पत्तीचें ज्ञान असतें. तो सर्व साधक-बाधक युक्ति जाणतो. समयसूचकता त्याच्यापाशीं मूर्तिमंत असते व बोलण्यांत तर तो दुसरा देवगुरूच असतो. २४ तो तळहातावर ठेविलेल्या आवळ्यासारख्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी स्पष्ट सांगतो, परंतु स्वानुभवशून्य असल्यामुळें तो आत्मज्ञानाविषयीं आंधळा असतो. त्यांतील गूढ रहस्य तो जाणत नाहीं. २५ मोराच्या सर्व अंगभर डोळे असतात, परंतु मुख्य दृष्टींतील एक नेत्र नसला तर तो जसा आंधळा होतो, त्याप्रमाणें या विद्वानाची स्थिति आहे. २६ गायीच्या ज्या आंचळांतून दूध येतें, त्याच आंचळावर गोचिड बसतो व मूर्खपणानें रक्त प्राशन करितो, त्याप्रमाणें विद्वान् विषयांना घट्ट चिकटतात. २७ गोचिडाच्या तोंडांत जर दुधाचा एखादा थेंब गेला तर तो रक्तावांचून घेत नाहीं, त्याप्रमाणें विद्वान् आपलें ज्ञान देऊन विषय विकत घेतो. २८ चंदनाचा सुवास सोडून माशी जशी घाणीच्या दुर्गंधीकडे प्रेमानें धांवते, त्याप्रमाणें पंडित आत्मज्ञान टाकून विषयांना कवटाळतात. २९ कमलाच्या परिमळाजवळ राहूनहि बेडूक चिखलाचें सेवन करितो, त्याप्रमाणें आत्मज्ञान सोडून विद्वान् विषयांत आसक्त होतात. ५३० अद्वैतमत सिद्ध करून तें ज्ञान विकण्यासाठीं परदेशांत जातात. ते मूर्ख ज्ञात्याचा उपहास करितात व स्वतःचा सन्मान इच्छितात. ३१ ब्रह्मनिरूपण सांगत असतां श्रोत्यांतील सात्त्विकांचें मन परमार्थाकडे लागतें. पण वक्ता मात्र द्रव्याची इच्छा करीत असतो. त्या विद्वानांचें ज्ञान असें मोठें विपरीत असतें. ३२ जो बोलतो

सांगे आन करी आन । तेथें कैंचें ब्रह्मज्ञान । जेथ वसे धनमान । तेथ आत्मज्ञान असेना ॥ ३३ ॥ दृढ धनमान करोनि पोटीं । सांगतां ब्रह्मज्ञानगोठी । त्यास आत्मसाक्षात्कारभेटी । नव्हे कल्पकोटी गेलिया ॥ ३४ ॥ नाना पदव्युत्पत्तिविंदान । एके श्लोकीं दशधा व्याख्यान । पोटीं असतां मानाभिमान । ब्रह्मज्ञान त्या कैंचें ॥ ३५ ॥ मी पंडितु अतिज्ञाता । ऐशिया नागवलें अहंता । जेवीं आंधळें नोळखे पिता । नित्य असतां एकत्र ॥ ३६ ॥ तैशी गति विद्वांसासी । नित्य असती आत्मसमरसीं । तेंचि वाखाणिती अहर्निशीं । परी त्या स्वरूपासी नेणती ॥ ३७ ॥ करावया विषयभरण । केलें शास्त्रव्युत्पत्तिव्याख्यान । ते वृथा कष्ट गेले जाण । जेवीं वंध्याधेनु पोशिली ॥ ३८ ॥ जे कधीं वोळे ना फळे । सुटली तरी सैरा पळे । नित्य वोढाळी राजमळे । तें दुःख आदळे स्वामीसी ॥ ३९ ॥ तैशी गति पंडितंमन्यासी । व्युत्पत्तीं पोशिलें वाचेसी । तों वोढाळ झाली विषयांसी । ज्याची त्यासी नावरे ॥ ५४० ॥ जेवीं कां निर्दैवाहातीं । कनक पडल्या तें होय माती । तेवीं पंडितमान्याची व्युत्पत्ती । विषयासक्ती नाशिली ॥ ४१ ॥ द्विजा दीधला भद्रजाती । त्यासी न पोसवे तो निश्चितीं । मग फुकासाठीं विकिती । तेवीं व्युत्पत्ती विद्वांसा ॥ ४२ ॥ अद्वैतशास्त्राची व्युत्पत्ती । हे त्यासी झाली अलभ्यप्राप्ती । जे विषयालागीं विकिती । ते मूर्ख निश्चिती विद्वांस ॥ ४३ ॥ मुखीं ऊंस घालिजे घाणा । तो रस पिळूनि भरे माणा । फिका चोपटीं करकरी घाणां । ते गति जाणा विद्वांसां ॥ ४४ ॥ विद्वांस करितां ज्ञानकथन । सारांश सात्विकीं नेला जाण । शब्दसोपटी करकरी वदन । गोडपण तेथें कैंचें ॥ ४५ ॥ जेवीं कां नपुंसकाच्या करीं । वोपिली पद्मिणी सुंदरी । ते अखंड रडे जयापरी । तेवीं विद्वांसाघरीं व्युत्पत्ती ॥ ४६ ॥ पाहें पां ब्रह्मज्ञानेंवीण ।

एक, व करितो भलतेंच, तेथें ब्रह्मज्ञान कसलें ! जेथें धन व मान यांकडे दृष्टि असते तेथें आत्मज्ञान नसतें. ३३ मनांत धन व मान यांवर आसक्ति ठेवून बाहेर ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या तर त्याला कोट्यवधि कल्पांतींहि आत्मसाक्षात्कार होत नाहीं. ३४ एका पदाची अनेकप्रकारें फोड केली किंवा एका श्लोकाचा दहा प्रकारानें अर्थ केला तरी मनांत मानाचा अभिलाष असतां त्याला ब्रह्मज्ञानच कोठचें ! ३५ मी पंडित, अतिज्ञानी, या अहंकारानें तो नागवतो. ज्याप्रमाणें नित्य एकत्र राहणारा आंधळा मुलगा आपल्या पित्याला ओळखत नाहीं, ३६ त्याप्रमाणें विद्वानाची स्थिति होते. विद्वान् नित्य आत्म्यापाशीं ऐक्यरूपानेंच असतो. रात्रंदिवस त्याचेंच वर्णन करितो. परंतु आत्मस्वरूपाला मात्र जाणत नाहीं. ३७ विषयांची भर करण्यासाठींच तो विद्वान् शास्त्रव्युत्पत्तीचें व्याख्यान करितो. परंतु वांझ गायीला पोसण्याप्रमाणें त्याचे ते सर्व श्रम व्यर्थ जातात. ३८ वांझ गाय जशी कधीं फळत नाहीं, सुटली कीं सैरावैरा पळते, ओढाळपणानें राजाच्या मळ्यांत शिरते व आपल्या धन्याला त्रासांत टाकिते. ३९ त्याप्रमाणें या पंडितंमन्याची स्थिति आहे. वाणीला शीण देऊन व्युत्पत्तीचें पोषण केलें पण ती ओढाळ होऊन विषयांच्या मागें लागली व ज्याची त्यालाहि आवरेनाशी झाली. ५४० ज्याप्रमाणें दुर्दैवी माणसाच्या हातीं सोनें पडलें तरी त्याची माती होते, त्याप्रमाणें पंडितंमन्याची विद्वत्ता विषयासक्तीमुळें नाश पावते. ४१ ब्राह्मणाला हत्तीचें दान दिलें व त्याला त्याचें पोषण करवलें नाहीं, तर तो मातीच्या मोलानें त्या हत्तीला विकून टाकितो, त्याप्रमाणें विद्वानांची विद्वत्ता आहे. ४२ अद्वैतशास्त्राची व्युत्पत्ति हा त्याला अलभ्य लाभ झालेला असतो. परंतु विषयासांठी त्याचा विक्रय करणारे पंडित खात्रीनें मूर्ख समजावे. ४३ उंसाच्या घाण्यांत ऊंस घातला म्हणजे रसज्ञ त्याचा रस पिळून भांड्यांत भरतो आणि घाणा त्याचे निरस चोयटे करकरां चघळींत बसतो, त्याप्रमाणें या पंडितांची स्थिति होते. ४४ विद्वान् ज्ञान सांगूं लागला कीं, सात्विक भक्त त्यांतील तत्त्वाचें ग्रहण करितात पण हा विद्वान मात्र कोरडे शब्द उच्चारीत तोंड हालवीत बसतो. त्यांत गोडी कसली ! ४५ एखाद्या नपुंसकाला सुंदर रंभेसारखी स्त्री अर्पण केली तरी ती विचारी जशी अखंड रडत बसते, त्याप्रमाणें विद्वानाच्या घरची व्युत्पत्ति रडत असते. ४६ त्या

शब्दज्ञानें संन्यासग्रहण । केलें तेंही वृथा जाण । जरी धारणा ध्यान करीना ॥ ४७ ॥ जैसी जैसी शब्दज्ञानव्युत्पत्ती । तैशी तैशी न करितां स्थिती । वर्तणें जैं विषयासक्ती । तैं निजमुखीं माती घातली ॥ ४८ ॥ वेदशास्त्रसंपन्न जाला । त्यावरी पोट भरूं लागला । तरी तो उदमी थोरू जाला । परी थित्या मुकला मुद्लासी ॥ ४९ ॥ रत्नें देऊनि कवडा घेतला । कां अमृत देऊनि कांजी प्याला । तैसा परिपाकू पंडितां जाला । थित्या नागवला निजज्ञाना ॥ ५५० ॥ शब्दज्ञान जोडिलें कष्टें । तेणेंचि साधनें परब्रह्म भेटे । इटेसाठीं परिस पालटे । मूर्ख वोखटें मानिती ॥ ५१ ॥ पोट भरावयाची युक्ती । आपुली मिरवावया व्युत्पत्ती । पत्रावलंबनें करिती । द्वाराप्रती सधनाच्या ॥ ५२ ॥ जेवीं पोट भरावया भांड । नाना परी वाजवी तोंड । तेवीं नाना व्युत्पत्ती वादवितंड । करिती अखंड उदरार्थ ॥ ५३ ॥ करूनि व्युत्पत्ती शब्दब्रह्म । जरी न साधीचि परब्रह्म । तरी त्या श्रमाचें फळही श्रम । जेवीं रत्नें उत्तम घाणा गाळी ॥ ५४ ॥ तेथें तेल ना पेंडी । झाली रत्नांची राखोंडी । तैशीं विद्वांसें झालीं वेडीं । श्रमें श्रमकोडी भोगिती ॥ ५५ ॥ श्रमें श्रमूचि पावती । दुःखें दुःखचि भोगिती । हेंचि कथन बहु दृष्टांतीं । उद्धवाप्रती हरि बोले ॥ ५६ ॥

गां दुग्धदोहामसतीं च भार्यां देहं पराधीनमसत्प्रजां च ।
वित्तं त्वतीर्थीकृतमङ्ग वाचं हीनां मया रक्षति दुःखदुःखी ॥ १९ ॥

विद्वानानें केवल शाब्दज्ञानाच्या बळावर ब्रह्मज्ञानावांचून संन्यासदीक्षा घेतली, पण ध्यानधारणा केली नाहीं तर तीहि व्यर्थ होते. ४७ जसें जसें शब्दज्ञान व अर्थज्ञान वाढूं लागते तसें तसें आचरण न केल्यास व विषयासक्त झाल्यास साधक आपल्याच तोंडांत माती घालून घेतो. ४८ एखादा वेदशास्त्रसंपन्न झाला व त्या ज्ञानावर पोट भरूं लागला तर तो मोठा व्यापारी होईल; पण जवळ असलेलें ज्ञानरूपी मुद्दल मात्र घालवील. ४९ ज्याप्रमाणें रत्नें देऊन कोंडा घ्यावा किंवा अमृत देऊन पेज प्यावी, त्याप्रमाणें पंडिताचा अखेर परिणाम होतो. तो आत्मज्ञानाला सर्वथा मुकतो. ५५० मोठे कष्ट करून आत्मज्ञान मिळविलें, तर त्याच साधनानें परब्रह्माची भेट होते. पण त्याला उलट परीस देऊन जो वीट घेतो त्याला लोक मूर्ख मानितात. ५१ पंडित पोट भरावयासाठीं व आपल्या विद्वत्तेची प्रसिद्धि व्हावी म्हणून शिफारसपत्रें घेऊन धनिकांचे उंबरठे झिजवितात. ५२ भाट जसा पोट भरण्यासाठीं सारखी बडबड करीत असतो, त्याप्रमाणें हे विद्वान् उदरभरणार्थ अखंड वितंडवाद करीत बसतात. ५३ पण व्युत्पत्तीच्या बळावर शब्दब्रह्म जाणून परब्रह्माला जो साधीत नाहीं, त्याच्या श्रमाचें फलहि केवल श्रमच. ज्याप्रमाणें उत्तम रत्न घेऊन ते घाण्यांत घातलें ५४ तर त्यापासून तेलहि निघत नाहीं व पेंडहि मिळत नाहीं; रत्नाचा मात्र चक्काचूर होतो, त्याप्रमाणें या विद्वानांना वेड लागलें आहे. ते कष्ट करून श्रमाच्या राशीच भोगितात. ५५ पंडित श्रम करून श्रमच मिळवितात व दुःख सोसून दुःखच भोगितात. श्रीकृष्ण आतां हीच कथा अनेक दृष्टान्तांनीं उद्धवाला सांगत आहे. ५५६.

—आतां हीच गोष्ट अन्योक्तींनीं सविस्तर वर्णितात—

दुग्धदोहां गां—जिचें दूध देण्याचें वय निघून गेलें आहे, आतां पुढें दूध मिळणें शक्य नाहीं, अशा निरुपयोगी गयीला, असतीं च भार्यां—कामशून्य भार्येला, तसेंच, पराधीनं देहं—पराधीन झालेला व त्यामुळेंच प्रतिक्षणीं दुःखाला कारण होणारा देह, असत्प्रजां च—दृष्ट व अदृष्ट फलांच्या साधनांनीं रहित असलेला पुत्र, तु अतीर्थीकृतं वित्तं—घरीं चालून आलेल्या सत्पात्राला न दिलेलें व त्यामुळेंच दुष्कीर्ति व पाप यांची प्राप्ति करून देणारें वित्त, मया हीनां वाचं—व माझ्या नांवानें रहित असलेली वाणी, यांना, अङ्ग दुःखदुःखी रक्षति—हे उद्धवा ! दुःखानंतर दुःख अशी दुःखपरंपरा भोगणारा पुरुषच रक्षितो. १९.

दुग्धाचिया लालुप्यता । भाकड गाय दोहूं जातां । शिंपीभरी दूध न ये हाता । हाणे लाता तत्काळ ।। ५७ ।। जे कुडी कुचर डेबरी । विषयमेळवणा अतिखाविरी । अधर्मशीळ लातिरी । सर्वांपरी अनाढ ।। ५८ ।। सुटली राजगारीं भरे । धर्मदंडें मागें न सरे । सद्‌बुद्धि धरितां न धरे । सैर चरे सुनाट ।। ५९ ।। जिचें कधीं नव्हे दुभतें । जे धरूं नेणे गर्भातें । पोषिता ऐसिये गायीतें । पावे दुःखातें पोषकु ।। ५६० ।। गृहिणी लाभल्या गृहाचार । तो अनुकूळ स्त्री नसतां नर । अतिदुःखें दुखिया थोर । सदा करकर कपाळीं ।। ६१ ।। निंदा अवज्ञा हेळण । भ्रताराचें करी जाण । स्वयें भक्षी मिष्टान्न । हें असंतलक्षण स्त्रियांचें ।। ६२ ।। खातां जेवितां द्रव्य देतां । गोड गुळसी सर्वथा । धर्म देखोनि फोडी माथा । तेही सर्वथा असतीचि ।। ६३ ।। जे न विचारी पापपुण्य । कामाचारी धर्मशून्य । हें असतीचें लक्षण । उद्धवा जाण निश्चित ।। ६४ ।। असतीचिये संगतीं । कैंची होईल सुखप्राप्ती । अतिदुःखें दुःखी होती । जाण निश्चितीं ते नर ।। ६५ ।। ज्याचें देह पराधीन । तो जीवें जितां सदा दीन । पराधीना समाधान । नव्हे जाण कल्पांतीं ।। ६६ ।। सांडोनि आपली निजसत्ता । ज्यासी लागली पराधीनता । तो स्वप्नींही सुखाची वार्ता । न देखे सर्वथा निश्चित ।। ६७ ।। पर म्हणिजे माया जाण । जो झाला तिचे आधीन । त्यासी सुखाचें न दिसे स्वप्न । दुःख संपूर्ण सर्वदा ।। ६८ ।। पराधीनासी सुख । आहे म्हणे तो केवळ मूर्ख । सोलींव दुःखाचें दुःख । अवश्य देख पराधीना ।। ६९ ।। ऐक प्रजांचा विवेक । एक पुत्र एक लेंक । एक ते केवळ मूर्ख । दुःखदायक पितरांसी ।। ५७० ।। जो नरकापासोनि तारी । जो पूर्वजांतें उद्धरी । जो मातापित्यांची भक्ति करी । अव्यभिचारी हरिरूपें ।। ७१ ।। जो सांडोनियां माता-पिता । जाऊं नेणे आणिके तीर्था । त्याचेनि चरणतीर्थें पवित्रता । मानिती सर्वथा अनिवार ।। ७२ ।।

दुधाच्या लोभानें भाकड गायीचें दोहन करूं गेल्यास शिंपीभरहि दूध हातीं येत नाहीं. उलट ती तत्काळ लाथा झाडीत सुटते. ५७ खट्याळ, अंगचोरणारी, मारकी, खुजट, अति खादाड, अधर्मी, लाथाळ, ओढाळ, ५८ सुटली कीं राजवाड्यांत शिरणारी, कितीहि दंड केला तरी मागें न फिरणारी, इच्छेस येईल तशी स्वैर संचार करणारी, ५९ जिचें कधीं दूध मिळालेंच नाहीं व जी कधीं गाभण राहिली नाहीं, अशा गायीचें पोषण केलें तर तो पोषण करणाराच दुःखी होतो. ५६० सुशील गृहिणी लाभली तरच घरांतील व्यवस्था सुरळीत चालते. परंतु तीच जर कां प्रतिकूल स्त्री असली तर त्या बिचाऱ्या पुरुषासारखा दुःखी कोणी नाहीं. त्याच्या कपाळीं सदाची किरकीर लागते. ६१ पतीची निंदा, अवज्ञा व निर्भत्सना करणारी व स्वतः मिष्टान्न करून खाणारी स्त्री असाध्वी होय. ६२ यथेच्छ खावयास, जेवावयास, द्रव्य व दागिने मिळाले कीं गुळासारखी गोड; परंतु पतीला धर्म करतांना पाहिलें कीं, त्याच्यापुढें डोकेंच फोडून घेण्यास उठते, ती स्त्री खरोखर सती नव्हे. ६३ जी पाप-पुण्याचा विचार करीत नाहीं व आपले मनोरथ पूर्ण करण्यासाठीं धर्मालाहि झुगारून देते, ती स्त्री साध्वी नव्हे. हीं असाध्वी स्त्रीचीं लक्षणें आहेत, असें खात्रीनें जाण. उद्धवा ! ६४ अशा असाध्वी स्त्रीच्या संगतींत सुखप्राप्ति कशी होणार ! ते बिचारे पुरुष अतिशय दुःखानें कष्टी होऊन रहातात, हें निश्चयपूर्वक समज. ६५ ज्याचें शरीर पराधीन असतें तो जिवंत असूनहि दीन होय. पराधीनाला कल्पान्तींहि समाधान नाहीं. ६६ आपली स्वतःची सत्ता सोडून ज्याला पराधीनता प्राप्त झाली, त्याला स्वप्नांतहि सुखाचा लेश देखील खात्रीनें मिळत नाहीं. ६७ पर म्हणजे माया. तिच्या अधीन जो होतो, तो पराधीन. त्याला स्वप्नांतहि सुख दिसत नाहीं, सदा-सर्वदा पूर्ण दुःखांत पडतो. ६८ पराधीनाला सुख आहे असें जो म्हणतो, तो केवळ मूर्ख होय. गाळीव दुःखाचाहि अर्क असें दुःख पराधीनाला भोगावें लागतें. ६९ आतां संतती-विषयीं विचार ऐक. एखाद्या माणसाला एक पुत्र असतो, एक कन्या असते व एक अपत्य आई-बापांना दुःख देणारें केवळ मूर्खच असतें. ५७० जो पुत्र नरकापासून रक्षण करितो, तो पूर्वजांचा उद्धार करितो. जो एक-निष्ठतेनें आई-बापांना साक्षात् परमेश्वररूप समजून त्यांची भक्ति करितो, ७१ जो आई-बापांना सोडून इतर क्षेत्रें, तीर्थें जाणत नाहीं तर त्यांच्याच चरणतीर्थाला पवित्र मानितो, ७२ व जो माता व पिता यांना लक्ष्मीनारायणांप्रमाणें

जैशीं रमा आणि नारायण । तैशीं मातापिता मानी जाण । चढत्या आवडीं करी भजन । नुबगे मन सेवेसी ॥ ७३ ॥ जो अतिसत्वें सात्विकू । जो पितृवचनपाळकू । जेणें धर्माधर्मविवेकू । हा नैसर्गिकू स्वभावो ॥ ७४ ॥ जो मातापित्यांचे सेवेवरी । आपआपणियातें तारी । सकळ पूर्वजांतें उद्धरी । तो संसारी सुपुत्र ॥ ७५ ॥ ऐशिया पुत्रासी प्रतिपाळितां । सुख पावे मातापिता । पूर्वजांतें उद्धरिता । स्वयें तरता पितृभक्ती ॥ ७६ ॥ जालिया सुपुत्रसंतती । एवढी होय सुखप्राप्ती । आतां असत्प्रजांची स्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ७७ ॥ मूळींचें पद 'असत्प्रज'। त्यांचे वर्तणुकेची वोज । सांगतां अत्यंत निर्लज्ज । तेही मी तुज सांगेन ॥ ७८ ॥ पोटीं उपजले जे लेंक । त्यांची वर्तणूक ऐशी देख । आवडे कांता आणि कनक । उपेक्षिती निःशेख मातापिता ॥ ७९ ॥ जे कुडे कुचर कुलट । जे कां अत्यंत शठ नष्ट । जे अनाचारी कर्मभ्रष्ट । अतिदुष्ट दुर्जन ॥ ५८० ॥ त्यांसी भांडवल लटिक । लटकी द्यावी आणभाक । माता पिता ठकावी देख । सात्विक लोक नाडावे ॥ ८१ ॥ आपण नरका जावें ते जाती । परी पूर्वज नेले अधोगती । ऐशिया प्रजातें प्रतिपाळिती । ते दुःखी होती अतिदुःखें ॥ ८२ ॥ पोटामाजीं उठिला फोड्ड । त्यासी करितां न ये फाड्ड । तैसा असत्प्रजीं संसार कड्ड । दुःख दुवाडू भोगवी ॥ ८३ ॥ ऐशिया पुत्रांचें जितां दुःख । मेल्यापाठीं देती नरक । असत्प्रजांचें कवतिक । दुःखें दुःख अनिवार ॥ ८४ ॥ गांठीं असोनियां धन । जो सत्पात्रीं न करी दान । तें सर्व दुःखाचें मूळ जाण । दुःख दारुण धनलोभ्या ॥ ८५ ॥ धन अर्जावया अनेक । उपाय अपाय करिती लोक । नाना क्लेश भोगोनि दुःख । द्रव्य देख सांचिलें ॥ ८६ ॥ प्रथम दुःख द्रव्य सांचितां । दुसरें दुःख द्रव्य रक्षितां । स्त्रीपुत्र प्रवर्ते घाता । इतर कथा ते भिन्न ॥ ८७ ॥ सत्पात्रीं न करितां दान । जेणें रक्षिलें यक्षधन । तेथें दुःखबाहुल्यें उठी विघ्न । धर्मरक्षण तेथ नाहीं

समजतो तोच पुत्र. वाढत्या प्रेमानें तो त्यांचें भजन करितो आणि त्यांच्या सेवेला कधीं कंटाळत नाहीं. ७३ जो अत्यंत सात्त्विक, पित्याचा आज्ञाधारक, धर्म आणि अधर्म यांचा विचार करणें हा ज्याचा उपजत स्वभावच आहे, ७४ जो आईबापांची सेवा करून आपणच आपला उद्धार करितो आणि सर्व पूर्वजांचा उद्धार करितो, तोच संसारांत खरा सत्पुत्र होय. ७५ अशा पुत्राचें पालन-पोषण करण्यांत आई-बापांस सुख होतें व तो पूर्वजांचा उद्धार करून स्वतःहि पितृभक्तीनें तरून जातो. ७६ चांगलीं मुलेंबाळें झाली तर इतकें सुख मिळतें. आतां कुपुत्रांची स्थिति तुला सांगतों, ती ऐक. ७७ मूळ श्लोकांत 'असत्प्रज' असें पद आहे. असल्या दुःसंततीच्या वर्तणुकीचें वर्णन करण्याचीहि अत्यंत लाज वाटते. तरी पण मी तुला सांगतों. ७८ ज्या आई-बापांपासून जन्म झाला त्यांच्याशींच त्या कुपुत्रांची वागणूक कशी असते, ती पहा! त्यांना स्त्री व द्रव्य यांची अत्यंत आवड असते व आई-बापांची ते पूर्णपणें उपेक्षा करितात. ७९ ते द्वाड, अंगचोर, व्यभिचारी, अत्यंत लबाड, नष्ट, दुराचारी, कर्मभ्रष्ट, अतिशय दुष्ट व दुर्जन असतात. ५८० फसवणूक हेंच त्यांचें भांडवल. ते खोट्या आणा-शपथा वाहतात आणि आई-बापांना फसवून सात्त्विक लोकांना छळतात. ८१ ते स्वतः तर नरकाला जातातच, पण आपल्याबरोबर पूर्वजांनाहि अधोगतीला नेतात. जे अशा दुःसंगतींत पडलेल्या पुत्रांचा सांभाळ करितात, ते जन्मभर अत्यंत दुःखानें कष्टी होतात. ८२ पोटामध्यें जर गळू झालें तर त्याची जशी फाड करितां येत नाहीं, त्याप्रमाणें कुसंततीमुळें सर्व संसार कडू होतो व तो असह्य क्लेश भोगवितो. ८३ अशी संतति जिवंत असतां दुःख देते व मरणोत्तर नरकांत टाकिते. अनिवार दुःखप्राप्ति हेंच कुपुत्रांचें कौतुक. ८४ पदरीं द्रव्य असूनहि त्याचें सत्पात्रीं दान न करणें हेंच सर्व दुःखाचें मूळ आहे. द्रव्यलोभी माणसाला भयंकर दुःख होतें. ८५ लोक धन मिळविण्यासाठीं अनेक बरे-वाईट उपाय योजितात. नानाप्रकारचे क्लेश व दुःख भोगून द्रव्याचा संचय करितात. ८६ पहिल्यानें द्रव्य संपादन करण्याचे कष्ट. नंतर त्या द्रव्याचें रक्षण करण्याचे क्लेश. कारण प्रसंगीं द्रव्यासाठीं स्त्री-पुत्रहि जर आपल्या जीवावर उठतात तर मग इतर परक्या माणसांची काय कथा! ८७ ज्यानें सत्पात्राला दान न करितां द्रव्यसंचय करून ठेविला तो कुबेराची संपत्ति राखणाराच होय. त्यांत दुःखपूर्ण विघ्नें उत्पन्न होतात आणि धर्माचें रक्षण होत नाहीं. ८८ अशाप्रकारचें तें

॥ ८८ ॥ ऐसेंही धन गेलियापाठीं । अतिदुःखें भडका उठी । धनवंता जन्मसाटी । दुःखकोटी भोगिती ॥ ८९ ॥ येवोनियां नरदेहासी । अविकळ वाचा असे ज्यासी । जो नुच्चारी हरिनामासी । पाप त्यापाशीं खतेलें ॥ ५९० ॥ पुरिले लोहा माती खाये । तें उपेगा न ये वायां जाये । तैशी नामेंवीण वाचा पाहें । वृथा जाये सर्वथा ॥ ९१ ॥ आसनध्यानपरिश्रम । न करूनि म्हणे जो राम राम । तेणें कोटि जन्मांचा हरे श्रम । उत्तमोत्तम ते वाणी ॥ ९२ ॥ जो नित्य जपे रामनाम । तो जाणावा मजाचिसम । तेणेंचि केले सकळही नेम । पुरुषीं पुरुषोत्तम तो जाण ॥ ९३ ॥ चतुर्वर्णांमाजीं जो कोणी । अविश्रम रामू जपे वाणीं । तोचि पढियंता मजलागुनी । आन त्रिभुवनीं नावडे ॥ ९४ ॥ ऐसें रामनाम नावडे ज्यासी । तैं पापमुखरोग आला मुखासी । तो स्वयें मुकला निजसुखासी । आपआपणासी घातकु ॥ ९५ ॥ रामनामेंवीण जें तोंड । तें जाणावें चर्मकुंड । भीतरी जिह्वा तें चामखंड । असत्यकाटें काटली ॥ ९६ ॥ हो कां हरिनामेंवीण जे वाणी । ते गलितकुष्ठें जाली कोढिणी । असत्यकुष्ठाचें गळे पाणी । उठी पोहणी निंदेची ॥ ९७ ॥ ऐशिये वाचेसी रोकडे । पडती अधर्माचे किडे । सुळबुळीत चहूंकडे । मागेंपुढें वळवळित ॥ ९८ ॥ ते वाचा होय ज्यासमोर । देखे तो पाठिमोरा ठाके नर । नाक झांकूनि म्हणे हरहर । लहान थोर थुंकिती ॥ ९९ ॥ ते वाचेची जे दुर्गंधी । मजही न साहवे त्रिशुद्धी । हे वाचा वाहे तो दुर्बुद्धि । अनर्थसिद्धि अतिदुःख ॥ ६०० ॥ सोलींव दुःखाचें अतिदुःख । त्या नराची वाचा देख । केवळ निरय तें त्याचें मुख । नामीं विन्मुख जे वाणी ॥ १ ॥ हो कां वेदशास्त्रसंपन्न वाणी । करूनि निंदकू नामकीर्तनीं । तो पापी महापाप्याहूनि । त्याचेन अवनी अतिदुःखी ॥ २ ॥ नामकीर्तनें धन्य वाणी । येचि अर्थीं सारंगपाणी । प्रवर्तला निरूपणीं । विशद करूनी सांगावया ॥ ३ ॥

द्रव्य जर कां नाहींसें झालें तर मग त्याच्या अंगाचा नुस्ता भडका होतो. अशा रीतीनें धनिक लोक शेंकडों जन्म दुःखांच्या राशी भोगीत असतात. ८९ ज्याला अव्यंग वाणी आहे, अशा मनुष्यजन्माला येऊन तो हरिनामाचा उच्चार करीत नाहीं, त्याच्यापाशीं पापाचा संचय होऊन रहातो. ५९० मातींत पुरून ठेविलेल्या लोखंडावर जसा कीट बसतो व मग तें लोखंड उपयोगांत येत नाहीं, त्याप्रमाणें हरिनामावांचून वाणी सर्वथा वायां जाते. ९१ पहा ! आसन-ध्यान-धारणा इत्यादि कांहीं परिश्रम न करितां जो तोंडानें नुस्तें 'राम राम' म्हणत असतो त्याच्या कोट्यवधि जन्मांतील श्रम नाहींसे होतात. त्याची वाणी उत्तमोत्तम होय. ९२ जो नित्य रामनामाचा जप करितो, तो माझ्यासारखाच आहे, असें समजावें. त्यानेंच वस्तुतः सर्व नेम-धर्म आचरिले. तो पुरुषांतील पुरुषोत्तमच होय. ९३ ब्राह्मण-क्षत्रियादि चारी वर्णांतील जो कोणी वाणीनें निरंतर रामनामाचा जप करितो, तोच माझा आवडता असतो. सर्व त्रिभुवनांत त्याच्यावांचून दुसरा कोणीहि मला प्रिय नाहीं. ९४ असें हें पवित्र रामनाम ज्याला आवडत नाहीं त्याला पापरूपी मुखरोगच झाला म्हणावयाचें ! तो स्वतःच आत्मसुखाला आंचवून आपणच आपला घात करितो. ९५ रामनाम न उच्चारणारें जें मुख तें चांभाराचें कातडें भिजविण्याचें भांडेंच होय. त्यांतील जीभ म्हणजे असत्यरूपी मळाचीं पुटें बसून मळकट झालेला कातड्याचा तुकडाच. ९६ हरिनामावांचून जी वाणी असते ती गलितकुष्ठ झालेली कुष्ठरोगीणीच होय. तिच्यांतून असत्यरूपी पाणी गळत असतें. ९७ त्यांत अधर्मरूपी किडे पडून ते चोहोंकडे बुजबुजत व मागेंपुढें वळवळत असतात. ९८ अशी वाणी ज्याच्या समोर येते तो पुरुष तिच्याकडे पाठमोरा होतो. नाकाला पदर लावून 'हर हर' असें म्हणतो. लहान-थोर थुंकतात. ९९ त्या वाणीची दुर्गंधी मलाहि खरोखर सहन होत नाहीं. अशा वाणीला वागविणाऱ्या दुर्बुद्धि पुरुषाला अति दुःख हाच अनर्थ प्राप्त होतो. ६०० दुःखाच्या गाभ्यांतील दुःख अशीच त्या माणसाची ती वाणी असते. ज्याची वाणी हरिनामापासून विमुख असते त्याचें तोंड म्हणजे केवळ नरक होय. १ मग तो मनुष्य वेद-शास्त्रसंपन्न कां असेना, त्याची वाणी जर नामकीर्तनाची निंदा करीत असली तर तो महापाप्याहूनहि पातकी होय. त्याच्यायोगानें पृथ्वी अत्यंत दुःखी होते. २ नामकीर्तनानें वाणी धन्य होते. आतां शारंगपाणी तिचेंच यथार्थ व स्पष्ट निरूपण करीत आहे. ६०३.

यस्यां न मे पावनमङ्ग कर्म स्थित्युद्भवप्राणनिरोधमस्य ।
लीलावतारेप्सितजन्म वा स्याद्वन्ध्यां गिरं तां बिभृयान्न धीरः ॥ २० ॥

जगातें पवित्र करिती । महादोषांतें हरिती । माझीं नामकर्में गुणकीर्ती । जड उद्धरती हरिनामें ॥ ४ ॥ म्हणसी तूं बोलिलासी निजवर्म । मी विद्याविद्यातीत ब्रह्म । त्या तुज कैंचें गुण नाम कर्म । कीर्तनधर्म केवीं घडे ॥ ५ ॥ उद्धवा हें मनीं न धरीं । मी स्वलीला स्वमायें करीं । नाना अवतारांतें धरीं । न करूनि करीं स्थित्यन्तू । ॥ ६ ॥ त्रिगुणगुणी गुणावतार । ब्रह्म आणि हरिहर । तिहीं रूपीं मीच साचार । चराचर करीं हरीं ॥ ७ ॥ स्रष्टारूपें मी स्रजिता । विष्णुरूपें मी प्रतिपाळिता । रुद्ररूपें मी संहर्ता । जाण तत्त्वतां मी एकू ॥ ८ ॥ बाल्यतारुण्यवार्धक्यांसी । एक पुरुष तिहीं अवस्थांसी । तेवीं उत्पत्तिस्थितिप्रळयांसी । गुणकर्मांसी मी कर्ता ॥ ९ ॥ मी कर्ताचि अकर्ता । अकर्तेपणें कर्ता । हें माझें मीचि जाणें तत्त्वतां । आणिकासी सर्वथा कळेना ॥ ६१० ॥ हींचि माझीं नामकर्में गातां । माझी पदवी लाभे वक्ता । माझे लीलावतार कीर्तितां । कीर्तिमंता निजलाभू ॥ ११ ॥ अवतारांमाजीं उत्तमोत्तम । श्रीरामकृष्णादिजन्मकर्म । नाना चरित्रें संभ्रम । अविश्रम जे गाती ॥ १२ ॥ सेतु बांधिला अवलीळा । सागरीं तारिल्या शिळा । गोवर्धनु उचलिला हेळा । दावानळा प्राशिलें ॥ १३ ॥ ताटिका वधिली एके बाणीं । पूतना शोखिली तानेपणीं । अहल्या तारिली चरणीं । यमलार्जुन दोन्ही उद्धरिले ॥ १४ ॥

—आतां ' मयाहीनां वाचं ' असें जें वर म्हटलें आहे त्याचेंच विवरण—

अङ्ग यस्यां मे अस्य पावनं स्थित्युद्भवप्राणविरोधं कर्म वा लीलावतारेप्सितजन्म न स्यात्—हे उद्धवा ! ज्या वाणीमध्यें माझें जगाला पावन करणारें चरित्र म्हणजे जगाची उत्पत्ति, स्थिति व लय यांना कारण होणारें कर्म, किंवा लीलावतारांतील जगाच्या प्रेमाला पात्र होणारे श्रीरामकृष्णादि जन्म यांतील कांहींच नसेल, **तां वंध्यां गिरं धीरः न बिभृयात्**—त्या तसल्या निष्फल वाणीला बुद्धीमानानें धारण करूं नये. २०.

श्रीकृष्ण म्हणाले कीं, माझें नांव, कर्में व गुणांची कीर्ति जगाला पवित्र करितात व महादोषांचें हरण करितात. हरिनामांनीं जड जीवांचा उद्धार होतो. ४ ' तूं आपलें एक रहस्य सांगितलें आहेस कीं, मी विद्या व अविद्या यांच्या अतीत ब्रह्मस्वरूप आहें. तेव्हां अशा तुला गुण, नांव आणि कर्म तरी कोठचें व त्यांचें कीर्तन तरी कसें घडतें ! ' ५ असें जर तूं म्हणशील तर हे उद्धवा ! तूं असें मनांतहि आणूं नकोस. कारण मी आपल्या मायेनें या सर्व लीला करीत असतों. मी नानाप्रकारचे अवतार घेतों व अकर्तेपणानेंच सर्वांचें रक्षण व नाश करितों. ६ ब्रह्मदेव, विष्णु व महेश्वर हे त्रिगुणात्मक तीन अवतार आहेत; पण त्यांच्या तिन्ही स्वरूपांत वास्तविक मीच राहून सर्व सृष्टीची उत्पत्ति व लय करितों. ७ ब्रह्मदेवाच्या रूपानें सृष्टीचा उत्पादक, विष्णूच्या रूपानें संरक्षक व रुद्राच्या रूपानें संहारक मीच एकटा आहें. ८ बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तीनहि अवस्था जशा एकाच पुरुषाच्या असतात, त्याप्रमाणें उत्पत्ति, स्थिति व लय या तीन गुणकर्मांचा कर्ता मीच आहें. ९ मी कर्ता असून अकर्ता व अकर्ता असून कर्ता आहें. यांतील तत्त्व माझें मीच जाणितों. इतरांना तें सर्वथा कळणार नाहीं. ६१० अशीं माझीं नामें व कर्में वर्णिलीं तर त्या वक्त्याला माझें पद प्राप्त होतें आणि माझ्या अवतारलीलेचें कीर्तन करणाराला आत्मप्राप्तीचा लाभ होतो. ११ माझ्या सर्व अवतारांतील उत्तमोत्तम असे जे श्रीराम व श्रीकृष्ण हे अवतार त्यांच्या जन्म-कर्मांचीं अलौकिक चरित्रें जे रात्रंदिवस गातात १२ ते माझ्या पदाला प्राप्त होतात. श्रीरामावतारीं मीं सहज लीलेनें सेतु बांधिला व समुद्रांत दगड तारिले. कृष्णावतारीं गोवर्धन पर्वताला सहज बोटावर उचलून धरिलें व दावाग्नि प्राशन केला. १३ रामानें एका बाणानें त्राटिकेचा वध केला. मीं बालवयांत पूतनेला शोषून टाकिलें. रामानें केवळ चरणाच्या स्पर्शानें अहल्येचा उद्धार केला व मी दोघां यमलार्जुनांना उद्धरिलें. १४ सीतास्वयंवराच्या वेळीं, रावण शिवधनुष्य उचलीत असतां तेंच त्याच्या वक्षः-

रावणू आदळला धनुष्य वाहतां । तें भंगोनि पर्णिली सीता । मथूनि चैद्यादि समस्तां । भीमकदुहिता आणिली ।। १५ ।। मारिला सुबाहु खरदूषणू । अघ बक केशिया मारी श्रीकृष्णू । सुग्रीवू स्थापिला राज्य देऊनू । येरें उग्रसेनू स्थापिला ।। १६ ।। मेळवूनि वानरांचा पाळा । वधू केला राक्षकुळा । मेळवून बाळां गोपाळां । मल्लां सकळां मर्दिलें ।। १७ ।। रावणकुंभकर्णां केला मारू । मारिला कंसचाणूरू । रामें ठकिला वाळी वानरू । ठकिला महावीरू काळयवनू ।। १८ ।। रामें बिभीषण स्थापिला । कृष्णें धर्म संस्थापिला । एक पितृवचनें वना गेला । एक घेऊनि आला गतपुत्र ।। १९ ।। हीं अवतारचरित्रें वर्णितां । चोरटा वाल्मीकि झाला तत्त्वतां । व्यास जारपुत्र सर्वथा । केला सरता तिहीं लोकीं ।। ६२० ।। या दोहीं अवतारांची पदवी । वर्णितां दोन्ही झाले महाकवी । व्यास वाल्मीकि वंदिजे देवीं । कीर्तिगौरवीं गौरविले ।। २१ ।। त्या महाकवींची कवित्वकथा । शेष नेत्रद्वारें श्रवण करितां । दोन सहस्र नयनीं आइकतां । धणी सर्वथा बाणेना ।। २२ ।। हेचि कथा स्वर्गाच्या ठायीं । श्रवण करावया पाहीं । इंद्र लागे बृहस्पतीचे पायीं । कीर्ति लोकत्रयीं वर्णिती ।। २३ ।। असो कथेचें महिमान । माझेनि नाममात्रें जाण । तारिला अजामिळ ब्राह्मण । गजेंद्रउद्धरण हरिनामें ।। २४ ।। पक्ष्याचे मिषेंकरूनी । राम या दों अक्षरस्मरणीं । महादोषांची श्रेणी । तत्काळ कुंटिणी तारिली ।। २५ ।। माझिया नामासमान । नव्हे वेदशास्त्रशब्दज्ञान । वेदशास्त्रांचा बोधु कठिण । तैसें जाण नाम नव्हे ।। २६ ।। पठणमात्रें वेदशास्त्रवक्ता । नव्हे मजमाजीं येणेंचि सरता । स्वभावें माझें नाम घेतां । अतिपढियंता मज होये ।। २७ ।। वेदशास्त्रांचा अधिकारी ब्राह्मण । नामासी अधिकारी चाऱ्ही वर्ण । जग उद्धरावया कारण । नाम जाण पैं माझें ।। २८ ।। जेथ नित्य नामाचा उच्चार । तेथ मी असें साचार । येथ करणें न लगे

स्थलावर पडून तो खालीं आदळला. पण त्याच अजस्र धनुष्याचा भंग करून रामानें सीतेला वरिलें; मीं स्वयंवरांत चैद्यादि सर्व बलाढ्य राजांचा पराभव करून भीमकराजाची कन्या रुक्मिणी आणिली. १५ रामानें सुबाहु, खर, दूषण यांचा व मीं अघ, बक, केशीया या सर्वांचा संहार केला. रामावतारांत सुग्रीवाला राज्य दिलें व कृष्णावतारीं मीं उग्रसेनाची राज्यावर स्थापना केली. १६ रामानें वानराचें सैन्य जमवून राक्षसकुळाचा वध केला व मीं बाळ-गोपाळ जमवून सर्व मल्लांचा नाश केला. १७ रामानें रावण-कुंभकर्णांना व मीं कंस-चाणुरांना गतप्राण केलें. रामानें वालीवानराचा व मीं कालयवनाचा वध केला. १८ रामानें बिभीषणाला लंकेच्या राज्यावर बसविलें व मीं धर्मराजाची राज्यावर स्थापना केली. राम पित्याच्या वचनावरून वनांत गेला. मीं ब्राह्मणाच्या मृतपुत्रांना घेऊन आलों. १९ अशीं हीं अवतारचरित्रें वर्णन करीत असतां वाटमाऱ्या वाल्मीकि रामायणकथनानें मोठा तत्त्वज्ञानी झाला. व्यभिचारानें जन्मलेला व्यास भारत-भागवताच्या वर्णनानें त्रैलोक्यांत अत्यंत श्रेष्ठ झाला. ६२० याप्रमाणें या दोन अवतारांचा महिमा गाऊन वाल्मीकि व व्यास हे महाकवि झाले. त्या दोघांनाहि देवांनीं वंदन करून, कीर्तीच्या द्वारां त्यांचा फार मोठा गौरव केला. २१ त्या महाकवींनीं रचलेलीं हीं महाकाव्यें शेष आपल्या दोन हजार कानांनीं ऐकूं लागला; पण कांहीं केल्या त्याची तृप्ति होईना. २२ स्वर्गांत हीच कथा श्रवण करण्यासाठीं इंद्र-बृहस्पतीचे पाय धरितो. त्यांची अशी चरित्रकीर्ति त्रिभुवनांत वर्णितात. २३ हें कथेचें महात्म्य असो. माझ्या केवळ नांवानेंच अजामिळ ब्राह्मणाचा उद्धार झाला व गजेंद्र हत्ती तरून गेला. २४ पोपटाला शिकविण्याच्या निमित्तानें 'राम' या दोन अक्षराचें स्मरण घडल्यानें महादोषांची खाणच अशी जी गणिका तीहि तत्काल तरली. २५ वेदशास्त्रांचें शब्दज्ञान माझ्या नांवाची बरोबरी करूं शकत नाहीं. कारण वेदशास्त्रांचा अर्थ समजणें जसें फार काठिण तसें माझें नांव नाहीं. २६ वेदशास्त्रवेत्ता केवळ पठणानें माझ्या स्वरूपांत येऊन मिळत नाहीं. परंतु माझें नांव घेणारा स्वभावतःच मला अत्यंत प्रिय असतो. २७ वेदशास्त्रांचा अधिकारी ब्राह्मण आहे; पण माझ्या नांवाचे अधिकारी चारी वर्ण आहेत. माझें नामस्मरणच जगाच्या उद्धाराचें कारण आहे. २८ जेथें माझ्या नांवाचा नित्य उच्चार

विचार । नाम सधर तारावया ॥ २९ ॥ ते माझे जन्म नाम कीर्ति गुण । जे वाचेसी नाहीं पठण । ते वाचा पिशाचिका जाण । वृथालापन वटवटी ॥ ६३० ॥ माझे कीर्तीवीण जें वदन । तें केवळ मद्यपानाचें भाजन । त्या उन्मादविटाळाभेण । नाम जाण तेथ नये ॥ ३१ ॥ जेथ उच्चारू नाहीं नामाचा । ते जाणावी वांझ वाचा । गर्भ न धरी हरिकथेचा । निष्फळ तिचा उद्योगू ॥ ३२ ॥ उद्धवासी म्हणे श्रीरंगू । आइकें बापा उपावो चांगू । माझा नाममार्ग सुगमू सांगूं । न पडे पांगू आणिकांचा ॥ ३३ ॥ हरिनामेंवीण वाणी । कदा न राखावी सज्जनीं । हाचि अभिप्रावो चक्रपाणीं । प्रीति करोनि सांगीतला ॥ ३४ ॥ करूनियां शब्दज्ञान । अतियोग्यता पंडितपण । तेणें माझी प्राप्ति नव्हे जाण । वैराग्येंवीण सर्वथा ॥ ३५ ॥ अथवा वैराग्यही जालें । परी तें विवेकहीन उपजलें । जैसें धृतराष्ट्रा ज्येष्ठत्व आलें । नेत्रेंवीण गेलें स्वराज्य ॥ ३६ ॥ तैसें वैराग्य विवेकेंवीण । केवळ आंधळें अनधिकारी जाण । नाहीं सन्मार्गदेखणेपण । वृथा परिभ्रमण तयाचें ॥ ३७ ॥ जो विवेकें पूर्ण भरित । त्यावरी वैराग्य वोसंडत । माझी जिज्ञासा अद्भुत । तेंचि निश्चित सांगतू ॥ ३८ ॥

एवं जिज्ञासयाऽपोह्य नानात्वभ्रममात्मनि । उपारमेत विरजं मनो मय्यर्प्य सर्वगे ॥ २१ ॥

नित्यमुक्त अव्ययो । स्वरूप जाणावया पहा हो । ज्याचा लागलो दृढ भावो । आन आठवो नाठवे ॥ ३९ ॥ ऐशी मज जाणावयाची अवस्था । त्या नांव बोलिजे जिज्ञासता । माझे प्राप्तीलागीं सर्वथा । पांडित्यमान्यता तो नेघे ॥ ६४० ॥ देहादि अध्यासु आपुल्या ठायीं । श्रवणें मननें मिथ्या केला पाहीं । दृढ विश्वास गुरूच्या पायीं । पूर्णब्रह्माच्या ठायीं निर्धारू ॥ ४१ ॥ तेथ पुढारीं चालावया

होतो तेथें मी खात्रीनें असतों. तेथें दुसरा कसलाहि विचार करावा लागत नाहीं. माझें नांवच रक्षण करण्यास समर्थ असतें. २९ जी वाचा असें माझे जन्म, नांव, गुण व कीर्ति यांचें पठण करीत नाहीं, ती केवळ हडळ, व्यर्थ वटवट करणारी होय. ६३० माझ्या कीर्तीचा उच्चार न करणारें तोंड केवळ मद्याचें भांडेंच होय. याच्या उन्मादाच्या विटाळ होईल या भीतीनें माझें नांव तेथें रहात नाहीं. ३१ जी वाचा माझ्या नांवाचा उच्चार करीत नाहीं, ती वांझच होय. जी हरिकथारूपी गर्भ धारण करीत नाहीं, तिचा इतर सर्व उद्योग निष्फल समजावा. ३२ श्रीरंग उद्धवाला म्हणाले कीं, अरे बाबा ! आतां उत्तम उपाय ऐक ! माझा नाममार्ग अत्यंत सुलभ व सोपा आहे. तेथें इतर उपायांची गरज नाहीं. ३३ सज्जनानें आपली वाणी हरिनामावांचून कधींहि ठेवूं नये, असा आपला अभिप्राय भगवानांनीं प्रेमानें सांगितला. ३४ शब्दज्ञान संपादून पांडित्याची मोठी योग्यता प्राप्त झाली तरी त्यानें वैराग्यावांचून माझी प्राप्ति केव्हांहि होत नाहीं. ३५ किंवा धृतराष्ट्राला वडीलपणा आला; पण त्याच्या अंधत्वामुळें तो आपल्या राज्याला जसा मुकला तसें वैराग्यहि आलें. ३६ परंतु तें जर विवेकावांचून असलें तर, तें केवळ आंधळें व व्यर्थ आहे. विवेकशून्य विरक्ताला सन्मार्ग दिसत नाहीं व तो व्यर्थ भटकत फिरतो. ३७ ज्याच्या अंगीं विवेक पूर्ण बाणला त्याच्या वैराग्याला नुस्ता ऊत येतो. त्याला माझी उत्कट जिज्ञासा होते. तेंच आतां निश्चित सांगतों. ६३८.

—आतां या उक्त ज्ञानमार्गाचा उपसंहार करितात—

एवं जिज्ञासया आत्मनि नानात्वभ्रमं अपोह्य—याप्रमाणें जिज्ञासेनें आत्मस्वरूपाचा निश्चय करून, आत्म्याच्या ठिकाणीं झालेला जो देहादि अध्यासरूप नानात्वभ्रम त्याचें विचारानें निरसन करून, **विरजं मनः मयि सर्वगे अर्प्य उपारमेत**—व शुद्ध मन मज परिपूर्ण परमात्म्यामध्यें स्थिर करून शांत व्हावें. केवळ शास्त्रपांडित्यानेंच ही शांति मिळणें शक्य नाहीं. २१.

ज्याला माझें नित्यमुक्त, अव्यय स्वरूप जाणण्याची तीव्र इच्छा होते त्याला दुसरें कांहीं सुचत नाहीं. ३९ अशी मला जाणण्याची जी उत्कट इच्छा तिलाच जिज्ञासा असें म्हणतात. तो माझ्या प्राप्तीसाठीं स्वतःकडे पंडित-मन्यता घेत नाहीं. ६४० तो आपल्यांतील देहादिकांचा भ्रम श्रवण-मननांनीं मिथ्या करितो. गुरुचरणांवर त्याचा दृढ विश्वास असतो व त्याची पूर्णब्रह्मावर निष्ठा असते. ४१ तो पुढला मार्ग चालण्यासाठीं भगवद्भजनांत अत्यंत

वाट । भगवद्भजनीं अतिउद्भट । कां सांडोनि कर्मकचाट । ध्याननिष्ठ तो होय ॥ ४२ ॥ तेथ ध्येय ध्याता ध्यान । न दिसे त्रिपुटीचें भान । कोंदलें चैतन्यघन । वस्तु सतानत तो पावे ॥ ४३ ॥ तेथ कैंचा कर्ता क्रिया कर्म । फिटला नानात्वाचा भ्रम । सबाह्य कोंदलें परब्रह्म । जाला उपरम गुरुकृपा ॥ ४४ ॥ सर्वगत सर्वकाळ । सर्वदेशीं सर्वीं सकळ । वस्तु असे जें केवळ । तेथ निश्चळ निजबोधू ॥ ४५ ॥ ऐशिये वस्तूची धारणा । ज्याचेनि न करवे जाणा । तरी सुगम उपाया आना । ऐक विचक्षणा सांगेन ॥ ४६ ॥

यद्यनीशो धारयितुं मनो ब्रह्मणि निश्चलम् । मयि सर्वाणि कर्माणि निरपेक्षः समाचर ॥ २२ ॥

स्वभावतां मन चंचळ । विषयवासना अतिचपळ । निर्गुण ब्रह्मीं केवळ । नाहीं बळ प्रवेशावया ॥ ४७ ॥ तरी सांख्य योग संन्यासू । हा न करावया आयासू । माझिया भक्तीचा विलासू । अतिउल्हासू करावा ॥ ४८ ॥ मागें बद्धमुक्तांचें निरूपण । सांगीतलें मुक्तांचें लक्षण । वृथा शाब्दिकांचें शब्दज्ञान । तेंही व्याख्यान दाविलें ॥ ४९ ॥ आतां आपुली निजभक्ती । सांगावया उद्धवाप्रती । अतिआदरें श्रीपती । भक्तीची स्थिति सांगतु ॥ ६५० ॥ उद्धवा चढत्या आवडीं मत्कर्म । जे भक्तीसी विकावा मनोधर्म । माझें स्मरावें गुणकीर्तिनाम । नाना संभ्रमविनोदें ॥ ५१ ॥ माझेनि भजनें कृतकृत्यता । दृढ विश्वास धरोनि चित्ता । भजनीं प्रवर्तावें सर्वथा । अविश्रमतां अहर्निशीं ॥ ५२ ॥ माझ्या भजनाच्या आवडीं । नुरेचि आराणुकेसी वाडी । वायां जावों नेदी अर्धघडी । भजनपरवडी या नांव ॥ ५३ ॥ माझ्या भजनीं प्रेम अधिक । न सांडावें नित्यनैमित्तिक । वैदिक-लौकिक-दैहिक । भक्तांसी

तत्पर होतो. किंवा कर्माची खटाटोप सोडून तो ध्याननिष्ठ होतो. ४२ ध्येय, ध्याता आणि ध्यान या त्रिपुटीचें त्याला भान रहात नाहीं. सर्वत्र चैतन्य भरून राहिल्यामुळें तो त्या सनातन ब्रह्मवस्तूला प्राप्त होतो. ४३ मग तेथें कर्ता, क्रिया व कर्म कोठचें! अनेकत्वाचा भ्रम नाहींसा होतो, अंतर्बाह्य परब्रह्मच भरून रहातें व गुरुकृपेनें तो शांत होतो. ४४ सर्वदेशीं, सर्वकाळ व सर्वांमध्यें जी सर्वत्र भरलेली आत्मवस्तु तिच्यामध्येंच निश्चल आत्मबोध असतो. ४५ अशा आत्मवस्तूचें ध्यान ज्याला करवत नाहीं, त्याच्यासाठीं आणखी एक सोपा उपाय सांगतों. हे चतुर उद्धवा! तूं आतां तो ऐक. ६४६.

—जर हें करण्याचें सामर्थ्य नसेल तर तें राहू दे, पुरुष माझ्या भक्तीनेंच कृतार्थ होईल, असें सांगतात—

यदि ब्रह्मणि मनः निश्चलं धारयितुं अनीशः—जर तूं ब्रह्मामध्यें मन निश्चल करण्यास असमर्थ असशील, निरपेक्षः मयि सर्वाणि कर्माणि समाचर—तर फलाचा अभिलाष सोडून सर्व कर्मे माझ्यासाठीं कर. २२.

मन स्वभावतःच चंचल आहे व विषयवासना अत्यंत चपळ आहे. त्यामुळें त्याला निर्गुण ब्रह्मामध्यें प्रवेश करण्याचें सामर्थ्य रहात नाहीं. ४७ यास्तव सांख्य, योग व संन्यास या कसल्याहि भानगडींत न पडतां अत्यंत आवडीनें माझी भक्ति करावी. ४८ मागें बद्ध व मुक्त, यांचें निरूपण करितेवेळीं मुक्ताचें लक्षण सांगितलेंच आहे. तेव्हांच केवळ शब्दज्ञानानें पोकळ पांडित्य करणारांचेंहि विवेचन केलें आहे. ४९ आतां श्रीपति आपली आत्मभक्ति उद्धवाला सांगण्यासाठीं भक्तीचें लक्षण अति आवडीनें सांगूं लागला आहे. ६५०. श्रीकृष्ण म्हणाला—उद्धवा! वाढत्या प्रेमानें जर माझें कार्य करावयाचें असेल, तर भक्तीलाच मनोधर्म विकून टाकावा आणि माझें नांव, गुण व कीर्ति, यांचें अनेक प्रकारच्या कौतुकानें स्मरण करावें. ५१ माझ्या भजनानेंच कृतकृत्यता प्राप्त होते, असा मनांत दृढविश्वास ठेवून रात्रंदिवस माझ्या भजनांत सर्वथा प्रवृत्त व्हावें. ५२ माझ्या भजनाच्या आवडींत समाधानालाहि जागा रहात नाहीं. अर्धी घटकाहि वायां जाऊं न देणें यालाच भजनाचा सुकाळ म्हणतात. ५३ माझ्या भजनाची जरी अधिक आवड असली तरी आपलें नित्य-नैमित्तिक

बाधक नव्हे कर्म ॥ ५४ ॥ आचरतां सकळ कर्म । न कल्पावा फळसंभ्रम । हेंचि भक्तीचें गुह्य वर्म उत्तमोत्तम अधिकारू ॥ ५५ ॥ उबग न मनूनि अंतरीं । माझ्या प्रीतीं सर्व कर्मांतें करी । जो फळाशेतें कंहीं न धरी । भक्तीचा अधिकारी तो जाणा ॥ ५६ ॥ पिंपुरें खावयाचें चाडें । न लाविती पिंपळाचीं झाडें । तेवीं कर्मे करितां वाडेंकोडें । फळाशा पुढें उठेना ॥ ५७ ॥ माझें भजन करितां । न पडे ज्ञानाची पंगिस्तता । माझे भजनें नित्यमुक्तता । जाण मद्भक्तां मद्भावें ॥ ५८ ॥ ज्ञानेंवीण भक्ति न घडे । म्हणती तें शब्दज्ञान धडफुडें । भक्तीस्तव जाण रोकडें । ज्ञान जोडे अपरोक्ष ॥ ५९ ॥ यालागीं माझें भजन करितां । ज्ञानाचा पांग न पडे भक्तां । देहगेहामाजीं वर्ततां । बंधन मद्भक्तां लागेना ॥ ५६० ॥ ज्याच्या मुखीं माझें नाम । ज्यासी माझा भजनसंभ्रम । ज्याच्या मनीं मी आत्माराम । त्याचें दासीकाम मुक्ति करी ॥ ६१ ॥ मुक्तीमाजीं विशेष कायी । वृत्ति निर्विषय असे पाहीं । भक्तांसी सर्व कर्मांच्या ठायीं । स्फुरण नाहीं विषयांचें ॥ ६२ ॥ भक्तांचें विषयीं नाहीं चित्त । त्यांचा विषय तो मी भगवंत । ते सदा मजमाजीं लोलुप्त । नित्यभक्त यालागीं ॥ ६३ ॥ भक्त विषयो सेविती । ते ग्रासोग्रासीं मज अर्पिती । तेणेंचि त्यांसी वंदी मुक्ती । सर्व भूतीं मद्भावो ॥ ६४ ॥ यालागीं कर्मबंधन । मद्भक्तासी न लगे जाण । करितां माझें स्मरण कीर्तन । जगाचें बंधन छेदिती ॥ ६५ ॥ माझ्या भक्तांचें वसतें घर । तें जाण माझें निजमंदिर । मुक्ति तेथें आठौ प्रहर । वोळगे द्वार तयांचें ॥ ६६ ॥ माझें भजन करितां । कोण्या अर्थाची नाहीं दुर्लभता । चहूं पुरुषार्थांचे माथां । भक्ति सर्वथा मज पढियंती ॥ ६७ ॥ ज्ञान नित्यानित्यविवेक । भक्तीमाजीं माझें प्रेम अधिक । तैसें प्रेमळाचें मजलागीं सुख । चढतें देख अहर्निशीं ॥ ६८ ॥ जेवीं एकुलतें बाळक । जननीसी आवडे अधिक । तैसें प्रेमळाचें कौतुक । चढतें

कर्म टाकूं नये. कारण वैदिक, लौकिक किंवा शारीरिक कर्म भक्ताला बाधत नाहीं. ५४ सर्व कर्में आचरीत असतां फलाची इच्छा ठेवूं नये. हेंच भक्तीचें गुह्य रहस्य आहे व हाच उत्तमोत्तम अधिकार होय. ५५ मनापासून मुळींच न त्रासतां जो माझ्यावर प्रेम ठेवून सर्व कर्में करितो आणि फलाची इच्छा ठेवीत नाहीं, तोच भक्तीचा अधिकारी आहे, असें जाण. ५६ पिंपरें खावयास मिळावीं या इच्छेनें जशीं कोणी पिंपळाचीं झाडें लावित नाहीं, त्याचप्रमाणें भगवद्भक्तीच्या आवडीनें कर्में करीत असतां फलाची आशा पुढें येत नाहीं. ५७ माझें भजन करीत असतां ज्ञानासाठीं खटपट करावी लागत नाहीं. माझ्या अनन्य भक्तांना माझ्या केवळ भक्तीनेंच नित्यमुक्ति प्राप्त होते. ५८ ज्ञानावांचून भक्ति साधत नाहीं, असें जे म्हणतात त्यांचें तें केवळ पोकळ शाब्दपांडित्य होय. भक्तीनेंच साक्षात् ज्ञान प्राप्त होतें, हें खात्रीनें जाण. ५९ यास्तव माझें भजन करीत असतां भक्ताला माझ्या ज्ञानाची उणीव भासत नाहीं. देहरूपी घरांत वागत असतां माझ्या भक्तांना बंधन घडत नाहीं. ५६० ज्याच्या तोंडीं माझें नांव असतें, ज्याला माझ्या भजनाची आवड असते, ज्याच्या मनांत मी आत्माराम वास करितों, त्याच्या दासीचें काम मुक्ति करितें. ६१ परंतु ज्याची वृत्तीच निर्विषय झाली, त्याला मुक्तींत तरी विशेष काय दिसणार! भक्ताला कोणत्याच कर्मांत विषयस्फूर्ति होत नाहीं. ६२ भक्ताचें मन विषयांत नसतें. मी भगवानच त्याचा विषय. तो निरंतर माझ्यांतच आसक्त असतो. यास्तव तो नित्यमुक्त होय. ६३ भक्त विषयसेवन करितेवेळीं प्रत्येक विषय मला अर्पण करीत असतो. त्यामुळेंच त्याला मुक्ति वंदन करिते. तो सर्व भूतांमध्यें माझीच भावना ठेवितो. ६४ त्यामुळें माझे भक्त कर्मबंधनांत पडत नाहींत. माझें स्मरण व कीर्तन करून ते जगाचें बंधन तोडून टाकितात. ६५ माझ्या भक्तांचें रहाण्याचें जें घर तेंच माझें मंदिर आहे. आठहि प्रहर मुक्ति त्याच्या दारांत सेवा करीत उभी असते. ६६ माझें भजन केलें असतां कसलीहि उणीव पडत नाहीं. चाराहि पुरुषार्थांहून भक्ति मला अधिक आवडते. ६७ ज्ञान व नित्यानित्यविवेक यापेक्षां भक्तीवरच माझें अधिक प्रेम आहे. त्याचप्रमाणें प्रेमळाचें सुख अहोरात्र वाढत जातें. ६८ एकुलत्या एक बाळावर मातेचें जसें अत्यंत

सुख मजलागीं ॥ ६९ ॥ यालागीं आपुलिये संवसाठीं । मी प्रेमळ घें उठाउठी । वरी निजसुख दें सदेंठीं । न घे तैं शेवटीं सेवक्रू होयें ॥ ६७० ॥ प्रेमाचिया परम प्रीतीं । जेणें मज अर्पिली चित्तवृत्ती । तेव्हांचि त्याचे सेवेची सुती । जाण निश्चितीं म्यां घेतली ॥ ७१ ॥ प्रेमळाचें शेष खातां । मज लाज नाहीं घोडीं धुतां । शेखीं उच्छिष्ट काढितां । लाज सर्वथा मज नाहीं ॥ ७२ ॥ मज सप्रेमाची आस्था । त्याचे मोचे मी वाहें माथां । ऐशी प्रेमळाची सांगतां कथा । प्रेम कृष्णनाथा चालिलें ॥ ७३ ॥ कंठ जाला सद्गदित । अंग झालें रोमांचित । धांवोनि उद्धवासी खेंव देत । प्रेम अद्भुत हरीचें ॥७४॥ सजल जाहले लोचन । वरुषताती स्वानंदजीवन । भक्तिसाम्राज्यपट्टाभिषिंचन । उद्धवासी जाण हरि करी ॥७५॥ सहजें प्रेमळाची करितां गोठी । संमुख उद्धव देखिला दृष्टीं । धांवोनियां घातली मिठी । आवडी मोठी भक्तांची ॥ ७६ ॥ आवडीं पडिलें आलिंगन । विसरला कार्यकारण । विसरला स्वधामगमन । मीतूंपण नाठवे ॥ ७७ ॥ नाठवे देवभक्तपण । नाठवे कथानिरूपण । नाठवे उद्धवा उद्धवपण । कृष्णा कृष्णपण नाठवे ॥ ७८ ॥ प्रेमळाचे गोठीसाठीं । परात्पर परतटीं । दोघां ऐक्यें पडली मिठी । आवडी मोठी प्रेमाची ॥ ७९ ॥ आजि भक्तीचें निजसुख । उद्धवासी फावलें देख । भक्तीचें प्रेम अलोलिक । उद्धवें सम्यक विस्तारिलें ॥ ६८० ॥ श्रीकृष्ण निजधामासी जातां । उद्धव जरी हें न पुसता । तरी ज्ञानवैराग्यभक्तिकथा । कां सांगतां श्रीकृष्ण ॥ ८१ ॥ विशेष भक्तिप्रेम अचुंबित । उद्धवें काढिलें निश्चित । उद्धवप्रश्नें श्रीभागवत । झालें सनाथ तिहीं लोकीं ॥ ८२ ॥ यालागीं तनुमनप्राणें । उद्धवू जीवें ओंवाळणें । याहूनि अधिक वानणें । तें बोलणें न साहे ॥ ८३ ॥ जे बोला बुद्धी न ये सहज । तें भक्तिप्रेम निजगुज । उद्धवा द्यावया

प्रेम असतें, तसें प्रेमळ भक्ताचें कौतुक पाहून माझी त्यावरील प्रीति वाढत असते. ६९ यास्तव प्रेमळ भक्तांना मी आपल्याच सद्भावानें एकदम आपलासा करून घेतों. त्याला आत्मसुख देतों. पण तो तेंहि जेव्हां घेत नाहीं तेव्हां शेवटीं मी त्याचा सेवक होतों. ६७० अत्यंत प्रेमानें जो मला आपली चित्तवृत्ति अर्पण करितो, त्याची सेवा करण्याचा निश्चय मी त्याचक्षणीं करितों. ७१ प्रेमळ भक्ताचें अवशिष्ट अन्न खातांना किंवा अर्जुनासारख्या जिवलग भक्ताचे घोडे धुतांना किंवा शेवटीं त्याचीं उष्टीं उचलण्यांतहि मला मुळींच लाज वाटली नाहीं. ७२ मला प्रेमळ भक्त इतका आवडतो कीं, मी त्याच्या वहाणासुद्धां डोकीवर घेतों. अशी प्रेमळ भक्तांची कथा सांगत असतां श्रीकृष्णाला प्रेमाचें भरतें आलें. ७३ त्याचा गळा दाटून आला. अंगावर रोमांच उभे राहिले. त्यानें धांवत जाऊन प्रेमभरानें उद्धवाला आलिंगन दिलें. श्रीहरीचें प्रेम मोठें अलैकिक खरें. ७४ त्याचे नेत्र आनंदाश्रूनें भरून आले व त्यांतून स्वानंदाचें जल वाहूं लागलें. त्या जलानें श्रीकृष्णानें उद्धवाला भक्तिसाम्राज्यावर पट्टाभिषेकच केला. ७५ सहज प्रेमळभक्तांच्या गोष्टी सांगत असतां समोरच उद्धव त्याच्या दृष्टीस पडला, म्हणून त्यानें तत्काल धांवून त्याला मिठी घातली. अशी त्याला भक्तांची मोठी आवड आहे. ७६ त्या आवडीमुळें आलिंगन देतांच तो आपलें कर्तव्य सुद्धां विसरला. त्याला निजधामाला जाण्याचें स्मरण राहिलें नाहीं व त्याचा 'मी तूं'पणाहि नाहींसा झाला. ७७ त्यावेळीं देवपणा व भक्तपणा आठवेनासा झाला. कथानिरूपणाचा विसर पडला. उद्धवाला उद्धवपण आणि कृष्णाला कृष्णपण आठवेनासें झालें. ७८ प्रेमळ भक्तांच्या गोष्टी करीत असतां दोघांची परात्पराच्या परतीरावर ऐक्यानें मिठी पडली. प्रेमाची आवड फार मोठी आहे. ७९ आज उद्धवाला भक्तीचें खरें सुख प्राप्त झालें. भक्तीचें अलौकिक प्रेम उद्धवानें उघड करून दाखविलें. ६८० श्रीकृष्ण निजधामाला जातेवेळीं उद्धवानें त्याला जर हा प्रश्न केला नसता तर श्रीकृष्णानेंहि ज्ञान, वैराग्य व भक्ति, यांची ही कथा कशाला सांगितली असती ! ८१ उद्धवानें खरोखर विशेष भक्तिप्रेम सहज काढून घेतलें. उद्धवाच्या या प्रश्नामुळें श्रीभागवत त्रैलोक्यांत पूज्य झालें. ८२ यास्तव उद्धवावरून आपला देह, मन व धन ओवाळून टाकावें इतकें त्याचें महत्त्व आहे. याहून जास्त वर्णन करण्यास वाणी समर्थ नाहीं. ८३ जें शब्दांनीं सहज सांगतां येत नाहीं, जें बुद्धीला आकलन करितां येत नाहीं, असें

गरुडध्वज । केलें व्याज खेंवाचें ॥ ८४ ॥ भक्तीचें शोधित प्रेम । उद्धवासी अतिउत्तम । देता जाला पुरुषोत्तम । मेघश्याम तुष्टला ॥ ८५ ॥ प्रेमळाची गोठी सांगतां । विसरलों जी श्लोकार्था । कृष्णासी आवडली प्रेमकथा । ते आवरितां नावरे ॥ ८६ ॥ प्रेमाची तंव जाती ऐशी । आठवू येऊं नेदी आठवणेंशीं । हा भावो जाणवे सज्जनांसी । ते भक्तिप्रेमासी जाणते ॥ ८७ ॥ हो कां ऐसेंही असतां । माझा अपराधू जी सर्वथा । चुकोनि फांकलों श्लोकार्था । क्षमा श्रोतां करावी ॥ ८८ ॥ तंव श्रोते म्हणती राहें । जेथें निरूपणीं सुख आहे । त्यावरी बोलणें हें न साहे । ऐसें रहस्य आहे अतिगोड ॥ ८९ ॥ आधींच भागवत उत्तम । तेथें हें वाखाणिलें भक्तिप्रेम । तेणें उल्हासें परब्रह्म । आमुचे मनोधर्म निवाले ॥ ६९० ॥ श्लोकसंगतीची भंगी । दूर ठेली कथेची मागी । हे प्रार्थना न लगे आम्हांलागीं । आम्ही हरिरंगीं रंगलों ॥ ९१ ॥ ऐकतां भक्तिप्रेमाचा जिव्हाळा । श्रवणसुखाचा पूरू आला । हे न बोलसीच उगला । निरूपण वहिला चालवीं ॥ ९२ ॥ सांगतां प्रेमळांची गोठी । कृष्णउद्धवां एक गांठी । प्रेमें पडली होती मिठी । ते कृष्णू जगजेठी सोडवी ॥ ९३ ॥ म्हणे हे अनुचित सर्वथा । आतां उद्धवू ऐक्या येतां । तरी कथेचा निजभोक्ता । ऐसा श्रोता कैंचा मग ॥ ९४ ॥ माझिया भक्तिज्ञानविस्तारा । उद्धवूचि निजांचा सोयरा । यालागीं ब्रह्मशापाबाहिरा । काढितू खरा निजबोधें ॥ ९५ ॥ जितुकी गुह्यज्ञानगोडी । भक्तिप्रेमाची आवडी । ते उद्धवाचिकडे रोकडी । दिसते गाढी कृष्णाची ॥ ९६ ॥ भक्तिप्रेमाचा कृष्णचि भोक्ता । कृष्णकृपा कळलीसे भक्तां । हे अनिर्वचनीय कथा । न ये बोलता बोलासी ॥ ९७ ॥ कृष्ण उद्धवासी म्हणे आतां ।

तें आपलें गुह्य भक्तीचें प्रेम उद्धवाला अनुभवतां यावें म्हणून भगवानानें आलिंगनाचें निमित्त केलें. ८४ पुरुषोत्तमानें उद्धवाला उत्तम भक्तीचें अत्यंत पवित्र शुद्ध प्रेम दिलें. मेघश्याम उद्धवावर प्रसन्न झाला. ८५ अहोपण, प्रेमळ भक्तांच्या गोष्टी सांगण्याच्या भरांत मी श्लोकाचा अर्थ सांगण्याचें अगदींच कींहो विसरलों ! श्रीकृष्णाला भक्ताची प्रेमकथा इतकी आवडली कीं, त्याच्या प्रेमाचा ओघ आवरतां आवरेना. ८६ प्रेमाचा स्वभावच असा आहे कीं, तें दुसरी कशाची आठवणच होऊं देत नाहीं. जे भक्तीच्या प्रेमाला जाणणारे सज्जन आहेत, त्यांना ही गोष्ट खात्रीनें पटेल. ८७ असें जरी आहे तरी माझ्याकडून अपराध झाला खरा. श्लोकार्थ सांगण्याचें सोडून मी चुकून भलतीकडेच वहावत गेलों. तरी आतां श्रोत्यांनीं मला क्षमा करावी. ८८ तेव्हां श्रोते म्हणाले कीं, थांबा. ज्या निरूपणानें आनंद वाटतो, त्याविषयीं असें बोलणें योग्य नाहीं. हें भक्तिप्रेमाचें रहस्य असेंच मधुर आहे. ८९ आधींच भागवत उत्तम, त्यांत आणखीं हें भक्तिप्रेमाचें वर्णन, त्यामुळें तर साक्षात् परब्रह्मच प्रकट होऊन आमचे मनोधर्म शांत झाले आहेत. ६९० यास्तव 'श्लोकांच्या संदर्भाचा भंग झाला, कथेचा संबंध दूर राहिला' अशीहि विनंति करण्याचें उरलें नाहीं. कारण आम्ही हरीच्या प्रेमांत रंगून गेलों आहों. ९१ भक्तिप्रेमाचा निर्झर वाहूं लागला आहे. श्रवणसुखाला पूर आला आहे. करितां आतां कांहीं न बोलतां कथा पुढें चालूं द्या. ९२ प्रेमळ भक्तांच्या गोष्टी सांगत असतां श्रीकृष्ण व उद्धव यांचें तादात्म्य होऊन परस्परांनीं जी मिठी मारिली होती ती श्रीकृष्णानें सोडविली ९३ व तो म्हणाला कीं, हें सर्वथा अयोग्य होय. कारण उद्धवाचें व माझें जर ऐक्य झालें तर मग आवडीनें कथा ऐकणारा श्रोता कोठचा ! ९४ माझ्या भक्तिज्ञानाचा विस्तार करावयास उद्धवच आपल्या भक्तांचा आप्त आहे. म्हणून त्याला मी आतां आत्मबोधानें ब्रह्मशापाच्या बाहेर काढितों. ९५ गुह्यज्ञानाची सर्व गोडी व श्रीकृष्णाच्या भक्तिप्रेमाची सर्व आवड उद्धवामध्यें स्पष्टपणें व दृढ दिसत आहे. ९६ भक्तिप्रेमाचा भोक्ता श्रीकृष्णच आहे. कृष्णाची कृपा भक्तासच कळते. ती अनिर्वचनीय गोष्ट शब्दांनीं सांगतां येत नाहीं. ९७ श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले कीं, आतां सावध

सावधू होयीं गा सर्वथा । पुढारीं परियेसीं कथा । जे भक्तिपथा उपयोगी ॥ ९८ ॥ सर्व कर्में मदर्पण । फळत्यागें न करवे जाण । तरी अतिसोपें निरूपण । प्रेमलक्षण सांगेन ॥ ९९ ॥

श्रद्धालुर्मे कथाः शृण्वन्सुभद्रा लोकपावनीः । गायन्ननुस्मरन्कर्म जन्म चाभिनयन्मुहुः ॥ २३ ॥
मदर्थे धर्मकामार्थानाचरन्मदपाश्रयः । लभते निश्चलां भक्तिं मय्युद्धव सनातने ॥ २४ ॥

करितां माझी कथा श्रवण । काळासी रिगमू नाहीं जाण । इतरांचा पाडू कोण । कर्मबंधन तेथें कैंचें ॥ ७०० ॥ जो हरिकथेनें गेला क्षण । तो काळासी नव्हे प्राशन । काळसार्थकता त्या नांव जाण । जैं श्रद्धाश्रवण हरिकथा ॥ १ ॥ परीस कथेचें महिमान । श्रद्धायुक्त करितां श्रवण । तिहीं लोकींचें दोषदहन । अक्षरें जाण होतसे ॥ २ ॥ ऐक श्रद्धेचें लक्षण । करितां हरिकथाश्रवण । ज्याचें अर्थारूढ मन । श्रद्धाश्रवण त्या नांव ॥ ३ ॥ श्रवण ऐकोनि नास्तिक । देवोचि नाहीं म्हणती देख । आहे म्हणती ते पोटवाइक । आम्हांसी निःशेख ठाकेना ॥ ४ ॥ या नास्तिका देवोनि तिळोदक । ज्याचें वाढलें आस्तिक्य देख । श्रद्धा त्या नांव अलोलिक । अगाध सुख तीमाजीं ॥ ५ ॥ श्रवणीं ध्यानीं अंतराय । लय विक्षेप कषाय । का रसस्वादुही होय । हे चारी अपाय चुकवावे ॥ ६ ॥ ऐकतांही हरिकथा । विषयचिंतनीं गोडी चित्ता । ते श्रद्धा नव्हे गा सर्वथा । मुख्य विक्षेपता ती नांव ॥ ७ ॥ हावभावकटाक्षगुण । सुरतकामनिरूपण । तेथ ज्याचें श्रद्धाश्रवण । रसस्वादन त्या नांव ॥ ८ ॥ हरिकथेपाशीं बैसला दिसे । परी कथेपाशीं मनही नसे । चित्त भंवे पिसें जैसें । तो कर्मठवसें विक्षेपु

होऊन पुढील कथा ऐक. ती भक्तिमार्गाच्या उपयोगी आहे. ९८ जर फलाची इच्छा सोडून सर्व कर्में मला अर्पण करवत नसतील तर त्याहूनहि सोपें असें प्रेमलक्षण सांगतों, तें ऐक. ६९९.

—कर्में मला अर्पण करून त्यांच्या योगानेंच शुद्धचित्त झालेल्या अधिकाऱ्याला भक्ति हें अंतरंगसाधन पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

सुभद्राः लोकपावनीः मे कथाः शृण्वन्—अतिशय कल्याणकर व लोकांना पावन करणाऱ्या अशा माझ्या कथा ऐकणाऱ्या, गायन् अनुस्मरन्—त्या गाणारा, त्यांचें चिंतन करणारा, मुहुः कर्म जन्म च अभिनयन्—वारंवार माझ्या कर्मांचें व जन्माचें स्वतः अनुकरण करणारा, मदर्थे धर्मकामार्थान् आचरन्—माझ्यासाठीं धर्म, अर्थ व काम यांचें सेवन करणारा, मदपाश्रयः श्रद्धालुः—माझा आश्रय केलेला श्रद्धालु, उद्धव—हे उद्धवा ! सनातने मयि—सनातन अशा माझ्या विषयींच्या, निश्चलां भक्तिं लभते—निश्चल भक्तीला प्राप्त होतो. २३–२४.

माझी कथा ऐकिली असतां तेथें काळाचाहि प्रवेश होत नाहीं. मग इतरांचा काय पाड ! व तेथें कर्मबंधन तरी कोठचें ! ७०० जो क्षण हरिकथेंत गेला त्याला काळ गिळित नाहीं. श्रद्धेनें हरिकथेचें श्रवण करणें हेंच काळाचें खरें सार्थक्य होय. १ आतां कथेचा महिमा ऐक ! श्रद्धेनें हरिकथा ऐकिली असतां त्यांतील प्रत्येक अक्षरानें त्रैलोक्यांतील दोष जळून जातात. २ आतां श्रद्धेचें लक्षण ऐक. हरिकथेचें श्रवण करीत असतां ज्याचें लक्ष तिच्या अर्थाकडे वेधलेलें असतें त्याच्या श्रवणालाच श्रद्धायुक्त श्रवण म्हणतात. ३ हरिकथा ऐकून नास्तिक म्हणतात.—‘ देवच नाहीं, तो आहे, असें म्हणणारे केवळ पोटभरू होत. आमचा त्यांच्यावर मुळींच विश्वास नाहीं.’ ४ अशा नास्तिकांच्या बोलण्याला तिलांजलि देऊन ज्यांची आस्तिक्यबुद्धि वाढत असते त्याच्या विश्वासालाच अलौकिक श्रद्धा म्हणतात व तिच्यातच अप्रतिम सुख असतें. ५ श्रवणांत व ध्यानांत विघ्न करणारे लय, विक्षेप, कषाय म्ह० रागादि दोष व रसास्वाद हे चारी अपाय टाळावेत. ६ हरिकथा ऐकत असतां मनाला विषयचिंतनाची आवड असणें ही सर्वथा श्रद्धा नव्हे. मुख्य विक्षेप तोच होय. ७ स्त्रियांचे हावभाव, नेत्रकटाक्ष, शृंगारचेष्टा यांचें वर्णन ऐकण्याविषयींची जी आसक्ति तेंच रसास्वादन होय. ८ किंवा एखादा हरिकथा ऐकावयास बसलेला दिसतो, पण त्याचें मन कथेकडे नसतें, तें वेड्यासारखें कोठें तरी भटकत असतें. याला मर्कटरूपी विक्षेप म्हणतात. ९ किंवा प्रपंचांतील अनेक उद्योग मागें लागलेले असल्यामुळें कथेकडे

॥ ९ ॥ नातरी नाना उद्वेगें । ऐकतां कथा मनीं न लगे । कां कथेमाजीं झोंप लागे । तो जाणावा वेगें लयविक्षेपू ॥ ७१० ॥ श्रवणीं ध्यानीं बैसल्या पाठीं । सगुण निर्गुण कांहीं नुठी । निळें पिंवळें पडे दिठीं । गुणक्षोभ त्रिपुटीं कषाय ॥ ११ ॥ श्रवणीं ध्यानीं हे अवगुण । तैसाचि त्रिविध प्रेमा जाण । तो वोळखती विचक्षण । ऐक लक्षण सांगेन ॥ १२ ॥ महावीरांचें शौर्यपण । ऐकोनि युद्ध दारुण । अत्यंत हरिखें उल्हासे मन । तो प्रेमा जाण राजस ॥ १३ ॥ दुःखशोकांची अवस्था । कां गेल्या-मेल्यांची वार्ता । अत्यंत विलापाची कथा । ज्यासी ऐकतां न संठे ॥ १४ ॥ नेत्रीं अश्रूंचिया धारा । स्फुंदनें कांपे थरथरां । प्रेमविलाप अवसरा । तो जाण खरा तामसू ॥ १५ ॥ सगुणमूर्तींची संपदा । शंख चक्र पद्म गदा । पीतांबरधारी गोविंदा । ऐकोनि आनंदा जो भरे ॥ १६ ॥ नेत्रीं आनंदजीवन । हृदयीं न संठे स्फुंदन । कृष्णमय जालें मन । तो प्रेमा जाण सात्विक ॥ १७ ॥ यावरी जो प्रेमा चौथा । अतर्क्य तर्केना सर्वथा । उद्धवा तूं मजलागीं पढियंता । तोही आतां सांगेन ॥ १८ ॥ तुझ्या भावार्थाची अवस्था मोटी । ते बोलविते गुह्य गोठी । तुजवेगळा पाहतां दृष्टी । अधिकारी सृष्टीं दिसेना ॥ १९ ॥ श्रीकृष्ण म्हणे सावधान । ऐकोनि निर्गुणश्रवण । ज्याचें चिन्मात्रीं बुडे मन । उन्मज्जन होऊं नेणे ॥ ७२० ॥ जेवीं कां सैंधवाचा खडा । पडला सिंधूमाजिवडा । तो झाला सिंधूचियेवढा । तेवीं तो धडफुडा ब्रह्म होय ॥ २१ ॥ चित्त-चैतन्या पडतां मिठी । सुटतां लिंगदेहाची गांठी । नेत्रीं अश्रूंचा पूर दाटी । रोमांच उठी सर्वांगीं ॥ २२ ॥ जीवभावाची दशा आटे । अनिवार बाष्प कंठीं दाटे । कांहीं केल्या शब्द न फुटे । पूर लोटे स्वेदाचा ॥ २३ ॥ नेत्र झाले उन्मीलित । पुंजाळले जेथिंचे तेथ । विस्मयाचें भरतें येत । वोसंडत स्वानंदें ॥ २४ ॥ हा जाण पां प्रेमा चौथा । उत्तम भागवत अवस्था । तुज म्यां सांगीतली तत्त्वतां । इचा जाणता मी एकू

लक्ष लागत नाहीं अथवा कथा ऐकतांना झोंप येते, तो लयविक्षेप जाणावा. १० किंवा कथाश्रवण, ध्यान किंवा पठण करीत असतां सगुण-निर्गुणरूप त्याच्या मनांत न येतां त्याच्या डोळ्यांपुढें निळे, पिवळे रंग दिसूं लागतात. हा जो त्रिगुणांचा क्षोभ त्याला कषाय म्हणतात. ११ श्रवण आणि ध्यान यांत जसे हे दोष आहेत, त्याप्रमाणें प्रेमांतहि तीन प्रकार आहेत. चतुर माणसें त्यांना तेव्हांच ओळखितात. त्यांचें लक्षण सांगतों, ऐक.१२ बलाढ्य वीरांचें शौर्य व तुमुल युद्धाचा वृत्तान्त ऐकून ज्याच्या मनाला अत्यंत आनंद होतो, तें राजस प्रेम जाणावें. १३ दुःख-शोकाची स्थिति किंवा मेल्या-गेल्यांच्या गोष्टी व अतिशय विलाप ऐकिला असतां ज्याचें मन आवरत नाहीं, १४ डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागतात, स्फुंदण्यानें अंग थरथरां कांपूं लागतें आणि प्रेमविलासाला अवसर मिळतो तो खरा तामस जाण. १५ शंख, चक्र, गदा, पद्म या सगुणमूर्तींच्या सौंदर्यानें युक्त असलेल्या पितांबरधारी गोविंदाचें वर्णन ऐकून ज्याला प्रेमाचें भरतें येतें, १६ डोळ्यांत आनंदाश्रु उभे रहातात, अंतःकरणांतील हुंदके आवरत नाहींत व मन श्रीकृष्णमय होतें तें सात्विक प्रेम होय. १७ यापेक्षां चौथें प्रेम मोठें अलौकिक आहे. त्याची कोणाला कल्पनाहि करितां येत नाहीं. परंतु हे उद्धवा ! तूं माझा अत्यंत आवडता असल्यामुळें मी तुला तेंहि सांगतों. १८ तुझ्या भक्तीचा प्रभाव मोठा विलक्षण आहे. तो माझ्या तोंडून गुप्त रहस्यहि वदवितो. सर्व सृष्टीमध्यें मला तुझ्या-वांचून दुसरा कोणीहि योग्य अधिकारी दिसत नाहीं. १९ श्रीकृष्ण म्हणाले कीं, सावधान चित्तानें ऐक. निर्गुण ब्रह्माच्या श्रवणानें भक्ताचें मन चिन्मात्रांत बुडून जातें व तें पुनः बाहेर येतच नाहीं. ७२० ज्याप्रमाणें मिठाचा खडा समुद्रांत पडला म्हणजे तो समुद्ररूपच बनतो, त्याप्रमाणें हा भक्त साक्षात् ब्रह्मच होतो. २१ चित्त व चैतन्य यांची गांठ पडली म्हणजे सूक्ष्मदेहाची गांठ सुटते, डोळ्यांतून आनंदाश्रूंचा पूर वाहूं लागतो. व सर्वांगावर रोमांच उभे रहातात. २२ जीवाभावाची अवस्था नाहींशी होते. कंठ अनि-वार दाटून येतो. कांहीं केल्या तोंडांतून शब्द उमटत नाहीं व सर्वांग घामानें दरदरून जातें. २३ नेत्र विकास पावतात व जागच्या जागीं स्थिर होतात. विस्मयाचें भरतें येतें व स्वानंदाला ऊत येतो. २४ ही प्रेमाची चौथी उत्तम भागवत अवस्था आहे, असें समज. तुलाच म्हणून मीं ती सांगितली. मीच

॥ २५ ॥ निर्गुणीं जो प्रेमा जाण । तें शोधितसत्वाचें लक्षण । हे मी जाणें उणखूण । कां ब्रह्मसंपन्न जाणती ॥ २६ ॥ उद्धवा श्रद्धायुक्त श्रवण । तेणें येवढी प्राप्ती आहे जाण । श्रद्धाश्रवणाचें महिमान । अतिगहन तिहीं लोकीं ॥ २७ ॥ सविवेकनैराश्य वक्ता । जोडल्या श्रद्धेनें ऐकावी कथा । का सज्ञान मीनलिया श्रोता । स्वयें कथा सांगावी ॥ २८ ॥ जैं श्रोता वक्ता दोन्हीं नाहीं । तैं रिघावें मनाच्या ठायीं । कां माझीं जन्मकर्मे जें कांहीं । एकलाही विचारीं ॥ २९ ॥ सांडूनि विषयांची आस । घालोनि कलिकाळावरी कांस । माझ्या कीर्तनीं न होनि उदास । अतिउल्हास करावा ॥ ७३० ॥ त्यजूनियां कामाचें बीज । सांडूनि लौकिकाची लाज । कीर्तनीं नाचावें भोज । गरुडध्वज स्मरोनी ॥ ३१ ॥ रामकृष्ण हरि गोविंद । ऐशिया नामांचे प्रबंध । गातां नाना पदें छंदबंध । करावा विनोद कीर्तनीं ॥ ३२ ॥ जेणें आत्मतत्त्व जोडे जोडी । ऐशिया पदांची घडीमोडी । कीर्तनीं गावी गा आवडीं । संतपरवडी बैसवूनी ॥ ३३ ॥ श्रुति मृंदग टाळ घोळ । मेळवूनि वैष्णवांचा मेळ । कीर्तनीं करावा गदारोळ । काळवेळ न म्हणावा ॥ ३४ ॥ दशमी दिंडी जागरणें । आळस सांडूनि गावें वाणें । हावभावो दाखवणें । कर्मे स्मरणें माझेनि ॥ ३५ ॥ वोढूनि धनुष्याची वोढी । त्र्यंबक मोडिलें कडाडी । मी राम म्हणोनी हांक फोडी । जैताची गुढी कीर्तनीं ॥ ३६ ॥ गोवर्धन उचलिला । दावाग्नि प्राशियेला । तो तो विन्यासू दाविला । सेतु बांधिला अनुकारू ॥ ३७ ॥ आळस दवडूनि दूरी । अभिमान घालोनियां बाहेरी । अहर्निशीं कीर्तन करी । गर्व न धरी गाणिवेचा ॥ ३८ ॥ गाणीव जाणीव शहाणीव । वोंवाळूनि सांडावें सर्व । सप्रेम सावडी कथागौरव । सुख अभिनव तेणें मज ॥ ३९ ॥ गर्जत नामाच्या कल्लोळीं । नामासरसी वाजे टाळी । महापातकां जाली होळी । ते वैष्णवमेळीं मी उभा ॥ ७४० ॥ जें सुख क्षीरसागरीं नसे ।

काय तो एकटा ती खूण जाणितों. २५ निर्गुणब्रह्मांत असें प्रेम उत्पन्न होणें, हेंच शुद्ध सत्त्वाचें लक्षण आहे. त्याची खूण एक मी किंवा आत्मज्ञानी जाणितात. २६ हे उद्धवा ! श्रद्धेनें श्रवण करण्याचा एवढा लाभ आहे. श्रद्धेनें केलेल्या श्रवणाचें माहात्म्य त्रैलोक्यांत मोठें गहन आहे. २७ विचारशील व निरिच्छ वक्ता भेटल्यास श्रद्धेनें कथा ऐकावी व ज्ञानी श्रोता लाभल्यास आपण स्वतःच कथा सांगावी. २८ जेव्हां श्रोता व वक्ता दोन्ही नसतील तेव्हां मनांतच विचार करीत बसावें. किंवा माझीं जीं कांहीं अवतारकृत्यें त्यांचा एकट्यानेंच विचार करावा. २९ विषयांची आसक्ति टाकून, कलि-काळावर झडप घालून, माझ्या कीर्तनाविषयीं उदास न होतां अतिउत्साह धरावा. ३० कामाचा बीमोड करून, लौकिकाची चाड सोडून, श्रीकृष्णाचें स्मरण करून, कीर्तनांत आवडीनें नाचावें. ३१ राम, कृष्ण, हरि, गोविंद या नांवांचीं काव्यें अनेक प्रकारच्या पदांत व छंदांत रचून कीर्तनांत आनंदाची बहार करावी. ३२ आत्मज्ञानाचा लाभ होईल अशा प्रेमळ पदांची रचना करून त्यांचें कीर्तनांत संतसमुदायापुढें गायन करावें. ३३ मृदंग, टाळ, वीणा इत्यादि वाद्यें जमवून, वैष्णवांचा समुदाय मिळवून कीर्तनांत हरिनामाचा मोठा गजर करावा. काळ-वेळाकडे लक्ष देऊं नये. ३४ दशमीला दिंडीचें जागरण करून कीर्तनांत आळस सोडून हरिनाम गावें. माझीं अवतारकर्मे आठवून त्यांचें हावभावयुक्त वर्णन करावें. ३५ रामानें शिवधनुष्याचा कसा भंग केला, हें धनुष्याची दोरी ओढून दाखवावें. 'मीच राम आहे' अशी गर्जना करून कीर्तनांत आनंदाची गुढी उभारावी. ३६ मीं गोवर्धनपर्वत कसा उचलिला, दावाग्नि कसा प्राशन केला, हें हावभावांनीं दाखवावें. रामानें सेतु कसा बांधिला त्याचें अनुकरण करावें. ३७ आळसाला दूर घालवून, अभिमानाला बाहेर टाकून रात्रंदिवस कीर्तन करावें. मी मोठा गाणारा, असा गर्व धरूं नये. ३८ गाण्याचा डौल, जाणतेपणाची प्रौढी व शहाणपणाचा टेंभा ओवाळून टाकून शुद्ध प्रेमानें व साधेपणानें कथेचा गौरव करावा. त्यायोगें मला अप्रतिम सुख होतें. ३९ नामसंकीर्तनाच्या गजरानें व त्या नामाबरोबर वाजविलेल्या टाळ्यांनीं महापातकें जळून भस्म होतात. वैष्णवांच्या समुदायांत मी उभा असतों. ७४० जें

पाहतां वैकुंठींही न दिसे । तें सुख मज कीर्तनीं असे । कीर्तनवशें डुल्लतु ॥ ४१ ॥ मज सप्रेमाची आवडी भारी । भक्तभावाचिया कुसरी । मीही कीर्तनीं नृत्य करीं । छंदतालावरी विनोदें ॥ ४२ ॥ ऐशिया कीर्तनपरिपाटीं । बुडाल्या प्रायश्चित्तांच्या कोटी । खुंटली यमदूतराहाटी । काढिली कांटी पापाची ॥ ४३ ॥ नामस्मरणाच्या आवडीं । लाजल्या मंत्रबीजांच्या कोडी । तपादि साधनें बापुडीं । जालीं वेडीं हरिनामें ॥ ४४ ॥ ऐकोनि हरिनामाचा घोख । योगयागीं लपविलें मुख । धाकें पळालें विषयसुख । विराले देख अधर्म ॥ ४५ ॥ हरिनामाच्या कडकडाटीं । दोष रिघाले दिक्पटीं । तीर्थांची उतरली उटी । कीर्तनकसवटी हरिप्रिय ॥ ४६ ॥ माझेनि प्रेमें उन्मत्त होउनी । आवडीं कीर्तन अनुदिनीं । मनसा वाचा कर्में करूनी । मजवांचूनी नेणती ॥ ४७ ॥

माझे भक्त जे उत्तम । त्यांचा धर्म अर्थ मीचि काम । मजवेगळा मनोधर्म । अन्यथा कर्म करूं नेणे ॥ ४८ ॥ माझें भजन उत्तम कर्म । मज अर्पे तो शुद्ध धर्म । मजकामनें हा शुद्ध काम । ज्याचा आराम मजमाजीं ॥ ४९ ॥ वेंचूनियां नाना अर्थ । संग्रहो करिती परमार्थ । नश्वर अर्थ जें वित्त । तें माझे भक्त न संचिती ॥७५०॥ ज्यांचें धनावरी चित्त । ते केवळ जाण अभक्त । ते जें जें कांहीं भजन करित । तें द्रव्यार्थ नटनाट्य ॥ ५१ ॥ भक्तीमाजीं विरुद्धपण । विरुद्ध धर्मांचें लक्षण । तेंही करीन निरूपण । सावधान अवधारीं ॥ ५२ ॥ मनसा वाचा कर्में जाण । जेथ नाहीं मदर्पण । तें तें दांभिक भजन । केवळ जाण उदरार्थ ॥ ५३ ॥ माझें भजन करूनि गौण । जो करूं रिघे धनार्जन । हें भजन-विरुद्ध लक्षण । मुख्य जाण भक्ताचें ॥५४॥ गांठींचें वेंचूं नेणे धन । कोरडें करी माझें भजन । मजसी जेणें केलें वंचन । विरुद्धलक्षण मुख्यत्वें ॥ ५५ ॥ या नांव अर्थविरुद्धता । आतां दुष्टकामीं जो विचरता । मी भजतसें भगवंता । दोष सर्वथा मज न लगे ॥ ५६ ॥ ऐसऐसिया भावना । जो दुष्ट कामीं विचरे

सुख क्षीरसागरांत नाहीं, वैकुंठांत पाहूं गेल्यास सांपडत नाहीं, तें सुख मला कीर्तनांत मिळतें व मी कीर्तनाच्या रंगांत डुलत असतों. ४१ मला प्रेमळतेची फार आवड. भक्ताच्या भक्तिकौशल्यामुळें मीहि कीर्तनांत ताल-सुरावर मोठ्या हौसेनें नाचत असतों. ४२ अशा कीर्तनांत कोट्यावधि प्रायश्चित्तें बुडून जातात. यमदूतांची रहदारी बंद होते व पापाचें कुंपण तुटून जातें. ४३ नामस्मरणाच्या आवडीला मंत्रबीजाच्या राशी लाजतात. तपासारखीं साधनें तर बिचारीं हरिनामानें वेडीं होतात. ४४ हरिनामाचा घोष ऐकून योगयाग तोंड लपवितात. विषयसुख भीतीनें पळून जातें व अधर्म जागच्याजागीं विरून जातो. ४५ हरिनामाच्या कडकडाटांत दोष दिगंतरांत पळून जातात. तीर्थांची प्रौढी उतरते. हरीला कीर्तनाचें चातुर्य आहे. ४६ माझ्या प्रेमानें वेडे होऊन माझे भक्त नित्य आवडीनें कीर्तन आणि मानसिक व वाचिक कर्में करितात. ते माझ्यावांचून दुसरें कांहीं जाणत नाहींत. ४७

माझे जे उत्तम भक्त आहेत, त्यांचा धर्म, अर्थ, काम, इत्यादि सर्व मीच आहें. माझ्यावांचून दुसरें कोणतेंहि कर्म करण्यास त्यांचा मनोधर्म जाणत नाहीं. ४८ माझें भजन हेंच त्यांचें उत्तम कर्म. तें मला अर्पण करणें हाच त्यांचा पवित्र धर्म. माझी आवड हीच त्यांची पवित्र इच्छा व माझ्यांतच त्यांची विश्रांति. ४९ नानाप्रकारच्या साधनांत द्रव्य खर्चून ते परमार्थाचा संग्रह करितात. नाशिवंत जें धन त्याचा माझे भक्त संचय करीत नाहींत. ७५० ज्यांचें द्रव्याकडे लक्ष असतें ते केवळ अभक्त आहेत, असें समज. ते जें भजन करितात तें केवळ द्रव्यासाठीं नाटक असतें. ५१ भक्तींतहि विरोध असतो. आतां त्या विरोधी भक्तीचें निरूपण करितों, तें लक्षपूर्वक ऐक. ५२ ज्यांत मनानें व वाणीनें कर्में करून तीं मला अर्पण केलीं जात नाहींत, तें केवल पोट भरण्यासाठीं दांभिक भजन समजावें. ५३ जो माझें भजन गौण समजून द्रव्य मिळवावयास निघतो त्या भक्ताचें तें भजनविरुद्ध मुख्य लक्षण आहे. ५४ जो पदरचें धन खर्च न करितां केवळ माझें कोरडें भजन करितो व मला फसवितो, त्याचें तें विरुद्धलक्षण होय. ५५ याचेंच नांव अर्थ-विरुद्धत्व. मनांत दुष्ट वासना धरणारा असें समजतो कीं, मी भगवंताचें भजन करीत आहें, तेव्हां मला कोणताच दोष लागणार नाहीं. ५६ पण असल्या भावनेनें जो दुष्ट विषयभोगांत निमग्न होतो त्याची भजनांतील विरुद्ध

जाणा । हे भजनीं विरुद्धलक्षणा । भक्ता अभक्तपणा आणित ॥ ५७ ॥ मज नार्पितां जें जें श्राद्ध । ते त्याची कल्पना विरुद्ध । श्राद्ध संकल्प अविरुद्ध । मदर्पणें वेद गर्जती ॥ ५८ ॥ श्राद्धीं मुख्य संकल्प जाण । पितरस्वरूपी जनार्दन । ऐसें असोनियां जाण । नैवेद्य मदर्पण न करिती ॥ ५९ ॥ अन्न ब्रह्म अहं ब्रह्म । हें श्राद्धींचें गुह्य वर्म । ऐसें नेणोनि शुद्ध कर्म । वृथा भ्रम वाढविती ॥७६०॥ मी सकळ जगाचा जनिता । मुख्य पितरांचाहि मी पिता । त्या मज कर्म नार्पितां । विरुद्ध सर्वथा तें श्राद्ध ॥ ६१ ॥ मज नार्पितां जें जें करणें । तें तें उपजे अभक्तपणें । विरुद्ध धर्माची लक्षणें । दुःख दारुणें अनिवार ॥ ६२ ॥ उत्तम भक्तांचें लक्षण । संकल्पेंवीण जाण । अन्नपानादि मदर्पण । करिती खूण जाणती ॥ ६३ ॥ ध्रुवाच्यापरी अढळ । जे माझ्या ठायीं भजनशीळ । ते माझी भक्ति अचंचळ । अतिनिश्चळ पावती ॥ ६४ ॥ आर्त जिज्ञासु अर्थार्थी । या तिघांसी जी नव्हेचि प्राप्ती । ते माझी जे चौथी भक्ती । प्रेमें पावती उद्धवा ॥ ६५ ॥ आर्त आर्तिहरणकाजें । जिज्ञासु जाणपणालागीं भजे । तिजेनि वांछिजे । अतिअर्थसिद्धी ॥ ६६ ॥ यावरी चौथियाचे ठायीं । या कल्पनांचा मागमोस नाहीं । यालागीं चौथी भक्ति पाहीं । त्याच्या ठायीं घर रिघे ॥ ६७ ॥ जया भक्तिमाजीं वाडेंकोडें । मीच मी चहूंकडे । जेथींच्या तेथें सांपडे । हें भजनें जोडे तयासी ॥ ६८ ॥ संकल्प केलियावीण । सहजें होतसे मदर्पण । हें चवथें भक्तीचें लक्षण । अतर्क्यभजन पैं माझें ॥ ६९ ॥ तेथ जें करणें तेचि पूजा । जें बोलणें तो जपू माझा । जें देखणें तें अधोक्षजा । दर्शन वोजा होतसे ॥ ७७० ॥ तेथ चालणें ते यात्रा माझी । जें भक्षी तें मजाचि यजी । त्याची निद्रा तें समाधि माझी । ऐसा मजमाजीं भजतसे ॥ ७१ ॥ यापरी अनायासें जाण ।

भावनाच भक्ताला अभक्त बनविते. ५७ मला अर्पण न करितां जे श्राद्ध करितात त्यांची श्राद्धाची कल्पनाच विरुद्ध होय. श्राद्धसंकल्प माझ्या अर्पणाच्या विरुद्ध नाहीं, असा वेद मोठ्यानें घोष करीत आहे. ५८ पितृस्वरूपी जनार्दन आहे, असा श्राद्धांतील मुख्य संकल्प आहे. पण असें असतांहि ते मला नैवेद्य अर्पण करीत नाहींत. ५९ 'अन्न ब्रह्म, अहं च ब्रह्म' 'अन्न ब्रह्म आहे व मी ब्रह्म आहे' हें श्राद्धाचें मुख्य वर्म आहे पण तें न जाणितां मूढ केवळ कर्मानें व्यर्थ श्रम वाढवितात. ७६० मी सर्व सृष्टीचा उत्पादक, मुख्य पितरांचाहि पिता, पण अशा मलाहि कर्म अर्पण न केल्यास तें श्राद्ध सर्वथा विरुद्ध होतें. ६१ मला अर्पण न करितां जें जें कर्म करावें, त्यानें अभक्तपणा मात्र उत्पन्न होतो. धर्माचीं अशीं अनेक विरुद्ध लक्षणें आहेत. त्यांनीं अनिवार दारुण दुःख प्राप्त होतें. ६२ उत्तम भक्तांचें लक्षण म्हटलें म्हणजे ते संकल्पावांचूनच अन्नपानादि सर्व मला अर्पण करितात, ही त्यांची खूण जाणावी. ६३ ज्याची माझ्यावर ध्रुवासारखी अढळ भक्ति असते, त्यांनाच माझी अतिदृढ भक्ति प्राप्त होते. ६४ हे उद्धवा! आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी या तिघांना प्राप्त न होणारी माझी ही चौथी भक्ति केवळ प्रेमानें लाभते. (सु. गी. ७-१६ पृ. १५२). ६५ जो आर्त असतो तो संसारांतील क्लेशांचें निवारण व्हावें म्हणून भक्ति करतो. जिज्ञासु मला जाणण्याच्या इच्छेनें भजतो व तिसरा अर्थार्थी अलोट धन मिळावें म्हणून मला भजत असतो. ६६ या तिघांहून वेगळा असा जो चौथा ज्ञानी भक्त त्याच्या मनांत या कल्पनांचा कधीं प्रवेशहि होत नाहीं. यास्तव ही चौथी भक्ति त्याच्याजवळ चालून येते. ६७ ज्या भक्तींतील अति आवडीनें सर्वत्र मीच एक असलेला जेथल्या तेथेंच सांपडतों; अशा भजनानें भक्ताला मोठा लाभ होतो. ६८ संकल्प केल्यावांचून त्याचीं सर्व कर्में सहजच मदर्पण होतात. हें चौथ्या भक्तीचें लक्षण आहे. माझें भजन अतर्क्य आहे. ६९ ज्ञानी भक्ताचें जें कांहीं करणें तीच माझी पूजा. त्याचें जें बोलणें तो माझा जप. त्याचें जें पहाणें तें अधोक्षजाचें पवित्र दर्शन. ७७० त्याचें चालणें ती माझी यात्रा. त्याचें खाणें तें माझें अर्चन. त्याची निद्रा ती माझी समाधि. याप्रमाणें तो माझ्यामध्येंच सर्व भजन करितो. ७१ ज्ञानी भक्ताची सर्व कर्में सहजच मला अर्पण

सहजें होतसे मदर्पण । हे चौथी भक्ति सनातन । उद्धवा संपूर्ण तो लाभे ॥ ७२ ॥ उद्धवा ऐसें मानिसी चित्तीं जे मुळींहूनि चारी भक्ती । पहिली दुजी तिजी चौथी । मिथ्यावदंती कल्पना ॥ ७३ ॥ सहज माझी जे प्रकाश-स्थिती । ते भक्ति बोलिजे भागवती । संविती बोलिजे वेदांतीं । शैवी शक्ती बोलिजे ॥ ७४ ॥ बौद्ध जिनेश नेमिनाथ । जोगी म्हणती आदिनाथ । भैरव खंडेराव गाणपत्य । अव्यक्त म्हणत एक पैं ॥७५॥ एक म्हणती हे आदिमाता । सौर म्हणती तो हा सविता । असो नांवांची बहु कथा । उपासकता विभागें ॥ ७६ ॥ ऐशी जे का प्रकाशस्थिती । त्या नांव बोलिजे भक्ती । जेणें प्रकाशें त्रिजगतीं । उत्पत्ति स्थिती लय भासे ॥ ७७ ॥ माझ्या नाना अवतारमाळा । येणें प्रकाशें प्रकाशती सोज्वळा । देवो देवी सकळा । ते प्रकाशमेळां भासती ॥ ७८ ॥ माझ्या अवतारांची उत्पत्ती । तेणें प्रकाशें असे होती । नाना चरित्रें अंतीं । प्रवेशती ते प्रकाशीं ॥ ७९ ॥ ऐशिया प्रकाशाची जे प्राप्ती । ते जाण सनातन माझी भक्ती । उद्धवा म्यां हे तुजप्रती । यथानिगुतीं सांगीतली ॥ ७८० ॥ निश्चळभक्ती सनातन । हें मुळींचें पद-व्याख्यान । यालागीं भक्ति सनातन । समूळ जाण बोलिलों ॥ ८१ ॥ सांडूनि पदपदार्था । नाहीं बोलिलों जी वृथा । सावधान व्हावें श्रोतां । पुढील कथा अनुपम ॥ ८२ ॥ उद्धवा हे ऐशी माझी भक्ती । कैसेनि म्हणसी होये प्राप्ती । भावें धरिलिया सत्संगती । माझी भक्ती उद्बोधे ॥ ८३ ॥

सत्सङ्गलब्धया भक्त्या मयि मां समुपासिता । स वै मे दर्शितं सद्भिरञ्जसा विन्दते पदम् ॥ २५ ॥

मुख्यत्वें संतांची सेवा । हेंचि साधन आवडे देवा । संतवचनें निजभावा । देतुसे तेव्हां निज-भक्ती ॥ ८४ ॥ ज्यासी आवडे संतसंगाचा मेळ । जो साधुवचनीं अतिभुकाळ । जो पडिलें वचन नेणें

होतात. हे उद्धवा ! त्यालाच ही सनातन चौथी भक्ति पूर्णपणें लाभते. ७२ तूं कदाचित् म्हणशील कीं, पहिली, दुसरी, तिसरी व चौथी अशा या चार भक्ति मूळच्याच आहेत. तर ती मिथ्या कल्पना आहे. ७३ माझी जी सहज प्रकाशस्थिति तिलाच 'भागवती भक्ति' असें म्हटलें आहे. वेदान्ती तिला संवित् म्ह० ज्ञान म्हणतात. शैव शक्ति बोलतात. ७४ बौद्ध जीनेश 'नेमिनाथ' व जोगी 'आदिनाथ' असें म्हणतात. कोणी तिलाच भैरव, खंडेराव, गाणपत्य तर कोणी अव्यक्त म्हणतात. ७५ कोणी तिला आदिमाता म्हणतात. सौर असें म्हणतात कीं, तोच हा सविता म्ह० सूर्य आहे. याप्रमाणें उपासनेच्या भेदाप्रमाणें नांवांचे पुष्कळ प्रकार आहेत. ७६ पण अशी जी प्रकाशस्थिति तिलाच भक्ति असें म्हणतात. त्या प्रकाशानें त्रैलोक्यांत उत्पत्ति, स्थिति व लय भासतात. ७७ माझ्या अनेक अवतारांची परंपरा या प्रकाशानेंच प्रकाशित केली आहे. देव, देवी इत्यादि सर्व या प्रकाशानें भासतात. ७८ याच प्रकाशानें माझे अवतार होतात व याच प्रकाशानें शेवटीं अनेक प्रकारचीं चरित्रें प्रकाशित होतात. ७९ अशा प्रकाशाची जी प्राप्ति तीच माझी सनातन भक्ति होय. हे उद्धवा ! ती मीं तुला यथार्थ सांगितली. ८० निश्चल भक्तीला मूळ श्लोकांत 'सनातन' म्हटलें आहे. यास्तव तुला सनातन भक्ति सविस्तर सांगितली. ८१ मूळ श्लोकांतील पद व पदांचा अर्थ यांना सोडून मी व्यर्थ कांहीं तरी बोललों नाहीं हो ! तरी आतां श्रोत्यांनीं पुढील अनुपम कथा ऐकण्यास सावधान व्हावें. ८२ हे उद्धवा ! ही माझी अशी भक्ति कशानें प्राप्त होते असें जर विचारशील तर श्रद्धेनें सत्संगति धरिली असतां तिच्या योगानेंच माझी भक्ति लाभते. ७८३.

मयि सत्संगलब्धया **भक्त्या**–त्यानंतर या पूर्वोक्त प्रकारानें माझ्या विषयींच्या सत्संगानें प्राप्त झालेल्या भक्तीनें, **सः मां समुपासिता भवति**–तो भक्त माझा उपासक होतो. **सः सद्भिः दर्शितं मे पदं अञ्जसा वै विन्दते**–तो ध्यान-शील भक्त सज्जनांनीं दाखविलेल्या माझ्या स्वरूपाला निश्चयानें अनायासानेंच प्राप्त होतो.

संताची सेवा हेंच साधन मुख्यत्वेंकरून देवाला आवडतें. संतांच्या वचनांवरूनच तो आत्मभाव व आत्म-शक्ति देतो. ८४ त्याला संतसंगतीचा मेळा आवडतो. तो साधुवचनासाठीं अत्यंत भुकेलेला असतो. त्यांचें वचन तो कधींच अमान्य करीत नाहीं. त्यामुळें पायाळु माणसाला जसें गुप्त ठिकाणीं पुरलेलें धन दिसतें तसें त्याला

उगळूं । तोचि पायाळू निजभक्ती ।। ८५ ।। साधुवचनीं श्रद्धा भारी । देखोनियां निजनिर्धारीं । त्यावरी सद्गुरु कृपा करी । साधु चराचरीं गुरुरावो ।। ८६ ।। गुरूवांचोनि तत्त्वतां । नाहीं संसारीं तारिता । गुरुवचनें निजभक्तिदाता । मीचि सर्वथा भक्तांसी ।। ८७ ।। सद्गुरु जो संसारी । त्याची आज्ञा मी वाहें शिरीं । तो ज्यावरी कृपा करी । तो मी उद्धरीं तात्काळ ।। ८८ ।। त्या सद्गुरूचें भजन । जो मद्रूपें करी जाण । त्याचें मज पढियंतेपण । माझेनिहि जाण न बोलवे ।। ८९ ।। त्याचा इहलोक परलोक । दोन्ही चालविता मीचि देख । त्याचें मज अत्यंत सुख । हरिखें हरिख वोसंडे ।। ७९० ।। त्यासी गुरूनें जो दाविला मार्ग । चालतां न पडे प्रयासपांग । मी सामोरा धांवें श्रीरंग । आपुलें सर्वांग मी वोडवीं ।। ९१ ।। तेणें जावें ज्या पदासी । तें पदचि मी आणीं त्यापासीं । संतभजनीं प्रीति ऐसी । हृषीकेशी सांगतु ।। ९२ ।। ऐसें ऐकोनियां वचन । उद्धवाचें कळवळलें मन । कोण कोण ते साधुजन । त्यांचें निजचिह्न पुसों पां ।। ९३ ।। कोण ते भक्तीचें लक्षण । भजती खूण ते कोण कोण । हें समूळ जाणावया आपण । उद्धवें प्रश्न मांडिला ।। ९४ ।।

उ०— साधुस्तवोत्तमश्लोक मतः कीदृग्विधः प्रभो । भक्तिस्त्वय्युपयुज्येत कीदृशी सद्भिरादृता ॥ २६ ॥

ज्ञाते वक्ते आहेत बहुत । परी ते रजतमगुणयुक्त । गुणानुसारें निरूपित । त्यांसी पुसों चित्त मानीना ।। ९५ ।। अथवा सात्विक केवळ । तो सत्वगुणें विव्हळ । बोलणें बोलतां जाये बरळ । नव्हे केवळ निजबोधू ।। ९६ ।। तैसा तूं नव्हेसि कृष्णनाथा । तुजआधीन गुण तत्त्वतां । लीलाविग्रहें देहधरितां । निजज्ञानवक्ता तूंचि एक ।। ९७ ।। यालागीं जी उत्तमश्लोक । तुज म्हणती तीनी लोक ।

खऱ्या भक्तीचें रहस्य लाभते. ८५ त्याची अशी साधुवचनावरील अत्यंत श्रद्धा पाहून आपली खात्री झाल्यावर सद्गुरु त्यावर कृपा करितो. साधु सर्व चराचरांचा गुरु आहे. ८६ वास्तविक गुरूवांचून या संसारांतून तारणारा दुसरा कोणी नाहीं. गुरुवचनानें भक्तांना माझी भक्ति देणारा सर्वथा मीच आहें. ८७ संसारांत मी सद्गुरूची आज्ञा शिरसा वंद्य करितों. सद्गुरु ज्यावर कृपा करितो. त्याचा मी तत्काळ उद्धार करितों. ८८ त्या सद्गुरूला मद्रूप समजून जो त्याचें भजन करितो तो मला किती आवडतो हें मला स्वतःलाहि पूर्णपणें सांगवत नाहीं. ८९ त्याचा इहपरलोकींचा योगक्षेम मीच वहातों. त्याच्यापासून मला अत्यंत सुख वाटतें व आनंदाला भरतें येऊन तो वाहूं लागतो. ७९० गुरूनें जो मार्ग दाखविलेला असतो त्याप्रमाणें चालत असतांना मुळींच श्रम होत नाहींत. मी श्रीरंग स्वतः आपलें सर्वांग पुढें करून त्याला सामोरा जातो. ९१ त्याला ज्या पदाला जावयाचें असतें तें पदच मी त्याच्यापाशीं नेतों. मला संतभजनाची इतकी आवड आहे असें श्रीकृष्ण म्हणाला. ९२ तें वचन ऐकून उद्धवाचें मन कळवळलें आणि असे संतजन कोण कोण आहेत, त्यांचें लक्षण काय आहे, ९३ त्यांच्या भक्तीचें लक्षण कसें असतें, त्यांच्या भजनाची खूण कोणती, हें सर्व सविस्तर जाणण्यासाठीं उद्धवानें असा प्रश्न पुढें मांडिला. ७९४.

—वरील श्लोकांतील सज्जन व भक्ति यांचा विशेष जाणण्याच्या इच्छेनें उद्धव प्रश्न करितो—

उद्धवः उवाच–उद्धव म्हणाला, प्रभो उत्तमश्लोक–हे उत्तम कीर्तिमान् प्रभो ! कीदृग्विधः साधुः तव मतः जगांत आपापल्या मतानें सगळे साधूच आहेत. पण तुला कोणत्या प्रकारचा साधू संमत आहे ! सद्भिः आदृता कीदृशी भक्तिः त्वयि उपयुज्येत–नारदादि सत्पुरुषांनीं जिचा आदर केला आहे, अशी कोणत्या प्रकारची भक्ति तुझ्या ठिकाणीं उपयुक्त होते ? [कारण साधूप्रमाणें जगांत भक्तीहि अनेक प्रकारची आहे.] २६.

जाणते लोक आणि वक्ते पुष्कळ आहेत. परंतु ते राजस व तामस गुणांनीं युक्त आहेत. ते आपल्या राजस किंवा तामस स्वभावाप्रमाणें निरूपण करितात. त्यामुळें त्यांना विचारावयास मन घेत नाहीं. ९५ किंवा जे केवळ सात्त्विक असतात ते सत्त्वगुणानें इतके भोळे-भोळे होतात कीं त्यांचें बोलणें तरी वहात जातें व त्यामुळें खरें आत्मज्ञान होत नाहीं. ९६ हे कृष्णनाथा ! तूं मात्र तसा नाहींस. तूं जरी लीलेनें हें अवतारशरीर धारण केलें आहेस तरी वास्तविक तुझ्या अधीन तीन्ही गुण आहेत. खरें आत्मज्ञान सांगणारा तूंच एक आहेस. ९७ यास्तव तुला

तुजवेगळा आणिक । आम्हांसी देख मानेना ।। ९८ ।। माझिया प्रश्नाचा वक्ता । तूंचि एक कृष्णनाथा । तरी साधु कोण तत्त्वतां । तुज सर्वथा मानला ।। ९९ ।। तुज मानले साधुजन । त्यांचें संपूर्ण सांग लक्षण । तुज पढियंती भक्ती कोण । तेंही लक्षण सांगावें ।। ८०० ।। भक्तींमाजीं भक्ति सधर । जे कां तुझी प्राप्तिकर । अतिउत्तम परात्पर । संतीं निरंतर आदरिली ।। १ ।। संतीं आदरिलें जे भक्तीसी । संतांसी पुसों जाये म्हणसी । मज विश्वास तुझिया वचनासी । पुसों आणिकांसी मानेना ।।२।। जे ज्या देवतांतरा भजती । ते ती उत्तम भक्ति म्हणती । तुज मानली जे श्रीपती । ते मजप्रती सांगावी ।। ३ ।। समान कुळशीळसंवादु । ते तैसियासीच म्हणती साधु । तूं निजमुखें जो म्हणसी शुद्धु । तो मज वंद्यु सर्वथा ।। ४ ।। तीं संबोधनीं सारंगधरू । उद्धव प्रार्थूनि करी सादरू । तीं विशेषणीं निजविचारू । श्रवणाधिकारू सांगतु ।। ५ ।।

एतन्मे पुरुषाध्यक्ष लोकाध्यक्ष जगत्प्रभो । प्रणतायानुरक्ताय प्रपन्नाय च कथ्यताम् ।। २७ ।।

पुरुषीं पुरुषोत्तम तूंचि कीं । तूंचि कर्मधर्मांचा विवेकी । यालागीं बोलिजे पुरुषाध्यक्षी । सर्वसाक्षी गोविंदा ।। ६ ।। जैसें कर्म तैसा फळदाता । यालागीं बोलिजे लोकाध्यक्षता । तूंचि ब्रह्मादिकांचा नियंता । प्रतिपाळिता जगाचा ।। ७ ।। हो कां मी जगाचा प्रतिपाळिता । त्या जगामाजीं तूंहीं असतां । तुजचि सांगावी ज्ञानकथा । हे अधिकता कां म्हणसी ।। ८ ।। जरी तूं सर्वज्ञ सर्वेश्वरु । अंतर्यामी नियंता ईश्वरू । जरी देखसी माझा अधिकारू । तरी ज्ञाननिर्धारू सांगावा ।। ९ ।। हो कां मज अधिकारू नाहीं । तरी शरण

त्रैलोक्यांत 'उत्तम श्लोक' म्ह० स्वरूपज्ञान सांगणारा असें म्हणतात. यास्तव तुझ्यावांचून दुसरा कोणीहि देव आम्हांला मान्य होत नाहीं. ९८ हे कृष्णनाथा ! माझ्या प्रश्नाचें यथायोग्य निरूपण करणारा तूंच एक मला दिसतोस. तरी आतां तुला सर्वथैव मान्य असलेला साधु कोण ! ९९ तुला जे जे साधुपुरुष मान्य आहेत, त्यांचें पूर्णपणें लक्षण मला सांग. त्याचप्रमाणें तुझी आवडती भक्ति कोणती ! त्याचेंहि लक्षण मला सांग. ८०० तुझी प्राप्ती करून देणारी अत्यंत उत्तम, संतांनीं जिचा निरंतर आदर केला आहे अशी सर्व प्रकारच्या भक्तीमध्यें श्रेष्ठ भक्ति कोणती ! १ आतां कदाचित् तूं असें म्हणशील कीं, संतांनीं ज्या भक्तीचा आदर केला आहे ती संतांनाच जाऊन विचार. परंतु माझा सर्व विश्वास तुझ्या शब्दावर आहे. त्यामुळें दुसऱ्याला विचारण्यास मन तयार होत नाहीं. २ जे भिन्न भिन्न देवतांना भजतात, ते आपल्या देवतेचीच भक्ति उत्तम असें म्हणतात. पण हे श्रीपते ! तुला जी भक्ति मान्य असेल तीच मला सांग. ३ ज्यांचें कुल, शील व भाषण हीं तीन्हीं सारखींच पवित्र असतात त्यांना साधु असें म्हणतात. परंतु तूं ज्याला आपल्या तोंडानें शुद्ध म्हणशील तो मला सर्वथा पूज्य आहे. ४ याप्रमाणें बोलून उद्धवानें श्रीकृष्णाला तीन संबोधनांनीं आदरानें प्रार्थना केली व त्या तीन संबोधनाच्या विशेषणांनींच त्यानें स्वतःचा श्रवणाधिकारहि व्यक्त केला. ८०५.

—हें अतिगुह्य तूंच सांगावेंस अशा आशयानें उद्धव भगवानाचें ऐश्वर्य व्यक्त करितो—

पुरुषाध्यक्ष, लोकाध्यक्ष, जगत्प्रभो–हे सर्वसाक्षिन्, हे लोकप्रवर्तक, हे जगत्स्वामिन् ! एतत् प्रणताय अनुरक्ताय प्रपन्नाय च मे कथ्यताम्–हें रहस्य तुझ्यापुढें नम्र झालेल्या, तुझ्या ठिकाणीं आसक्त असलेल्या व तुला शरण आलेल्या मला सांग. २७.

हे गोविंदा ! तूं पुरुषांतील उत्तम पुरुष आहेस. कर्मधर्मांचा विचार करणारा तूंच आहेस. यास्तव तुला पुरुषाध्यक्ष सर्वसाक्षी म्हणतात. ६ जसें ज्याचें कर्म तसें त्याला तूं फल देणारा आहेस, म्हणून तुला लोकाध्यक्ष म्हणतात. तूंच ब्रह्मदेवादिकांचें नियमन करणारा व जगाचा प्रतिपाळ करणारा आहेस. ७ 'मी जर जगाचा प्रतिपालक आहें तर त्या जगांत तूंहि आहेस. असें असतां तुलाच ही ज्ञानकथा सांगण्याइतकें तुझ्यांत काय अधिक आहे !' असें जर म्हणशील तर हे श्रीकृष्णा ! ८ ज्याअर्थी तूं सर्वज्ञ, सर्वेश्वर, अंतर्यामी, नियंता ईश्वर आहेस, त्याअर्थी तुला माझ्यांत जर अधिकार दिसत असला तर मला निश्चित ज्ञान सांग ९ आणि जरी माझ्यांत अधिकार

आलों तुज पाहीं । शरणागताची तुझ्या ठायीं । उपेक्षा नाहीं सर्वथा ॥ ८१० ॥ विषयीं देखोनि थोर दुःख । झालों तुझिया चरणासंमुख । अतिदीन मी तुझें रंक । कृपा आवश्यक तुवां कीजे ॥ ११ ॥ माझ्या दुर्जय वासना । अनिवार मज निवारतीना । त्या तूं निवारी श्रीकृष्णा । शरण चरणा यालागीं ॥ १२ ॥ मी एक भक्त अनुरक्तु । ऐसें बोलतां बहु गर्व दिसतु । तूं सर्वज्ञ श्रीअनंतु । कृपावंतु दीनाचा ॥ १३ ॥ मी एकु श्रवणाधिकारी । हेंही न म्हणवे गा मुरारी । ऐसें बोलोनियां पाय धरी । कृपा करीं कृपानिधि ॥ १४ ॥ आम्ही स्वगोत्र सखे सहज । पाय धरणें न घडे तुज । या म्हणणियाचें निजबीज । कळलें मज गोविंदा ॥ १५ ॥

त्वं ब्रह्म परमं व्योम पुरुषः प्रकृतेः परः । अवतीर्णोऽसि भगवन् स्वेच्छोपात्तपृथग्वपुः ॥ २८ ॥

तूं निर्गुण निर्विशेष । चिन्मात्रैक चिदाकाश । पुरुषांमाजीं उत्तम पुरुष । वंद्य सर्वांस तूं एक ॥ १६ ॥ तूं ब्रह्म गा निर्विकार । प्रकृतिपुरुषांहोनि पर । तुझा वेदशास्त्रां न कळे पार । अगोचर इंद्रियां ॥ १७ ॥ ऐक आमुचे भाग्याची कळा । त्या तुज प्रत्यक्ष देखतों डोळां । मुकुटकुंडलें वनमाळा । घनसांवळा शोभतु ॥ १८ ॥ सुंदर राजीवलोचन । पीतांबर परिधान । देखोनि निवताहे तनुमन । तूं जगज्जीवन जगाचा ॥ १९ ॥ त्या तुझें दर्शन अतिगोड । देखतां पुरे जगाचें कोड । त्याहि देहाची तुज नाहीं चाड । ऐसा निचाड तूं देवा ॥ ८२० ॥ तरी भक्तकृपेचा कळवळा । धरिसी नानावतारमाळा । भक्तइच्छा तूं स्वलीळा । देहाचा सोहळा दाविसी ॥ २१ ॥ भक्तकृपेनें तत्वतां । तूं अवतरलासी कृष्णनाथा । तरी माझिया प्रश्नाचा वक्ता । न प्रार्थितां जालासी ॥ २२ ॥ जेवीं वत्सा

नसला तरी मी तुला शरण आलों आहें व तूं शरणागताची उपेक्षा केव्हांहि करीत नाहींस. ८१० विषयांत अतिशय दुःख आहे हें जाणून मी तुझ्या चरणाजवळ आलों आहें. मी अतिशय दीन, तुझा दास आहें. तूं माझ्यावर अवश्य कृपा केली पाहिजेस. ११ माझ्या अजिंक्य वासना मला आवरतां येत नाहींत, म्हणून तूं त्यांचें निवारण कर. मी तुझ्या चरणांना शरण आलों आहें. १२ 'मीच एक भक्त तुझ्यावर लुब्ध झालों आहें,' असें बोलणें म्हणजे गर्व दिसतो. पण हे श्रीअनंता ! तूं सर्वज्ञ असून दीनावर कृपा करणारा आहेस. १३ हे मुरारे ! मीच कायतो एक श्रवणाचा अधिकारी आहें, असेंहि म्हणवत नाहीं. हे दयाळा ! कृपा कर. असें बोलून उद्धवानें श्रीकृष्णाचे पाय धरिले. १४ पण आम्हीं तुझ्याच गोत्रांत जन्मलेले तुझे स्नेही आप्त आहोंत, तेव्हां तूं माझे पाय धरणें योग्य नव्हे, असें जर म्हणशील तर हे श्रीकृष्णा ! या बोलण्यांतील मर्महि मला कळलें. ८१५.

—त्याविषयीं हेतु—

त्वं परमं ब्रह्म–तूंच परब्रह्म आहेस. व्योम–तूं आकाशाप्रमाणें असंग आहेस, प्रकृतेः परः पुरुषः–तूं प्रकृतीहून पर पुरुष आहेस, भगवन्–हे भगवन्, स्वेच्छोपात्तपृथग्वपुः अवतीर्णोऽसि–आपल्या भक्तांच्या इच्छेनें ज्यानें परिमित शरीर धारण केलें आहे, असा तूं अवतीर्ण झाला आहेस. २८.

निर्गुण, निर्विशेष, चित्स्वरूपानें चिदाकाशांत राहणारा, पुरुषांतील उत्तम पुरुष, सर्वांना वंद्य असा तूंच एक आहेस. १६ तूं निर्विकार ब्रह्म प्रकृति-पुरुषांच्याहि पलीकडे आहेस. वेदशास्त्रांना देखील तुझा थांग लागत नाहीं. तूं इंद्रियांनीं जाणतां येणारा नाहींस. १७ आमचें भाग्य फार मोठें म्हणून अशा तुला आम्ही डोळ्यांनीं साक्षात् पहात आहोंत. मुकुट, कुंडलें, वैजयंतीमाळा यांनीं तुझी सांवळी मूर्ति शोभत आहे. १८ तुझे कमलासारखे सुंदर नेत्र व पीतांबरधारी रूप पाहून माझें शरीर व मन अगदीं शांत झालें. तूं सर्व जगाचा जगज्जीवन आहेस. १९ तुझें दर्शन फार गोड आहे. तुला पहातांच सर्व जगाची हौस पुरी होते. पण अशा तुझ्या देहावरहि तुझी आसक्ति नाहीं. हे देवा ! तूं अनासक्त आहेस. ८२० तरीहि भक्तावर कृपा करण्याच्या कळकळीनें तूं अनेक प्रकारची अवतारमालिका घेतोस व भक्तांच्या इच्छेसाठीं आपल्या लीलेनें देहाचा सोहळा दाखवितोस. २१ वास्तविक भक्तांवर कृपा करण्यासाठींच तूं अवतरला आहेस. म्हणूनच हे श्रीकृष्णनाथा ! प्रार्थना न करितांच तूं माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दिलींस. २२

हुंकारे गाये। वोरसली धांवताहे। तेवीं उद्धवप्रश्नीं देव पाहें। बोललाहे निजबोधें ॥ २३ ॥ धन्यासी दुभतें दोनी सांजे। तेंही वत्सयोगें पाविजे। वत्सासी बोळली सदा सहजें। तेवीं अधोक्षजें उद्धवासी ॥ २४ ॥ उद्धव आवडला आवडीं। त्याच्या प्रश्नाची अतिगोडी। बापु भाग्याची परवडी। जोडिल्या जोडी श्रीकृष्णू ॥ २५ ॥ जें जें कांहीं उद्धव पुसतू। त्यासी अंजुळी वोडवी श्रीकृष्णनाथू। आवडी त्यातें चाटूं पाहातू। भावार्था अनंतू भुलला ॥ २६ ॥ जैशीं अजातपक्ष पिलीं। त्यांसी पक्षिणी मुखीं चारा घाली। तैसी निजज्ञानगुह्यबोली। कृष्ण हृदयीं घाली उद्धवाचे ॥ २७ ॥ उद्धवप्रश्नाचें उत्तर। पांच श्लोकीं शार्ङ्गधर। साधुलक्षणें विचित्र। अतिपवित्र सांगेल ॥ २८ ॥ साधुलक्षणें अपार जाण। त्यांत उत्तमोत्तम तीस गुण। निवडोनियां श्रीकृष्ण। उद्धवासी आपण सांगतु ॥ २९ ॥

श्रीभ०—कृपालुरकृतद्रोहस्तितिक्षुः सर्वदेहिनाम्। सत्यसारोऽनवद्यात्मा समः सर्वोपकारकः ॥ २९ ॥

कृपेसी स्वतंत्र जन्म नाहीं। जेथ उपजे तो साधु पाहीं। कृपा वसे संतांच्या देहीं। त्यांचेनि ते पाहीं दाटुगी जगीं ॥ ८३० ॥ कृपा त्यांचेनि महिमें आली। दया त्यांचेनि जीवें झाली। कठिणत्वाची कांटी काढिली। समूळीं उपटिली निष्ठुरता ॥ ३१ ॥ कृपा भूतमात्राच्या ठायीं। सारिखीच सर्व देहीं। येथतेथ हें त्या नाहीं। अवकृपा ठायीं निमाली ॥ ३२ ॥ नवल कृपाळुत्वाचें चित्त। जीवाचा जीव जीवीं स्यूत। दुःख हरोनि सुख देत। कृपा अद्भुत तयापरी ॥ ३३ ॥ जेणें आपणासी होय दुःख। तें

म्हणूनच ज्याप्रमाणें वत्सानें हंबरतांच गायीला स्वभावतःच पान्हा फुटून ती त्याच्यापाशीं धांवत येते, त्याप्रमाणें उद्धवाच्या प्रेमळ प्रश्नानें श्रीकृष्णाला आत्मज्ञानाचें भरतें येऊन तो वळला आहे. २३ वासरामुळें गायीच्या धन्याला सांज-सकाळ दोन्हीं वेळां दूध, अनायासानें मिळतें. त्याचप्रमाणें उद्धवाच्या योगानें श्रीकृष्णाच्या तोंडून हें अप्रतिम रहस्य बाहेर आलें. २४ कृष्णाला उद्धवाची आवड असल्यामुळें त्याला उद्धवाचे प्रश्न फार गोड वाटत. उद्धवाच्या भाग्याचें वर्णन काय करावें ! त्यानें श्रीकृष्णासारखा अमूल्य ठेवा मिळविला होता. २५ उद्धव जें जें कांहीं विचारी, त्याचें उत्तर देण्यास श्रीकृष्ण अगदीं हात जोडून तयार असे. फार काय, गाय जशी आपल्या वासराला चाटिते, त्याप्रमाणें तोहि प्रेमानें त्याला चाटावयासहि तयार झाला. इतका अनंत त्याच्या भक्तीला भाळला होता. २६ ज्याप्रमाणें पक्षीण पंख न फुटलेल्या पिलांच्या तोंडांत चारा घालिते त्याप्रमाणें आत्मज्ञानाची गुह्य गोष्ट श्रीकृष्ण उद्धवाच्या अंतःकरणांत ठसवूं लागला. २७ पुढील पांच श्लोकांत श्रीकृष्ण उद्धवाच्या प्रश्नाचें उत्तर—अत्यंत पवित्र व विलक्षण साधुलक्षण सांगेल. २८ साधूंचीं लक्षणें असंख्य आहेत त्यांतील उत्तमोत्तम तीस गुण निवडून श्रीकृष्णांनीं उद्धवाला सांगितले. ८२९.

—या पुढील पांच श्लोकांनीं भगवान् साधूचीं तीस लक्षणें सांगतात—

श्रीभगवान् उवाच—भगवान् म्हणाले—**कृपालुः**—दुसऱ्याच्या दुःखाला सहन न करणारा, **सर्वदेहिनां अकृतद्रोहः**—कोणत्याहि प्राण्याचा द्रोह न करणारा, **तितिक्षुः**—क्षमाशील, **सत्यसारः**—सत्य हेंच ज्याचें बल आहे किंवा सत्य ज्याच्यामध्यें स्थिर आहे, **अनवद्यात्मा**—असूयादि दोषरहित, **समः**—सुख-दुःखावस्थेंत हर्ष-विषादरहित, **सर्वोपकारकः**—यथाशक्ति सर्वांवर उपकार करणारा. [यांत साधूचीं सात लक्षणें सांगितलीं.] २९.

कृपा स्वतंत्रपणें निराळी जन्मास येत नाहीं, तर ती जेथें उत्पन्न होते, तोच साधु जाणावा. कृपा संतांच्या शरीरांतच रहाते. ८३० त्यामुळें तिला जगांत एवढें महत्त्व प्राप्त झालें आहे. संतांच्या जीवावर दया जिवंत राहिली आहे. त्यांच्यामुळेंच कठोरपणाचें कांटेरें कुंपण गेलें व त्यांनीं निष्ठुरता समूळ उपटून काढिली. ३१ त्यांची कृपा सर्व प्राणिमात्रांवर सारखीच असते. ती एकावर आहे व दुसऱ्यावर नाहीं, असें कधीं नसतें. त्यामुळें अवकृपा जागच्याजागीं शांत झाली. ३२ दयाळु माणसाचें चित्तहि मोठें विलक्षण असतें. तो सर्व जीवांना आत्मरूप पाहून त्यांच्या दुःखाचें हरण करितो व सुख देतो. याप्रमाणें तो अद्भुत कृपा करितो. ३३ ज्याच्यामुळें आपल्याला दुःख होतें, तें तो दुसऱ्याशीं वागतांना कधींहि आचरणांत आणीत नाहीं. परंतु ज्यानें आपल्याला सुख होतें, त्याचरीतीनें

परासी न करी निःशेख। जेणें आपणिया होय सुख। तें करी आवश्यक प्राणिमात्रां ॥ ३४ ॥ या नांव कृपाळुता। हें पहिलें लक्षण संतां। दुसरें तें अद्रोहता। ऐक आतां सांगेन ॥ ३५ ॥ लोकीं हिंडतां अद्रोहता। ठावो न लभेचि सर्वथा। मग शरण आली साधुसंतां। सावकाशता वस्तीसी ॥ ३६ ॥ ते दयाळु शरणागता। तिंहीं प्रतिपाळिली अद्रोहता। भूतीं भगवंतू देखतां। द्रोहाची वार्ता निमाली ॥ ३७॥ व्याघ्रसर्पादि देहांसी। कदा द्वेष नुपजे त्यांसी। जरी देऊं आले उपद्रवासी। तरी द्वेषासी करीना ॥ ३८॥ देहास आलिया आपदा। तेणें झाडिकरी प्रारब्धा। द्वेष येऊं नेदी कदा। नातळे क्रोधा निजबोधें ॥३९॥ हे जाण पां अद्रोहता। दुसरें लक्षण तत्त्वतां। तितिक्षा ते ऐक आतां। सहनशीलता साधूंची ॥ ८४० ॥ शांति परदेशी झाली होती। जेथें जाये तो दवडी परती। मग अतिदीन येतां काकुळती। निजधामा संतीं आणिली ॥ ४१ ॥ संतीं वाढविली अतिप्रीतीं। ते भगवंताची झाली पढियंती। तेणें आपुली निजसंपत्ती। शांतीच्या हातीं दिधली ॥ ४२ ॥ शांती सकळ वैभवेंसीं। अखंड असे संतांपाशीं। यालागीं सहनशीलता तयांसी। अहर्निशीं अनिवार ॥ ४३ ॥ लागतां सकळ भूतांचा झटा। न म्हणे हा भला वोखटा। नाचतू निजशांतीचे चोहटा। संत गोमटा त्या नाव ॥ ४४ ॥ ऐशी जे सहनशीलता। ते तितिक्षा जाण तत्त्वतां। हे तिसरी लक्षणता। सत्याची सत्यता अवधारीं ॥ ४५ ॥ सत्य अल्पायुषी झालें येथें। मरे उपजे जेथींच्या तेथें। कोठेंही नव्हे वाढतें। तेणें संतांतें ठाकिलें ॥ ४६ ॥ सत्यासी संतांसी होतां भेटी। तंव सत्यस्वरूपीं पडली गांठी। सत्य संतत्वें उठी। झालें सृष्टीं चिरायु ॥ ४७ ॥ यापरी सत्य संतदृष्टीं। सत्य सारें आलें पुष्टी। बळें वाढलें सृष्टीं। सत्यें भेटी परब्रह्मीं ॥ ४८ ॥ संतांसी होआवया उतराया। सत्य लागलें त्यांचें पायीं। संतचरणावेगळा पाहीं। थारा

तो सर्व प्राण्यांबरोबर अवश्य वागतो. ३४ याचें नांव दयाळुपणा. हें संताचें पाहिलें लक्षण आहे. दुसरें लक्षण अद्रोहता. तेंहि आतां सांगतों, ऐक. ३५ अद्रोहता जगांत हिंडत होती. तिला कोठें रहाण्यास ठिकाणच मिळेना. तेव्हां ती साधुसंतांना शरण आली व त्यांच्यापाशीं तिनें वस्ती केली. ३६ ते निरंतर शरणागतांवर दया करणारे असल्यामुळें त्यांनीं तिचा कायमचा सांभाळ केला. ते प्रत्येक प्राण्यांत भगवंतालाच पहात असल्यामुळें वैराचें नांवच नाहींसें झालें. ३७ वाघ, साप इत्यादिकांचे देह पाहूनहि त्यांच्या मनांत द्वेष उत्पन्न होत नाहीं. ते पीडा द्यावयास जरी आले तरीहि साधु-संत त्यांचा द्वेष करीत नाहींत. ३८ संतांच्या देहावर जरी एखादी आपत्ति आली तरी प्रारब्धावर भार टाकून ते मनांत कधींहि द्वेष उत्पन्न होऊं देत नाहींत. किंवा आत्मज्ञानामुळें ते क्रोधाला कधीं स्पर्शहि करीत नाहींत. ३९ याचेंच नांव अद्रोह म्ह० निर्वैर. तिसरें लक्षण तितिक्षा म्ह० क्षमा. साधूंची ती सहनशीलताच आतां तत्त्वतः ऐक. ८४० शांति हद्दपार झाली होती. ती ज्याच्यापाशीं जाई तो तिला घालवून देऊं लागला. शेवटीं अत्यंत दीन होऊन ती मोठ्या काकुळतेनें संतांपाशीं आली; तेव्हां त्यांनीं तिला आपल्या घरीं आणिलें. ४१ संतांनीं तिला अतिशय प्रेमानें वाढविल्या-मुळें ती भगवानाची अत्यंत आवडती झाली व त्यानें आपलें सर्व ऐश्वर्य शांतीच्या स्वाधीन केलें. ४२ तेव्हां-पासून भगवानाच्या ऐश्वर्यासह शान्ति सदोदित संतांपाशीं असते. म्हणूनच त्यांच्या अंगीं अपार सहनशीलता रात्रं-दिवस वास करिते. ४३ सगळ्या प्राण्यांचा समुदाय एकत्र जमून तो जरी संतांना उपद्रव देऊं लागला तरी साधु केव्हांहि हा भला व हा बुरा असें म्हणत नाहीं. तो आत्मशांतीच्या चव्हाट्यावर निर्विकार मनानें नाचत असतो. त्यालाच उत्तम संत म्हणतात. ४४ अशी जी सहनशीलता तिचेंच नांव तितिक्षा. हें तिसरें लक्षण होय. आतां सत्याची सत्यता ऐक. ४५ सृष्टीमध्यें सत्य अल्पायुषी झालें होतें. तें उपजतांच जेथल्या तेथें मरत असे. कोठेंच वाढीला लागेना. तेव्हां तें संतांपाशीं जाऊन उभें राहिलें. ४६ सत्याची व संतांची भेट होतांच सत्यस्वरूपाची गांठ पडली, सत्य संतस्वरूप बनून राहिलें व सृष्टींत तें चिरायु झालें. ४७ याप्रमाणें संतांच्या कृपादृष्टीनेंच सत्याला बळ येऊन तें जगांत वाढलें. त्यामुळें सत्याच्या द्वारां परब्रह्माची भेट होते. ४८ संताचें उतरायी होण्यासाठीं सत्यानें संतचरणांचा आश्रय केला. त्यामुळें संतांच्या पायांखेरीज त्याला दुसऱ्या कोठेंहि

नाहीं सत्यासी ॥ ४९ ॥ ऐसें सत्यास आधारभूत । ज्यांचे पाखोवा सत्य जीत । ज्यांचेनि बळें सत्य समर्थ । ते शुद्ध संत जाणावे ॥ ८५० ॥ ज्यांसी सबाह्य सत्यत्वें तुष्टी । जे सत्यस्वरूपें आले पुष्टी । सत्यें धाली दे ढेंकर दृष्टी । ज्यांची उठी सत्यत्वें ॥ ५१ ॥ या नांव जाण सत्याचें सार । हें संतांचें वसतें घर । हें मज मान्य संत साचार । मी निरंतर त्यांपाशीं ॥ ५२ ॥ जिहीं असत्याची वाहूनि आण । ज्यांमाजीं सत्य सप्रमाण । जे सदा सत्यत्वें संपन्न । हें मुख्य लक्षण साधूंचें ॥ ५३ ॥ या नांव सत्य सार । संतलक्षण साचार । हा चौथा गुण सधर । अनवद्य अपार तें ऐका ॥ ५४ ॥ निंदा असूयादि दोष समस्त । निजात्मबोधें प्रक्षाळित । अत्यंत पवित्र केलें चित्त । अनिंदित निजबोधें ॥ ५५ ॥ गुरुआज्ञातीर्थीं न्हाला । न्हावोनि सर्वांगीं निवाला । त्रिविधतापें सांडवला । पवित्र झाला मद्रूपें ॥ ५६ ॥ काय सांगूं त्याची पवित्रता । तीर्थें मागती चरणतीर्था । मीही पदरज वांछिता । इतरांची कथा कायसी ॥ ५७ ॥ कृष्ण म्हणे उद्धवा । हा अनवद्य गुण पांचवा । ऐक आतां सहावा । सम सर्वां समभावें ॥ ५८ ॥ निजरूपें सर्वसमता । समचि देखे सर्वां भूतां । निःशेष निमाली विषमता । जेवीं सैंधवता सागरीं ॥ ५९ ॥ नाना अलंकार पदार्थां । सोनेपणें विकत घेतां । ते ते पदार्थ न मोडितां । स्वभावतां सम सोनें ॥ ८६० ॥ तैसे नाना आकार नाना नाम । अवघें जग दिसे विषम । साधूचि चिद्रूपें सर्व सम । न देखे विषम निजबोधें ॥ ६१ ॥ ऐशिया समसाम्यावस्थेसी । दैवें आलिया सुखदुःखांसी । तेही मुकली द्वंद्वभावासी । सहजें समरशीं निजसाम्यें ॥ ६२ ॥ सव्यें मिनल्या महानदीसी । अपसव्यें आल्या गांवरसासी । गंगा दोहींतेंही समरसी । गुणदोषांसी उडवूनी ॥ ६३ ॥ तेथ पवित्रअपवित्रता । बोलूंचि न ये सर्वथा । गोडकडूपणांची वार्ता । निजांगें समता करी गंगा

थारा नाहीं. ४९ असे जे सत्याचे आधारस्तंभ, ज्यांच्या बळानें सत्य समर्थ होतें व ज्यांच्या पंखाखालींच सत्य जिवंत राहिलें तेच शुद्ध संत जाणावे. ८५० ज्यांना सबाह्य सत्यत्वानें संतोष होतो, जे सत्यस्वरूपानेंच पुष्ट झाले आहेत, ज्यांची दृष्टि सत्यानें तृप्त होऊन ढेंकर देते, ५१ ज्यांचा सत्यत्वानेंच उत्कर्ष होतो ते संत सत्याचें सार आहेत. तें संताचें रहातें घरच आहे. असे संत मला खरोखर मान्य आहेत. मी निरंतर त्यांच्यापाशीं असतों. ५२ ज्यांनीं असत्याविषयीं शपथ वाहिलेली असते, ज्यांच्यामध्यें सत्य सप्रमाण रहातें व जे सर्वदा सत्यानें युक्त असतात तेच खरे संत. ही साधूंची मुख्य खूण आहे. ५३ याचेंच नांव सत्याचें सार व संताचें खरें लक्षण. आतां त्यांचा समर्थ, शुद्ध व अपार असा चौथा गुण ऐक. ५४ ज्यानें निंदा, असूया इत्यादि सर्व दोष आत्मज्ञानानें धुवून टाकिले आहेत व निर्दोष आत्मबोधानें ज्यानें आपलें चित्त अत्यंत पवित्र केलें आहे, ५५ जो गुरु-आज्ञारूपी तीर्थांत स्नान करून शांत झाला आहे, त्रिविध तापांपासून मुक्त होऊन जो माझ्या स्वरूपानें पावन झाला आहे. ५९ त्याच्या पवित्रपणाचें वर्णन किती करावें ! तीर्थें त्याच्या चरणांचें तीर्थ मागूं लागलीं. मीहि त्याच्या चरणधुळीची इच्छा करितों; मग इतरांची काय कथा ! ५७ श्रीकृष्ण म्हणाला कीं, हे उद्धवा ! अनवद्य म्ह० शुद्धता. हा पांचवा गुण आहे. आतां सर्वांना समदृष्टीनें समान पहाणें हा सहावा गुण ऐक. ५८ आत्मस्वरूपामुळें त्याच्या अंगीं समता आलेली असते व त्यामुळें तो सर्व प्राण्यांना समदृष्टीनें पहातो. समुद्रांत मीठ व व पाणी हीं जशीं एकरूप होतात तसा त्याच्या मनांतील भेदभाव समूळ नाहींसा झालेला असतो. ५९ निरनिराळ्या घाटाचे सोन्याचे दागिने विकत घेतले व ते जरी मोडिले नाहींत तरी त्यांचें सोनें स्वभावतः एकच असतें. ८६० त्याप्रमाणें अनेक प्रकारचे आकार व नानाप्रकारचीं नांवें, यांमुळें जगत् आपल्याला विषम भासतें; परंतु साधूंच्या चित्स्वरूप दृष्टीला तें सर्व सारखेंच दिसतें. आत्मज्ञानामुळें त्यांना कांहींच विषम दिसत नाहीं. ६१ अशा समान स्थितींत दैवयोगानें जीं सुखदुःखें येतात, तींहि द्वंद्वभावाला मुकतात व स्वभावतः आत्मसाम्यानें समरस होतात. ६२ गंगेला उजवीकडून एखादी महानदी येऊन मिळाली व डावीकडून गांवांतील घाण पाण्याचा ओहोळ येऊन मिळाला तरी गंगा त्या दोहोंतील गुण-दोष नाहींसे करून त्यांस स्वतःमध्यें समरस करून टाकिते. ६३ तेथें पवित्र व अपवित्र हा भेदच

॥ ६४ ॥ तैसें सुखदुःखांचें भान । साधूंसी समत्वें समान । सदा निजबोधें संपन्न । हें अगाध लक्षण संतांचें ॥ ६५ ॥ नटिया एकचि एकला । गायव्याघ्रांचें सोंग अवगला । भीतरील खेळ्या जैं बोळखिला । तैं फिटला भवभ्रमू ॥ ६६ ॥ तैशी भयाभयवार्ता । द्वैतभावें उठी सर्वथा । साधु उभयसाम्यें पुरता । भयनिर्भयतां तो नेणे ॥ ६७ ॥ द्वंद्वसाम्यें परिपूर्ण । साधूचा हा सहावा गुण । ऐक सातवें लक्षण । परोपकारीपण तयाचें ॥ ६८ ॥ पत्र पुष्प छाया फळ । त्वचा काष्ठ समूळ । वृक्ष सर्वांगें सफळ । सर्वांसी केवळ उपकारी ॥ ६९ ॥ जो वृक्षा प्रतिपाळी । कां जो घावो घाली मूळीं । दोनींतें वृक्ष पुष्पीं फळीं । समानमेळीं संतुष्ट ॥ ८७० ॥ मोडूनि फळें आलिया वृक्षें । वृक्षु एकही स्वयें न चाखे । तेवीं कर्मफळा जो न टेंके । तो यथासुखें परब्रह्म ॥ ७१ ॥ तैसा कायावाचामनेंप्राणें । साधु वाढला उपकाराकारणें । आपुलें परावें म्हणों नेणे । उपकारू करणें सर्वांसी ॥ ७२ ॥ हो कां चंद्र उगवोनि अंबरीं । जेवीं जगाचें आंधारें निवारी । विश्वाचा ताप दूर करी । निववी निजकरीं सर्वांतें ॥ ७३ ॥ तेथ चंद्रामृत चकोरीं सेवावें । येरांसी चंद्र न म्हणे न द्यावें । जो जो भजे जेणें भावें । तो तो पावे तें सुख ॥ ७४ ॥ तैसेंचि जाण साधूपाशीं । जो जो श्रद्धा करी जैसी । त्या त्या देतसे सुखासी । होत जगासी उपकारी ॥ ७५ ॥ काउळे चंद्रासी हेळसिती । चकोर चंद्रामृत सेविती । तेवीं दुष्ट साधूतें धिक्कारिती । भावार्थी पावती निजलाभू ॥ ७६ ॥ सातव्या लक्षणाचा उभारा । सांगितलें परोपकारा । पुढील श्लोकीं लक्षणें अकरा । साधुनिर्धारा सांगत ॥ ७७ ॥

मुळीं रहात नाहीं. गोडपणा व कडुपणा यांची वार्ता गंगा जशी आपल्या अंगानें एकरूप करिते ६४ त्याप्रमाणें संतांना सुख-दुखाचें भान समत्वामुळें समान होतें. निरंतर आत्मज्ञानानें युक्त असणें हें साधूचें अगाध लक्षण आहे. ६५ नानाप्रकारचीं सोंगें घेणारा नट एकच असतो. तो गाय, वाघ इत्यादि अनेकांचीं सोंगें घेतो. परंतु त्या सोंगाच्या आंत कोण आहे, हें ज्यांनीं ओळखिलें त्यांचा भ्रम तत्काल नाहींसा होतो. ६६ त्याप्रमाणें भय व अभय द्वैतभावानें उत्पन्न होत असतें. साधूची त्या दोहोंविषयीं सारखीच भावना असल्यामुळें तो भय किंवा अभय कांहीं जाणतच नाहीं. ६७ द्वंद्वाविषयीं पूर्णपणें समभाव हें संतांचें सहावें लक्षण झालें. आतां परोपकार हा सातवा गुण ऐक. ६८ वृक्ष आपलीं पानें, फुलें, सावली, फळ, साल, लांकूड इत्यादि आपल्या भिन्न-भिन्न अवयवांनीं लोकांच्या उपयोगी पडून सर्वांवर नेहमीं उपकारच करीत असतो. ६९ जो वृक्षाची जोपासना करितो किंवा जो त्यांच्या मुळावर घाव घालितो त्या दोघांनाहि वृक्ष फुलें व फळें देऊन सारखाच संतोष देतो. ८७० वृक्ष स्वतः फळांनीं अगदीं भरून गेला तरी तो स्वतः त्यांतील एकहि फळ कधीं चाखीत नाहीं. त्यांचप्रमाणें जो संत कर्मफळाला स्पर्शहि करीत नाहीं, तो खरा परब्रह्म होय. ७१ खरोखर साधु काया-वाचा-मनानें परोपकारासाठीं वाढलेला असतो. तो आप-पर भाव टाकून सर्वांवर उपकार करीत असतो. ७२ चंद्र जसा आकाशांत उगवतो व सृष्टींतील अंधार घालवितो, विश्वाचा ताप दूर करितो व आपल्या शीतल किरणांनीं सर्वांना शांत करितो, ७३ चंद्राचें अमृत चकोरानेंच सेवन करावें, इतरांनीं तें घेऊं नये, असें चंद्र केव्हांहि म्हणत नाहीं. ज्याला जो ज्या भावनेनें भजतो, तसें त्याला सुख मिळतें. ७४ त्याचप्रमाणें साधूवर ज्याची जशी श्रद्धा असते तसें त्याला तो सुख देतो व जगावर उपकार करितो. ७५ कावळे चंद्राला तुच्छ लेखितात व चकोर त्याचें अमृत सेवितात. त्याप्रमाणें दुर्जन संतांचा धिक्कार करितात व सज्जन श्रद्धाळु भक्त त्यांच्यापासून आत्मज्ञानाचा लाभ घेतात. ७६ याप्रमाणें परोपकार या सातव्या गुणाचा विस्तार करून सांगितला. आतां पुढील श्लोकांत साधूंच्या लक्षणांतील आणखी अकरा गुण सांगत आहेत. ८७७.

कामैरहतधीर्दान्तो मृदुः शुचिरकिञ्चनः । अनीहो मितभुक् शान्तः स्थिरो मच्छरणो मुनिः ॥ ३० ॥

उर्वशी आलिया सेजेसी । कामक्षोभ नुपजे ज्यासी । स्वानंद भोगितां अहर्निशीं । विषयकामासी विसरला ॥ ७८ ॥ रंकू पालखिये बैसला । तो पूर्वील वाहना विसरला । तेवीं हा निजानंदें तृप्त झाला । काम विसरला तुच्छत्वें ॥ ७९ ॥ कांहीं अप्राप्त पावावया कामावें । साधूसी अप्राप्तता न संभवे । प्राप्तपदीं यथागौरवें । निजानुभवें विराजतू ॥ ८८० ॥ खद्योता सूर्य भेटों जातां । खद्योता न देखे सविता । सूर्यासी न भेटवे खद्योता । तेवीं अप्राप्तता साधूसी ॥ ८१ ॥ एवं उभय परी पाहतां । कामू निमाला सर्वथा । हें आठवें लक्षण तत्त्वतां । अकामता साधूची ॥ ८२ ॥ सावधानें अंतर नेमितां । तेचि बाह्येंद्रियां नियामकता । जेवीं का लेंकीशीं शिकवण देतां । सून सर्वथा चळीं कांपे ॥ ८३ ॥ मुख्य धूर रणीं लागल्या हाता । येर कटक जिंतिलें न झुंझतां । का मूळ छेदिलें असतां । शाखा समस्ता छेदिल्या ॥ ८४ ॥ एवं अंतरवृत्तीचा जो नेम । तोचि बाह्येंद्रियां उपरम । ऐसेनिही जें निपजे कर्म । तें निर्भ्रम अहेतुक ॥ ८५ ॥ अंतर जडलें आत्मस्थितीं । बाह्य रंगलें मद्भक्तीं । तेथें जीं जीं कर्में निपजती । तीं तीं होती ब्रह्मरूप ॥ ८६ ॥ बाह्येंद्रियें करितां नेम । अंतरींचें कर्मीं प्रकटे ब्रह्म । हा बाह्येंद्रियांचा नेम । आत्माराम जाणती ॥ ८७ ॥ ऐशी बाह्येंद्रियनियामकता । हे जाणावी साधूची दांतता । हा नववा गुण तत्त्वतां । ऐक आतां दशमातें ॥ ८८ ॥ आकाश सर्वांसीही लागे । परी कठिण नव्हे कोणेहि भागें । तेवी साधु जाण सर्वांगें । मृदु लागे सर्वांसी ॥ ८९ ॥ पिंजल्या कापुसाचा गोळा । फोडूं नेणे कोणाच्या कपाळा ।

कामैः अहतधीः–कामांकडून ज्याचें चित्त क्षुब्ध केलें जात नाहीं, दान्तः–ज्यानें बाह्य इंद्रियांचें नियमन केलें आहे, मृदुः–कोमलचित्त, शुचिः–सदाचारसंपन्न, अकिञ्चनः–सर्व परिग्रहशून्य, अनीहः–दृष्टफलाच्या अपेक्षेनें क्रिया न करणारा, मितभुक्–यदृच्छेनें जें प्राप्त होईल त्यावरच निर्वाह करणारा, शान्तः–ज्याचें अंतःकरण नियमित आहे, स्थिरः–स्वधर्मामध्यें स्थिर असणारा, मच्छरणः–केवळ माझाच आश्रय करणारा, मुनिः–मननशील. [यांत अकरा लक्षणें सांगितलीं.] ३०.

उर्वशी जरी शय्येवर आली तरीहि त्याचें मन कामविकारानें क्षुब्ध होत नाहीं, रात्रंदिवस स्वानंदांत तल्लीन झाल्यामुळें त्याला विषयेच्छांचा विसर पडतो. ७८ एखादा भिकारी पालखींत बसला कीं, तो आपलें पूर्वींचें क्षुद्र वहान जसें विसरतो, तसा साधु आत्मानंदानें तृप्त झाला कीं वासना तुच्छ लेखून त्यांना साफ विसरून जातो. ७९ जी वस्तु दुर्मिळ असते ती मिळावी अशी इच्छा होते. परंतु साधूला अप्राप्त कांहींच नसल्यामुळें तो प्राप्तस्थितींत मोठ्या आनंदानें आत्मानुभवानें शोभतो. ८८० सूर्य जर काजव्याच्या भेटीला गेला तर त्याला काजवा दिसत नाहीं आणि काजव्याला सूर्याला भेटतां येत नाहीं, तशी साधूची अप्राप्तता आहे. ८१ अशाप्रकारें दोन्ही बाजूंनीं पाहिलें तरी साधूंची इच्छा पूर्णपणें शान्त झालेली असते. असें हें निरिच्छत्व साधूंचें आठवें लक्षण आहे. ८२ मनाचें नियमन करण्यांत तत्पर होऊन राहिल्यास बाह्य इंद्रियांचेंहि सहजच नियमन होतें. ज्याप्रमाणें लेकीला खडखडून बोललें असतां सून चळचळां कांपू लागते, ८३ किंवा सेनानायक हातीं लागतांच इतर सैनिकांना युद्धावांचून जिंकितां येतें, किंवा वृक्षाचें मूळ तोडिलें असतां सर्व शाखा तुटून पडतात, ८४ त्याप्रमाणें मनोनिग्रहानें बाह्य वृत्तीचें दमन सहजच घडतें. अशा स्थितींत जें जें कर्म घडतें तें तें निःसंशय अहेतुकच असतें. ८५ अंतःकरण आत्मस्वरूपांत जडलें व बाह्येंद्रियें माझ्या भक्तीमध्यें तल्लीन झालीं म्हणजे जीं जीं कर्में उत्पन्न होतात तीं सर्व ब्रह्मस्वरूपच बनतात. ८६ किंवा बाह्येंद्रियांचें नियमन केलें कीं, मनोमय कर्मामध्येंहि परब्रह्म प्रकट होतें. आत्म्यामध्यें रममाण होणारे लोक हा बाह्येंद्रियांचा नियम जाणितात. ८७ बाह्येंद्रियांचें नियमन हीच संताची दांतता म्ह० नियमनशक्ति समजावी. हा नववा गुण झाला. आतां दहावा गुण ऐक. ८८ आकाश जसें सर्व बाजूंनीं सर्व वस्तूंना लागलेलें दिसतें, परंतु तें कोठेंहि कठिण नसतें, त्याप्रमाणें साधू सर्वांबरोबर मृदू असतात. कधींच कठोर नसतात. ८९ पिंजलेल्या कापसाचा गोळा करून तो जर कोणाच्या डोकीवर मारिला तर त्यानें जसें कोणाचेंहि डोकें फुटत नाहीं, त्या-

तैसाचि साधूचा जिव्हाळा । अतिकोंवळा सर्वांसी ॥८९०॥ पाहें पां जैसें गंगाजळ । गायीव्याघ्रांसी करी शीतळ । तैसाचि साधुहि केवळ । मृदु मंजुळ सर्वांसी ॥ ९१ ॥ साधूंची अतिमृदुता । या नांव जाण सर्वथा । हे दशमलक्षणयोग्यता । ऐक आतां अकरावें ॥ ९२ ॥ साधूंचीं जे शुचिष्मंतता । ते भगवद्भ-जनेंचि तत्त्वतां । व्रततपदानादितीर्थां । शुचिष्मंतता त्यांचेनी ॥ ९३ ॥ परदारा आणि परधन । सर्वथा नातळे ज्याचें मन । गंगादि तीर्थें त्याचें जाण । चरणस्पर्शन वांछिती ॥ ९४ ॥ स्वदारास्वधन-सलोभता । अवश्य जाणें अधःपाता । द्रव्यदारानिरपेक्षता । शुचिष्मंतता साधूची ॥ ९५ ॥ ऐशी असोनि शुचिष्मंतता । तो निंदीना व्रततपादितीर्था । ते ते विधीतें आचरितां । सदाचारता अतिश्रोत्री ॥ ९६ ॥ पडलिया मगरमिठी । ते न सोडी प्राणसंकटीं । सांपडे तें सगळेंचि घोटी । तैशी पडली मिठी जीवब्रह्मां ॥ ९७ ॥ हें पुढेंसूनि परब्रह्म । आश्रमधर्मादि स्वकर्म । आचरोनि दावी उत्तमोत्तम । कर्मीं ब्रह्मप्रतीती ॥ ९८ ॥ कर्म करितो लोक म्हणती । तो वर्तताहे ब्रह्मस्थितीं । हें ज्याचें तो जाणे निश्चितीं । लोकां प्रतीती कळेना ॥ ९९ ॥ कुलाल भांडें करूनि उतरी । चक्र भोंवे पूर्विला भंवरीं । तैसा साधू पूर्वसंस्कारीं । स्वकर्मं करी वृत्तिशून्य ॥ ९०० ॥ हें साधुलक्षण अत्यंत थोर । ऐकतां सुगम करितां दुर्धर । हें अकरावें अतिपवित्र । ऐक विचित्र तें बारावें ॥ १ ॥ साधूची अपरिग्रहता । परिग्रहो नातळे चित्ता । देहगेहें निःसंगता । अकिंचनता त्यासी नांव ॥ २ ॥ स्फटिकु काजळीं दिसे काळा । आरक्तीं आरक्त कीळा । नीळवर्णीं भासे निळा । तरी तो वेगळा शुद्धत्वें ॥ ३ ॥ स्फटिक जपाकुसुमीं ठेविला । पाहतां दिसे तांबडा झाला । परी तो अलिप्तपणें संचला । नाहीं माखला तेणें रंगें ॥ ४ ॥ तैसा साधु परिग्रहामाजीं वसे । परिग्रही झालाही दिसे । परी

प्रमाणें साधूंचें अंतःकरण सर्वांविषयीं अतिशय कोमल असतें. ८९० गंगेचें जल वाघालाहि शांत करितें व गायीलाहि तृप्त करितें. त्याप्रमाणें साधु सर्वांबरोबर गोड व सौम्यपणानें वागतो. ९१ साधूच्या अंतःकरणाचें अत्यंत कोमलत्व हा दहावा गुण झाला. आतां अकरावा गुण ऐक. ९२ साधूंना भगवद्भ-जनामुळें पावनत्व प्राप्त होतें. व्रत, तप, दान, तीर्थें इत्यादिकांना भगवद्भजनामुळेंच अभिलाष ज्याच्या मनाला स्पर्शहि करीत नाहीं, त्याच्या चरणस्पर्शाची गंगा-गोदावरीसारख्या पवित्र नद्या इच्छा करितात. ९४ स्वस्त्री व स्वतःचें द्रव्य यांवरील आसक्ति खरोखर नरकाला नेणारी आहे. स्त्री व द्रव्य या दोहों-विषयीं निरपेक्ष असणें हीच साधूंची शुद्धता आहे. ९५ स्वतःच्या अंगीं इतकें पावित्र्य असूनहि तो व्रत, दान, तप व तीर्थें यांची केव्हांहि निंदा करीत नाहीं. उलट त्यांचें आचरण करण्याचा प्रसंग आलयास तो ज्ञानी तीं मोठ्या सदाचारानें वैदिकांप्रमाणें करितो. ९६ मगरानें एकदां मिठी मारिली म्हणजे प्राणावर जरी बेतलें तरी तो मिठी न सोडितां, जें सांपडेल तें गिळून टाकितो, त्याप्रमाणें ब्रह्माची एकदा घट्ट मिठी पडली कीं ती सुटत नाहीं. ९७ तो परब्रह्माला पुढें करून आश्रमधर्मादि आपलीं सर्व कर्में उत्तमप्रकारें आचरून दाखवितो. त्याला कर्मामध्येंहि ब्रह्माची प्रतीति येत असते. ९८ लोक म्हणतात कीं, तो कर्में करितो. परंतु तो ब्रह्मस्वरूपांतच वा..त असतो. तें वास्तविक ज्याचें तोच जाणितो. लोकांना त्याचा अनुभव नसतो. ९९ कुंभारानें घट करून तो उत-रून घेतला, तरी त्याचें चक्र जसें फिरतच असतें, त्याप्रमाणें साधु पूर्वसंस्कारामुळें शून्यवृत्तीनें कर्में करीत असतो. ९०० हें साधूचें लक्षण अत्यंत श्रेष्ठ आहे. तें ऐकण्यास सोपें पण आचरण्यास फार कठिण आहे. असें हें अक रावें लक्षण अतिशय पवित्र आहे. आतां साधूचें अपरिग्रहत्व हें बारावें विलक्षण लक्षण ऐक. १ कोणत्याहि वस्तूचा संग्रह न करणें ही अपरिग्रहता. परिग्रह साधूच्या मनाला स्पर्शहि करीत नाहीं. किंवा देह व घर-दार यांवर आसक्ति नसणें यालाच अकिंचनता म्हणतात. २ स्फटिक काजळावर ठेविला तर तो काळा दिसतो. तांबड्या रंगावर ठेविला तर रक्तासारखा लाल व निळ्या रंगावर ठेविला तर निळा दिसतो. परंतु तो स्वभावतः मात्र या सर्व रंगांहून वेगळा, अत्यंत शुद्ध व स्वच्छ असतो. ३ तो जर जास्वंदीच्या फुलावर ठेविला तर तांबडा झाल्यासारखा भासतो; परंतु वास्तविक तो त्या रंगांपासून अलिप्त असल्यामुळें त्यांनीं जसा केव्हांहि माखत

जागृतिस्वप्नसुषुप्तिवशें । परिग्रहो न स्पर्शे निजबोधें ॥ ५ ॥ परीस सर्व धातूंसी खेंव देतां । मिळणीं सोनें करी तत्त्वतां । तो सुवर्णावांचूनि सर्वथा । आणिका पदार्था नातळे ॥ ६ ॥ तैसा साधु म्हणे जें जें माझें । तें तें त्यासी नाठवे दुजें । ऐक्यभावाचीं नाचवीं भोजें । अधोक्षजें अंकितु ॥ ७ ॥ चिन्मात्रीं जडलें मन । विश्व जाहलें चैतन्यघन । बुडालें परिग्रहाचें भान । अकिंचनपण या नांव ॥ ८ ॥ सकळ सांडूनि वना गेला । वनीं वनिता चिंतूं लागला । तो त्यागचि बाधकत्वा आला । उलथोन पडिला परिग्रहीं ॥ ९ ॥ उंडणी भिंती चढों लाहे । चढते कष्ट व्यर्थ पाहे । ते पूर्विल्यापरीस तळीं जाये । उलंडूनि ठाये अतिदुःखी ॥ ९१० ॥ तैशी मुंगी नव्हे पाहें । उंडणी घेऊनि वृक्षावरी जाये । सत्संगतीं मूर्ख उद्धरों लाहे । परी ते उपाये न करिती ॥ ११ ॥ मुंगी लहान उंडणी थोर । ते तिचा करूं शके उद्धार । तैसे अकिंचन जे नर । ते करिती उद्धार सकळांचा ॥ १२ ॥ असो मूर्खांची जे त्यागिती गती । ते अत्यंत-बाधें बाधका होती । जंव धरिली नाहीं सत्संगती । तंव त्यागस्थिति कळेना ॥ १३ ॥ प्रपंच सांडूनि वना गेला । तो देहप्रपंचें दृढ अडकला । देहीं देहो जेणें मिथ्या केला । तो सत्य झाला अकिंचन ॥ १४ ॥ मूर्खासी त्याग तो झाला बाधू । परिग्रहीं असोनि मुक्त साधू । सबाह्य त्यागें अतिशुद्धू । शुकनारदु तिहीं लोकीं ॥ १५ ॥ ते दोघेही लागती जनकाच्या पायीं । तो राज्य करितांही विदेही । त्यासी मीही मानितसे पाहीं । अभिनव नवाई साधूची ॥ १६ ॥ या नांव मुख्य अकिंचनता । तुज म्यां सांगीतली तत्त्वतां । हे बारावी लक्षणता । ऐक आतां अनीहा ॥ १७ ॥ अनीहा झाली बापुडी । जेथ जाय ते दूर दवडी । कोणी राहों नेदी अर्धघडी । अति चरफडी निराश्रयें ॥ १८ ॥

नाहीं, ४ त्याप्रमाणें साधु परिग्रहांत राहिला म्हणजे संग्रह करणारा आहे असा भासतो; परंतु जागृति, स्वप्न, व सुषुप्ति या तीन्हीं अवस्थांत आत्मबोधामुळें त्याला परिग्रह स्पर्शेहि करीत नाहीं. ५ परीस सर्व धातूला लागतांच तत्काल त्याचें सोनें बनवितो. तो सोन्यावांचून कोणत्याहि पदार्थाला स्पर्श करीत नाहीं, ६ त्याप्रमाणें साधु ज्याला ज्याला 'माझें' म्हणतो तें सर्व दुजाभावानें तो पहातच नाहीं. ऐक्यभावाचा ठसा उमटलेलीं सोंगें तो ईश्वरांशात्मक बाहुली करून नाचवितो. ७ चिन्मात्रांत मन जडलें म्हणजे सर्व विश्व चैतन्ययुक्तच दिसूं लागतें व परिग्रहाचें भानहि उरत नाहीं. यालाच अकिंचनपणा म्हणतात. ८ एखादा साधक सर्वसंगपरित्याग करून वनांत गेला व तेथेंहि स्त्रीचें ध्यान करूं लागला, तर त्याला तो त्याग बाधक होतो व उलट परिग्रहांतच अडकतो. ९ एखादी आळी जेव्हां भिंतीवर चढूं लागते, तेव्हां तिला चढण्याचे श्रम मात्र व्यर्थ होतात, ती घसरून खालीं येते व पूर्वीपेक्षांहि जास्त खोलींत उताणी पडून तळमळूं लागते. ९१० पण मुंगी मात्र तशी नाहीं; पहा ! ती आळीला घेऊन वृक्षावर चढते. याप्रमाणें सत्संगतीनें मूर्खांचा उद्धार होत असतो. परंतु ते उपायच करीत नाहींत. ११ पाहूं गेल्यास मुंगी लहान व आळी मोठी असते; पण ती लहान असूनहि जशी आळीचा उद्धार करूं शकते, त्याचप्रमाणें वर सांगितलेले अकिंचन पुरुष सर्वांचा उद्धार करितात. १२ असो. मूर्खांनीं केलेला त्याग त्यांनाच बाधक होतो. जोंपर्यंत त्यांनीं सत्संगति धरिली नाहीं, तोंपर्यंत त्यांना त्यागाचें खरें स्वरूप कळत नाहीं. १३ तो प्रपंच सोडून वनांत जातो व देहाच्या प्रपंचांत अडकून पडतो. तेव्हां देहांतच राहून जो प्रपंच मिथ्या समजतो तोच खरा अकिंचन होय. १४ मूर्खाला त्यागहि बाधक होतो व साधु परिग्रहांत राहूनहि मुक्त होतो. अंतर्बाह्यत्यागानें शुकाचार्य व नारदमुनी तिन्ही लोकीं अति पवित्र झाले. १५ पण त्या दोघांनींहि जनकाचे पाय धरिले. कारण जनक राज्य करीत असून देहात्मबुद्धीपासून अलिप्त होता. फार काय पण मीदेखील त्याला पूज्य मानितों. साधूचा महिमा कसा आश्चर्यकारक आहे पहा. १६ यालाच अकिंचनता म्हणतात. ती मी तुला तत्वतः सांगितली. हें बारावें लक्षण झालें. आतां अनिहा म्ह० निरिच्छता, ऐक. १७ अनिहा बिचारी दीनपणानें दारोदार हिंडत होती. ज्याच्यापाशीं ती जाई तो तिला दूर घालवून देत असे. कोणी तिला क्षणभरहि थारा देत नसे. तेव्हां कोठेंच आश्रय न मिळाल्यामुळें ती अतिशय चडफडूं लागली. १८ ती त्रैलोक्यांत हिंडली;

अनीहा हिंडतां लोकीं तिहीं । तिळभरी ठावो बसावया नाहीं । ईहा वैरिणी लागली पाहीं । ठायींच्या ठायीं दंडवी ॥ १९ ॥ कोणी येवों नेदी दाराकडे । अतिदीन जाली बापुडें । धाय मोकलोनि रडे । गाऱ्हाणें संतांपुढें देवों आली ॥ ९२० ॥ ते कृपाळू दयामेळें । निजकरें पुसोनि डोळे । प्रतिपाळिली स्वहितकाळें । संतबळें वाढली ॥ २१ ॥ त्यापूर्वील वैर स्मरोनियां । ईहा वैरिणी साधावया । संतांसी पुसोनि उपाया । तिच्या अपाया प्रवर्तली ॥ २२ ॥ ईहेसी नाना चेष्टीं चेष्टवितां । अहं आणि जाण ममता । कामें अंगीं घातली तत्त्वतां । कामकांता ते झाली ॥ २३ ॥ ईहा कामफळें वाढली थोर । व्यापूनि राहिली घरोघर । तिसीं साधावया वैर । अनीहा सत्वर चालिली ॥ २४ ॥ असंगशस्त्र मागोनि संतां । ईहेच्या करावया घाता । आधीं मारूं धांवे अहंममता । दोघें धाकतां निमालीं ॥ २५ ॥ अनीहा पाठीं लागल्या जाण । अहंममतेसी म्हातारपण । थरथरां कांपोनि प्राण । घायेंवीण सांडिला ॥ २६ ॥ अनीहा देखोनि दिठीं । काम पळे बारा वाटीं । संकल्पाचे शेवटिले गोटीं । उठाउठी पाडिला ॥ २७ ॥ कामू पडतां रणांगणीं । क्रोधादि शूर पडिले रणीं । ईहेचा कैवारी नुरेच कोणी । एकेक शोधूनी मारिले ॥ २८ ॥ एवं अनीहेसमोर । राही ऐसा नाहीं वीर । मारूनि अवध्यांचा केला चूर । क्रिया करणार कोणी नाहीं ॥ २९ ॥ काम निमाल्या सर्वथा । ईहा रांडवली वस्तुतां । मुख न दावीच संतां । अधोगमनता पळाली ॥ ९३० ॥ यालागीं ईहेसवें जो लागला । तो जाणावा अधोगती गेला । अनीहेचा जो अंकित झाला । तो आवडला गोविंदा ॥ ३१ ॥ म्हणसी अनीहा ते कोण । काय ते ईहेचें लक्षण । ऐक सांगेन संपूर्ण । जेणें बाणे खूण जिव्हारीं ॥ ३२ ॥ काम्यकर्मादि क्रियाजाळ । तेचि ईहा जाणावी

पण तिला बसावयास कोणी तिळभराहि जागा तर दिली नाहींच, पण इच्छा वैरीण तिची पिच्छा पुरवून ठिकठिकाणाहून तिला घालवून देत होती. १९ तिला कोणी दारापुढें उभें राहूं देईना. बिचारी अगदीं व्याकूळ होऊन ऊर बडवून रडूं लागली व शेवटीं संतांच्याजवळ गाऱ्हाणें सांगावयास आली. ९२० त्या स्वभावतःच दयाळु असलेल्या संतांनीं आपल्या हातांनीं तिचे डोळे पुसले व आपल्या हितासाठीं तिचा सांभाळ केला. तेव्हां ती संतांच्या आश्रयानें वाढली. २१ पण पूर्वींचें इच्छेचें वैर मनांत ठेवून तिचा नाश करण्यासाठीं संतांना उपाय विचारून ती निघाली. २२ अहं व ममता यांनीं इच्छेकडून अनेक प्रकारच्या क्रीडा करविल्या. कामानें तिला आश्रय दिल्यामुळें ती कामाची भार्या होऊन राहिली. २३ अशाप्रकारें इच्छा इष्टफलानें फार जोरावली व घरोघर व्यापून राहिली. तिचें वैर साधण्यासाठीं अनीहा मोठ्या त्वरेनें चालली. २४ तिनें संतांच्या जवळून अलिप्तपणाचें शस्त्र मागून घेतलें व इच्छेचा नाश करण्यासाठीं पहिल्यानें ती अहं व ममता यांवर प्रहार करण्यास धांवली. तेव्हां तीं दोघें भीतीनेंच मरण पावलीं. २५ अनिच्छा पाठीस लागल्यामुळें बिचारी आधींच वृद्ध झालेली, अहं–ममता तीं थरथरां कांपूं लागलीं व घांव बसण्याच्या आधींच त्यांनीं प्राण सोडिला. २६ अनिच्छा दृष्टीस पडतांच काम बारा वाटांनीं पळाला. तिनें त्या संकल्पाच्या शेवटल्या गोटांत गांठून तेथल्या तेथें गतप्राण केला. २७ काम याप्रमाणें रणांगणांत पडल्यामुळें त्याचें क्रोधाधिक शूर योद्धेहि युद्धांत मारले गेले. इच्छेचा कैवारी कोणीच उरला नाहीं. अनीहेनें एकेकाला शोधून काढून मारून टाकलें. २८ याप्रमाणें निरिच्छेपुढें उभा राहील असा एकहि वीर उरला नाहीं. तिनें सर्वांचा संहार करून चुराडा करून टाकिला. मागें त्याची क्रिया करणारेहि कोणी राहिलें नाहीं. २९ कामाचा पूर्णपणें नाश झाल्यामुळें इच्छा वस्तुतः विधवा झाली. ती संतांना आपलें तोंडही न दाखवितां खालच्या मानेनें पळून गेली. ९३० यास्तव जो इच्छेच्या नादाला लागला तो अधोगतीला गेला असें समजावें आणि जो निरिच्छेचा दास झाला तो गोविंदाला आवडला, असें समजावें. ३१ तूं कदाचित् म्हणशील कीं, ही अनीहा कोण! इहेचें लक्षण काय! तर त्यांचीही अंतःकरणांत बाणेल अशी खूण सांगतों. ऐक. ३२ काम्यकर्माचें जें अनुष्ठान तीच चंचळ इहा आहे. आणि अंतःकरणांत अढळ असणारी जी वृत्ति

अतिचपळ । अंतरीं जे सुनिश्चळ । तेचि केवळ अनीहा ॥ ३३ ॥ अंतरीं कामाची वार्ता । नुपजे कर्मांची कर्मावस्था । अणूभरीं न रिघे उद्वेगता । अनीहा तत्त्वतां ते जाण ॥ ३४ ॥ ऐशी अनीहा असे ज्यासी । देवो आज्ञाधारकु त्यापाशीं । ते अनीहा संतांची दासी । अहर्निशीं जीवेंभावें ॥ ३५ ॥ हे अनीहा अतिगौरवें । साधुलक्षण तेरावें । मितभोजन तें चौदावें । लक्षणवैभव अवधारीं ॥ ३६ ॥ न कोंडे रसनेचिया चाडा । न पडे क्षुधेच्या पांगडा । आवडीनावडीच्या उपाडा । करूनि निधडा भोजनीं ॥ ३७ ॥ प्राणु आकांक्षी अन्नातें । जठराग्नि भक्षी त्यातें । उभयसाक्षी मी येथें । जाणोनि निरुतें रस सेवीं ॥ ३८ ॥ जें जें आलें भोजनासी । दृष्टीनें त्याचें दोष निरसी । अतिपवित्र करूनि त्यासी । निजसमरसीं सेवितू ॥ ३९ ॥ न देखे भोग्य पदार्था । नाठवे मी एक भोक्ता । ग्रासीं समरसीं अच्युता । भोगूनि अभोक्ता मितभोजी ॥ ९४० ॥ अग्नि आधीं आपणयाऐसें करी । मग त्या आहारातें अंगीकारी । साधु आधीं द्वैतातें निवारी । मग स्वीकारी आहारातें ॥ ४१ ॥ याचि नांव मितभोजन । साधूचें आहाराचें लक्षण । युक्तीविण अल्प भोजन । तें पथ्य जाण रोग्यांचें ॥ ४२ ॥ ग्रासोग्रासीं ब्रह्मार्पण । त्या नांव परिमित भोजन । हें चौदावें लक्षण । साधूचें जाण उद्धवा ॥ ४३ ॥ समळजळसंभारीं । सरितामेळु मिळे सागरीं । तो डहुळेना तिळभरी । निर्विकारी निर्मळु ॥ ४४ ॥ तैशा आलिया नाना ऊर्मी । ज्यासी गजबजु नाहीं मनोधर्मीं । शांति संतांची पराक्रमी । उपकर्मीं निजशक्ती ॥ ४५ ॥ जेवीं का नागवेलीची वेली । आधारावीण न वचे वेंगली । तैसी संतबळें शांती वाढली । मंडपा चढली चिन्मात्र ॥ ४६ ॥ झांकळोनि दश दिशांसी । आभाळ दाटल्या आकाशीं । गगन अविकारी त्या दोषासीं । आभाळासी नातळे ॥ ४७ ॥ शीत उष्ण पर्जन्यधारा । अंगीं न लागती अंबरा । तेवीं साधूचा उभारा । द्वंद्वसंभारा निर्द्वंद्व

तीच अनीहा जाणावी. ३३ अंतःकरणांत इच्छेचा लेशही नसणें किंवा कर्मांची कर्मावस्था अथवा उद्वेग अणुभरहि उत्पन्न न होणें हीच खरोखर अनीहा आहे, असें समज. ३४ अशी निरिच्छा ज्याच्या अंतःकरणांत ठसली आहे, त्याच्या आज्ञेंत देव रहातो. ती निरिच्छा रात्रंदिवस जीव-भावानें संतांची दासी होऊन रहाते, ३५ ही अनीहा अति गौरवानें संताचें तेरावें लक्षण होऊन राहिली आहे. आतां चौदावें लक्षण मित आहार, तेंहि त्याच्या श्रेष्ठ गुणांसह ऐक ३६ जो जिभेच्या आवडीचा दास होत नाहीं, जो भुकेच्या अधीन होत नाहीं, आवड व नावड यांचा पराभव करून जो भोजनाला तयार असतो, ३७ तो 'प्राणाला अन्नाची अपेक्षा केवळ रसाचें सेवन करितो ३८ जे जे भोजनाचे पदार्थ त्याच्यापुढें येतात, त्यांतील दोष तो केवळ आपल्या दृष्टीनेंच नाहींसे करितो व त्यांना अतिशय शुद्ध करून आत्मैक्यांत समरस होऊन त्यांचें सेवन करितो. ३९ हे भोग्य पदार्थ आहेत असें तो पहात नाहीं किंवा मी त्यांचा भोक्ता आहे, असेंहि समजत नाहीं. प्रत्येक ग्रासा-बरोबर अच्युताचाच समरसानें अनुभव घेऊन परिमित भोजन करणारा तो अभोक्ताच आहे. ९४० अग्नि जसा त्याच्या आहाराला अगोदरच स्वस्वरूप बनवितो आणि मग त्याचें ग्रहण करितो, तसा साधु प्रथम द्वैताचें निवारण करितो व मग आहार स्वीकारितो. ४१ याचेंच नांव मितभोजन व हेंच साधूच्या आहाराचें लक्षण आहे. या युक्तीवांचून थोडें खाणें हें रोग्याचें पथ्य समजावें. ४२ प्रत्येक घास ब्रह्मार्पण करणें यालाच परिमित भोजन म्हणतात. हे उद्धवा ! साधूंचें हें चौदावें लक्षण आहे, असें जाण. ४३ नदीबरोबर घाण पाणीहि समुद्राला जाऊन मिळतें. पण त्यामुळें समुद्र जसा तीळभरहि गढूळ होत नाहीं, तो निर्विकार व निर्मळ असतो, ४४ त्याप्रमाणें कितीहि ऊर्मी आल्या तरी त्यामुळें साधूंच्या मनोधर्मांत चल-बिचल मुळींच होत नाहीं. संतांची शांति मोठी पराक्रमी आहे. ती त्यांची उपकारक शक्ति आहे. ४५ ज्याप्रमाणें नागवेलीची वेल वृक्षाच्या आधारानेंच वर चढते त्याप्रमाणें शांति संतांच्या आधारानें वाढून चित्स्वरूपाच्या मंडपावर चढली आहे. अभ्रें दशदिशा व्यापून जरी भरून आलीं तरी आकाश त्यांपासून अलिप्तच असतें. तें अभ्राला स्पर्शहि करीत नाहीं. ४७ शीत, उष्ण किंवा पर्जन्य हीं आकाशाला कधीं लागत नाहींत, त्याप्रमाणें साधूंचें स्वरूप द्वंद्वामध्येंहि निर्द्वंद्व असतें.

॥ ४८ ॥ तैशा उंच नीच नाना अवस्था । निबिड दाटल्या मोहममता । क्षोभु नुपजे ज्याच्या चित्ता । त्या नांव तत्त्वतां निजशांती ॥ ४९ ॥ संतांचेनि शांति गहन । शांतीचेनि संत पावन । हें अनन्य निजलक्षण । पंधरावा गुण संतांचा ॥ ९५० ॥ जैं मीपणें नव्हतें जन्मनाम । तैंच पूर्वजांचें निजधाम । आपुली मिरासी जे उत्तम । तेथ मनोधर्म स्थिरू ज्याचा ॥ ५१ ॥ मज जन्मचि नाहीं झालें । मरण म्यां नाहीं देखिलें । ऐसें मन मूळीं स्थिरावलें । स्थिरता बोलिलें या नांव ॥ ५२ ॥ चहूं आश्रमांहूनि उत्तम । आपुला जो निजाश्रम । तेथें स्थिरावोनि ममोधर्म । वर्णाश्रम चालवी ॥ ५३ ॥ चहूं वर्णांमाजीं पवित्रता । जेणें ब्राह्मणांची ब्राह्मणता । तेथें स्थिराविलें जेणें चित्ता । जाण स्थिरता ती नांव ॥ ५४ ॥ तिहीं लोकीं स्थिरता । मरों टेंकली सर्वथा । कोणी नाहीं प्रतिपाळिता । हातीं धरितां न देखे ॥ ५५ ॥ दारीं राहों नेदी कोणी । कोण देईल पथ्यपाणी । अवघी ठाकली निरंजनीं । ते सज्जनीं प्रतिपाळिली ॥ ५६ ॥ स्थिरता वाढली संतबळें । जिणोनि वर्णाश्रमादि टवाळें । भेदोन अकारादिवर्णपटळें । एके वेळे वाढली ॥५७॥ स्वस्वरूपीं सायुज्यता। पावोनि स्थिरावली स्थिरता। तेथ वाट मोकळी संतां । स्वभावतां त्यां केली ॥ ५८ ॥ तेथ स्वस्वरूपें स्वकर्म । स्वस्वरूपें वर्णाश्रम । स्वस्वरूपें स्वधर्म । स्थिरतासंभ्रम या नांव ॥ ५९ ॥ ऐसी स्वधर्मकर्मीं अवस्था । ती नांव उत्तम स्थिरता । हे सोळावी लक्षणता । मच्छरणता ते ऐक ॥ ९६० ॥ सरिता सागरा शरण आली । समरसोनि सिंधू झाली । तैसी शरण जे वृत्ति मज आली । ते पावली दशा माझी ॥ ६१ ॥ लवण जीवना आलें शरण । तें तत्काळ जाहलें जीवन । तैसा अनन्य मज जो शरण । तो मीचि जाण होऊनि ठाकें ॥ ६२ ॥ मज रिघोनियां शरण । जों वांछी महिमा सन्मान । तो गुळांतील पाषाण । केवळ जाण गुळदगडू ॥ ६३ ॥ जो कां गुंळें

---

४८ त्यामुळें उच्च, नीच इत्यादि नानाप्रकारच्या स्थितींत मोह, ममता कितीहि दाट पसरलेलीं असलीं तरी त्याच्या चित्तांत क्षोभ मुळींच उत्पन्न होत नाहीं. याचेंच नांव खरी आत्मशान्ति ४९ संतामुळेंच शांतीला महत्त्व येतें व शान्तीमुळें संत पावन होतात याप्रमाणें त्यांनीं एकमेकांच्या आधारानें राहणें हें पंधरावें लक्षण आहे. ९५० ज्यावेळीं मीपणानें जन्माचें नांवहि नव्हतें, तेव्हां तेंच पूर्वजांचें निजधाम होतें. त्याची उत्तम मिरास व तेथेंच ज्याचा मनोधर्म स्थिर असतो ५१ व 'माझा जन्म झालाच नाहीं, मरण मीं पाहिलें नाहीं' असें मुळांतच मन स्थिरावलें म्हणजे तीच 'स्थिरता' होय. ५२ आपला जो आश्रम असेल तोच चारहि आश्रमांहून श्रेष्ठ आहे. त्यांतच मनोधर्म स्थिर करून तो वर्णाश्रम चालवितो. ५३ चारहि वर्णांमध्यें ज्याला पवित्रता आली आहे, ज्यानें ब्राह्मणांना ब्राह्मणत्व आलें आहे, त्या ब्रह्मामध्यें चित्त स्थिर झालें म्हणजे 'स्थिरता' सिद्ध होते. ५४ ही स्थिरता सर्व त्रिभुवनांत मरायला टेकली होती तिचा सांभाळ करणारा कोणी नव्हता. तिला कोणी आश्रय देईना. ५५ कोणी दाराशीं उभें करीना. मग पथ्य पाणी कोण करणार ! सर्व तिच्या मरणाची वाट पहात राहिलीं. तेव्हां सज्जनांनीं तिचा प्रतिपाळ केला. ५६ स्थिरता वर्णाश्रमादि मिथ्या भेदांना जिंकून संतांच्या बळावर वाढली. षट्चक्रांतील अकारादि सर्व मातृकांचा भेद करून ती एकदम मोठी झाली. ५७ स्वस्वरूपामध्यें सायुज्यता मिळवून ती तेथेंच स्थिर झाली. तेव्हां तिनें स्वभावतःच संतांना मार्ग मोकळा करून दिला. ५८ स्वस्वरूपानेंच स्वकर्म, वर्णाश्रम व स्वधर्म आचरणें याला स्थिरत्व म्हणतात. ५९ अशी जी स्वधर्म व कर्म यांतील स्थिति तिलाच उत्तम स्थिरता असें म्हणतात. हें सोळावें लक्षण. मच्छरणता ९६० मला शरण येणें, आतां त्याविषयीं ऐक. ९६० नदी समुद्राला शरण गेली कीं, ती त्याच्याशीं एकरूप होऊन समुद्रच बनते. त्याप्रमाणें जी वृत्ति मला शरण येते ती मत्स्वरूपच बनते. ६१ मीठ पाण्याला शरण गेलें कीं, ते लगेच जलरूप होतें, त्याप्रमाणें मला जो अनन्य शरण येतो तो मत्स्वरूपच होऊन रहातो. ६२ जो मला शरण येऊन स्वतःची कीर्ति, सन्मान मिळविण्याची इच्छा करितो तो गुळांतील खड्यासारखा केवळ गुळदगडच जाणावा. ६३ गुळानें माखलेला दगड वरून वरून अगदीं गोड लागतो; पण

माखिला दगडू । तो पाहतां दिसे वरिवरी गोडू । शेखीं परिपाकीं निवाडू । अतिजडू कठिणत्वें ॥ ६४ ॥ तैसें वरिवरी दावी माझें भजन । हृदयीं विषयअभिलाषण । तो नव्हे माझा अनन्यशरण । अतिदूषण लोभाचें ॥ ६५ ॥ सर्वांगीं सुंदर सुरेख । जिच्या नाकावरी पांढरें ठीक । तिसी वरीना साधु लोक । तैसा विषयलोभु देख मद्भजनीं ॥ ६६ ॥ रांडवा केलें काजळकुंकूं । देखोनि जग लागे थुंकूं । तैसा विषयांचा अभिलाखू । जेवीं वोकिला वोकूं अतिनिंद्य ॥ ६७ ॥ त्रैलोक्यसाम्राज्यवैभव जाण । जो थुंकोनि रिघाला मज शरण । तो समरसें मीचि जाण । मानापमान त्या कैंचा ॥ ६८ ॥ या नांव मच्छरण । हें सतरावें लक्षण । उद्धवा जाण संपूर्ण । मननगुण तो ऐक ॥ ६९ ॥ श्रुतिगुरुवाक्यनिरूपण । ऐकतां अद्वैतश्रवण । युक्तिप्रयुक्तीं पर्यालोचन । मनन गुण त्या नांव ॥ ९७० ॥ अग्निकापुरा भेटी होतां । तो अग्नीचि होय वस्तुतां । तेवीं माझे स्वरूपीं मन ठेवितां । मन चित्स्वरूपता पावलें ॥ ७१ ॥ मन चिदंशें असे जाण । तें चिन्मात्र जाहलें करितां मनन । जेवीं जीवनीं जन्मलें लवण । तें होय जीवन निजमिळणीं ॥ ७२ ॥ असो मननाचेनि लवलाहें । मन जेथवरी जावों पाहें । तेथवरी तया मीचि आहें । न वचतां राहें तेथही मी ॥ ७३ ॥ दीप जेउतां जाऊं बैसे । तेउता प्रकाशचि तया असे । कोठेंही न वचोनि ठायीं बसे । तेथेंही वसे प्रकाशू ॥ ७४ ॥ तैसें माझें करितां मनन । मद्रूपचि जाहलें मन । मग करितां गमनागमन । मद्रूपता जाण मोडेना ॥ ७५ ॥ एवं माझें स्वरूप जें केवळ । तेथें मद्रूपें मन निश्चळ । ध्रुवाचे परी अचंचळ । मननशीळ त्या नांव ॥ ७६ ॥ मुनि या पदाचें व्याख्यान । मननशीलता जाण । हें अठरावें लक्षण । तें हें निरूपण सांगितलें ॥ ७७ ॥ अत्यंत गोड निरूपण । पुढिले श्लोकीं दशलक्षण । तें ऐकावया उद्धव सावधान । सर्वांगीं कान होऊनि ठेला ॥ ७८ ॥

शेवटीं तो कठिणपणामुळें जड असतो व गुळासारखा विरघळत नाहीं, पाक करितेवेळीं त्याचा भेद कळतो. ६४ त्याप्रमाणें जो वरून माझें भजन दाखवितो, पण मनांतून त्याला विषयांचा अभिलाष असतो, तो खरोखर मला अनन्य शरण आलेला नसतो. त्याच्यांत लोभाचें मोठें दूषण असतें. ६५ ज्याप्रमाणें एखादी कुमारिका सर्वांगसुंदर आहे. पण तिच्या नाकावर कोडाचा पांढरा डाग आहे, तर कोणीहि सूज्ञ तिच्याशीं विवाह करीत नाहीं. त्याप्रमाणें माझ्या भजनांत तत्पर असलेल्या माणसाचा विषयलोभ त्या डागाप्रमाणेंच आहे, असें निश्चयानें जाण. ६६ विधवेनें जर काजळ-कुंकू लाविलें तर सर्व जगत् तिच्याकडे पाहून थुंकूं लागेल, त्याप्रमाणें ओकलेल्या वांतीसारखा हा विषयांचा अभिलाष अत्यंत निंद्य आहे. ६७ जो सर्व त्रिभुवनाच्या साम्राज्यवैभवाला तुच्छ लेखून मला शरण आला, तो माझ्याशीं एकरूपच झाला; मग त्याला मान-अपमान कोठचा ! ६८ याचेंच नांव मच्छरण. हें सतरावें लक्षण झालें. हे उद्धवा ! आतां मनन, हा गुणहि सविस्तर ऐक. ६९ वेदशास्त्रांतील तत्त्वें, गुरुमुखानें ऐकिलेलें निरूपण व वेदांतांचें श्रवण, यांचा वारंवार विचार करणें याला मनन असें म्हणतात. ९७० ज्याप्रमाणें कापुराची अग्नीशीं गांठ पडली कीं, तो अग्निच होतो, त्याप्रमाणें माझ्या स्वरूपांत मन ठेविलें कीं तें मन चित्स्वरूपालाच प्राप्त होतें. ७१ ज्याप्रमाणें मीठ समुद्राच्या पाण्यापासूनच उत्पन्न होत असल्यामुळें तें पाण्यांत टाकतांच पाण्यांत मिळून जातें, त्याप्रमाणें मन वास्तविक चित्ताचाच अंश आहे. म्हणून मनन केल्यानें तें चित्स्वरूप बनतें, ७२ असो. मननाच्या सामर्थ्यानें मन जेथपर्यंत जाऊं पहातें, तेथपर्यंत त्याच्याबरोबर मीच असतों. ७३ दीप जेथें जाऊन बसतो तेथें त्याच्याबरोबर जसा प्रकाश असतो, त्याप्रमाणें माझें चिंतन करण्यांत मन मद्रूपच होतें. ७४ मग कितीहि ‘ जा, ये ’ केली तरी मद्रूपत्व मोडत नाहीं, ७५ याप्रमाणें माझ्या शुद्ध स्वरूपांत मन मत्स्वरूपानें अढळ झालें म्हणजे त्याला ‘ मननशील ’ असें म्हणतात, ७६ ‘ मुनि ’ या शब्दाचा अर्थ मननशीलता असा समज. हें अठरावें लक्षण मीं स्पष्ट करून सांगितलें. ७७ पुढील श्लोकांत दहा लक्षणांचें जें गोड निरूपण भगवान् करणार आहेत, तें ऐकण्यास उद्धव सावधान चित्तानें कान देऊन बसला. ९७८.

अप्रमत्तो गभीरात्मा धृतिमान् जितषड्गुणः । अमानी मानदः कल्पो मैत्रः कारुणिकः कविः ।। ३१ ।।

जंववरी वृत्तिशून्य नव्हे मन । तंववरी विश्वासेना विचक्षण । वृत्तिरूपें सिंतरील जाण । यालागीं सावधान निजबोधें ।। ७९ ।। हां हो दुर्वासाऐसा सज्ञान । त्यासी क्षणक्षणां क्षोभवी मन । न विचारितां गुणागुण । शाप दारुण देवों धांवे ।। ९८० ।। दुर्गंधा जन्मली मत्स्याचे पोटीं । पराशर नाडला तीसाठीं । नारद कौतुक पाहतां दिठीं । केला गंगातटीं नारदी ।। ८१ ।। आपुली कन्या देखोनि गोमटी । मनक्षोभें भोगावया उठी । ब्रह्मा धांवे सरस्वतीपाठीं । जो कां सृष्टिपितामहो ।। ८२ ।। या मनाऐसें नाडक । जगामाजीं नाहीं आणिक । छळछद्में नाडी ज्ञाते लोक । साधु घातक मनाचे ।। ८३ ।। म्हणाल मनेंवीण भोग घडे । तरी वृत्तीसी क्षोभू कां पां चढे । हे बोल बोलती ते सज्ञान वेडे । साधूसी नावडे हे गोष्टी ।। ८४ ।। अधिष्ठूनि सत्वगुण । सूक्ष्मरूपें वृत्ति जाण । ते क्षोभवूनियां मन । मी मुक्त म्हणोन विषयी करी ।। ८५ ।। मुक्ताभिमानें विषयासक्ती । हेचि मनक्षोभाची प्राप्ती । वृत्ति असोनियां मुक्ती । साधु न मानिती सर्वथा ।। ८६ ।। अतिनाटकी नाटक मन । मुक्तत्वें धरी अभिमान । त्याचें करावया निर्दळण । साधु सावधान निजबोधें ।। ८७ ।। मुखीं धरिल्या कृष्णसर्पासी । ढिलें करितां तो तत्काळ ग्रासी । मरे तंववरी आंवळावें त्यासी । तेवीं मनासी निर्दाळिती ।। ८८ ।। ।। ८८ ।। मन निर्दाळावें सावधानता । बोलिली ते हे साधुसंमता । हा एकुणिसावा गुण सर्वथा । ऐक आतां विसावा ।। ८९ ।। वर्षाकाळीं जळबळें सरिता । आल्या समुद्र नुचंबळे श्लाघ्यता । उष्णकाळीं

अप्रमत्तः–सावधान, गभीरात्मा–निर्विकार, धृतिमान्–विपत्तीमध्येंहि कृपण न होणारा, जितषड्गुणः–क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा व मृत्यु या सहा ऊर्मींना ज्यानें जिंकिलें आहे असा, अमानी–मानाची अपेक्षा न करणारा, मानदः–इतरांना मान देणारा, कल्पः–दुसऱ्यांस बोध करण्यांत दक्ष, मैत्रः–कोणालाहि न फसविणारा, कारुणिकः–केवळ करुणेनेंच प्रवृत्ति करणारा, दुष्ट लोभानें नव्हे, कविः–यथार्थज्ञानी. [यांत दहा लक्षणें सांगितलीं.] ३१.

जोंपर्यंत मन वृत्तिशून्य होत नाहीं. तोंपर्यंत विद्वानांचा त्यांवर विश्वास बसत नाहीं. वृत्तीच्या रूपानें मन केव्हां फसवील याचा नेम नाहीं. म्हणून आत्मज्ञानानें तो नेहमीं सावध असतो. ७९ अहो ! दुर्वासासारखा ज्ञानी, पण त्याचेंहि मन क्षणोक्षणीं क्षुब्ध होत होतें व गुण-अवगुणाचा विचार न करितां तो भयंकर शाप देण्यास धांवत होता. ९८० मत्स्याच्या पोटीं जन्मलेली दुर्गंधा, तिच्यासाठीं पराशर या वृत्तीमुळेंच नाडला गेला. नारद गंगेच्या तीरावर नुस्ता कौतुक पहात जों उभा राहिला, तो तो स्वतःच 'नारदी' झाला. ८१ सर्व विश्वाचा जो पितामह ब्रह्मदेव तो आपलीच सुंदर कन्या जी सरस्वती तिला पाहून क्षुब्ध झाला व भोगाभिलाषानें तिच्या पाठीस लागला. ८२ यास्तव या मनासारखें नाडणारें जगांत दुसरें कांहीं नाहीं. तें नानाप्रकारचा छळ करून चांगल्या विद्वान् लोकांनाहि नाडितें. ८३ आतां तूं जर असें म्हणशील कीं, मनावांचून शरीराचा भोग घडतो, तर मग वृत्ति तरी क्षुब्ध कां व्हावी ! पण हे उद्धवा, असें बोलणारे मूर्ख होत. साधूंना हें भाषण आवडत नाहीं. ८४ सत्त्वगुणाच्या आश्रयानें वृत्ति सूक्ष्मरूपानें रहात असते. ती मनाला क्षुब्ध करून 'मी मुक्त' म्हणून त्याला विषयीं बनविते. ८५ मुक्ताभिमानानें होणारी विषयासक्ति हेंच मनःक्षोभाचें कारण आहे. जोंपर्यंत वृत्ति आहे तोंपर्यंत साधु मुक्ति मानीत नाहींत. ८६ मन अत्यंत नाटकी नट आहे. तें मुक्तपणानें अभिमान धरितें. दक्ष असलेला साधु आत्मज्ञानानें त्याचें निर्दालन करितो. ८७ कृष्णसर्पाचें तोंड धरून ठेवावें लागतें. तें जरा सैल सोडिलें की, लगेच तो दंश करितो. त्याला मरेपर्यंत घट्ट दाबून ठेवावें लागतें. त्याप्रमाणें साधु मनाचें निर्दालन करितात. ८८ मनाचें निर्दालन करणें हीच सावधानता होय. साधुसंतांचा हा एकोणिसावा गुण झाला. आतां विसावा गुण ऐक. ८९ पावसाळ्यांत नद्या पाण्याच्या मोठ्या ओघानें जरी येऊन मिळाल्या तरी समुद्राला त्यामुळें

त्या न येतां । क्षोभोनि सर्वथा आटेना ॥ ९९० ॥ तैसें जाहलिया समृद्धिधन । साधूचें उल्हासेना मन । सकळ जाऊनि जाल्या निर्धन । दीनवदन हों नेणे ॥ ९१ ॥ दिवसराती येतांजातां । प्रकाशें पालटेना सविता । तेवीं आल्यागेल्या नाना अवस्था । गंभीरता अक्षोभ्य ॥ ९२ ॥ कडकडीत विजेचे कल्लोळ । तेणें गगनासी नव्हे खळबळ । तैसा नाना ऊर्मींमाजी निश्चळ । गांभीर्य केवळ त्या नांव ॥ ९३ ॥ हे संताची गंभीरता । विसांवा जीवशिवांसी तत्त्वतां । हे विसावी संताची अवस्था । धृतीची व्यवस्था अवधारीं ॥ ९४ ॥ मनबुद्ध्यादि इंद्रियें प्राण । निजधैर्यें धरोनि आपण । नित्य केलिया आत्मप्रवण । परतोनी जाण येवों नेदी ॥ ९५ ॥ स्वयंवरीं जिणोनि अरिरायासी । बळें आणिलें नोवरीसी । तो जाऊं नेदी आणिकापासीं । तेवीं वृत्तीसी निजधैर्य ॥ ९६ ॥ वागुरें बांधिल्या मृगासी । पारधी जाऊं नेदी त्या वनासी । तेवीं धैर्य आकळूनि मनासी । देहापाशीं येऊं नेदी ॥ ९७ ॥ देहासी नाना भोगसमृद्धी । वावूनियां गजस्कंधीं । ऐसें सुख होतां त्रिशुद्धी । मनासी देहबुद्धि धरूं नेदी ॥ ९८ ॥ प्रळयकाळाच्या कडकडाटीं । महाभूतां होतां आटाटी । तरी मनासी देहाची भेटी । धैर्य जगजेठी होंचि नेदी ॥ ९९ ॥ तेथ काळाचेनि हटतटें । वृत्ति परब्रह्माचिये वाटे । लावूनियां नेटेंपाटें । चिन्मात्रपेठे विकिली ॥ १००० ॥ तेथ स्वानंदाचा ग्राहकु । तत्काळ भेटला नेटकु । त्यासी जीवेंसहित विवेकु । घालूनि आंखू संवसाटी केली ॥ १ ॥ या नांव धृतीचें लक्षण । हा एकविसावा साधूचा गुण । आतां जिंतिलें जे षड्गुण । तेंही लक्षण अवधारीं ॥ २ ॥ स्वानंदें तृप्त झाला । यालागीं क्षुधेसी मुकला । जगाचे जीवनीं निवाला । तृषा विसरला निःशेष ॥ ३ ॥ भोगितां निजात्मसुख । विसरला शोकदुःख । चिन्मात्रज्ञानें निर्धक । त्यासंमुख मोहो न ये ॥ ४ ॥ तिहीं अवस्थां बाहिरा । वसिन्नला

आपल्या ऐश्वर्याचा डौल कधींहि वाटत नाहीं, किंवा उन्हाळ्यांत नद्या येऊन मिळाल्या नाहींत तर तो रागावून कधीं आटत नाहीं, ९९० त्याचप्रमाणें द्रव्याची समृद्धि झाली असतां साधूला हर्ष होत नाहीं, किंवा सर्व संपत्ति जाऊन तो निर्धन झाला तरी त्यासाठीं खिन्न होत नाहीं. ९१ रात्र व दिवस हीं आलीं किंवा गेलीं तरी त्यानें सूर्याच्या प्रकाशांत जसा पालट होत नाहीं, त्याप्रमाणें नानाप्रकारच्या अवस्था आल्या व गेल्या तरी साधूचा गंभीरपणा कायम रहातो. ९२ मोठा कडकडाट होऊन विजेचा कल्लोळ उठला तरी त्यामुळें आकाश जसें भीतीनें हादरत नाहीं, त्याप्रमाणें अनेकप्रकारच्या ऊर्मींत तो निश्चल असतो, तो गंभीर व त्याच्याच वृत्तीला गांभीर्य हें नांव आहे. ९३ संतांची ही गंभीरता म्हणजे जीवा-शिवांची विश्रांतिच आहे. हें संतांचें विसावें लक्षण समज. आतां धृतीचें स्वरूप ऐक. ९४ तो मन, इंद्रियें व प्राण यांना धैर्यानें आंवरून ठेवितो व त्यांना आत्मोन्मुख करून पुनः परत फिरूं देत नाहीं. ९५ स्वयंवरांत बलाढ्य शत्रूंना जिंकून आपल्या पराक्रमानें वधू मिळविल्यावर तिला जसा तिचा पति दुसऱ्या कोणाला वरण्यास मोकळी सोडीत नाहीं, तसा साधु आपल्या वृत्तीला कोठें जाण्यास मोकळी सोडीत नाहीं. ९६ जाळ्यांत धरलेल्या हरिणाला पारधी जसा परत वनांत जाऊं देत नाहीं, त्याप्रमाणें साधु धैर्यानें वृत्तीला बांधून तिला परत देहापाशीं येऊं देत नाहीं. ९७ देहाला अनेक प्रकारचें सुख मिळालें, त्याला हत्तीवर बसविलें, तरी साधु मनाला देहबुद्धि धरूं देत नाहीं, ९८ किंवा प्रलयकाळच्या गर्जनेनें पंचमहाभूतांचा जरी नाश होण्याचा प्रसंग आला तरी तो जगजेठी मनाची व देहाची भेटच होऊं देत नाहीं. ९९ काळाशीं झगडून तो वृत्तीला परब्रह्माकडे लावितो व चिन्मात्र पेठेंत तिला निश्चयानें विकून टाकितो. १००० तेथें त्याला स्वानदग्राहक नेमका भेटतो, जीवासह प्राणाला त्याच्या पदरांत घालून त्याच्यापासून विवेकाचा मोबदला घेतो. १ हेंच धृतीचें लक्षण आहे. हा साधूचा एकविसावा गुण आहे. आतां षड्विकार जिंकण्याचें लक्षण ऐक. २ साधु स्वानंदानें तृप्त झाला, त्यामुळें त्याची भूक नाहींशी झाली, जगांतील जलानें तो शांत झाला व त्यामुळें तहान पूर्णपणें विसरला, ३ म्हणजे मग आत्मसुखाचा अनुभव घेत असतां चिन्मात्र ज्ञानानें तो शोक व दुःख साफ विसरतो. त्याच्या समोर मोह उभाहि रहात नाहीं. ४ जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्थांच्या बाहेर आत्मज्ञानाच्या ओवरींत तो रहातो.

निजबोधवोवरा । तेथें जरा जाली अतिजर्जरा । कांपत थराथरां पळाली ॥ ५ ॥ मिथ्या जालें कार्य-कारण । देहाचें देहपणें नेदखे भान । तंव मरणासीचि आलें मरण । काळाचें प्राशन तेणें केलें ॥ ६ ॥ यापरी गा हे षड्गुण । अनायासें जिंतोन । सुखें वर्तती साधुजन । हें लक्षण बाविसावें ॥ ७ ॥ आपुला स्वामी देखे सर्वां भूतीं । तेथ मान इच्छावा कवणाप्रती । मानाभिमान सांडिले निश्चितीं । अतिनम्र वृत्तीं वर्तणें ॥ ८ ॥ आधीं देहीं धरावा अभिमान । मग इच्छावा अतिसन्मान । तंव देहाचें खुंटलें भान । मानाभिमान बुडाले ॥ ९ ॥ या नांव गा अमानिता । हे तेविसावी लक्षणता । साधु सन्मानाचा दाता । तेही कथा अवधारीं ॥ १०१० ॥ ब्रह्मादि मशकवरी । सर्वांतें वंदीं शिरीं । एकनिष्ठता चराचरीं । बुद्धि दुसरी जाणेना ॥ ११ ॥ सर्व भूतीं स्वामी देखे । लोटांगणें घाली हरिखें । सुर नर खर हे नोळखे । अतिसंतोखें वंदित ॥ १२ ॥ नाना अलंकार घडिलें गुणें । सोनें सोनेपणा नव्हेच उणें । तेवीं नामरूपांचे विंदाणें । पालटु मनें घेऊं नेणे ॥ १३ ॥ साकरेची निंबोळी केली । परी ते कडूपणा नाहीं आली । तेवीं सूकरादि योनी जरी जाली । तरी नाहीं भंगली चित्सत्ता ॥ १४ ॥ सागरीं नाना परींचें विक्राळ । जरी उठिले अनंत कल्लोळ । ते जेवीं गा केवळ जळ । तेवीं वस्तु सकळ भूतमात्रीं ॥ १५ ॥ यापरी सकळ भूतां । साधु सन्मानातें देता । हे चोविसावी लक्षणता । परबोधकता ते ऐक ॥ १६ ॥ जैसा भावो जैशी श्रद्धा । तैसतैशा करूं जाणे बोधा । ज्ञान पावोनि नव्हे मेधा । स्वरूपश्रद्धा प्रबोधी ॥ १७ ॥ एक ज्ञान पावोनि जाहला पिसा । पडिला अव्यवस्थ ठसा । नोळखेचि सच्छिष्याची दशा । योग्य उपदेशा तो नव्हे ॥ १८ ॥ एकज्ञान आश्चर्यें कोंदला । विस्मयें तटस्थ होउनि ठेला । काष्ठलोष्ठांचेपरी

तेथें ह्यातारी जरा अगदीं जर्जर होऊन थरथरां कांपत पळून गेली. ५ कार्यकारण मिथ्या झालीं. देहपणानें देहाचें मानहि राहिलें नाहीं. त्यामुळें मरणाला मरण येऊन त्यानें काळालाहि ग्रासून टाकिलें. ६ याप्रमाणें या षड्गुणांना सहज जिंकून साधुलोक सुखानें रहातात. हें बाविसावें लक्षण समज. ७ आपला स्वामी त्याला सर्व भूतांत दिसत असतो तेव्हां कोणापासून मनाची इच्छा करावयाची ! यास्तव मनाचा अभिमान सोडून तो नम्र-वृत्तीनेंच वागत असतो. ८ आधीं देहावर अभिमान ठेवावा व मग सन्मानाची इच्छा करावी. पण देहाचें भानच खुंटल्यामुळें मानाभिमान बुडाला ९ याचेंच नांव अमानिता. हें साधूचें तेविसावें लक्षण जाणावें. साधु सन्मान देणारा असतो. तेंहि कथानक आतां ऐक. १०१० साधु ब्रह्मदेवापासून क्षुद्र कीटकापर्यंत सर्वांना शिरसा वंदन करितो. चराचरांतील एकनिष्ठेवांचून अन्य बुद्धि तो जाणत नाहीं. ११ सर्व भूतांमध्यें तो स्वामीलाच पहातो व मोठ्या आनंदानें त्यांना लोटांगण घालितो. हा देव, हा मनुष्य किंवा हा गाढव हें तो जाणत नाहीं. सर्वांनाच अतिशय संतोषानें वंदन करितो. १२ सोन्याचे विविध आकाराचे अनेक अलंकार जरी घडविले तरी त्यांतील सोन्याचा सोनेपणा जसा जात नाहीं, त्याचप्रमाणें नांव व रूप यांच्या भेदानें साधूचें मन पालटत नाहीं. १३ साखरेची निंबोणी म्ह० कडुलिंबाचें फळ जरी बनविलें तरी त्याची चव कांहीं कडु होत नाहीं मूळ साखरेची गोडीच जशी त्यांत असते; त्याचप्रमाणें डुकराच्या योनींत जरी जन्म झाला तरी त्या देहांतील चित्सत्तेंत कधीं बदल होत नाहीं. १४ समुद्रांत असंख्य व नानाप्रकारच्या भयंकर लाटा जरी उसळल्या तरी ते जसें स्वरूपानें केवळ पाणीच असतें, तसेंच सर्व प्राणिमात्रांत केवळ आत्मतत्त्वच भरलेलें आहे. १५ याप्रमाणें साधु सर्व प्राण्यांना मान देतो. हें चोविसावें लक्षण झालें. आतां त्याची 'परबोधकता' ऐक. १६ जसा ज्याचा भाव व जशी त्याची श्रद्धा असते, तसा त्यांस उपदेश करण्याचें साधु जाणितो. ज्ञान प्राप्त झाल्यावरहि, त्याला ज्याची आवड नसली तरी साधु स्वरूपावरील श्रद्धेचा उपदेश करितो. १७ कोणी ज्ञान मिळवून वेडा होतो व त्याच्या मनावर अयोग्य ठसा उमटतो. सच्छिष्याची स्थिती कशी असते, हें तो जाणत नाहीं, तो उपदेशाला योग्य नाहीं. १८ कोणी ज्ञानाच्या आश्चर्यानें इतका थक्क होतो कीं, विस्मयानें अगदीं स्तब्ध होऊन

पडला । नाहीं उरला उपदेश ।। १९ ।। एक ज्ञान पावोनि अतिकृपण । जीव गेलिया न बोले जाण । भेणें भेणें धरूनि मौन । न बोले वचन सर्वथा ।। १०२० ।। ज्यासी धनकोडी जोडी जाहली । ते पुरूनि वरी दगड घाली । दान न देतां वृथा गेली । संपत्ति केली शुविसवती ।। २१ ।। तैसें कष्टीं जोडूनि निजज्ञान । सत्पात्रीं न करीच दान । हें ज्ञात्याचें कृपणलक्षण । वंचकपण स्वभावें ।। २२ ।। एक ज्ञान पावोनि सांगों जाये । उपदेशीं शिष्या बोधू नोहे । तें ज्ञान अबीज जाहलें पाहें । अंकुरां न लाहे सत्क्षेत्रीं ।। २३ ।। सधन शिष्य करावया जाण । स्वयें प्रयत्न करी पूर्ण । आमुची दीक्षा अनुभव गहन । यापरी ज्ञान विकरां घाली ।। २४ ।। जैसेनि प्रलोभे त्याचें मन । तैसें निरूपी निरूपण । अर्थस्वार्थें उपदेश पूर्ण । धनलोभें ज्ञान निर्वीर्य होये ।। २५ ।। पेवीं रिघालिया पाणी । त्या धान्याची नव्हे पेरणी । तेवीं धनलोभ रिघालिया ज्ञानीं । उपदेशें कोणी सुखी नव्हे ।। २६ ।। शिष्य बोधेंवीण झुरे अंतरीं । गुरु गुरुपणें गुरगुरी । ते बोधकता नव्हे खरी । घरच्या घरीं चुकामुकी ।। २७ ।। शब्दज्ञानें पारंगत । जो ब्रह्मानंदें सदा डुल्लत । शिष्यप्रबोधनीं समर्थ । तो मूर्तिमंत स्वरूप माझें ।। २८ ।। हो कां मी जैसा अवतारधारी । तैसाचि तोही अवतारी । चिद्रत्नाच्या अलंकारीं । अलंकारी कुसरीं सच्छिष्यां ।। २९ ।। तो मी या शब्दकुसरीं । नांवाचीं अंतरें बाहेरीं । आंतुवटें निजनिर्धारीं । एके घरीं नांदत ।। १०३० ।। एकचि बहुतांतें उपदेशी । एकाची प्राप्ति सुटंक कैशी । एकें अज्ञानें जैशीं तैशीं । हा बोल कोणासी म्हणाल ।। ३१ ।। कृषीवल पेरणी करी । भूमिपाडें पिकती धुमरी । अंकुरेना क्षितितळीं उखरीं । तें बीज निर्धारीं अतिशुद्ध ।। ३२ ।। भूमीचि सखरनिखर । बीज पावन गा साचार । भाविकीं उपदेशा विस्तर ।

रहातो. तो काष्ठ-पाषाणासारखा पडून रहातो. तेथें उपदेश शिल्लकच रहात नाहीं. १९ कोणी ज्ञानप्राप्ति झाल्यावर अतिशय कृपण होतो. जीव गेला तरी बोलत नाहीं. भीतीनें मौन धरून बसतो व तोंडांतून एक शब्द काढीत नाहीं. १०२० एखाद्याला अगणित संपत्ति मिळून तो कोट्यधिश झाला तरी तो तें धन जमिनींत पुरून त्यावर दगड ठेवितो. कोणाला एवढेंसें देखील दान न देतां तो जसा ती सर्व संपत्ति जमिनींत पुरून ठेवितो, २१ त्याप्रमाणें मोठ्या परिश्रमानें कष्ट करून संपादिलेलें ज्ञान तो केव्हांहि सत्पात्रालाहि देत नाहीं. हेंच ज्ञात्याच्या कृपणपणाचें लक्षण आहे. ही स्वभाविक फसवणूक आहे. कोणी ज्ञान मिळवून तें दुसऱ्याला सांगायला जातात, पण त्यांचा तो उपदेश शिष्यांना कांहींच समजत नाहीं; अशा ज्ञानाला निःसत्त्व म्हणतात. कारण त्या ज्ञानरूपी बीजापासून शिष्यरूपी शेतांत एखादा अंकुरहि फुटत नाहीं. २३ कोणी धनिक शिष्य मिळविण्याचा झटून प्रयत्न करितात. 'आमचा अनुभव व दीक्षा फार गूढ आहे,' असें म्हणून ते आपल्या ज्ञानाचा विक्रय मांडितात. २४ ज्यायोगें शिष्याचें मन आकर्षण केलें जाईल असाच उपदेश त्याला करावा. द्रव्यलोभानें उपदेशिलेलें ज्ञान निःसत्त्व बनतें. २५ धान्याच्या पेवांत एकदा पाणी शिरलें कीं, मग त्या धान्याची जशी पेरणी करितां येत नाहीं त्याप्रमाणें ज्ञात्याच्या मनांत धनलोभ शिरला कीं, त्याच्या उपदेशानें कोणी सुखी होत नाहीं. २६ ज्ञानावांचून शिष्य मनांत झुरत असतो व गुरु आपल्या गुरुपणाच्या अधिकारांत त्याच्यावर गुरगुरत असतो. तो कांहीं खरा उपदेश नव्हे. ती घरांतल्या घरांत चुकामूक होय. २७ जो शब्दज्ञानांत प्रवीण असून सतत ब्रह्मानंदांत डुलत असतो आणि शिष्याला उपदेश करण्यास समर्थ असतो तो साक्षात् माझें स्वरूपच आहे, २८ असें समजावें. मीं जसा अवतार धारण केला आहे, तसा तोहि अवतारीच आहे. म्हणून तो चिद्रत्नाच्या भूषणानें सच्छिष्याला मोठ्या कौशल्यानें अलंकृत करितो. २९ तो व मी या दोन नांवांत नुस्तें शब्दमात्र अंतर आहे. अंतरंगानें आम्ही दोघेहि एकाच घरांत नांदत असतों. १०३० तो एकच असून अनेकांना उपदेश करितो. पण एखादा त्या उपदेशानें सज्ञान होतो व दुसरा अज्ञानच रहातो. तेव्हां याचा दोष कोणाकडे ! असें जर म्हणशील तर ऐक. ३१ शेतकरी पेरणी करितो. जेथें जमीन सुपीक असते तेथें भरपूर पीक येतें व माळ जमिनींत एक अंकुरहि उगवत नाहीं; पण तें बीज मात्र खात्रीनें शुद्धच असतें. ३२ जमीन सरस-

विकल्पी नर सुनाट ॥ ३३ ॥ जो जैसा देखे अर्थ । तोचि बोधूनि करी परमार्थ । ऐसा परबोधनीं समर्थ । गुण विख्यात पंचविसावा ॥ ३४ ॥ साधूची मैत्री चोखट । वोळखी सर्वांसी जुनाट । सर्वांचा सखा श्रेष्ठ । सर्वांसकट सारिखा ॥ ३५ ॥ सुहृद सर्वांचा सोयरा । सर्वांचा जिवलगु खरा । होऊनि सर्वांहिबाहिरा । मित्राचारा चालवी ॥ ३६ ॥ सांगतां आपुली गुह्य गोष्टी । अळोंचावया वेगळा नुठी । आप्तभावें देखे सृष्टी । अवंचक पोटीं सर्वांसी ॥ ३७ ॥ क्षीरनीरांची मैत्री जैशी । भेद नाहीं मिळणीपाशीं । साधू सर्व जीव समरसी । अभेदभावेंसीं मित्रत्वें ॥ ३८ ॥ परम मैत्रीचा भावो देख । दुःख हिरोनि द्यावें सुख । साधू जीवांचें निरसोनि दुःख । परम सुख देतसे ॥ ३९ ॥ नवल मैत्रीचें महिमान । सखा सर्वांचा पुरातन । सर्वांसी नीच नवें सौजन्य । अवंचकपण सर्वदा ॥ १०४० ॥ बंधूहूनि मित्र अधिकु । पुत्राहूनि मित्र विश्वासिकु । तो मित्र जैं जाहला वंचकु । तैं केवळ ठकु तो जाणावा ॥ ४१ ॥ मनें धनें कर्तव्यता । ज्याची अनन्य अवंचकता । त्या नांव परम मित्रता । हे खूण तत्त्वतां जाणावी ॥ ४२ ॥ समूळ मैत्रीचें निरूपण । विशद सांगीतलें जाण । हें सव्विसावें साधुलक्षण । कारुण्यपण तें ऐका ॥ ४३ ॥ प्रत्युपकार न वांछितां । मी कारुणिक हें नाहीं अहंता । ऐसेनि दीनदुःख निवारितां । कारुण्य सर्वथा त्या नांव ॥ ४४ ॥ रसपूजा धरोनि पोटीं । वैद्य वोखदांच्या सोडी गांठी । कां संभावना सूनि दिठी । सांगे गोठी पुराणिक ॥ ४५ ॥ ऐसी वर्तणूक सर्वथा । ते लागली विषयस्वार्था । साधूची नव्हे तैशी कथा । नैराश्यता दयाळू ॥ ४६ ॥ दयार्णवें द्रवली दृष्टी । तन मन धन वेंचूनि गांठी । अनाथावरी करुणा मोटी । उद्धरी संकटीं दीनातें ॥ ४७ ॥ जैसा कळवळ

नीरस असते, तेथें बीजाकडे कांहीं दोष नसतो. तें खरोखर उत्तमच असतें. त्याप्रमाणें भाविकजन हेंच उपदेशाला उत्तम क्षेत्र आहे. विकल्प करणारे निव्वळ माळ जमीनीसारखेच होत. ३३ ज्याचें मन ज्यांत आसक्त असेल, त्याचाच त्याला उपदेश करून जो परमार्थ करितो व दुसऱ्याला बोध करण्यास असा समर्थ असतो, त्याच्याच ठिकाणीं परबोधकता असते. हा साधूचा पंचाविसावा प्रख्यात गुण जाणावा. ३४ साधूंची मैत्रीहि श्रेष्ठच असते. सर्वांशीं त्याची फार जुनी ओळख असते. तो सर्वांबरोबर सारख्या स्नेहानें वागत असल्यामुळें तो सर्वांचा श्रेष्ठ स्नेही असतो. ३५ तो सर्वांचा सुहृद्, आप्त, जिवलग असतो. तो सर्वांपासून दूर राहून आपलें मित्रत्व राखितो. ३६ आपली एखादी गुप्त गोष्ट देखील तो दुसऱ्याला सांगतो. सर्व सृष्टि त्याला आपली आप्तच दिसते. त्याच्या मनांत कपट मुळींच नसतें. ३७ दूध व पाणी यांची जशी मैत्री असते, तीं एकत्र होतांच त्याच्यांत जसा कांहीं भेद रहात नाहीं, त्याप्रमाणें साधु सर्व प्राण्यांशीं एकरूप झालेला असल्यामुळें त्याची मैत्री अभेदभावानें असते. ३८ दुसऱ्याचें दुःख नाहींसें करून त्याला सुख देणें हें उत्कट मैत्रीचें लक्षण आहे. त्याप्रमाणें साधु सर्व जीवांचें दुःख घालवून त्यांना अत्यंत सुख देत असतो, ३९ त्याच्या मैत्रीचा महिमा मोठा अगाध आहे. तो सर्वांचा जुनाच स्नेही असतो. त्यामुळें सर्वांबरोबर तो नित्य नव्या सौजन्यानेंच वागत असतो. तो नेहमीं निष्कपट असतो. १०४० मित्र बंधूहूनहि अधिक आहे. तो पुत्रापेक्षांहि जास्त विश्वासू आहे. पण अशा मित्रानें जर विश्वासघात केला तर त्याला भामटा समजावें. ४१ मनानें व धनानें साह्य करणें आणि अनन्य भावानें निष्कपट वागणें याचेंच नांव खरी मैत्री. ही त्याची मुख्य खूण जाणावी. ४२ मैत्रीचें सविस्तर निरूपण स्पष्ट करून सांगितलें. हें साधूंचें सव्विसावें लक्षण होय. आतां त्याचें कारुण्य ऐक. ४३ जो केलेल्या उपकाराच्या फेडीची इच्छा करीत नाहीं, मी दयाळु असा अभिमान धरीत नाहीं, अशाप्रकारें जो आर्तांचें दुःखनिवारण करितो त्याला करुण असें म्हणतात. त्याच्याच ठिकाणीं करुणा रहाते. ४४ द्रव्याची इच्छा मनात धरून वैद्य जसा औषधांचा बटवा सोडितो, किंवा आतां द्रव्यरूपी पारितोषिक मिळणार आहे हें जाणून पुराणिक कथा सांगतो, ४५ तसेंच जे विषयस्वार्थाच्या मार्गे लागतात, त्यांचें वर्तन असतें; परंतु साधूची गोष्ट तशी नाहीं. ४६ तो स्वतःच्या स्वार्थासाठीं जितका कळवळतो, त्याहूनहि अधिक अनाथ प्राण्यांविषयीं त्याला कळवळा वाटतो. ४७ याचेंच नांव परम कारुणिकता

निजस्वार्थां । त्याहून अधिक अनाथभूतां । तियें नांव परम कारुणिकता । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ४८ ॥ हें सत्ताविसावें लक्षण । साधूचें जाण संपूर्ण । कविपदाचें व्याख्यान । सावधान अवधारीं ॥ ४९ ॥ वेदशास्त्रांचा मथितार्थ । जाला करतळामळकवत । तैसाच ब्रह्मानंदें डुल्लत । कवि निश्चित या नांव ॥ १०५० ॥ उपनिषदांचा मथितार्थ । ज्याच्या मुखाची वास पहात । परोक्षापरोक्ष ज्याचेनि सत्य । कवि विख्यात त्या नांव ॥ ५१ ॥ कवि या पदाचे व्याख्यानें । झालीं अठ्ठावीस लक्षणें । उरलीं दोनीं अतिगहनें । तें दों श्लोकीं श्रीकृष्णें आदरिलें सांगों ॥ ५२ ॥

> आज्ञायैवं गुणान् दोषान् मया दिष्टानपि स्वकान् ।
> धर्मान् सन्त्यज्य यः सर्वान् मां भजेत स सत्तमः ॥ ३२ ॥

प्रपंचनगरासभोंवतीं । कर्मनदीची महाख्याती । तिचेनि जळें जीव वर्तती । उत्पत्तिस्थिति अरतीरीं ॥ ५३ ॥ ते नदीचेनि जीवनमेळें । कर्मासी येती कर्मफळें । स्वर्गनरकादि सोहळे । तेणें जळबळें भोगिती ॥ ५४ ॥ प्रपंचनगरींहूनि निघतां । वेगें परमार्थासी येतां । जोतो कर्मनदीआंतौता । बुडे सर्वथा निर्बुजला ॥ ५५ ॥ एक तरलों ऐसें ज्ञाते म्हणती । तेही कर्मीं कर्मगुचकिया खाती । स्वयें बुडोनि आणिकां बुडविती । तरलों म्हणती तोंडाळ ॥ ५६ ॥ ऐसे बुडाले नेणों किती । बुडतां शिकवण तेचि देती । कर्मचि उपावो तरणोपायप्राप्ती । म्हणोनि बुडविती सर्वांतें ॥ ५७ ॥ 'न कर्मणा' हें

आहे, असें निश्चयानें जाण. हे उद्धवा ! ४८ हें साधूचें सत्ताविसावें पूर्ण लक्षण समज. आतां कविपदाचें निरूपण लक्षपूर्वक ऐक. ४९ वेद शास्त्रांचा मथितार्थ ज्याला तळहातावरील आंवळ्यासारखा प्रत्यक्ष होऊन जो ब्रह्मानंदांत डुलत असतो, त्यालाच कवि हें नांव यथार्थ आहे. १०५० उपनिषदांचा मथितार्थ ज्याच्या तोंडून आपला उच्चार व्हावा म्हणून वाट पहात असतो, शब्दज्ञान व स्वानुभव ज्याच्यामुळें सत्य ठरतात, त्यालाच कवि हें प्रसिद्ध नांव देतात. ५१ कविशब्दांच्या व्याख्यानानें अठ्ठावीस लक्षणें झालीं. आतां दोन अतिशय गहन लक्षणें उरलीं आहेत. तीं श्रीकृष्ण पुढील दोन श्लोकांनीं अति आदरानें सांगत आहे. १०५२.

मया दिष्टान् अपि स्वकान् सर्वान् धर्मान् सन्त्यज्य यः मा भजेत सः एवं सत्तमः–मीं वेदरूपानें सांगितलेल्याहि सर्व धर्मांचा त्याग करून जो माझी भक्ति करितो तोहि वर सांगितलेल्या भक्तांप्रमाणेंच श्रेष्ठ भक्त होय. (तो अज्ञानानें किंवा नास्तिक्यानें स्वधर्म सोडून भक्ति करितो कीं काय ? उत्तर–) गुणान् दोषान् आज्ञाय–स्वधर्माचरणामध्यें चित्तशुद्ध्यादि गुण आहेत व धर्माचरण न केल्यास चित्ताची अशुद्धि वगैरे दोष आहेत, असें जाणूनहि धर्माचरण करूं लागल्यास ईश्वरचिंतनांत खंड पडत असल्यामुळें माझ्या भक्तीनेंच चित्तशुद्ध्यादि सर्व गुण प्राप्त होतील अशा निश्चयानेंच धर्मत्याग करून भक्ति करितो. [किंवा भक्तीच्या दृढतेनेंच धर्माधिकार निवृत्त झाल्यामुळें त्यांचा त्याग करितो. किंवा जे श्रद्धादिभक्तिविरुद्ध धर्म त्यांचा त्याग करितो, असा याचा भावार्थ.] ३२.

प्रपंच-नगराच्या सभोंवार कर्मांची नदी असल्याची मोठी प्रसिद्ध आहे. तिच्या पाण्यावर लोक रहातात. उत्पत्ति, स्थिति व लय हीं तिच्या अलिकडच्या तीरावर असतात. ५३ त्या नदीच्या पाण्यानें कर्माला कर्मफळें येतात व त्या पाण्याच्या प्रवाहवेगानेंच स्वर्ग-नरकादि सोहळे भोगावे लागतात. ५४ प्रपंचनगरींतून बाहेर पडून परमार्थाकडे वेगानें येत असतां जो तो कर्मनदींत पडतो व त्यांतच गुदमरून बुडतो. ५५ कांहीं ज्ञाते ' आपण तरलों ' असें म्हणतात, पण तेहि कर्मांमध्यें गटंगळ्या खातात व स्वतः बुडून दुसऱ्यांना बुडवितात आणि ते 'तरलों ' अशी व्यर्थ वटवट करितात. ५६ आजवर असे किती बुडाले त्यांची गणती नाहीं. पण ते स्वतः बुडत असतांना दुसऱ्यांना उपदेश करीत असतात कीं तरणोपाय प्राप्तीचें मुख्य साधन कर्मच आहे, असें बोलून ते सर्वांना बुडवितात. ५७ ' न कर्मणा० ' म्ह० कर्म, प्रजा व धन यांनीं मोक्ष नाहीं. असें वेदवचन आहे. कर्मानें ब्रह्मज्ञान कदापि होत नाहीं. परंतु कर्मठ लोक मात्र हें खरें मानीत नाहींत, त्यांना कर्मांचा मोठा

वेदवचन । कर्मे नव्हे ब्रह्मज्ञान । तें न मानिती कर्मठ जन । त्यांसी कर्माभिमान कर्मोचा ॥ ५८ ॥ कर्म देहाचे माथां पूर्ण । तो न सांडितां देहाभिमान । कर्मोचा त्याग नव्हे जाण । कर्मबंधन देहबुद्धी ॥ ५९ ॥ एक अरतीरीं असती नष्ट । तरलों म्हणती अकर्मनिष्ठ । स्वकर्मत्यागी कर्मभ्रष्ट । जाण पापिष्ठ पाषांडी ॥ १०६० ॥ ये कर्मनदीतें तरला । ऐसा न देखों दादुला । बुडाल्या धुराचि मुदला । पाडु केतुला इतरांचा ॥ ६१ ॥ ये कर्मनदीची उत्पत्ती । मजचिपासोनि निश्चितीं । तेही सांगेन तुजप्रती । यथा-निगुती निजबोधें ॥ ६२ ॥ ‘ आज्ञायैवं ’ हें मुळींचें मूळ । श्लोकींचें प्रथम पद केवळ । येणेंचि कर्मनदी झाली स्थूळ । करूनि विवळ सांगत ॥ ६३ ॥ मदाज्ञा मेघगंभीरा । निःश्वासितपवनद्वारा । चतुर्वेद-विधीच्या धारा । अतिअनिवारा वर्षले ॥ ६४ ॥ तेणें कर्मनदीआंतौतें । अनिवार उथळलें भरतें । पूर दाटला जेथींचा तेथें । उतार कोणातें कळेना ॥ ६५ ॥ तेथ गुणदोषांचा वळसा । विधिनिषेधांचा धारसा । कर्माकर्मांचा आवर्त कैसा । सबाह्य सरिसा भंवतसे ॥ ६६ ॥ संकल्पविकल्पांचे हुडे । नदी दाटली चहूंकडे । तरों जाय तो गुंतोनि बुडे । पाऊल पुढें न घालवे ॥ ६७ ॥ प्रत्यवायाची मगर-मिठी । पडल्या सगळेंचि घाली पोटीं । उगळोनि न सोडी संकटीं । ने उठाउठी अधोगती ॥ ६८ ॥ अंगविकळतेचे मासे । तळपताति घ्यावया आविसें । कर्मठतेचे कमठ कैसे । खडक तैसे निब्रर ॥ ६९ ॥ काळविक्षेप सर्पांसी । एक सांपडले विलासआळशीं । विकळ उच्चार चोंढियेसी । एक व्यग्रतेसीं बुडाले ॥ १०७० ॥ एक तरावयाच्या आशा । पडिले कर्माच्या धारसां । ते विधिनिषेधवळसां । पडिले सहसा गुंगडती ॥ ७१ ॥ एक स्वकर्मधारी । पडोनि वाहावले दूरी । ते सत्यलोकमगरीं । आपुल्या विवरीं सूदले ॥ ७२ ॥ एका न वचवेचि परतटीं । माझारींच

अभिमान असतो. ५८ कर्म पूर्णपणें देहावर लादलेलें आहे. म्हणून देहाभिमान सोडल्यावांचून कर्माचा त्याग होत नाहीं. देहाभिमान हेंच कर्मबंधन आहे. ५९ कांहीं मूढ तर कर्म मुळींच न करितां अलिकडच्या तीरावर राहून ‘ आम्ही तरलों ’ असें म्हणत असतात. ते स्वकर्माचा त्याग करणारे कर्मभ्रष्ट अत्यंत पातकी व पाखांडी आहेत, असें जाणावें. १४६० कर्मनदींतून तरून गेला असा एकहि पराक्रमी वीर दिसत नाहीं. जेथें मोठे धैर्यवान् पुढारीहि बुडाले तेथें इतरांची काय प्रतिष्ठा ! ६१ या कर्मनदीची उत्पत्ति वास्तविक माझ्यापासूनच झाली आहे. तीहि तुला आत्मज्ञानानें यथार्थ सांगतों. ६२ ‘ आज्ञायैवं. ’ हें मूळ श्लोकांतील पहिलें पद आहे. त्यानेंच कर्मनदी इतकी प्रबल झाली आहे त्याचेंच विवेचन करून आतां सांगतों. ६३ माझ्या आज्ञारूपी गंभीर मेघांनीं माझ्या श्वासोच्छ्वासरूप वायूच्या द्वारा चार वेदविधि, याच पर्जन्यधारांनीं वृष्टि केली. ६४ त्यामुळें कर्मनदीला अनिवार पूर येऊन तो तेथल्या तेथेंच दाटला. त्याचा उतार कोणालाच कळेना. ६५ त्यांत गुण-दोषांचा वेढा, विधि-निषेधांचा प्रवाह व कर्माकर्मांचा भोंवरा आंतून व बाहेरून एकसारखा फिरत असतो. ६६ संकल्प-विकल्पांच्या कड्यामुळें नदीचा प्रवाह जागोजागीं अडकून रहातो. त्यामुळें जो तरावयास जातो, तो त्यांत गुंतून बुडतो. त्याला एक पाऊलहि पुढें टाकवत नाहीं. ६७ त्यांत प्रत्यवायाची मगरमिठी पडली म्हणजे तर तो सगळेंच गिळून पोटांत घालितो. संकटांतहि सोडीत नाहीं. तत्काळ अधोगतीला नेतो. ६८ अंगविक्षेपाचे मासे आमिष घेण्यासाठीं फिरत असतात. कर्मठपणाचे कांसव तर काय ! खडकापेक्षांहि कठीण. ६९ जे कोणी विलास भोगून आळशी बनलेले असतात ते काळविक्षेपरूपी सर्पांच्या पकडींत सांपडतात. कित्येक भयंकर आवाज करणाऱ्या धरणासारख्या व्यग्रतेंत बुडतात. १०७० कोणी तरून जाण्याच्या आशेनें प्रवाहांत सांपडतात. ते विधि-निषेधांच्या वळणांत गुंतून त्यांतून बाहेर पडतच नाहीं. ७१ कोणी स्वकर्माच्या प्रवाहांत सांपडून दूर वहात जातात. त्यांना सत्यलोकमगरी आपल्या विवरांत नेऊन टाकितात. ७२ कोणाला परतीराला जाववतच नाहीं. ते मध्येंच मधुर फळें पाहून आड-

फळें गोमटीं । देखोनि धांवीन्नले अव्हाटीं । ते स्वर्गसंकटीं गुंतले ॥ ७३ ॥ आम्ही तरों युक्तिबळें । म्हणोनि रिघाले एके वेळे । ते अहंकारखळाळें । महातिमिंगिळें गिळिले ॥ ७४ ॥ एकीं वेद-त्रयाची पेटी । दीक्षेची दोरी बांधली पोटीं । ते स्वर्गांगनाकुचकपाटीं । गुंतोनि शेवटीं बुडाले ॥ ७५ ॥ मंत्रतंत्रादिदीक्षितें । गुंतोनि बुडालीं जेथींच्या तेथें । कर्मनदीच्या परपारातें । कोणी पावतें दिसेना ॥ ७६ ॥ विरळा कोणीएक सभाग्य येथें । हें सकळ उपाय सांडूनि परते । जो अनन्य प्रीती भजे मातें । कर्मनदी त्यातें कोरडी ॥ ७७ ॥ माझे भक्तीचें तारूं नातुडे । जंव सप्रेमाचें शीड न चढे । तंव तरणोपाय बापुडे । वृथा कां वेडे शिणताती ॥ ७८ ॥ धरूनि अनन्यभक्तीचा मार्गु । करूनि सर्वधर्मत्यागु । हा तरणोपाय चांगु । येरु तो व्यंगु अधःपाती ॥ ७९ ॥ नेणोनि स्वधर्मकर्मातें । का नास्तिक्य मानूनि चित्तें । किंवा धरोनियां आळसातें । त्यागी कर्मातें तैसा नव्हे ॥ १०८० ॥ अथवा शरीरक्लेशाभेण । किंवा सर्वथा उबगोन । कां धरोनि ज्ञानाभिमान । स्वकर्म जाण सांडीना ॥ ८१ ॥ माझी वेदरूप आज्ञा शुद्ध । ते वेदविवंचना विशद । स्वधर्मकर्मांचे कर्मवाद । अतिअविरुद्ध जाणता ॥ ८२ ॥ स्वधर्माचा उत्तम गुण । प्रत्यवायें अधःपतन । या दोहींतें जाणोन । मद्भक्तीसी प्राण विकिला ॥ ८३ ॥ विसरोनि आन आठवण । अखंडतां हरिस्मरण । त्या नांव भक्तीसी विकिला प्राण । इतर भजन आनुमानिक ॥ ८४ ॥ माझेनि भजनप्रेमें जाण । विसरला कर्मांची आठवण । कर्म बापुडें रंक कोण । बाधक जाण नव्हे भक्तां ॥ ८५ ॥ सप्रेम करितां भजनविधी । सर्व कर्मातें विसरली बुद्धी । ते जाणावी भजनसमाधी । तेथ कर्म त्रिशुद्धी बाधेना ॥ ८६ ॥ ज्याची श्रद्धा कर्मावरी । तोचि कर्मांचा अधिकारी । ज्याची श्रद्धा श्रीधरीं । तो नव्हे अधिकारी कर्मांचा ॥ ८७ ॥ जो जीवेंप्राणें

वाटेंत शिरतात व स्वर्गरूपी संकटांत पडतात. ७३ 'आम्ही युक्तीच्या बळावर तरून जाऊं' असें बोलून ते ते मोठ्या गडबडीनें निघतात, पण अहंकाररूपी खळग्यांत पडले कीं त्यांतील मोठाले मासे त्यांना गिळून टाकितात. ७४ कोणी तीन वेद हीच पेटी दीक्षेच्या दोरीनें पोटाशीं बांधून घेतात व अप्सरांच्या आलिंगनगुहेंत अडकून अखेर साफ बुडतात. ७५ मंत्र-तंत्राची दीक्षा देणारे तर त्यांत गुंतून जागच्याजागींच बुडाले. कर्मनदीच्या परतीराला पोंचणारे कोणीच दिसत नाहींत. ७६ या लोकीं असा भाग्यवान् विरळाच कीं, जो हे सर्व उपाय सोडून अनन्य प्रेमानें मला भजतो, अशा माझ्या भक्ताला कर्मनदी कोरडी असते. ७७ जोंपर्यंत माझी भक्तिरूप नाव सांपडत नाहीं, जोंपर्यंत प्रेमाचें शीड चढत नाहीं, तोंपर्यंत सर्व तरणोपाय फोल होत. वेडेलोक व्यर्थ खटपट करून थकतात. ७८ अनन्य भक्तीचा मार्ग धरून सर्व धर्मकर्मांचा त्याग करणें हाच खरा तरणोपाय आहे. इतर सर्व उपाय गौण व अधोगतीला नेणारे आहेत. ७९ अभक्त आपला स्वधर्म व आपलें कर्म न जाणून किंवा मनानेंच नास्तिकपणाचें ग्रहण करून किंवा आळसाच्या अधीन होऊन कर्म सोडून देतात. तसा माझा भक्त नसतो. १०८० तो शरीरक्लेशांच्या भीतीनें किंवा अतिशय वैतागून अथवा ज्ञानाभिमानानें कर्म सोडीत नाहीं. ८१ माझी वेदरूपी आज्ञा अत्यंत पवित्र आहे, वेदांचा विचार अतिशुद्ध आहे. ज्ञानीच स्वधर्म व कर्म यांचें अर्थवाद अविरोधानें जाणितो. ८२ स्वधर्माचा गुण अत्यंत उत्तम आहे; पण प्रत्यवायानें त्याचा अधःपात होतो. या दोन्ही गोष्टी जाणून भक्त माझ्या भक्तीलाच आपला प्राण अर्पण करितो. ८३ दुसऱ्या सर्व गोष्टी विसरून हरीचें अखंड स्मरण करणें यालाच 'भक्तीला प्राण विकणे असें म्हणतात. इतर सर्व भजन अनुमानिक होय . ८४ माझ्या भजनाच्या प्रेमानें तो कर्मांची आठवणहि विसरतो. कर्म बिचारें दरिद्री, तें भक्ताला काय बाधक होणार ! ८५ प्रेमानें भजनाचा विधि आरंभिला म्हणजे बुद्धि सर्व कर्मांना विसरते. तीच भजनाची समाधि आहे. तेथें कर्म केव्हांहि बाधत नाहीं. ८६ ज्याची कर्मावर श्रद्धा असते तोच कर्मांचा अधिकारी आहे आणि ज्याची अच्युतावर श्रद्धा असते तो कर्मांचा अधिकारी नाहीं

भक्तीसी विकिला । तो तेव्हांचि कर्मावेगळा जाला । त्याच्या भावार्था मी विकिला । तो कर्मीं बांधला केवीं जाये ॥ ८८ ॥ गुणदोषांची जननी । ते निःशेष अविद्या निरसुनी । जो प्रवर्तला माझे भजनीं । तो साधु मी मानीं मस्तकीं ॥ ८९ ॥ निजकल्पना जे देहीं । तेचि मुख्यत्वें अविद्या पाहीं । ते कल्पना निमालिया ठायीं । जगीं अविद्या नाहीं निश्चित ॥ १०९० ॥ अविद्येच्या त्यागासवें । धर्माधर्मादि आघवें । न त्यजितांचि स्वभावें । त्याग फावे अनायासें ॥ ९१ ॥ शिर तुटलियापाठीं । शरीर निजकर्मासी नुठी । तेवीं अविद्या त्यागितां शेवटीं । त्यजिले उठाउठीं सर्व धर्म ॥ ९२ ॥ दिवसा चंद्रउदयो पाहे । तो झाला तैसा नाहीं होये । तेवीं अविद्येचेनि विलयें । सर्व धर्म लाहे ते दशा ॥ ९३ ॥ खद्योत सूर्योदयापाठीं । शोधूनि पाहतां न ये दिठीं । तेवीं अविद्येच्या शेवटीं । धर्माधर्मकोटी मावळल्या ॥ ९४ ॥ ग्रहगण नक्षत्रमाळा । खद्योततेजउमाळा । रात्रीसकट बोळवण सकळां । तेवीं धर्माधमकळा अविद्येसवें ॥ ९५ ॥ सर्व धर्मत्यागाची खूण । उद्धवा मुख्यत्वें हेचि जाण । याहीवरी माझें भजन । मुख्य भागवतपण या नांव ॥ ९६ ॥ म्हणसी अविद्याचि केवीं नासे । मा अधर्म नासती तीसरिसे । ते अविद्या नाशे अनायासें । भक्तिउल्हासें माझेनि ॥ ९७ ॥ सूर्योदयो देखतां दृष्टीं । सचंद्र नक्षत्रांची मावळे सृष्टी । तेवीं माझ्या भक्तिउल्हासापाठीं । अविद्या उठाउठीं निमाली ॥ ९८ ॥ अविद्येच्या नाशासवें । नासती धर्माधर्म आघवे । जेवीं गरोदर मारितां जीवें । गर्भही तीसवें निमाला ॥ ९९ ॥ जेव्हां माझे भक्तीचा उल्हासू । तेव्हांचि अविद्येचा निरासू । अविद्येसवें होय नाशू । अनायासू सर्व धर्मां ॥ ११०० ॥ ते तूं

---

८७ जो जीव-भावानें भक्तीला विकून घेतो तो त्याचवेळीं कर्मापासून अलिप्त होतो आणि त्याच्या भावार्थाला मी विकिला जातों. तो कर्मानें बद्ध कसा होणार ! गुण-दोषांची साक्षात् जननीच अशा अविद्येचें निरसन करून जो माझ्या भजनांत प्रवृत्त होतो त्या साधूला मी शिरसा वंद्य मानितों. ८९ 'देहच मी' ही जी कल्पना तीच मुख्य अविद्या आहे, असें जाण. ती कल्पना जागच्याजागीं लीन झाली कीं, अविद्या जगांतूनच खात्रीनें नाहींशी होते. १०९० अविद्येच्या त्यागाबरोबर धर्म व अधर्म यांचा त्याग न करितांच आपोआप घडतो. ९१ एकदां मस्तक तुटल्यावर मग तें शरीर आपलें कर्म करण्यास जसें उठत नाहीं, त्याप्रमाणें एकदां अविद्येचा त्याग केला कीं, लगेच सर्व धर्म नाहींसे होतात. ९२ दिवसा चंद्रोदय जरी झाला तरी तो जसा निरुपयोगी असतो त्याप्रमाणें अविद्येचा लय होतांच सर्व धर्महि निरुपयोगी होतात. ९३ सूर्योदयानंतर काजव्याला शोधिलें तरी तो जसा सांपडत नाहीं, त्याप्रमाणें अविद्येचा नाश झाल्यावर धर्माधर्माच्या राशी मावळून जातात. ९४ नवग्रहांचा समूह, नक्षत्रमंडळ व काजव्याचा प्रकाश या सर्वांची जशी रात्रीबरोबर बोळवण होते, त्याचप्रमाणें अविद्येबरोबर धर्माधर्मांची रवानगी होते. ९५ हे उद्धवा! सर्व धर्मत्यागाची हीच मुख्य खूण आहे, असें जाण. त्यांत माझ्या भजनाची भर पडणें यालाच मुख्य भागवतपण म्हणतात. ९६ तूं कदाचित् म्हणशील कीं, अविद्येचा नाश कसा होणार ! कीं जिच्या नाशाबरोबर अधर्माचाहि नाश होईल ! तर माझ्या भक्तीच्या उल्हासानें त्या अविद्येचा सहज नाश होतो. ९७ सूर्योदय दृष्टीस पडतांच चंद्रासह सर्व नक्षत्रसृष्टि जशी मावळते, तशी माझ्या भक्तीचा उल्हास दृष्टीस पडतांच अविद्या तत्काल लोपून जाते. ९८ गरोदर स्त्रीचा जीव घेतला असतां तिच्याबरोबर तिचा गर्भहि जसा मरतो, त्याप्रमाणें अविद्येच्या नाशाबरोबर सर्व धर्माधर्म नाश पावतात. ९९ माझ्या भक्तीचा विकास होतांच तत्काल अविद्येचा नाश होतो व अविद्या नाहींशी झाली कीं, तिच्याबरोबर अनायासें सर्व धर्म नाश पावतात. ११०० तूं रहणशील कीं, अशी तुझी भक्ति कोणती, तर ऐक. जिचें मीं पूर्वी निरूपण केलें आहे ती माझी चौथी भक्ति जाण. तिच्यामुळें अविद्येचें निवारण

भक्ति म्हणसी कोण । जीचें मागां केलें निरूपण । ते माझी चौथी भक्ति जाण । अविद्यानिरसन तिचेनी ॥ १ ॥ येर आर्त जिज्ञासु अर्थार्थी । जे जे भक्तीतें आदरिती । ते अविद्यायुक्त निश्चितीं । चौथी भक्ति मुख्यत्वें माझी ॥ २ ॥ जे भक्तीमाजीं कंहीं । अविद्येचा विटाळ नाहीं । भजन तरी ठायींच्या ठायीं । अनायासें पाहीं होतसे ॥ ३ ॥ ते माझी आवडती भक्ती । उद्धवा जाण निश्चितीं । जीसी अविद्या असे धाकती । सर्व धर्म कांपती सर्वदा ॥ ४ ॥ ते भक्तीची देखोनि गुढी । अविद्या धाकेंचि प्राण सांडी । सर्व धर्मांची आवडी । घायेंवीण बापुडी निमाली ॥ ५ ॥ हा मद्भक्तीचा पर्यावो । आवडीच्या गोडिया सांगे देवो । ऐक भक्ताचा भजनभावो । जेणें निर्वाहो भक्तीचा ॥ ६ ॥ माझेनी अनुसंधानेंवीण । स्नान संध्या होम दान । ते अवघेंचि अधर्म जाण । मद्भजन तें नव्हे ॥ ७ ॥ गोडी आवडी ते परपुरुषीं । मिथ्या लुडबुडी निजपतीपाशीं । ते पतिव्रता नव्हे जैशी । जाण भक्ति तैशी व्यभिचारी ॥ ८ ॥ नाना विषयीं ठेवूनि मन । जो करी ध्यान अनुष्ठान । तें जारस्त्रियेच्या ऐसें जाण । नव्हे पावन ते भक्ती ॥ ९ ॥ काया वाचा मनसा । माझे भक्तीचा पडला ठसा । भजतां नाठवे दिवसानिशा । भक्तीची दशा या नांव ॥ १११० ॥ जपेंवीण नाम वदनीं । धारणेंवीण ध्यान मनीं । संकल्पेंवीण मदर्पणीं । सर्व कर्मे करूनि सर्वदा ॥ ११ ॥ निरोधेवीण वायुरोधू । मर्यादेवीण स्वरूपबोधू । विषयेंवीण सदा स्वानंदू । मद्भक्त शुद्ध या नांव ॥ १२ ॥ भक्त म्हणवितां गोड वाटे । परी भजनमार्गीं हृदय फुटे । अकृत्रिम भक्ति जैं उमटे । तैं मी भेटें उद्धवा ॥ १३ ॥ ऐसेनि भजनें जो भजत । तो मजमाजीं मी त्याआंत । भक्तांमाजीं जो उत्तम भक्त । साधू निश्चित या नांव ॥ १४ ॥ तो पुरुषांमाजीं पुरुषोत्तम । साधूंमाजीं अतिउत्तम । तो माझें विश्रामधाम । अकृत्रिम उद्धवा ॥ १५ ॥ तयालागीं मी आपण । करीं सर्वांगाचें आंथरूण । जीवें सर्वस्वें निंबलोण । प्रतिपदीं जाण मी करीं ॥ १६ ॥ तो मज आवडे म्हणशी कैसा । जीवासी पढिये प्राण जैसा । सांगतां उत्तम भक्तदशा । प्रेमपिसा

होतें. १ इतर जे आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी भक्त माझ्या भक्तीचा आदर करितात ते खरोखर अविद्येनें युक्त असतात. चौथी ज्ञानलक्षणा भक्तीच माझी भक्ति आहे. २ त्या भक्तींत अविद्येचा कोठें लेशहि नसतो. जागज्याजागीं अनायासें माझें भजन होत असतें. ३ उद्धवा ! खरोखर तीच माझी आवडती भक्ति आहे, असें जाण. तिला अविद्या घाबरते. सगळे धर्म तिच्यापुढें सर्वदा चळचळां कांपतात. ४ त्या भक्तीची पताका पहातांच अविद्या भीतीनेंच प्राण सोडिते व सर्व धर्मांची आवड तर बिचारी घाव बसल्यावांचून मरण पावते. ५ हा आपल्या भक्तीचा प्रकार देवानें मोठ्या आवडीनें सांगितला. आतां भक्तीचा निर्वाह करणारा भक्तांचा भजनभाव ऐक. ६ माझ्या चिंतनावांचून स्नान, संध्या, जप, होम, दान हे सर्व अधर्मच आहेत. तें माझें भजन नव्हे. ७ मनांतून परपुरुषाची आवड असून पतीपुढें खोटीच लाडीगोडी करणारी स्त्री जशी खरी पतिव्रता नव्हे, तशी ती भक्ति व्यभिचारिणी होय. ८ अनेक विषयांत मन ठेवून जो ध्यान व अनुष्ठान करितो त्याची ती भक्ति जारिणीसारखी होय. ती पवित्र नव्हे. ९ काया-वाचा-मनानें माझ्या भक्तीचा ठसा उमटला म्हणजे मग त्याला दिवस व रात्र यांचें भान रहात नाहीं. अशी ज्याची स्थिति होते त्याची ती स्थितीच भक्ति होय. १११० जपावांचूनच त्याच्या तोंडांत माझें नांव असतें. धारणेवांचूनच ध्यान आणि संकल्पावांचून सर्व कर्में मदर्पण होतात. ११ प्राणायामावांचून वायूचा निरोध, मर्यादेवांचून स्वरूपज्ञान, विषयावांचूनच सतत स्वानद जो साधितो त्यालाच माझा भक्त म्हणतात. १२ भक्त म्हणवून घेणें मोठें गोड वाटतें, पण भजनमार्गांत हृदय फुटतें. अकृत्रिम भक्ति जेव्हां प्रकट होते, तेव्हां हे उद्धवा ! मी त्याला भेटतों. १३ अशा भजनानें जो भजतो तो माझ्यामध्यें व मी त्याच्यामध्यें रहातों. असा जो भक्तांमध्यें उत्तम भक्त त्याचें नांव साधु. १४ तो पुरुषांतील पुरुषोत्तम, साधूंतील श्रेष्ठ, तो माझें अकृत्रिम विश्रांतिस्थान आहे. हे उद्धवा ! १५ त्याच्यासाठीं मी आपल्या सर्वांगाचें अंथरूण करितों. प्रत्येक पावलाला माझा जीव त्याच्यावरून ओंवाळून टाकितों. १६ तो मला कितपत आवडतो म्हणून म्हणशील तर जीवाला जसा प्राण आवडतो तसा मला तो प्रिय आहे. ही भक्ताची

देवो जाला ॥ १७ ॥ मग न धरतु न सांवरतु । उद्धवासी कडिये घेतु । भुलला स्वानंदें नाचतु । विस्मयें स्फुंदतु उद्धवू ॥ १८ ॥ मी एकु देवो हा एकु भक्तु । हेंही विसरला श्रीकृष्णनाथु । हा देवो मी एकु भक्तु । तें उद्धवाआंतु नुरेची ॥ १९ ॥ ऐसें भक्तिसाम्राज्यपटीं । दोघां पडली ऐक्यगांठी । तंव देवोचि कळवळला पोटीं । निजभक्तगोठी सांगावया ॥ ११२० ॥ ऐशी उत्तम भक्तांची कथा । अतिशयें आवडे कृष्णनाथा । रुचलेपणें तत्त्वतां । मागुतां मागुतां सांगतू ॥ २१ ॥ श्लोकीं प्रमेयें दिसतां अनेगें । तें श्रीकृष्णें सांडूनि मागें । हा ग्रंथार्थू श्रीरंगें । साक्षेपें स्वांगें लिहविला ॥ २२ ॥ हे माझे युक्तीची कथा । नव्हे नव्हे जी सर्वथा । सत्य मानावें श्रोतां । येअर्थीचा वक्ता श्रीकृष्ण ॥ २३ ॥ श्रोतां व्हावें सावधान । मागील कथाअनुसंधान । दोघां पडिलें होतें आलिंगन । विस्मयें पूर्ण उद्धवू ॥ २४ ॥ चढत प्रेमाचें भरतें । तें आवरोनि कृष्णनाथें । थापटूनि उद्धवातें । सावध त्यातें करी हरी ॥ २५ ॥ उद्धवातें म्हणे तत्त्वतां । तुज आवडली भक्तिकथा । तेचि मी सांगेन आतां । सावधानतां अवधारीं ॥ २६ ॥ एक जाणोनि भजती मातें । एक ते केवळ भावार्थें । मी दोहींच्या भुललों भावातें । दोघे माते पढियंते ॥ २७ ॥

ज्ञात्वाऽज्ञात्वाऽथ ये वै मां यावान् यश्चास्मि यादृशः । भजन्त्यनन्यभावेन ते मे भक्ततमा मताः ॥ ३३ ॥

मी स्वस्वरूपीं सच्चितानंद । जगदादि आनंदकंद । नित्य सिद्ध परम शुद्ध । माझें स्वरूप विशद जाणती ॥ २८ ॥ देश काळ वर्तमान । सर्वीं सर्वदा अनवच्छिन्न । सर्वात्मा सच्चिदानंदघन । भेदशून्य मी एक ॥ २९ ॥ सत्य ज्ञान अनंत । परब्रह्म मी निश्चित । ऐसें जाणूनि मज भजत । उत्तम भागवत ते जाण ॥ ११३० ॥ शुद्ध झालिया स्वरूपप्राप्ती । म्हणसी भजन कैशा रीतीं । देवभक्त तेचि ते होती । मी

उत्तम अवस्था सांगतेवेळीं देव प्रेमानें वेडा झाला. १७ तो कोणाला आवरेना कीं सांवरेना. त्यानें उद्धवाला कडेवर घेतलें व स्वानंदाच्या रंगांत नाचूं लागला. तेव्हां उद्धव आश्चर्यानें गहिंवरला. १८ 'मी एक देव व हा एक भक्त' हें श्रीकृष्णनाथ विसरला आणि 'हा देव व मी भक्त' हा भेद उद्धवाच्याहि मनांत उरला नाहीं. १९ अशी भक्तिसाम्राज्यपटावर दोघांच्या ऐक्याची गांठ पडली. तेव्हां देवाच्या पोटांत आपल्या भक्तांच्या गोष्टी सांगण्याचा उमाळा आला. ११२० अशी उत्तम भक्तांची कथा श्रीकृष्णनाथाला फार आवडत होती व त्या आवडीमुळेंच तो पुनःपुनः ती सांगत होता. २१ श्लोकांत अनेक विषय असतांहि श्रीकृष्णानें ते मागें टाकून हा ग्रंथार्थ स्वतः मोठ्या आवडीनें लिहविला. २२ अहो! ही कथा मीं माझ्या स्वतःच्या मनांतून मुळींच काढलेली नाहीं बरें. हा अर्थ सांगणाराहि श्रीकृष्णच आहे. २२ श्रोत्यांनीं हें सत्य समजावें. आतां श्रोत्यांनीं लक्ष द्यावें. मागील कथेचें अनुसंधान असें होतें कीं, श्रीकृष्ण व उद्धव या दोघांनीं एकमेकांस आलिंगन दिलें व उद्धव अत्यंत विस्मयानें भान विसरला होता. २४ तेव्हां श्रीहरीनें वाढत्या प्रेमाचें भरतें आंवरून उद्धवाला थापटून सावध केलें. २५ तो उद्धवाला म्हणाला कीं, तुला ही भक्तीची कथा फार आवडली. तीच मी आतां पुढें सांगतों. तर सावधान चित्तानें ऐक. २६ कोणी मला स्वरूपतः जाणून भजतात, तर कित्येक केवळ भावार्थानेंच माझें भजन करितात. पण मी त्या दोन्ही प्रकारच्या भक्तीला भाळतों. कारण ते दोघेहि भक्त मला प्रिय असतात. ११२७.

यावान् यः च यादृशः अस्मि—मी जेवढा-देशकालानीं अपरिच्छिन्न जो—सर्वात्मा जसा—सच्चिदानंदरूप आहें व तं मां—त्या मला, अज्ञात्वा अथ ज्ञात्वा—न जाणतां किंवा विशेषतः पुनः पुनः जाणून, अनन्यभावेन ये वै भजन्ति ते मे भक्ततमाः मताः—अनन्यभावानें जे मला भजतात ते श्रेष्ठ भक्त म्हणून मला संमत आहेत. ३३.

मी आत्मस्वरूप, सच्चिदानंद, जगाचें कारण, आनंदकंद, नित्य सिद्ध, परमपावन आहें. माझे भक्तच या स्वरूपाला स्पष्टपणें जाणतात. २८ देश, काल, वर्तमान या सर्वांत परिपूर्ण भरलेला, सर्वात्मा सच्चिदानंदघन, भेद-शून्य असा मीच एक आहें. २९ मला सत्य, ज्ञान, अनंत, परब्रह्म असें निश्चयानें जाणून जे भजतात तेच उत्तम भागवत होत, असें समज. ११३० तूं म्हणशील कीं, एकदा शुद्धस्वरूपाची प्राप्ति झाल्यावर भजन कसें करावयाचें!

होऊन भजती मजमाजीं ॥ ३१ ॥ वाम सव्य दोनी भाग । दों नांवीं एकाचि अंग । तेवीं देवभक्तविभाग । मद्रूपीं साङ्ग भासती ॥ ३२ ॥ पाहें पां लोखंडाचा आरिसा । लोखंडेंचि घडिजे जैसा । लोखंडेंचि उजळे कैसा । स्वप्रकाश निजतेजें ॥ ३३ ॥ दर्पण उजळलिया पाहीं । शशी सूर्य गगन मही । बिंबलीं धरी आपुल्या ठायीं-अप्रयासें पाहीं स्वलीला ॥ ३४ ॥ तैसें मी होऊनि माझे भक्त । अनन्यभावें मजचि भजत । तें माझें ऐश्वर्य समस्त । प्रतिबिंबत तयांमाजीं ॥ ३५ ॥ हो का तरंगू जैसा सागरीं । त्यासी जळाचि तळींवरीं । तैसा माझा भक्त मजमाझारीं । सबाह्याभ्यंतरीं मद्रूप ॥ ३६ ॥ जैसा सुवर्णाचा नरहरी । सुवर्णहिरण्यकशिपूतें विदारी । सुवर्ण प्रल्हाद पोटींसी धरी । तैशी परी मद्भजना ॥ ३७ ॥ तेथें सगुण आणि निर्गुण । उभय रूपें मीचि जाण । जैसें सुवर्ण आणि कंकण । तैसे अभिन्न जाण मद्रूपें ॥ ३८ ॥ तेथ जें जें दृश्य देखे दृष्टीं । तें तें मद्रूपें पडे मिठी । दृश्य द्रष्टा लोपूनि त्रिपुटी । उठाउठी मज मिळे ॥ ३९ ॥ ऐसें जाणोनियां मज भजत । ते जाण पां उत्तम भक्त । ऐसें नेणोनियां मज भजत । भोळे भक्त ते माझे ॥ ११४० ॥ नाहीं श्रुतीचें पठण । नाहीं वेदांतशास्त्रश्रवण । नाहीं विकल्पलक्षण । अनन्य जाण भावार्थी ॥ ४१ ॥ सगुण निर्गुण नेणे कांहीं । परी देवो आहे म्हणे हृदयीं । जडत्व असे देहाच्या ठायीं । तें देवो पाहीं वागवीत ॥ ४२ ॥ यालागीं देहाचें जें चळण । तें हृदयस्थ करवी नारायण । दृष्टीचें जें देखणेपण । त्याचेनि जाण होतसे ॥ ४३ ॥ काढूनि आपुला डोळा । दूरी ठेविला वेगळा । तो हृदयस्थेंवीण आंधळा । देखणी कळा देवाची ॥ ४४ ॥ रसना केवळ चामडी । ते काय जाणे रसगोडी । कापूनि टाकिल्या बापुडी । गोडी अगोडी ते नेणे ॥ ४५ ॥ रसनाद्वारें रसस्वादू । घेता हृदयस्थ परमानंदू । बुद्धीसीं करितां उद्बोधू । सत्य गोविंदू हृदयींचा ॥ ४६ ॥ मनाचें गमनागमन । दिसे हृदयस्थाआधीन ।

तर ऐक. देव व भक्त दोघेहि एक होऊन मलाच माझ्यामध्यें भजतात. ३१ डावे व उजवे हे जरी दोन भाग आहेत तरी दोन नांवांनीं तें जसें अंग एकच आहे; त्याप्रमाणें देव व भक्त हे दोन भाग माझ्या स्वरूपांतच भासतात. ३२ पहा! लोखंडाचा आरसा लोखंडानेंच घडावा लागतो व लोखंडानेंच त्याला उजाळा द्यावा लागतो. तेव्हां तो स्वतेजानें प्रकाशितो. ३३ आरसा स्वच्छ केला कीं, तो चंद्र, सूर्य, आकाश व पृथ्वी या सर्वांचें प्रतिबिंब जसें सहज लीलेनें धारण करितो, ३४ त्याप्रमाणें माझे भक्त मत्स्वरूप बनून माझें अनन्यभावानें भजन करितात. तेव्हां माझें सर्व ऐश्वर्य त्यांच्यामध्यें प्रतिबिंबित होतें. ३५ किंवा समुद्रांतील लाटांच्या खालीं-वर जसें पाणीच असतें, त्याप्रमाणें माझा भक्त माझ्यांतच असल्यामुळें तो आंतून बाहेरून मद्रूपच असतो. ३६ किंवा सोन्याची नृसिंहाची मूर्ति जशी सोन्याच्याच हिरण्यकशिपूचें विदारण करिते. व सोन्याच्याच प्रल्हादाला पोटाशीं धरिते, तसाच माझ्या भजनाचा प्रकार आहे. ३७ सगुण आणि निर्गुण या दोन्हीं रूपांनीं मीच असतों. सोन्याचें कंकण व सोनें हीं दोन जशीं भिन्न नाहींत, त्याचप्रमाणें भक्त माझ्या रूपाहून भिन्न नाहीं. ३८ तो दृष्टीनें जें जें दृश्य पहातो, तें तें सर्व त्याला मद्रूपच दिसतें आणि दृश्य, द्रष्टा व दर्शन ही त्रिपुटी नाहींशी होऊन तो तत्काल माझ्या स्वरूपांतच मिळून जातो. ३९ अशाप्रकारें माझें खरें स्वरूप ओळखून जे मला भजतात ते उत्तम भक्त आणि मला स्वरूपतः न जाणितां जे भजतात ते माझे भोळे भक्त होत. ११४० ते कधीं वेदपठण करीत नाहींत; कधीं वेदान्तशास्त्राचें श्रवण करीत नाहींत किंवा कधीं मनांत विकल्पहि आणीत नाहींत. ते पूर्ण भाविक असतात. ४१ ते सगुण किंवा निर्गुण कांहीं जाणत नाहींत. पण देव हृदयांत आहे, असें म्हणतात. देह जड आहे, त्याला देवच वागवितो. ४२ या देहाची सर्व हालचाल हृदयस्थ नारायण करवीत असतो. नेत्र त्याच्याचमुळें पहातात. ४३ आपला डोळा कापून जर पलीकडे ठेविला तर तो हृदयस्थ आत्मारामावांचून आंधळा होतो. म्हणून पहाणारी शक्ति देवाची आहे. ४४ जीभ तर केवळ कातडें आहे. तिला रसाची गोडी काय कळणार! त्या बिचारीला कापून टाकिली तर ती गोड कडू काय जाणणार! ४५ जिभेच्या द्वारां रसाची चव घेणाराहि हृदयस्थ परमात्माच आहे व बुद्धीला ज्ञान देणाराहि अंतःकरणस्थ गोविंदच आहे. ४६ मनाचें जाणेंयेणेंहि त्या हृदयस्थ आत्मारामाच्या अधीन असलेलें दिसतें.

यालागीं दूरी जावोनि परते मन । हृदयासी जाण येतसे ॥ ४७ ॥ इंद्रियें प्रेरिता वारिता । हे सत्ता आधीन हृदयस्था । यालागीं नांवें हृषीकेशता । त्यासचि तत्त्वतां म्हणताती ॥ ४८ ॥ एवं विचाराचा निर्वाहो । करितां निज हृदयीं असे देवो । तो पहावया बाहेरी धांवों । तैं मूर्ख पहा हो मी झालों ॥ ४९ ॥ तीर्थी क्षेत्रीं भेटेल देवो । हा आपुले हृदयींचा भावो । निजभावेंवीण पहा वो । तीर्थीही देवो असेना ॥ ११५० ॥ एवं देवो तो मजमाजीं आहे । त्याचेनि टवटवती इंद्रियें । क्रिया कर्म जें जें होये । तें त्याचेनि पाहें तत्त्वतां ॥ ५१ ॥ देह तंव बापुडें । केवळ अचेतन मडें । त्याचेनि कर्म नुपजे कुडें । हें तंव कुडें सर्वथा ॥ ५२ ॥ इंद्रियांचेनि चेतविता । कर्म क्रिया कर्तव्यता । देहाचेनि नोहे तत्त्वतां । मुख्यत्वें कर्ता हृदयस्थु ॥ ५३ ॥ यापरी जे कांहीं कर्तव्यता । ते भोळेपणें नेघे माथां । सर्व कर्मांचा आत्मा कर्ता । विश्वासें सर्वथा दृढ मानी ॥ ५४ ॥ मग अन्नपानादि सेवितां । मानी आत्मारामु भोक्ता । सर्वकर्मकर्तव्यता । अहं कर्ता हें म्हणों नेणे ॥ ५५ ॥ ऐसे भोळिवेचेनि समजें । माझें भजन निपजे वोजें । तें म्यां आवडीं सेविजे । जाण तें माझें खाजुकें ॥ ५६ ॥ सर्वभावें सर्वथा । बाळकांसी जेवीं माता । तेवीं माझिया भोळ्या भक्तां । मी सर्वथा सर्वस्वें ॥ ५७ ॥ धांवोनि मिठी घालावयासी । हित गुज आळों-चासी । खाणें जेवणें विश्रांतीसी । जेवीं बाळकासी निजजननी ॥ ५८ ॥ तेवीं माझिया भोळ्या भक्तां । मीचि जाण जिवलग माता । अर्थ स्वार्थ परमार्थता । जाण तत्त्वतां मी त्यांसी ॥ ५९ ॥ तोंडींचें पोटींचें गांठींचें । माता बाळकालागीं वेंचे । तेवीं भाविकांलागीं आमुचें । सर्वस्व साचें मी वेंचीं ॥ ११६० ॥

त्यामुळेंच मन कितीहि दूर गेलें तरी तें हृदयापाशींच परत येतें. ४७ इंद्रियांची प्रवृत्ति व निवारण हीं दोन्हीं हृदयस्थाच्या अधीन आहे, म्हणूनच त्याला हृषीकेशी म्ह० इंद्रियांचा स्वामी असें म्हणतात. ४८ याप्रमाणें विचार केला तर शेवटीं देव हृदयांतच आहे, अशी खात्री होते. पण मी त्याला शोधावयास बाहेर धांवतों. तेव्हां मी किती मूर्ख आहे पहा! ४९ तीर्थें, क्षेत्रें या ठिकाणीं देव भेटेल असा आपल्या मनांतील भाव असतो; परंतु आत्मश्रद्धेवांचून तीर्थांतहि देव दिसत नाहीं. ११५० याप्रमाणें देव माझ्याच जवळ आहे. त्याच्याचयोगानें इंद्रियें सतेज असतात. क्रिया-कर्म जें जें कांहीं घडतें तें सर्व वास्तविक त्याच्यामुळेंच होतें. ५१ शरीर तर काय बिचारें, चेतनारहित केवळ प्रेतच. त्याच्यापासून कर्म कसें घडणार ! तें सर्वथा व्यर्थ आहे. ५२ म्हणून इंद्रियांना चालन देणारा, विविध क्रिया करविणारा देह नसून त्यांचें सर्व कर्तृत्व हृदयस्थ परमात्म्याकडे आहे. ५३ यास्तव ते कोणत्याहि कर्मांचें कर्तृत्व भोळेपणानें आपल्या माथीं न घेतां सर्व कर्मांचा कर्ता परमात्मा आहे, असा दृढ विश्वास बाळगितात. ५४ अन्नपानादि सर्व विषयांचें सेवन करितेवेळीं भोक्ता आत्माराम आहे, असें ते मानितात. सर्व कर्मकर्तव्यतेचा 'मी कर्ता' असें बोलणें त्यांना कधीं ठाऊकच नसतें. ५५ अशा भोळ्या-भाबड्या भावानें होणारें माझें भजन मोठ्या आवडीनें होतें. त्याचा मी मोठ्या प्रेमानें स्वीकार करितों. तें माझें आवडीचें 'खाजेंच' आहें, असें समज. ५६ तान्ह्या बाळाचें जशी सर्वप्रकारें सर्वस्व त्याची आई, त्याप्रमाणें माझ्या भोळ्या भक्तांचें सर्वस्व सर्वथा मी आहें. ५७ बालकाला धांवत येऊन मिठी घालण्यास, हितगुज सांगण्यास, खाणें, पिणें, विश्रांति या सर्वांस जशी त्याची माता प्रिय वाटते ५८ त्याप्रमाणें माझ्या भोळ्या भक्तांची मीच प्रेमळ माता आहें. त्यांना अर्थ, स्वार्थ, परमार्थ सगळें कांहीं मीच वाटतों. ५९ आई जशी आपल्या मुलासाठीं तोंडचें, पोटचें, गांठींचें सर्वस्व खर्च करिते, त्याप्रमाणें मी माझ्या भक्तासाठीं सर्वस्व वेंचितों. ११६० तान्ह्या बाळानें जरी मागितलें नाहीं तरीहि त्याची माता जशी धांवत येऊन

बाळक न मागतां धांवोनि । कळवळोनि माता लावी स्तनीं । तेवीं भोळ्या भक्तांलागुनी । मी अनुसंधानीं लाविता ।। ६१ ।। ज्येष्ठ कनिष्ठ पुत्रातें पिता । एकचि जाण प्रतिपाळिता । ज्येष्ठातें निग्रहो करिता । लळे पुरविता बाळकांचे ।। ६२ ।। ज्येष्ठ वांकुडें बोलतां । तोंडावरी हाणे पिता । बाळक बोबडें बोलतां । संतोषे सर्वथा सर्वस्वें ।। ६३ ।। सज्ञानासी अबद्ध पडतां । दोष वाजती त्याचे माथां । भोळ्या भक्तांची अबद्ध कथा । तेणें देवो तत्त्वतां संतोषे ।। ६४ ।। कर्माकर्म प्रत्यवायता । हे सज्ञानासीच सर्वथा । भोळ्या भक्तांसी कर्मबाधकता । मी सर्वथा येऊं नेदीं ।। ६५ ।। भोजनीं बैसतां बापासी । दूरी बैसवी ज्येष्ठ पुत्रासी । अंकीं वाऊनि बाळकासी । तृप्ति निजग्रासीं देतुसे ।। ६६ ।। तेथें जें जें गोड आपणासी । तें तें दे बाळकासी । न घेतां प्रार्थूनि त्यासी । तृप्तीच्या ग्रासीं जेववी ।। ६७ ।। तेवीं साधनीं शिणतां सज्ञानासी । प्राप्ती होय अतिप्रयासीं । माझिया भोळ्या भक्तांसी । मीचि अनायासें उद्धरीं ।। ६८ ।। वाट चुकल्या भुयाळासी । फेरा पडे चालों जाण त्यासी । बाळक बापाचे कडियेसी । श्रमू तयासी येवों न शके ।। ६९ ।। तेवीं साधनीं अंगविकळता । ते वाजे सज्ञानाचे माथां । भोळ्या भक्तातें मी उद्धरिता । प्रयास सर्वथा त्या नाहीं ।। ११७० ।। त्यासी वाऊनि आपुल्या खांदीं । मी पाववीं सायुज्यसिद्धी । नवल त्याची भोळी बुद्धि । तेथही भजनविधि न सांडी ।। ७१ ।। हृदयीं कपटाचा थारा । तोचि भजनासी आडवारा । करितां युक्तिप्रयुक्ति विचारा । विचाराबाहिरा मी त्यासी ।। ७२ ।। नेणे आचाराविचारा । केवळ भावार्थी भोळा खरा । न धरत न सांवरत एकसरां ।

कळवळून त्याला प्यावयास घेते, त्याप्रमाणें माझ्या भोळ्या भक्तांना मी माझ्या चिंतनांत लावितों. ६१ लहान व मोठ्या पुत्रांचा संभाळ करणारा त्यांचा पिता एकच असतो, पण तो मोठ्या मुलांना धाकांत ठेवितो व लहान मुलांचें कोड पुरवून कौतुक करितो. ६२ मोठा जाणता मुलगा जर कांहीं अपशब्द बोलला तर पिता लगेच त्याच्या थोबाडींत देतो. पण लहान मुलांनीं कसेंहि बोबडे शब्द उच्चारिले तरी ते ऐकून त्याला अतिशय आनंद होतो. ६३ सज्ञान माणसानें असंबद्ध भाषण केल्यास त्याचा दोष त्याच्याच माथीं येतो. पण भोळ्या भाविकांनीं जरी असंबद्ध कथा गाइली तरी देवाला त्यापासून मोठा संतोषच होतो. ६४ सज्ञानी लोकांसाठींच कर्माकर्माचा सर्व दोष आहे. भोळ्या भक्ताकडे कर्मबाधकता मी कधीं येऊंच देत नाहीं. ६५ पिता जेवावयास बसला कीं, मोठया वडील पुत्राला दूर बसवितो व सर्वांत लहान मुलास आपल्या मांडीवर बसवून त्याला आपला घास भरवून तृप्त करितो. ६६ स्वतःला जें जें गोड वाटतें, तें तें तो लहान मुलाला देतो. त्यानें जर घेतलें नाहीं तर त्याचीं आर्जवें करून आपला घास त्याच्या तोंडांत घालितो. ६७ त्याप्रमाणें सज्ञान लोक अनेक साधनें करून थकल्यावर त्यांना मोठ्या प्रयासानें माझी प्राप्ति होते. पण माझ्या भोळ्या भक्तांचा मीच अनायासें उद्धार करितों. ६८ वाटाड्याला चालतां येत असूनहि तो रस्ता चुकला तर त्याला पुनः खेप पडते, पण पित्याच्या कडेवर बसलेल्या मुलाला चालण्याचे श्रम जाणवत नाहींत. ६९ त्याप्रमाणें सज्ञानी लोकांनाच साधनांतील सदोषता बाधते. भोळ्या भक्तांचा मी उद्धार करणारा असल्यामुळें त्यांना कसलाच प्रयास पडत नाहीं. ११७० मी त्यांना आपल्या खांद्यावर बसवून सायुज्यसिद्धीला नेऊन पोंचवितों. त्यांचा भोळा भाव केवढा विलक्षण असतो, पहा! ते तेथेंहि आपला भजनविधि सोडीत नाहींत. ७१ मनांत कपट ठेविणें हाच भजनांत अडथळा आहे. युक्ति-प्रयुक्तीनें विचार करूं लागल्यास मी त्याच्या विचाराबाहेरच असतों. ७२ केवळ भाविक भक्त आचार-विचार कांहीं जाणत नाहीं. तो खराच भोळा असतो. तो दुसऱ्या कोठेंहि न वळतां सरळ माझ्याकडेच

मज भीतरां तो पावे ।। ७३ ।। देखोन भोळिविया भक्तासी । मीचि सामोरा धांवें त्यासी । त्यापाशीं मी अहर्निशीं । भुललों भावासी सर्वथा ।। ७४ ।। केवळ जे भोळे भक्त । ते भगवंतासी आवडत । सांगतां कृष्ण मिटकिया देत । लाळ घोटीत उद्धवू ।। ७५ ।। मज भोळ्या भक्तांची आवडी । काय सांगों त्याची गोडी । त्यावेगळी अर्धघडी । कोडी परवडी नावडती ।। ७६ ।। यापरीचे जे भोळे भक्त । ते मी मानीं उत्तम भागवत । त्यांच्या पायां मी लागें भगवंत । उत्तम निश्चित ते जाण ।। ७७ ।। त्यांलागीं मी आर्तभूत । त्यांलागीं सदा सावचित्त । त्यांलागीं मी दशदिशा धांवत । भोळा भक्त दुर्लभ ।। ७८ ।। उद्धवा काय सांगों गोठी । भोळा भक्त देखोनि दिठीं । मीही आपुलिये सवसाटीं । उठाउठी घेतुसें ।। ७९ ।। येऱ्हवीं मोल करितां जाण । मजहूनि माझे भक्त गहन । यालागीं मी त्यांअधीन । भक्तवचन नुलंघीं ।। ११८० ।। भोळ्या भक्तांचें वचन । माझेनि नुलंघवे जाण । देवकीवसुदेवांची आण । भावो प्रमाण भजनासी ।। ८१ ।। वृथा घृतेंवीण भोजन । वृथा वंध्येचें मैथुन । वृथा भावेंवीण भजन । सत्य जाण उद्धवा ।। ८२ ।। भावो तेथ भाग्य पहा हो । भावो तेथ मी निःसंदेहो । भावो तेथें प्रकटे देवो । निजस्वभावो स्वानंदें ।। ८३ ।। भावो तेथ विरक्ती । भावो तेथ प्रकटे शांती । भावो तेथ माझी भक्ती । उल्हासती निजबोधें ।। ८४ ।। एवं भाविकांमाजीं माझी भक्ती । मजसहित स्वानंदें नाचती । यालागीं भोळे जे भावार्थी । ते उत्तम होती भागवत ।। ८५ ।। नेणते भक्त जे मातें भजती । ते मज पावले या रीतीं । सांगीतली ते म्यां व्युत्पत्ती । आतां उत्तम भक्ती अवधारीं ।। ८६ ।।

धांवत येतो व मद्रूप होतो. ७३ अशा भोळ्या भक्ताला पाहून मीहि त्याला सामोरा जातों. त्याच्या भाविकपणाला मी पूर्णपणें भाळतों व रात्रंदिवस त्याच्यापाशीं रहातों. ७४ जे केवळ भोळे भक्त असतात ते भगवंताला आवडतात. हें सांगत असतांना श्रीकृष्ण मिटक्या मारूं लागला व उद्धव लाळ घोटूं लागला ७५ श्रीकृष्ण म्हणाले कीं, मला भोळ्या भक्तांची अतिशय आवड आहे. त्याची गोडी तुला काय सांगूं ! त्यांच्यावांचून मला एक घटकाभरहि सुखाचे उपचार आवडत नाहींत. ७६ अशाप्रकारचे जे भोळे भक्त त्यांना मी उत्तम भागवत समजतों. मी भगवान् त्याचे पाय धरितों. ते उत्तम होत, असें खात्रीनें जाण. ७७ त्यांच्यासाठीं मी अत्यंत उत्कंठित असतों. सावध रहातों. त्यांच्यासाठीं मी दाहीदिशांत धांवतों. कारण भोळा भक्त दुर्लभ आहे. ७८ उद्धवा ! तुला काय सांगूं ! भोळा भक्त दृष्टीस पडतांच मी स्वतःचा मोबदला देऊन त्यास तत्काल घेतों. ७९ एरवीं जर मोलच करावयास गेलें तर माझ्या भक्तांची किंमत माझ्याहूनहि जास्त आहे. म्हणून तर मी त्यांच्या अधीन राहून त्यांच्या शब्दाचें उलंघन कधींहि करीत नाहीं. ११८० भोळ्या भक्ताच्या शब्दाचें माझ्यानें उलंघन करवत नाहीं, हें मी देवकी-वसुदेवांची शपथ वाहून सांगतों. भजनाला भक्ति हेंच मुख्य प्रमाण आहे. ८१ उद्धवा ! तुपावांचून जेवण, वंध्यास्त्रीचा संबंध, हें जसें व्यर्थ, तसेंच भक्तीवांचून भजन व्यर्थ आहे, हें अगदीं खरें समज. ८२ जेथें भाव तेथेंच भाग्य आणि जेथें भाव तेथें निःसंशय मी असतों. जेथें भाव तेथें देव स्वभावतःच आनंदानें प्रकट होतो. ८३ जेथें भाव तेथें विरक्ति व जेथें भाव तेथें शांति प्रकट होते आणि जेथें भाव तेथेंच माझी भक्ति आत्मभावानें विकास पावते. ८४ याप्रमाणें भाविकांमध्यें माझी भक्ति माझ्यासह स्वानंदानें नाचत असते. यास्तव जे भोळे भाविक भक्त तेच उत्तम भागवत होत. ८५ जे माझे अज्ञ भक्त मला भजतात ते अशाप्रकारें मला येऊन मिळतात. त्यांचा प्रकार मीं तुला सांगितला. आतां उत्तम भक्ति कशी असते, ती ऐक. ११८६.

मल्लिंगमद्भक्तजनदर्शनस्पर्शनार्चनम् । परिचर्या स्तुतिः प्रह्वगुणकर्मानुकीर्तनम् ॥ ३४ ॥
मत्कथाश्रवणे श्रद्धा मदनुध्यानमुद्धव । सर्वलाभोपहरणं दास्येनात्मनिवेदनम् ॥ ३५ ॥
मज्जन्मकर्मकथनं मम पर्वानुमोदनम् । गीतताण्डववादित्रगोष्ठीभिर्मद्गृहोत्सवः ॥ ३६ ॥
यात्रा बलिविधानं च सर्ववार्षिकपर्वसु । वैदिकी तांत्रिकी दीक्षा मदीयव्रतधारणम् ॥ ३७ ॥
मदर्चास्थापने श्रद्धा स्वतः संहृत्य चोद्यमः । उद्यानोपवनाक्रीडपुरमन्दिरकर्मणि ॥ ३८ ॥
संमार्जनोपलेपाभ्यां सेकमण्डलवर्तनैः । गृहशुश्रूषणं मह्यं दासवद्यदमायया ॥ ३९ ॥
अमानित्वमदम्भित्वं कृतस्यापरिकीर्तनम् । अपि दीपावलोकं मे नोपयुंज्यान्निवेदितम् ॥ ४० ॥
यद्यदिष्टतमं लोके यच्चातिप्रियमात्मनः । तत्तन्निवेदयेन्मह्यं तदानन्त्याय कल्पते ॥ ४१ ॥

—साधूंचें लक्षण सांगितलें. आतां पुढील आठ श्लोकांनीं भक्तीचें लक्षण सांगतात.—

मल्लिंग-मद्भक्तजन-दर्शन-स्पर्शन-अर्चनं—माझीं प्रतिमादि लिंगें व माझे भक्तजन यांचें दर्शन, स्पर्श, पूजन, **परिचर्या स्तुतिः प्रह्वगुणकर्मानुकीर्तनं**—सेवा, स्तुति, नमस्कार, गुण व कर्में यांचें संकीर्तन ३४, **उद्धव**—हे उद्धवा ! **मत्कथाश्रवणे श्रद्धा**—माझ्या कथाश्रवणामध्यें श्रद्धा, **मदनुध्यानं**—माझें चिंतन, **सर्वलाभोपहरणं**—सर्व लाभ मला अर्पण करणें, **दास्येन आत्मनिवेदनं**—दास्यानें मला आत्मसमर्पण करणें, ३५. **मज्जन्मकर्मकथनं**—माझा जन्म व कर्म यांचें कथन, **मम पर्वानुमोदनं**—जन्माष्टमी इत्यादि माझ्या पर्वकाळीं महोत्सव करणें, **गीत-तांडव-वादित्र-गोष्ठीभिः मद्गृहोत्सवः**—गायन, तांडवनृत्य, मंगल वाद्यांचें वादन, माझ्याविषयींच्या कथा यांच्या योगानें माझ्या मंदिरांत उत्सव करणें, ३६. **यात्रा**—माझ्या तीर्थक्षेत्रांना जाणें, **सर्ववार्षिकपर्वसु**—पावसाळयांतील म्ह० चातुर्मास्यांतील एकादशी प्रभृति सर्व पर्वकाळीं, **बलिविधानं च**—पुष्पोपहारादि मला समर्पण करणें, **वैदिकी तांत्रिकी दीक्षा**—वैदिक व तांत्रिक दीक्षा घेणें, **मदीयव्रतधारणं**-माझ्या व्रतांचें धारण करणें, ३७. **मदर्चास्थापने श्रद्धा**—माझ्या मूर्तीची स्थापना करण्याविषयीं पूर्ण श्रद्धा, **उद्यान-उपवन-आक्रीड-पुर मन्दिर-कर्मणि स्वतः संहृत्य च उद्यमः**—फुलांची बाग, फळझाडांचा मळा, क्रीडास्थान, नगर, मंदिर इत्यादि करण्याचें स्वतःला सामर्थ्य असल्यास स्वतः व तें नसल्यास अनेकांनीं मिळून त्याविषयीं उद्योग करणें, ३८. **संमार्जन-उपलेपाभ्यां सेकमंडलवर्तनैः दासवत् यत् अमायया मह्यं गृहशुश्रूषणं**—केर काढणें, सारवणें, सडा घालणें, चित्रविचित्र रांगोळया काढणें यांच्या योगानें एखाद्या दासाप्रमाणें निष्कपटपणें माझ्या गृहाची शुश्रूषा करणें, ३९. **अमानित्वं**—मानिपणा न ठेवणें, **अदंभित्वं**—दांभिकपणा न स्वीकारणें, **कृतस्य अपरिकीर्तनं**—केलेल्या धर्माचें आपल्या तोंडानें कथन न करणें, **दीपावलोकं अपि**—दीपमाळेवर दीपादि पाजळणें, **मे निवेदितं न उपयुञ्जात्**—आपण स्वतःच किंवा दुसऱ्या कोणीं मला समर्पण केलेल्या नैवेद्याचा स्वीकार न करणें. ४०. **लोके आत्मनः यत् यत् इष्टतमं**—या प्रपचांत आपल्याला जें जें अतिशय इष्ट वाटत असेल, **यत् च अतिप्रियं**—आणि जें अतिप्रिय असेल, **तत् तत् मह्यं निवेदयेत्**—तें तें मला निवेदन करावें, **तत् आनंत्याय कल्पते**—तें अनंत फल देण्यास समर्थ होतें. ४१. [हें साधारण स्थावर पदार्थांविषयीं किंवा आसक्तीनें प्राप्त झालेल्या पदार्थांविषयीं समजावें, पण भक्तीनें प्रसाद घेण्यास कांहीं हरकत नाहीं. सहा महिने एकसारखे उपवास केल्यानें जें फल मिळतें म्हणून सांगितलें आहे तेंच कलियुगांत विष्णूच्या नैवेद्यांतील एक शित खाणारासहि मिळतें. ज्याच्या हृदयामध्यें विष्णूचें रूप, मुखामध्यें नाम, उदरामध्यें हरीचा नैवेद्य व तीर्थ, आणि मस्तकावर निर्माल्य असतो तो अच्युतच होय. इत्यादि वचनें याविषयीं प्रमाण आहेत. किंवा 'निवेदितं मे न उपयुंजात्' याचा अर्थ असा – इतर देवतांना निवेदन केलेलें अन्नादि पुनः मला निवेदन करूं नये. 'विष्णूला निवेदन केलेल्या अन्नानें इतर देवतांचें यजन करावें व तें अन्न पितरांना द्यावें म्हणजे तें अनंत फल देण्यास समर्थ होतें. पण याच्या उलट जो पितरांना निवेदन करून राहिलेलें अन्न परमात्म्या हरीला अर्पण करितो, त्याचे पितर निर्वीर्य व दुःखी होतात' अशीं याविषयीं अनेक वचनें आहेत.]

नाना अवतारअनुक्रमा । शैवी वैष्णवी अतिउत्तमा । शास्त्रोक्त माझ्या प्रतिमा । तीर्थक्षेत्रीं महिमा विशेष ज्यांचा ॥ ८७ ॥ ज्या प्रतिमा देवीं प्रतिष्ठिलिया । ज्या नरकिन्नरीं संस्थापिलिया । ज्या स्वयें स्वयंभ प्रकटलिया । शास्त्रीं बोलिलिया गंडकी ॥ ८८ ॥ एकी भक्तअनुग्रहें आल्या । आसुरीं निशाचरीं ज्या केल्या । आपुलाल्या घरीं पूजिल्या । भक्तीं करविल्या त्रैवर्णिकीं ॥ ८९ ॥ ऐशा माझ्या प्रतिमांची भेटी । पाहों धांवे उठाउठी । पूजा करावया पोटीं । आवडी मोटी उल्हासे ॥ ११९० ॥ माझें स्वरूप ते माझे भक्त । मी तेचि ते माझे संत । त्यांचे भेटीलागीं आर्तभूत । जैसें कृपणाचें चित्त धनालागीं ॥ ९१ ॥ माझ्या प्रतिमांहूनि अधिक । संतभजनीं अत्यंत हरिख । साधुसंगतीचें अतिसुख । सांडूनि देख घरदारां ॥ ९२ ॥ चिंतामणीसी कीजे जतन । तैसी मर्यादा राखे सज्जन । नीच नवें अधिक भजन । न धाये मन पूजितां ॥ ९३ ॥ सिद्ध करूनि पूजासंभार । माझे पूजेचा अत्यादर । पूजा करितां एकाग्र । जैं साधु नर घरा येती ॥ ९४ ॥ त्या साधूंची पूजा न करितां । जो माझी पूजा करी सर्वथा । तेणें मज हाणितल्या लाता । कीं तो माझ्या घाता प्रवर्तला ॥ ९५ ॥ बाळक एक एकुलता । त्यासी माथां हाणिल्या लाता । मग पाटोळाही नेसवितां । क्षोभली माता समजेना ॥ ९६ ॥ तेवीं अवगणुनी माझिया संतां । मीचि क्षोभें मज पूजितां । ते सेवा नव्हे सर्वथा । अतिक्षोभकता मज केली ॥ ९७ ॥ संत माझे लळेवाड । त्यांची पूजा मज लागे गोड । संतसेवकांचें मी पुरवीं कोड । मज निचाडा चाड संतांची ॥ ९८ ॥ सांडूनि माझें पूजाध्यान । जो संतांसी घाली लोटांगण । कोटि यज्ञांचें फळ जाण । मदर्पण तेणें केलें ॥ ९९ ॥ सकळ तीर्थीं तोचि न्हाला । जपतपादिफळें तोचि

शैव आणि वैष्णव यांनीं तीर्थक्षेत्रांत माझ्या अनेक अवतारांच्या ज्या अति उत्तम प्रतिमा यथाशास्त्र स्थापन केल्या आहेत त्यांचें माहात्म्य विशेष आहे; ८७ किंवा ज्या मूर्तींची देवांनीं प्रतिष्ठा केलेली असते, मनुष्य व किन्नर यांनीं ज्यांची स्थापना केलेली असते, किंवा ज्या स्वयंभू मूर्ति प्रकट झालेल्या असतात त्यांना शास्त्रांत 'गंडकी' असें म्हणतात. ८८ यांपैकीं कांहीं मूर्ति भक्तावर अनुग्रह करण्यासाठीं आलेल्या असतात. कांहीं राक्षसांनीं व असुरांनीं केलेल्या असतात व कांहीं त्रैवर्णिकांनीं आपापल्या घरीं पूजा करण्यासाठीं केलेल्या असतात. ८९ अशा ज्या माझ्या प्रतिमा त्यांचें दर्शन घ्यावयास माझा भक्त मोठ्या त्वरेनें धांवतो. ११९० माझे भक्त माझें स्वरूपच आहेत. जो मी, तेच माझे संत. त्यांची पूजा करण्याची मला फार मोठी इच्छा असते. कृपणाचें चित्त जसें द्रव्यासाठीं ओढत असतें तसें माझें चित्त त्यांच्या भेटीसाठीं उत्सुक असतें. ९१ त्यांना माझ्या मूर्तींपेक्षां संतांच्या भजनांत अत्यंत आनंद होतो. घरदार सोडून संतांच्या संगतींत ते सुखी असतात. ९२ चिंतामणि जसा जतन करून संभाळून ठेवितात तसे माझे भक्त संतांची मर्यादा राखण्यासाठीं जपत असतात. ते नित्य नवें भजन करितात. त्यांची पूजा करून मन कधीं तृप्तच होत नाहीं. ९३ पूजेचें साहित्य तयार करून अति आदरानें माझी एकाग्र चित्तानें पूजा करीत असतां जर कोणी साधु-संत त्यावेळीं घरीं आले ९४ व त्यांची पूजा न करितां तो माझ्याच पूजेंत मग्न झाला तर त्याची ती पूजाच नव्हे त्यानें मला लाथा मारिल्या किंवा तो माझा घात करण्यास प्रवृत्त झाला असेंच मी समजतों. ९५ एखादीचें एकुलतें एक मूल असलें व त्या मुलाच्या मस्तकावर कोणी लाथा मारिल्या आणि नंतर त्याच्या आईची समजूत करण्यासाठीं तिला रेशमी उंची वस्त्र नेसावयास जरी दिलें तरी तिचा क्रोध जसा शांत होत नाहीं ९६ त्याचप्रमाणें माझ्या संतांची उपेक्षा करून माझी पूजा केल्यास माझाच क्षोभ होतो. ती पूजा माझी सेवा नसून मला क्षुब्ध करणारी आहे, असें समज. ९७ संत माझे अतिशय लाडके आहेत. त्यांची पूजा मला गोड वाटते. संतांची सेवा करणारांचे सर्व मनोरथ मी पुरवितों. आत्मतृप्त अशा मलाहि संतांची इच्छा आहे. ९८ माझें पूजन, ध्यानादिक सोडून जो संतांना शरण जातो, त्यानें कोटि यज्ञांचें फळच मला अर्पण केलें, असें जाण. ९९ ज्यानें साधूंना आदरानें वंदन केलें, त्याला सर्व तीर्थांत स्नान घडतें. जप-तपा-

लाहिला । सर्व पूजांचें सार तो पावला । जेणें साधू वंदिला सन्मानें ॥ १२०० ॥ प्रतिमा माझ्या अचेतन व्यक्ती । संत सचेतन माझ्या मूर्ती । दृढ भावें केल्या त्यांची भक्ती । ते मज निश्चितीं पावली ॥ १ ॥ केल्या प्रतिमा निजकल्पना उत्तम । संत प्रत्यक्ष पुरुषोत्तम । चालतेंबोलतें परब्रह्म । अतिउत्तम साधुसेवा ॥ २ ॥ माझ्या प्रतिमा आणि साधुनर । तेथें या रीतीं भजती तत्पर । हा तंव सांगीतला निर्धार । भजनप्रकार तो ऐक ॥ ३ ॥ प्रतिमा आणि साधु सोज्ज्वळे । आवडीं न पाहती ज्यांचे डोळे । दृष्टि असोनि ते आंधळे । जाण केवळें मोरपिसें ॥ ४ ॥ जेवीं का प्रिया पुत्र धन । देखेनियां सुखावती नयन । तैसें संतप्रातिमांचें दर्शन । आवडीं जाण जो करी ॥ ५ ॥ अतिउल्हासें जें दर्शन । या नांव गा देखणेपण । तेणें सार्थक नयन जाण । दृष्टीचें भजन या रीतीं ॥ ६ ॥ देखोनि संत माझीं रूपडीं । जो धांवोनियां लवडसवडी । खेंव देऊनियां आवडीं । मिठी न सोडी विस्मयें ॥ ७ ॥ ऐसें संतांचें आलिंगन । तेणें सर्वांग होय पावन । का मूर्तिस्पर्शें जाण । शरीर पावन होतसे ॥ ८ ॥ तीर्थयात्रे न चालतां । संतांसमीप न वचतां । हरिरंगणीं न नाचतां । चरण सर्वथा निरर्थक ॥ ९ ॥ जो का नाना विषयस्वार्थां । न लाजे नीचापुढें पिलंगतां । तो हरिरंगणीं नाच म्हणतां । आला सर्वथा उठवण्या ॥ १२१० ॥ तीर्थयात्रा क्षेत्रगमनता । हरिकीर्तना जागरणा जातां । संतसमागमें चालतां । का नृत्य करितां हरिरंगीं ॥ ११ ॥ या नांव गा सार्थक चरण । इतर संचार अधोगमन । चरणाचें पावनपण । या नांव जाण उद्धवा ॥ १२ ॥ सर्वभावें अवंचन । कवडी धरूनि कोटि धन । जेणें केलें मदर्पण । माझें अर्चन या नांव ॥ १३ ॥ धनधान्य वंचूनि गांठीं । माझी पूजा आहाच दृष्टीं । ते नव्हे अर्चनहातवटी । तो जाण कपटी मजसी पैं ॥ १४ ॥ लोभें खावया आपण । ठेवी प्रतिमेपुढें पक्वान्न । अतीत आलिया न घाली कण । मर्दचन तें नव्हे ॥ १५ ॥ कर

दिकांचें सर्व फळ त्याला प्राप्त होतें व सर्व पूजांचें सार त्याला मिळतें. १२०० प्रतिमा माझ्या जड मूर्ति आहेत, पण संत हें माझें साक्षात् चेतन स्वरूपच आहे. त्यांची दृढभावानें भक्ति केल्यास ती मला खात्रीनें पोंचते. १ माझ्या प्रतिमा कल्पनेनें उत्तम बनविलेल्या असतात व संत साक्षात् पुरुषोत्तमच, चालतें बोलतें परब्रह्म आहेत. यास्तव साधुसेवाच अत्यंत उत्तम आहे. २ माझ्या प्रतिमा व साधुपुरुष यांच्या सेवेंत तत्पर राहून भक्त मला ज्याप्रकारें भजतात तो प्रकार मीं तुला सांगितला. ३ आतां भजनाचा प्रकार ऐक. माझी प्रतिमा आणि सोज्ज्वल साधू यांस ज्यांचें डोळे प्रेमानें पहात नाहींत, त्यांचे ते डोळे मोराच्या पिसांसारखे असून आंधळे होत. ४ स्त्री, पुत्र व द्रव्य पाहून डोळ्यांचें जसें पारणें फिटतें तसेंच संत व प्रतिमा यांचें दर्शन तो आवडीनें घेतो. ५ त्यांचें अति उत्सुकतेनें दर्शन घेणें याचेंच नांव देखणेपणा. त्यानेंच डोळ्यांचें सार्थक होतें. याप्रमाणें दृष्टीचें भजन होत असतें. ६ संत माझ्याच प्रतिमा आहेत, असें समजून माझा भक्त गडबडीनें धांवून त्यांना आवडीनें आलिंगन देतो व आश्चर्यानें मिठी सोडीत नाहीं. ७ असें संताना दिलेलें जें आलिंगन त्यानें सर्वांग पावन होतें. किंवा मूर्तीच्या स्पर्शानेंहि देह पावन होतो. ८ तीर्थयात्रेला किंवा संतांच्या समीप न जाणारे, किंवा माझ्या कीर्तनमंडपांत न नाचणारे पाय सर्वथा निरुपयोगी होत. ९ अनेक प्रकारच्या विषयसुखासाठीं हीन माणसापुढेंहि लुडबुडण्यास त्याला लाज वाटत नाहीं, पण हरिकीर्तनांत नाचावयास सांगतांच त्याला आळस येतो. १२१० पुण्यक्षेत्रांतून तीर्थयात्रा करीत हिंडणें, हरिकीर्तनांत जागरण करण्यास जाणें, संतांच्या समूहाबरोबर चालणें किंवा हरिकीर्तनांत नाचणें ११ यालाच चरणांचें सार्थक म्हणतात. इतर ठिकाणीं फिरणें ही अधोगतिच होय. हे उद्धवा! यालाच चरणांचें पावनत्व म्हटलें आहे. १२ सर्वप्रकारें निष्कपट भावना ठेवून कोट्यावधि द्रव्यराशी तुच्छ मानून मन मदर्पण करणें याचेंच नांव माझें अर्चन. १३ जो धन-धान्याचा संग्रह करून बाह्यात्कारी माझी पूजा करितो, तें खरें अर्चन नव्हे. तो माझ्याशीं कपट करणाराच होय. १४ स्वतः खाण्याच्या हेतूनें माझ्यापुढें मिष्टान्नाचा नैवद्य ठेवितो व दाराशीं अतिथि आल्यास त्याला कोरडें अन्नहि देत नाहीं. तें खरोखर माझें जन नव्हे. १५ पूजा करून पवित्र झालेले हात भग-

पवित्र करितां पूजा । ते आवडती अधोक्षजा । जे न पूजिती गरुडध्वजा । त्या जाण भुजा प्रेताच्या ॥ १६ ॥ न करितां हरिपूजनें । न देतां सत्पात्रीं दानें । जडित मुद्रा बाहुभूषणें । तें प्रेतासी लेणें लेवविलें ॥ १७ ॥ वाचा सार्थक हरिकीर्तनें । का अनिवार नामस्मरणें । जयजयकाराचेनि गर्जनें । केलीं त्रिभुवनें पावन ॥ १८ ॥ रामनामाच्या गजरीं । सदा गर्जे ज्याची वैखरी । तेथ कळिकाळाची नुरे उरी । दुरितें दूरी पळालीं ॥ १९ ॥ हरिनाम सांडूनि करंटीं । मिथ्या करितातीं चावटी । जेवीं हागवणी पटपटी । तैशा गोठी जल्पती ॥ १२२० ॥ हरिनामाचा सुखसुरवाड । ज्याचे मुखीं लागला गोड । त्याचें मजपाशीं सरतें तोंड । मी अखंड त्याजवळी ॥ २१ ॥ गद्यपद्यें स्तवनमाळा । नाना पदबंधाची कळा । छंदें कुसरीं विचित्र लीळा । स्तुति गोपाळा अर्पावी ॥ २२ ॥ धैर्य स्थैर्य औदार्य । घनश्याम अतिसौन्दर्य । शौर्य वीर्य अतिमाधुर्य । गुणगांभीर्य गोविंद ॥ २३ ॥ त्रिविक्रम उभा बळीच्या द्वारीं । द्वार न सांडूनि द्वारकरी । तेणें द्वारें द्वारकेभीतरी । येऊनि उद्धरी कुशातें ॥ २४ ॥ तो अद्यापि श्रीहरी । स्वयें उभा समुद्रतीरीं । शोभा विराजमान साजिरी । असुरसुरनरीं वंदिजे ॥ २५ ॥ मत्स्य झाला तो सागरीं । वराह झाला नाशिकद्वारीं । उपजला खांबामाझारीं । यशोदेघरीं पोसणा ॥ २६ ॥ जरठपाठी झाला कमठू । बळिच्छळणीं तो खुजटू । वेदवादें अतिवाजटू । फुरफुराटू निःश्वासें ॥ २७ ॥ बाईल चोरीं नेली परदेशीं । तीलागीं रडे पडे वनवासीं । एकही गुण नाहीं त्यापाशीं । शेखीं दासी कुब्जेसी रातला ॥ २८ ॥ ' स्तुति गुणकर्मानुकीर्तन ' । तें या नांव गा तूं जाण । ' प्रह्व ' म्हणिजे तें नमन । तेंही व्याख्यान अवधारीं ॥ २९ ॥ माझे प्रतिमांचे दर्शन । का देखोनि संत जन । जो भावें घाली लोटांगण । देहाभिमान सांडूनि ॥ १२३० ॥ साधुजनांसी वंदितां । धणी न मनी जो चित्ता । पुनः पुन्हा चरणीं

वानाला आवडतात. जो श्रीकृष्णाची पूजा करीत नाहीं, त्याचा हात प्रेताचाच होय. १६ हरीचें पूजन न करितां व सत्पात्राला दान न देतां रत्नजडित अलंकार हातांत घालणारा प्रेतावर दागिने चढविणाराच होय. १७ हरि-कीर्तनानेंच वाणीचें सार्थक होतें. किंवा अनिवार नामस्मरण व जय-जयकाराच्या गर्जनेनें त्रिभुवन पावन होतें. १८ त्याची वाणी निरंतर रामनामाचा गजर जेथें करीत असते तेथें कळि-काळ उभा रहात नाहीं. सर्व पातकें दूर पळतात. १९ अभागी मूर्खलोक हरिनाम सोडून व्यर्थ वायफळ गप्पा मारीत बसतात व त्यांच्या तोंडून निरर्थक शब्द पटापट निघतात. १२२० ज्याच्या मुखाला हरिनामाच्या सुखाची गोड चटक लागली आहे, तो सर्वदा माझ्या संमुख असतो व मी निरंतर त्याच्यापाशीं असतों. २१ अनेक प्रकारची गद्यपद्य स्तोत्रें, प्रेमळ काव्यें, विविध वृत्तांत रचलेल्या हरीच्या लीळा इत्यादि सर्व भगवानाला अर्पण करावें. २२ घनश्याम श्रीकृष्ण अत्यंत सुंदर आहे. त्या गोविंदामध्यें धैर्य, स्थैर्य, औदार्य, शौर्य, वीर्य व अतिमाधुर्य या गुणांचें अति गांभीर्य आहे. म्ह० त्याच्यांत हे सर्व गुण विपुल आहेत. २३ श्रीकृष्ण बळीचा द्वारपाळ होऊन त्याच्या दारांत उभा राहिला; पण त्यानें त्याच मार्गानें द्वारकेस येऊन कुशाचा उद्धार केला. २४ तोच श्रीहरि अद्यापि समुद्रतीरावर प्रत्यक्ष उभा आहे. त्याची शोभा विलक्षण आहे. देव व मनुष्यें त्याला वंदन करितात. २५ तोच समुद्रांत मत्स्य झाला होता. नासिकद्वारीं वराह झाला. तोच खांबांतून प्रकट झाला व शेवटीं यशोदेच्या घरीं वाढला. २६ तोच कठिण पाठीचा कांसव झाला. तोच बळीला छळण्यासाठीं बुटका वामन झाला. तोच वेदवादानें अतिशय भांडखोर झाला आणि सापासारखा फुत्कार सोडूं लागला. २७ चोरानें बायको पळवून परदेशी नेली म्हणून तिच्या-साठीं वनवासांत रडणाराहि तोच. त्याच्यापाशीं एकहि गुण नाहीं. शेवटीं तोच कुब्जादासीशीं रत झाला. २८ ' गुणकर्मानुकीर्तन ' यालाच म्हणतात. आतां ' प्रह्व ' म्हणजे नमन. त्याचेंहि निरूपण ऐक. २९ माझा भक्त देहाभिमान टाकून माझ्या प्रतिमेचें दर्शन होतांच किंवा साधु-संत दृष्टीस पडतांच भक्तीनें लोटांगण घालितो. १२३० संतांना वंदन करीत असतां त्याची तृप्तिच होत नाहीं. अत्यंत नम्रतेनें व विनयानें तो वारंवार त्यांच्या

माथा । विनीततां अतिनम्र ॥ ३१ ॥ भागवताचे रजःकण । जो मस्तकीं वंदीना आपण । तो जीवें जीतां प्रेत जाण । अपवित्र तैसें तया ॥ ३२ ॥ सांडूनि लौकिकाच्या लाजा । जो वैष्णवांच्या चरण-रजा । गडबडां लोळे वोजा । हा भक्तीचा माझा उल्हास ॥ ३३ ॥ या आवडीं करितां भजन । सहजें जाती मानाभिमान । हें मुख्य भक्तीचें लक्षण । जे मानाभिमान सांडावे ॥ ३४ ॥ त्यजावया मानाभिमान । करावें मत्कीर्तनश्रवण । श्रवणादि भक्तीचें लक्षण । ऐक संपूर्ण उद्धवा ॥ ३५ ॥

दृढ आस्तिक्यें समाधान । शुद्ध श्रद्धा त्या नांव जाण । भावार्थें न डंडळी मन । कथाश्रवण सादरें ॥३६॥ वक्त्याच्या वचनापाशीं । जडूनि घाली कानामनासी । श्रवणार्थ वाढवी बुद्धीसी । विकिला कथेसी भावार्थें ॥३७॥ जेवीं दुधालागीं मांजर । संधी पहावया सादर । तेवीं सेवावया कथासार । निरंतर उल्हासु ॥ ३८ ॥ जडित कुंडलेंमंडित कान । तें श्रवणासी नोव्हे मंडण । श्रवणासी श्रवण भूषण । श्रवणें श्रवण सार्थक ॥ ३९ ॥ जरी स्वयें झाला व्याख्याता । पुराणपठणें पुरता । तरी साधुमुखें हरिकथा । ऐके सादरता अतिप्रीतीं ॥ १२४० ॥ श्रवणें श्रवणार्थीं सावधान । तोचि अर्थ करी मनन । संपल्या कथा-व्याख्यान । मनीं मनन संपेना ॥ ४१ ॥ ऐसें ठसावल्या मनन । सहजेंचि लागे माझें ध्यान । सगुण अथवा निर्गुण । आवडी प्रमाण ध्यानासी ॥ ४२ ॥ तेथ ध्येय ध्यान ध्याता । तिहींसी एकी गांठी नसतां । तंवचिवरी ध्यानावस्था । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ४३ ॥ ज्याच्या जीवीं ध्यानाची आवडी । ज्याच्या मनासी माझी गोडी । उद्धवा हे तैंचि जोडे जोडी । जैं जन्मकोडी निजभाग्यें ॥ ४४ ॥ निष्काम करोनियां मन । जन्मजन्मांतरीं साधन । केलें असेल तैं माझें ध्यान । विश्वासें जाण दृढ लागे ॥ ४५ ॥ दृढ लागल्या माझें ध्यान । अनन्यभावें माझें भजन । सर्व पदार्थेंसीं जाण । आत्मसमर्पण

चरणांवर मस्तक ठेवितो. ३१ भगवद्भक्तांच्या पायाची धूळ जो मस्तकावर धारण करीत नाहीं, तो जिवंत असूनहि प्रेतासारखाच होय. त्याला शवासारखाच अपवित्र समजावा. ३२ जो लौकिकाची चाड सोडून वैष्णवांच्या चरण-धूळींत मोठ्या आवडीनें गडबडां लोळतो, तोच माझ्या भक्तीचा उल्हास आहे. ३३ अशा आवडीनें भजन केलें असतां माना-भिमान सहज नाहींसा होतो. ज्याच्यायोगें मानाचा अभिमान निघून जातो, तेंच माझ्या भक्तीचें मुख्य लक्षण आहे. ३४ मानाभिमान टाकण्यासाठीं माझें कीर्तन श्रवण करावें. उद्धवा ! आतां श्रवणादि भक्तीचें लक्षण पूर्णपणें ऐक. १२३५.

दृढ आस्तिक्यभावानें जें समाधान त्यालाच शुद्ध श्रद्धा म्हणतात. आदरानें कथाश्रवण केलें असतां त्यांचें मन श्रद्धेपासून ढळत नाहीं. वक्त्याच्या शब्दाकडे तो कान व मन ठेवितो आणि ऐकलेला अर्थ बुद्धीनें वाढवितो. तो भाविकपणामुळें कथेला विकूनच घेतो. ३७ मांजर जसें दुधासाठीं टपून बसतें तसा तो लोकांचें दुर्लक्ष झाल्याची संधि पाहून कथासार ऐकण्यास उत्सुक असतो. ३८ रत्नजडित कुंडलानें कान सुशोभित केले तरी तें कांहीं कानांचें खरें भूषण नव्हे, श्रवण हेंच कानांचें खरें भूषण आहे. त्यानेंच कानांचें सार्थक होतें. ३९ तो स्वतः जरी वक्ता होऊन कथा-पुराण सांगण्यांत निष्णात झाला तरी साधूंच्या तोंडून तो अत्यंत आवडीनें व आदरानें हरिकथा ऐकितो. १२४० जो लक्षपूर्वक कान देऊन कथा ऐकितो व त्याच अर्थाचें मनन करितो, त्याच्या मनांतील मनन कथा आटोपली तरी संपत नाहीं. ४१ असें मनन एकदा ठसलें कीं, सहजच आवडीप्रमाणें सगुण किंवा निर्गुण ध्यान करण्याकडे मन लागतें. ४२ उद्धवा ! जोपर्यंत ध्येय, ध्यान व ध्याता या त्रिपुटीची एकरूपता झाली नाहीं तोंपर्यंतच ध्यानावस्था असते. ज्याला ध्यानाची आवड असते, ४३ ज्याच्या मनाला माझी गोडी असते, त्यालाच अशी अवस्था प्राप्त होते. उद्धवा ! यालाहि कोट्यवधि जन्मांचें भाग्य लागत असतें, तेव्हांच हा लाभ घडतो. ४४ निष्काम मनानें अनेक जन्मीं साधनें आचरिलीं असतील, तरच माझ्या ध्यानावर दृढ विश्वास बसेल. ४५ माझें ध्यान दृढ झालें व अनन्यभावानें माझें भजन घडूं लागलें कीं तो सर्व वस्तूंसह मला

मज करी ॥ ४६ ॥ वैदिक लौकिक दैहिक । या क्रियांचे लाभ देख । जरी झाल्या अलोलिक । भक्त भाविक तैं नेघे ॥ ४७ ॥ वैदिक लाभ दिव्य सामग्री । स्वर्गादि सत्यलोकवरी । भक्त तेंहीं हातीं न धरी । भजन सुखें करी संतुष्ट ॥ ४८ ॥ लौकिक लाभाची श्रेणी । कल्पतरु कामधेनु चिंतामणी । भक्त अर्पी कृष्णार्पणीं । हरिभजनीं संतुष्ट ॥ ४९ ॥ दैहिक लाभाची थोरी । गजांतलक्ष्मी आल्या घरीं । भक्त कृष्णार्पण करी । भजन सुखें करी संतुष्ट ॥ १२५० ॥ आविरिंच्यादि लाभ जाण । सर्वहि मानोनियां गौण । माझे भक्तीसी विकिला प्राण । सर्व समर्पण मज करी ॥ ५१ ॥ जेणें सेवेसी विकिला प्राण । तो वृथा जावों नेदी अर्ध क्षण । माझी कथा माझें ध्यान । महोत्साहो जाण माझाचि ॥ ५२ ॥

ध्यानावस्थे करी ध्यान । नातरी कथानिरूपण । अनुसंधानीं सावधान । रितें मन राहों नेदी ॥ ५३ ॥ माझीं जन्मकर्में निरूपितां । आवडीं उल्हास थोर चित्ता । स्वेद रोमांच द्रवतां । सप्रेम कथा उल्हासे ॥ ५४ ॥ ऐकूनि रहस्य हरिकथा । द्रव नुपजे ज्याचिया चित्ता । तो पाषाण जाण सर्वथा । जळीं असतां कोरडा ॥ ५५ ॥ ऐक माझें भक्तीचें चिन्ह । माझ्या पर्वाचें अनुमोदन । करी करवी आपण । दीनोद्धरणउपावो ॥ ५६ ॥ पर्वविशेष भागवतधर्मीं । नृसिंहजयंती रामनवमी । वामनजयंती जन्माष्टमी । उत्तमोत्तमीं शिवरात्र ॥ ५७ ॥ वैष्णवांसी शिवरात्रि विरुद्ध । हें बोलणें अतिअबद्ध । सकळ पुराणीं अविरुद्ध । व्यास विशुद्ध बोलिला ॥ ५८ ॥ शिव श्याम तमोगुणी । तो शुद्ध झाला विष्णूच्या ध्यानीं । विष्णु श्याम शिवचिंतनीं । विनटले गुणीं येरयेरां ॥ ५९ ॥ शिव धवळधाम गोक्षीरू । विष्णु घनश्याम अतिसुंदरू । बाप ध्यानाचा बडिवारू । येरें येरू व्यापिला ॥ १२६० ॥ मुदला दोहींसी ऐक्य शुद्ध मा उपासकांसीं कां विरुद्ध । शिवरात्री वैष्णवांसी अविरुद्ध । व्रत त्रिशुद्ध सर्वांही ॥ ६१ ॥ जे पर्वणी प्रिय

आत्मसमर्पण करितो. माझा भाविक भक्त वैदिक, लौकिक व शारीरिक, कोणत्याहि अलौकिक लाभाचा स्वीकार करीत नाहीं. ४६ वैदिक लाभ म्हणजे सत्यलोकांपर्यंत स्वर्गांतील दिव्यभोगांची प्राप्ति; पण माझा भक्त त्यांना स्पर्शहि करीत नाहीं. तो भजनसुखानेंच आनंदीत असतो. ४८ लौकिक लाभाचा श्रेष्ठपणा तर इतका आहे कीं, कल्पतरु, कामधेनु, चिंतामणि अशा अलौकिक वस्तु घरीं चालून येतात; पण भक्त त्या कृष्णार्पण करून हरिभजनांत संतुष्ट असतो. ५९ दैहिक लाभाची थोरवी काय वर्णावी ! गजान्तलक्ष्मी घरीं आली तरी भक्त ती कृष्णार्पण करितो व सुखानें भजन करीत बसतो. १२५० ब्रह्मदेवाच्या पदापर्यंत सर्व लाभ तुच्छ लेखून भक्त माझ्या भक्तीला आपला प्राण विकतो व सर्व मदर्पण करितो. ५१ ज्यानें माझ्या सेवेला आपला प्राण विकला आहे तो अर्धाक्षणहि व्यर्थ घालवीत नाहीं. तो माझी कथा, माझें ध्यान व माझाच महोत्सव करीत असतो. १२५२.

माझा भक्त ध्यानाच्या वेळीं ध्यान करितो. नाहींतर कथानिरूपण करितो. लक्षपूर्वक माझेंच चिंतन करितो. मन केव्हांहि रिकामें राहूं देत नाहीं. ५३ माझा जन्म व अवतारकृत्यें यांचें निरूपण करण्यांत त्याच्या मनाला मोठा उल्हास वाटतो. त्याच्या अंगावर रोमांच उभे रहातात. ५४ घामानें अंग थबथबतें व तो उल्हासानें प्रेमळ कथा सांगतो. अशी रहस्यपूर्ण कथा ऐकून ज्याचें मन द्रवत नाहीं. ५५ तो पाण्यांत असून कोरडा राहिलेला दगडच जाणावा, आतां माझ्या भक्तीचें लक्षण ऐक. जो दीनांच्या उद्धारासाठीं माझी जयंती, उत्सव वगैरे करण्यास संमति देऊन करवितो व आपणहि करितो, ५६ नृसिंहजयंती, रामनवमी, वामनद्वादशी, जन्माष्टमी व उत्तमांतील उत्तम शिवरात्र हे भागवत धर्मांतील विशेष पर्वणीचे दिवस आहेत. ५७ शिवरात्रीचें व्रत वैष्णवांच्या विरुद्ध आहे, हें बोलणें असंबद्ध आहे. याला कोणत्याहि पुराणांत विरुद्धपक्षीं प्रमाण नाहीं, असें व्यासांनीं स्पष्ट सांगितलें आहे. ५८ शंकर तमोगुणामुळें मूळचा काळाच होता. पण विष्णूचें ध्यान करून तो शुभ्र झाला आणि विष्णु शंकराचे ध्यान करून सांवळा झाला. याप्रमाणें ते दोघे एकमेकांच्या गुणांनीं शोभत आहेत. ५९ शंकर गायीच्या दुधासारखा पांढरा शुभ्र आहे आणि विष्णु अत्यंत सुंदर घनश्याम आहे. असें त्यांनीं परस्परांच्या ध्यानाचें महत्त्व वाढविलें आहे. १२६० मूळांत दोघांचेंहि शुद्ध ऐक्य असतां उपासकांच्या मनांत असा विरुद्ध भाव कां यावा ! यास्तव शिवरात्रीचें व्रत वैष्णावांच्या मुळींच विरुद्ध नाहीं. तें सर्वांनींच आचरावें, असें पवित्र आहे. ६१

चक्रपाणी । जे सकळ कल्याणाची श्रेणी । उभय पक्षां तारिणी । वैष्णवजननी एकादशी ॥ ६२ ॥ जे शुक्ल-कृष्णपक्षविधी । भक्त वाऊनिया खांदीं । नेऊनियां सायुज्यसिद्धी । मोक्षपदीं बैसवी ॥ ६३ ॥ करावी शुक्ल एकादशी । त्यजावें कृष्णपक्षासी । उपडलिया एका पक्षासी । सायुज्यासी केवीं पावे ॥ ६४ ॥ दों पाखीं उड्डाण पक्ष्यासी । एकु उपडलिया नुडवे त्यासी । तेवीं पां त्यजितां कृष्णपक्षासी । सायुज्यासी न पविजे ॥ ६५ ॥ तेवीं एकादशी पाहीं । जो जो उत्सवो जे जे समयीं । तो तो उपतिष्ठे माझ्या ठायीं । संदेहो नाहीं सर्वथा ॥ ६६ ॥ जो एकादशीचा व्रतधारी । मी नित्य नांदें त्याच्या घरीं । सर्व पर्वकाळांच्या शिरीं । एकादशी खरीं पैं माझीं ॥ ६७ ॥ जो एकादशीचा व्रती माझा । तो व्रततपतीर्थांचा राजा । मज आवडे तो गरुडध्वजा । परिग्रहो माझा तो एकु ॥ ६८ ॥ जैं माझे भक्त आले घरा । तैं सर्व पर्वकाळ येती दारा । वैष्णवां तो दिवाळी दसरा । तीर्थें घरा तैं येती ॥ ६९ ॥ चंद्रसूर्यग्रहणांसी । वोवाळूनि सांडी ते दिवसीं । कपिलाषष्ठी ते याची दासी । मा अर्धोदयासी कोण पुसे ? ॥ १२७० ॥ ऐसें भक्तांचें आगमन । तेणें उल्हासें न संटे मन । सर्वस्व वेंचितां धनधान्य । हरिखें जाण नाचतु ॥ ७१ ॥ ऐसी माझ्या भक्तांची आवडी । त्यांचे संगतीची अतिगोडी । त्या नांव भक्तीची कुळवाडी । पर्वकोडी ते दिवसीं ॥ ७२ ॥ पर्वविशेष आदरें । संत आलेनि अवसरें । श्रृंगारी हरिमंदिरें । गुढिया मखरें महोत्साह ॥ ७३ ॥ संत बैसवूनि परवडीं । कीर्तन मांडिती निरवडी । हरिखें नाचती आवडी । धरिती बागडी विन्यासें ॥ ७४ ॥ टाळ घोळ मृदंग कुसरीं । नाना चरित्रें गाती गजरीं । गर्जती स्वानंदें अवसरीं जयजयकारी हरिनामें ॥ ७५ ॥

ऐक दीक्षेचें लक्षण । वैदिकी तांत्रिकी दोन्ही जाण । वैदिकी वेदोक्तग्रहण । तांत्रिकी जाण

भगवानाला प्रिय, सर्व कल्याणाचें भांडार, उभयपक्षांचें रक्षण करणारी वैष्णवाची जननीच, अशी एकादशीची पर्वणी आहे. ६२ ती भक्तांना शुक्ल व कृष्ण पक्षरूपी आपल्या खांद्यांवर घेऊन सायुज्य सिद्धीला नेऊन मोक्षपदाला पोंचविते. ६३ शुक्लपक्षांतील एकादशी तेवढी करून कृष्णपक्षांतील सोडून दिली, तर एक पक्ष उपटल्याप्रमाणें ती सायुज्याला नेत नाहीं. ६४ पक्षी दोन पंखांनीं उडत असतो. त्याचा एक पंख उपटून टाकिला तर त्याला जसें उडतां येत नाहीं त्याप्रमाणें कृष्णपक्षांतील एकादशी सोडिली तर सायुज्य मुक्ति प्राप्त होत नाहीं. ६५ एकादशीचा ज्या ज्या वेळीं जो जो उत्सव करावा तो तो मलाच येऊन पोंचतो, यांत मुळींच संशय नाहीं. ६६ जो एकादशीव्रत करितो, त्याच्या घरी मी नित्य रहातों. माझी एकादशी सर्व पर्वकाळाहून श्रेष्ठ आहे. ६७ जो माझा भक्त एकादशी-व्रत करणारा असतो, तो इतर सर्व व्रतें, तीर्थें, तप यांचा राजाच आहे. तो माझ्या परिवारांतलाच एक आहे. मज गरुडध्वजाला तो फार आवडतो. ६८ माझे भक्त जेव्हां घरीं येतात, तेव्हां सगळे पर्वकाळ दारांत येऊन उभे रहातात. वैष्णवांना तर तो दिवाळीं-दसराच असतो. त्यावेळी सर्व तीर्थें घरीं चालून येतात. ६९ ते त्या दिवसावरून चंद्रसूर्योचें ग्रहणहि ओवाळून टाकितात. कपिलाषष्ठी तर त्यांची दासीच आहे. मग अर्धोदयपर्वांना कोण विचारितो! १२७० माझ्या भक्तांचें आगमन इतकें पवित्र आहे. त्यांचा उल्हास मनांत मावत नाहीं. धन-धान्यादि सर्वस्व त्यांच्यासाठीं खर्चून ते आनंदानें नाचत असतात. ७१ अशी जी माझ्या भक्ताविषयीं आवड आणि त्यांच्या संगतीची अतिशय गोडी, तिलाच भक्तीचा उत्कर्ष म्हणतात. त्या दिवशी कोट्यवधि पर्वण्याच असतात. ७२ माझा भक्त-संत घरीं आले कीं, तो दिवस मोठ्या पर्वणीचाच समजतो. तो हरिमंदिरें श्रृंगारितो. गुढ्या उभारून, मखर बांधून मोठ्या आदरानें महोत्सव करितो. ७३ संतांना ओळीनें बसवून, तो मोठ्या चातुर्यानें कीर्तन करितो. मोठ्या आनंदानें कीर्तनांत सोंग घेऊन नाचतो. ७४ टाळ, विणा, मृदंग मोठ्या कौशल्यानें वाजवीत, अनेकप्रकारचीं अवतारचरित्रें गात भजनाचा गजर व हरिनामाचा जयजयकार करितो. १२७५.

आतां दीक्षेचें लक्षण ऐक. वैदिक व तांत्रिक अशा दोन प्रकारच्या दीक्षा आहेत. वेदोक्तमंत्रग्रहण ही

आगमोक्त ॥ ७६ ॥ वैष्णवी दीक्षा व्रतग्रहण। पांचरात्रिक मंत्रानुष्ठान। हें आगमोक्त शुद्ध लक्षण। व्रतधारण तें माझें ॥ ७७ ॥ वैष्णवव्रतधर्मासी। पर्वें करावीं वार्षिकेंसी। जे बोलिलीं चातुर्मासीं। एकादश्यादि जयंत्या ॥ ७८ ॥ शयनी कटिनी प्रबोधिनी। पवित्रारोपणी नीराजनी। वसंतदमनकारोपणी। जन्मादिनीं जयंत्या ॥ ७९ ॥ इत्यादि नाना पर्वकाळीं। महामहोत्साहो पूजावळी। नीराजनें दीपावळी। मृदंगटाळी गर्जत ॥ १२८० ॥ उचंबळोनि अतिसुखें। यात्रे निघावें येणें हरिखें। दिंडी पताका गरुडटकें। नामघोषें गर्जत ॥ ८१ ॥ यात्रे जावें ज्या देवासी। तो देवो आणी निजगृहासी। आपली आवडी जे मूर्तीसी। ते प्रतिमेसी प्रतिष्ठी ॥ ८२ ॥

मूर्ति निपजवावी वरिष्ठ। नेटुगी देटुगी चोखट। साधुमुखें अतिनिर्दुष्ट। घवघवीत साजिरी ॥ ८३ ॥ मूर्ति करावी अतिसुरेख। कृश न करावी अधोमुख। स्थूल न करावी ऊर्ध्वमुख। रडकी दुर्मुख न करावी ॥ ८४ ॥ अंग स्थूळ वदन हीन। मूर्ति न करावी अतिदीन। खेचरी भूचरी जिचे नयन। विक्राळ वदन न करावी ॥ ८५ ॥ अंग साजिरें नाक हीन। वरदळ चांग चरण क्षीण। मोद्ळी बुद्गुली ठेंगणें ठाण। अतिदीर्घ जाण न करावी ॥ ८६ ॥ मूर्ति साजिरी सुनयन। सम सपोस सुप्रसन्न। अंगीं प्रत्यंगीं नव्हे न्यून। सुचिन्ह सुलक्षण सायुध ॥ ८७ ॥ पाहतां निवे तनमन। देखतां जाय भूकतहान। घवघवीत प्रसन्नवदन। कृपालक्षण सुकुमार ॥ ८८ ॥ जे देखतांचि जीवीं जडे। अतिशयें सर्वांसी आवडे। पाहों जातां निजनिवाडें। पूरू चढे प्रेमाचा ॥ ८९ ॥ ईषत् दिसे हास्यवदन। अतिशयेंसीं सुप्रसन्न। जिचेनि घवघवाटें निवे मन। प्रतिमा संपूर्ण ती नांव ॥ १२९० ॥ तेथें मेळवूनि साधुश्रेष्ठां। अग्न्युत्तारण करावें निष्ठा। चक्षून्मीलन प्राणप्रतिष्ठा। करावी वरिष्ठाचेनि हातें ॥ ९१ ॥

वैदिक दीक्षा आणि शास्त्र-पुराणोक्त दीक्षा ती तांत्रिक समजावी. ७६ वैष्णवव्रताचें ग्रहण ही वैष्णव दीक्षा. पांच-रात्री मंत्रानुष्ठानानें माझें वैष्णवव्रत धारण करणें हें आगमोक्त शुद्ध लक्षण आहे. ७७ वैष्णवधर्माचें पालन करण्यासाठीं वार्षिक पर्वणी, चातुर्मासांतील एकादश्या व निरनिराळ्या जयंत्या यथाशास्त्र कराव्या. ७८ शयनी, कटिनी, प्रबोधिनी, पवित्रारोपणी, नीराजनी, वसंतदमनकारोपणी, इत्यादि एकादश्या आणि जयंत्या, ७८ या विविध पर्वकाळीं नानाप्रकारच्या पूजा बांधून, आरती, दीपमाळी पाजळून व मृदंग, टाळ वाजवून महोत्सवाचा मोठा गजर करावा १२८० मोठ्या उत्साहानें दिंड्या, पताका, ध्वज घेऊन नामाचा घोष करीत यात्रेला जावें. ८१ कारण या देवांच्या यात्रेला जो जातो, तो देवच आपल्या घरीं आणितो आणि आपल्या आवडत्या मूर्तीची प्रतिष्ठा करितो. १२८२

मूर्ति अत्यंत उत्कृष्ट घडवावी. ती नीट-नेटकी, ठसठसीत व सुबक असावी. ती निर्दोष व भव्य आहे, असें संतांच्या तोंडून ठरवावें. ती अत्यंत सुंदर व प्रमाणांत असावी. ८३ ती रोड व खालीं पहाणारी नसावी, किंवा लठ्ठ व वर दृष्टि लावलेली नसावी. (मूर्तीची व आपली दृष्टि एक होईल अशी ती समोर पहाणारी असावी.) रडकी किंवा दुर्मुखलेली नसावी. ८४ अंग बोजड व मुख कुरूप किंवा केविलवाणी चर्या नसावी. ती अधोमुख, ऊर्ध्वमुख, किंवा अक्राळ-विक्राळ नसावी. ८५ अंग चांगलें व नाक वाईट किंवा वरचा भाग चांगला व पाय बारीक, लठ्ठ, वाटोळी, बुटकी, किंवा फार उंच नसावी. ८६ तर हरीची मूर्ति सुंदर, तेजस्वी नेत्र, प्रसन्न मुख व नाजूक असावी. ८७ तिला पहातांच तिच्यावर मन बसावें. ती सर्वांना अतिशय आवडणारी असावी, तिच्याकडे दृष्टि लावतांच प्रेमाचा पूरच लोटावा. ८८-८९ किंचित् हास्यवदन, अत्यंत प्रसन्न, लावण्ययुक्त अशा मूर्तीला पाहून मन शांत होतें. अशी मूर्ति असते तेव्हांच तिला पूर्ण प्रतिमा म्हणतात. १२९० अशी प्रतिमा घडवून नंतर साधुसंतांना जमवावें आणि श्रद्धेनें अग्न्युत्तारण करून म्हणजे उन्हाचा ताप व घडण्याच्या आघाताचा दोष घडतो त्याच्या निवारणार्थ विधि करावा. तिच्या नेत्रावरील आच्छादन काढून कोणा श्रेष्ठ पुरुषाच्या हातून तिची प्राण-

देवालय करावें गहन । वन उद्यान उपवन । खेंडकुलिया विश्रामस्थान । आराम जाण करावें ॥ ९२ ॥ नाना जातींचे वृक्ष तें वन । फळभक्ष वृक्ष तें उपवन । पुष्पवाटिका तें उद्यान । कृष्णार्पण पूजेसी ॥ ९३ ॥ हाट हाटवटिया चौपासीं । नगर वसवावें देवापाशीं । वेदाध्ययन शास्त्रश्रवणेंसीं । अहर्निशीं कीर्तनें ॥ ९४ ॥ इतुकें करावया असमर्थ । श्रद्धा आहे परी नसे वित्त । तरी साह्य मेळवून असमर्थ । मद्भावयुक्त करावें ॥ ९५ ॥ कां मेळवूनि भगवद्भक्त । त्यांत श्रद्धाळू जे वित्तवंत । भावपूर्वक दिधल्या वित्त । तेणें हें समस्त करावें ॥ ९६ ॥ देउळीं करूनि मूर्तिप्रतिष्ठा । परतोनि न वचे जो त्या वाटा । तो आळशी जाणावा करंटा । नव्हेचि चोखटा भावाचा ॥ ९७ ॥ जो करूं जाणे मूर्तिप्रतिष्ठा । धन वेंचून भावार्थी मोटा । नीचसेवा तो माझा वांटा । झाडितां खराटा न संडी ॥ ९८ ॥

असतां शिष्य सेवकजन । ते प्रतिष्ठा सांडूनि सन्मान । स्वयें करी सडासंमार्जन । देवालयीं जाण निर्दंभ ॥ ९९ ॥ रंगमाळा घाली कुसरी । नाना यंत्रें नानाकारीं । नाना परींचे रंग भरी । आवडी भारी मद्भजनीं ॥ १३०० ॥ जैसे कां नीच रंक । तैसी सेवा करी देख । नीचसेवेचें अतिसुख । निर्मायिक मद्भजनीं ॥ १ ॥

अपार वेंचूनि नाना अर्थ । प्रासादप्रतिष्ठा म्यां केली येथ । मी एक देवाचा मोटा भक्त । न धरी पोटांत अभिमान ॥ २ ॥ शुद्ध भावो नाहीं चित्तीं । खटाटोपें अहाच भक्ती । ऐशी जे दांभिक स्थिती । भक्त नातळती भाविक ॥ ३ ॥ भक्तें न धरावा अभिमान । नापेक्षावा मानसन्मान । न करावें दांभिक भजन । अभिलाष जाण न धरावा ॥ ४ ॥ अनुभव जाला तो आपण । कां देवालयीं वेचिलें धन । अथवा जें दिधलें दान । तें वाच्या जाण न करावें ॥ ५ ॥ यजमान जैं केलें

प्रतिष्ठा करावी. ९१ मोठें देवालय बांधावें व सभोंवार बाग-बगीच्या उपवन करून तेथें रम्य विश्रांतिस्थान बनवावें. ९२ अनेकप्रकारचे वृक्ष जेथें असतात त्याला वन म्हणतात, खाण्यास योग्य असलेल्या फळांचीं झाडें जेथें असतात त्याला उपवन म्हणतात आणि जेथें फक्त फुलझाडेंच असतात त्याला उद्यान म्हणतात. ही सर्व तयारी पूजेसाठीं कृष्णार्पण करावी. ९३ चोहोंकडून लोक येऊन बाजार भरावा म्हणून देवापाशीं शहर वसवावें व तेथें रात्रंदिवस वेदाध्ययन, शास्त्रश्रवण व कीर्तन करीत असावें. ९४ इतकें सर्व करण्याचें ज्याला सामर्थ्य नसेल, म्हणजे श्रद्धा असून द्रव्य नसेल त्यानें इतरांकडून साह्य मिळवून माझ्या भक्तीनें हें कार्य पूर्ण करावें. ९५ किंवा भगवद्भक्त जमवून, त्यांत जे श्रद्धाळु धनिक असतील त्यांनीं भक्तिभावानें द्रव्य दिल्यास, त्या द्रव्यानें हें सर्व घडवून आणावें. ९६ जो देवळांत मूर्तींची स्थापना करून पुनः तिच्याकडे कधीं पहात नाहीं, तो मूर्ख आळशी समजावा. त्याची भक्ति सरळ नव्हे. ९७ जो माझ्या मूर्तींची स्थापना करून, पुष्कळ द्रव्य खर्चून सर्व व्यवस्था करितो, तो खरा भाविक. तो हलकें काम करणेंहि माझेंच समजून केर काढण्यास हातांत खराटा घेण्यासहि कचरत नाहीं. १२९८.

त्याच्यापाशीं शिष्य, नोकर-चाकर असूनहि तो स्वतःचा मोठेपणा विसरून, दंभ टाकून आपल्या हातांनीं देवालयांत सडा-संमार्जन करितो. ९९ मोठ्या कुशलतेनें रांगोळ्या घालितो. सुंदर चित्रें काढितो. त्यांत अनेक-प्रकारचे रंग भरितो. त्याला माझ्या भजनाची फार आवड असते. १३०० जसा एखादा गरीब निर्धन असावा, त्याप्रमाणें तो माझी सेवा करितो. त्याला माझीं हलकीं कामें करण्यांतहि मोठा आनंद वाटतो. याप्रमाणें तो माझें अकृत्रिम भजन करितो. १३०१.

'मीं अगणित द्रव्य खर्च करून येथें देवालय बांधिलें व देवाची स्थापना केली, मीच कायतो देवाचा मोठा भक्त' असा अभिमान तो मनांत धरीत नाहीं. २ मनांत खरी भक्ति नसून बाहेरून मात्र भक्तीचा मोठा डौल आणावयाचा, असा दांभिकपणा माझ्या भाविक भक्ताच्या मनाला स्पर्शीहि करीत नाहीं, ३ भक्तानें अभिमान धरूं नये. मानसन्मानाची इच्छा करूं नये. दांभिक भजन कधीं करूं नये आणि कसलाहि अभिलाष धरूं नये. ४ आपला अनुभव किंवा देवालयासाठीं झालेला खर्च किंवा दिलेले दान यांचा कधीं उच्चारहि करूं नये. ५ यजमान जेव्हां

बोले । तें जें केलें तें निर्वीय जालें । प्राणेंवीण प्रेत उरलें । तैसे झाले ते धर्म ।। ६ ।। कृषीवळ पेरूनियां धान्य । सवेंचि आच्छादी आपण । तें पीक लगडूनि ये जाण । तैसें सफळ दान न बोलतां ।। ७ ।। देवासी समर्पिलें आपण । कां आणिकीं केलें निवेदन । तें घेऊं नये आपण । देवलकण तो दोषु ।।८।। देवाचा प्रसाद घेतां । लोभें न घ्यावा सर्वथा । आधीं वांटावा समस्तां । अल्पमात्रतां स्वयें घ्यावा ।। ९ ।। दीपु समर्पिला श्रीहरीं । तेणें न वर्तावें गृहव्यापारीं । हें बोलिलें आगमशास्त्रीं । स्मृतिकारीं सज्ञानीं ।। १३१० ।। हे तंव अवघी साधारण बाह्य पूजा । परी दृढविश्वासें भावो माझा । ते भक्ती आवडे अधोक्षजा । भाविकांची पूजा भावार्थें ।। ११ ।। ऐक पां भक्तीचा इत्यर्थु । जेणें भजनें म्हणिजे भक्तु । तरी जे जे उत्तम या लोकांतु । आवडता पदार्थु मज अर्पी ।। १२ ।।

हो कां चंद्रामृत तत्त्वतां । अवचटें आलें भक्ताचे हाता । तें अवघेंचि अर्पी भगवंता । देहलोभता न सेवी ।। १३ ।। देहासी यावया अमरता । तेणें लोभें सेवावें अमृता । अमर अमृतपान करितां । मरती सर्वथा स्वकाळें ।। १४ ।। नश्वर देहाचिया ममता । भक्त सेवींना अमृता । तेंचि भगवंतासी अर्पितां । अक्षयता अनश्वर ।। १५ ।। परिस चिंतामणी न प्रार्थितां । दैवें आलिया भक्ताच्या हातां । तो लोभें न ठेवीं सर्वथा । अर्पी भगवंता तत्काळ ।। १६ ।। लोभें कल्पतरु राखतां । कल्पना वाढे अकल्पिता । तोचि भगवंतीं अर्पितां । निर्विकल्पता स्वयें लाभे ।। १७ ।। स्वार्थे चिंतामणी राखितां । अत्यंत हृदयीं वाढवी चिंता । तोचि भगवंतीं अर्पितां । निश्चिंतता चित्तासी ।। १८ ।। कामधेनु राखतां आपण । अनिवार कामना वाढवी जाण । तेचि करितां कृष्णार्पण । निरपेक्षता पूर्ण अंगीं बाणे ।। १९ ।। लोभें स्पर्शमणि

आपण केलेलें सत्कृत्य आपल्याच तोंडानें सांगतो तेव्हां तें निष्फळ होतें. प्राणावांचून जसें प्रेत असतें तसा त्याचा तो धर्म होतो. ६ शेतकरी धान्याची पेरणी करून तें जेव्हां लगेच मातीनें झांकून टाकितो, तेव्हांच पीक जसें जोरानें येते, त्याच-प्रमाणें दिलेल्या दानाचा उच्चार न केल्यानेंच तें सफळ होतें. ७ आपण देवाला कांहीं अर्पण केलें, किंवा दुसऱ्या कोणीं कांहीं दिलें तर तें आपण घेऊं नये. कारण त्यांत देवलकपणाचा म्ह० गुरवपणाचा दोष येतो. ८ देवाचा प्रसादहि लोभानें सगळाच आपण घेऊं नये. आधीं सर्वांना वाटून मग अल्पसा आपण घ्यावा. ९ श्रीहरीला दीप अर्पण केल्यावर मग त्या दिव्यानें आपल्या घरांतील कामें करूं नयेत, असें विद्वान् स्मृतिकारांनीं आणि पुराणकारांनीं सांगितलें आहे. १३१० ही सारी साधारण बाह्य पूजा झाली. पण मनांत मजवर दृढ भक्ति व विश्वास असला पाहिजे. तीच भक्ति भगवानाला आवडते. भाविकांची भक्तिभावानेंच पूजा घडते. ११ आतां भक्तीचें रहस्य ऐक. या लोकीं जें जें कांहीं उत्तम व आपल्याला प्रिय असेल तें तें सर्व मला प्रेमानें अर्पण करणें, यालाच भक्त भजन असें म्हणतात. १३१२.

भक्ताच्या हातीं अकस्मात् चंद्रांतील अमृत जरी आलें तरी तो तें सर्व भगवानाला अर्पण करितो. देहलोभानें त्याचें सेवन करीत नाहीं. १३ देह अमर होण्याच्या लोभानें अमृत सेवन करावें, तर अमृतपान करणारे देवहि त्यांचा काळ येतांच मरण पावतात. १४ देहावरील प्रेम नश्वर आहे, हें जाणून भक्त अमृताचें सेवन करीत नाहींत. तेंच भगवानाला अर्पण केलें असतां कायमचें अमरत्व प्राप्त होतें. १५ परीस, चिंतामणि यांसारख्या दुर्लभ, अमूल्य वस्तु दैवयोगानें भक्ताला अयाचित जरी प्राप्त झाल्या तरी तो लोभानें त्या जवळ ठेवीत नाहीं. तत्काळ भगवानाला अर्पण करितो. १६ लोभानें कल्पवृक्षाची जोपासना केली तर अकल्पित कल्पना वाढूं लागतात. पण तोच भगवानाला अर्पण केला कीं, सहजच निर्विकल्पता प्राप्त होते. १७ स्वार्थबुद्धीनें चिंतामणीचा संग्रह केला तर मनांत चिंता वाढत जाते, पण तोच भगवानाला अर्पण करितांच मन निश्चिंत होतें. १८ कामधेनु जवळ बाळगिली तर वासना अनिवार वाढत जातात, पण तीच भगवानाला अर्पण केली कीं निरपेक्षता आपल्या अंगीं पूर्ण बाणते. १९ परीस आपल्यापाशीं

राखतां । तो वाढवी धनलोभता । तोचि भगवंतीं अर्पितां । अर्थस्वार्थतानिर्मुक्त ॥ १३२० ॥ हो का देशकाळऋतुमेळें । उत्तम पदार्थ अथवा फळें । नवधान्यादिकें सकळें । अर्पी भावबळें मजलागीं ॥ २१ ॥ पोटांतूनि आवडता । प्राप्त झालिया पदार्था । मजचि अर्पिती सर्वथा । लोलिंगता सांडूनि ॥ २२ ॥ आपुले हृदयींची आवडी । हरिचरणीं लाविली फुडी । आतां नाना पदार्थांची जे गोडी । ते मजचि रोकडी अर्पिती ॥ २३ ॥ मज अनंताच्या हातीं । आवडीं अर्पिलें मद्भक्तीं । त्याचीं फळें सांगतां श्रुती । मुक्या होती सर्वथा ॥ २४ ॥ मी वेदांचा वेदवक्ता । मजही न बोलवे सर्वथा । त्याचें फळ तें मीचि आतां । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ २५ ॥ जीवाहिहोनि वर्तती । माझ्या ठायीं अत्यंत प्रीती । तिये नांव गा माझी भक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ २६ ॥ तत्काळ मज पाविजे जेणें । ते माझे पूजेचीं स्थानें । अतिपवित्र जें कल्याणें । तुजकारणें सांगेन ॥ २७ ॥

सूर्योऽग्निर्ब्राह्मणो गावो वैष्णवः खं मरुज्जलम् । भूरात्मा सर्वभूतानि भद्रपूजापदानि मे ॥ ४२ ॥

एकादशीं एकादशाध्यायीं । एकादश पूजास्थानें पाहीं । एका जनार्दनु तेंही । एकरूप सर्वही वर्णील ॥ २८ ॥ सूर्य अग्नि आणि ब्राह्मण । गायी वैष्णव आणि गगन । अनिळ जळ मही जाण । पूज्य आपण आपणासी ॥ २९ ॥ अकरावें पूजास्थान । सर्व भूतें पूज्य जाण । ऐक पूजेचें विधान । यथायोग्य लक्षण अवधारीं ॥ १३३० ॥

सूर्ये तु विद्यया त्रय्या हविषाग्नौ यजेत माम् । आतिथ्येन तु विप्राग्र्ये गोष्वङ्ग यवसादिना ॥ ४३ ॥
वैष्णवे बन्धुसत्कृत्या हृदि खे ध्याननिष्ठया । वायौ मुख्यधिया तोये द्रव्यैस्तोयपुरस्कृतैः ॥ ४४ ॥

ठेविला तर तो द्रव्यलोभ वाढवितो. पण तोच भगवदर्पण केला असतां द्रव्यलोभापासून निरंतर मुक्त करितो. १३२० देश, काल व ऋतु, यांच्या मानानें होणारीं फळें, उत्तम पदार्थ, नवीन धान्य इत्यादि सर्व माझे भक्त मोठ्या भाविकपणानें मलाच अर्पण करितात. २१ मनापासून अत्यंत आडवणारा एखादा पदार्थ त्यांना मिळतांच त्याचा लोभ न ठेवितां ते सर्वथा मलाच अर्पण करितात. २२ आपल्या अंतःकरणांतील आवड त्यांनीं खऱ्या भावानें हरिचरणाला वाहिलेली असते; तेव्हां नानाप्रकारच्या पदार्थांची गोडी ते प्रत्यक्ष मलाच अर्पितात. २३ माझ्या भक्तांनीं प्रेमानें मज अनंताच्या हातीं जें दिलेलें असतें, त्याचीं फलें सांगतेवेळीं वेदहि मौन धरितात. २४ हे उद्धवा ! मी जो वेदांचा वक्ता, त्या मलाहि तीं सांगतां येत नाहींत. मी स्वतःच त्यांचें फल आहें, असें तूं समज. २५ हे उद्धवा ! स्वतःच्या प्राणापेक्षांहि मजवर अत्यंत प्रीति असणें याचेंच नांव माझी भक्ति, हें निश्चयानें जाण. २६ आतां ज्यायोगें तत्काल माझी प्राप्ति होते तीं माझीं अत्यंत पवित्र व कल्याणकारक पूजास्थानें तुला सांगतों. १३२७.

—आतां अकरा पूजाधिष्ठानें सांगतात—

हे भद्र सूर्यः अग्निः ब्राह्मणः गावः०--मे पूजापदानि-हे उद्धवा ! सूर्य, अग्नि, ब्राह्मण, गायी, वैष्णव, आकाश, वायु, जल, पृथ्वी, आत्मा व सर्व भूतें हीं माझ्या पूजेचीं स्थानें आहेत. ४२.

एकादशस्कंधाच्या आकराव्या अध्यायांत अकरा पूजास्थानें सांगितलीं आहेत. त्या सर्वांचें ऐक्यरूपानें एकनाथ-जनार्दन वर्णन करीत. २८ सूर्य, अग्नि, ब्राह्मण, गायी, वैष्णव, आकाश, वायु, जल, पृथ्वी आणि आपण स्वतःच आपल्याला पूज्य आहोंत २९ व सर्व भूतें पूज्य आहेत, हें अकरावें पूजास्थान जाण आतां त्या पूजेचा प्रकार व यथार्थ लक्षण ऐक १३३०.

—भिन्न भिन्न अधिष्ठानांतील पूजासाधनें पुढील तीन श्लोकांनीं सांगतात—

सूर्ये तु त्रय्या विद्यया—सूर्यामध्यें वेदत्रयींतील सौर सूक्तांनीं उपस्थानादिकांच्या योगानें माझी पूजा करावी, **अग्नौ हविषा मां यजेत**—अग्नीमध्यें घृतादि हवीनें माझें पूजन करावें. **विप्राग्र्ये तु आतिथ्येन**—ब्राह्मणश्रेष्ठामध्यें आतिथ्यानें मला पूजावें. **हे अङ्ग**—बा उद्धवा ! **गोषु यवसादिना**—गायींमध्यें तृणादिकांच्या योगानें माझें पूजन करावें. ४३. **वैष्णवे बन्धुसत्कृत्या**—वैष्णवाच्या ठिकाणीं बंधूसारख्या सत्कारानें, **हृदि खे ध्याननिष्ठया**—हृदयांतील आकाशांत ध्याननिष्ठेनें, **वायौ मुख्यधिया**—वायूमध्यें प्राणदृष्टीनें, **तोये तोयपुरस्कृतैः द्रव्यैः**—जलामध्यें जलादि द्रव्यांनीं तर्पणादिकांच्या योगानें. ४४.

स्थण्डिले मंत्रहृदयैर्भोगैरात्मानमात्मनि । क्षेत्रज्ञं सर्वभूतेषु समत्वेन यजेत माम् ॥ ४५ ॥

सविता माझें अधिष्ठान । माझेनि तेजें विराजमान । जेणें तेजें जगाचे नयन । देखणें जाण होताती ॥ ३१ ॥ दीपु लाविल्या गृहाभीतरीं । तो प्रकाशु दिसे गवाक्षद्वारीं । तैसें माझें निजतेज अंतरीं । तें सूर्यद्वारीं प्रकाशे ॥ ३२ ॥ तो सविता मंडळमध्यवर्ती । जाण नारायण मी निश्चितीं । त्या मज सूर्याची उपास्ती । सौर सूक्ति त्रैविद्या ॥ ३३ ॥ ऋग्वेदादि वेद तीनी । साङ्ग सौरमंत्र जाणोनी । सूर्यसूक्तें संमुख पठणीं । पूजा सज्ञानीं करावी ॥ ३४ ॥ हे वैदिकी उपासकता । वेदज्ञांसीचि तत्त्वतां । नेणत्या योग्य नव्हे सविता । ऐसें सर्वथा न म्हणावें ॥ ३५ ॥ तत्काळ प्रसन्न होय सविता । ऐसी सुगम उपासकता । तुज सांगेन आतां । सावधानता अवधारीं ॥ ३६ ॥ सकळ वेदांची जननी । सकळ मंत्रांचा मुकुटमणी । ते गायत्री उत्तमवर्णीं । सकळ ब्राह्मणीं जाणिजे ॥ ३७ ॥ तिचा अर्थ विचारितां । ती अधीन असे सविता । त्रिपदा त्रिकाळीं अर्घ्य देतां । त्रैविद्या तत्त्वतां त्या नांव ॥ ३८ ॥ अर्धमात्रा अर्धबिंबध्यान । त्रिपदा त्रिकाळीं अर्घ्यदान । तेणें संतोषें चिद्घन । आपणासमान भक्त करी ॥ ३९ ॥ हें प्रथम माझें अधिष्ठान । सूर्यपूजा याचि नांव जाण । आतां अग्निपूजेचें लक्षण । सांग संपूर्ण तें ऐक ॥ १३४० ॥ सर्वांगां मुख प्रधान । तें माझें मुख अग्नि जाण । ये अर्थीं वेदशास्त्रपुराण । साक्षी संपूर्ण गर्जती ॥ ४१ ॥ ब्राह्मण माझे आवडते । माझे मुखीं होआवया सरते । म्यां लाविले अग्निसेवेतें । तेही तेथें चूकले ॥ ४२ ॥ घालूनि मजमुखीं अवदान । इंद्राय स्वाहा म्हणती जाण । कर्मकांडें ठकिले ब्राह्मण । शुद्ध मदर्पण चूकले ॥ ४३ ॥ केवळ मजमुखीं अर्पितां । आड आली त्यांची योग्यता । इंद्र यम वरुण सविता । नाना विकल्पती अवदानीं ॥ ४४ ॥ देवो देवी मीचि आहें । सत्य न मानिती पाहें । मजवेगळा विनियोग

स्थंडिले मंत्रहृदयैः–भूमीमध्यें रहस्यमंत्रांच्या न्यासानें, **आत्मनि आत्मानं भोगैः** –शरीरामध्यें आत्म्याची भोगांच्या योगानें, **सर्वभूतेषु मां क्षेत्रज्ञं**–सर्व भूतांमध्यें मज क्षेत्रज्ञाची, **समत्वेन यजेत** –समत्वानें पूजा करावी. ४५.

सूर्य माझें अधिष्ठान आहे. माझ्याच तेजानें तो प्रकाशतो. त्याच्या तेजामुळें सर्व जगाचे डोळे पहाण्यास समर्थ होतात. ३१ घरांत लाविलेल्या दिव्याचा प्रकाश खिडक्यांतून जसा बाहेर पसरतो, त्याप्रमाणें माझ्या स्वरूपांतील आत्मतेज सूर्याच्या रूपानें बाहेर प्रकाशतें. ३२ सूर्यमंडळामध्यें असणारा जो सविता तो मी नारायणच आहें त्याच मज सूर्याची वेदत्रयोक्त सौरसूक्तानें उपासना करावी. ३३ ज्ञानी पुरुषांचे सौरमंत्र हें सांग तीन वेद आहेत, असे समजून सूर्याकडे तोंड करून सूर्यसूक्ताच्या पठनानें पूजा करावी. ३४ पण ही वैदिकांची वैदिक उपासना आहे. ती वेदाचा अधिकार असणारांनींच करावी. पण इतरांनीं सूर्याची उपासना करूं नये, असें मात्र केव्हांहि म्हणूं नये. ३५ आतां ज्यायोगें सूर्य तत्काळ प्रसन्न होतो, अशी एक सुलभ उपासना तुला सांगतों, ती लक्षपूर्वक ऐक. ३६ सर्व वेदांची माता, सगळ्या मंत्रांतील श्रेष्ठ अशी गायत्री, उत्तम वर्णांतील जे ब्राह्मण त्या सर्वांनीं जाणावी. ३७ तिचा अर्थाच्या विचार केला असतां सूर्य तिच्या अधीन असतो. गायत्रीनें त्रिकाळ अर्घ्य देणें यालाच वस्तुतः त्रैविद्या हें नांव आहे. ३८ अर्घ्या उगवलेल्या सूर्यबिंबाचें एक अर्धक्षण ध्यान करणें व त्रिकाळीं त्रिपदा गायत्रीनें अर्घ्य देणें यांच्या योगानें चिद्घन संतुष्ट होतो व भक्ताला आपणासारखाच करितो. ३९ हें माझें पहिलें अधिष्ठान आहे. याचें नांव सूर्यपूजा. आतां अग्निपूजेचें साविस्तर लक्षण ऐक. १३४० सर्व अंगांत मुख श्रेष्ठ आहे आणि अग्नि हेंच माझें मुख आहे, अशी साक्ष सर्व वेद, शास्त्रें व पुराणें गर्जना करून देतात. ४१ ब्राह्मण माझे आवडते, म्हणून त्यांनीं अर्पण केलेलें सर्व माझ्याच मुखीं अर्पण होण्यासाठीं मीं त्यांना अग्नीच्या सेवेला लाविलें. पण तेहि त्यांत चुकले. ४२ कारण ते माझ्या मुखांत म्हणजे अग्नींत आहुती घालून तोंडानें ‘ इंद्राय स्वाहा ’ असें म्हणतात. कर्मकांडानें त्यांना अशा रीतीनें फसविल्यामुळें ते शुद्ध मदर्पणास चुकले. ४३ केवळ माझ्या मुखांत अर्पण करीत असतां त्यांची योग्यताच आड आली व त्यामुळें ते आहुतींमध्यें इंद्र, यम, वरुण, सूर्य, असे अनेकप्रकारचे

होये । नवल काये सांगावें ॥ ४५ ॥ जें जें सेविजे तिहीं लोकीं । तें तें अर्पे माझ्या मुखीं । हें न मनिजे याज्ञिकीं । कर्माविखीं विकल्पू ॥ ४६ ॥ विकल्पबुद्धि ब्राह्मण । अद्यापि संशयीं पडिले जाण । करूनि वेदशास्त्रपठण । शुद्ध मदर्पण न बोलतीं ॥ ४७ ॥ माझें मुख वैश्वानर । येणें भावें विनटले नर । सांडूनि भेद देवतांतर । मजचि साचार अर्पिती ॥ ४८ ॥ त्यांचे समिधेनीं मन तृप्त झालें । तेथही जरी हविर्द्रव्य आलें । तरी माझें निजसुख सुखावलें । सर्वस्व आपुलें त्यांसी मी दें ॥ ४९ ॥ मज नैराश्यतेची आस । त्यांच्या हाताची मी पाहें वास । त्यांलागीं सदा सावकाश । अल्पही ग्रास जैं देती ॥१३५०॥ त्याचेनि हातें निर्विकल्पें । मद्भावें जें अग्नीस अर्पे । तृण काष्ठ तिळ तुपें । तें म्यां चिद्रूपें सेविजे ॥ ५१ ॥ यापरी अग्नीची उपास्ती । जे दुजे स्थानींची पूजास्थिती । सांगीतली म्यां तुजप्रती । ब्राह्मणभक्ती अवधारीं ॥ ५२ ॥ पूजेमाजीं अतिश्रेष्ठ जाण । शीघ्र मत्प्राप्तीचें कारण । ब्राह्मण माझें पूजास्थान । अतिगहन उद्धवा ॥ ५३ ॥ त्यांचिया भजनाची नवलपरी । आड पडावें देखोनि दूरी । मस्तक ठेवावा चरणावरी । चरणरज शिरीं वंदावे ॥ ५४ ॥ आवाहनविसर्जनेंवीण । शालग्राम माझें अधिष्ठान । परी तें केवळ अचेतन । ब्राह्मण सचेतन मद्रूपें ॥ ५५ ॥ मी अव्यक्तरूप जनार्दन । तो मी व्यक्त ब्राह्मणरूपें जाण । धरातळीं असें मी नारायण । धरामर ब्राह्मण यालागीं ॥ ५६ ॥ ब्राह्मणमुखें वेदांसी महिमा । ब्राह्मणें यज्ञदानतपतीर्थगरिमा । ब्राह्मणें देवासी परम प्रेमा । ब्रह्मत्व ब्रह्मा ब्राह्मणमुखें ॥ ५७ ॥ त्या ब्राह्मणांसी अपमानितां । अपमानिल्या यज्ञदेवता । वेदादि तपदानतीर्था । परब्रह्म तत्त्वतां अपमानिलें ॥ ५८ ॥ मज त्रिलोकीं नाहीं सांठवण । मजहूनि अधिक माझे ब्राह्मण । त्यांमाजीं मी वेदरूप नारायण । सगळा जाण सांठवलों ॥ ५९ ॥ ब्राह्मणपण हृदयीं धरितां । मज आली परम पवित्रता । लक्ष्मी पायां लागे

विकल्प करूं लागले. ४४ देव, देवी सर्व मीच आहें, हेंहि ते खरें मानीत नाहींत आणि मला सोडून सर्व समर्पण करितात. काय आश्चर्य आहे पहा ! ४५ त्रिभुवनांतील लोक जें जें सेवन करितात तें सर्व माझ्याच मुखांत पडतें; पण याज्ञिकांना तें मान्य नाहीं. त्यांच्या मनांत कर्माविषयीं विकल्प आहे. ४६ ब्राह्मण विकल्पबुद्धीनें अद्यापि संशयांतच पडले आहेत. ते वेदशास्त्र पढूनहि शुद्ध मदर्पण सांगत नाहींत. ४७ माझें मुखच अग्नि आहे. या भावनेनें युक्त झालेले लोक अन्य देवतांचा भेद टाकून सर्व मदर्पणच करितात. ४८ त्यांच्या एका समिधेनेंहि माझें मन तृप्त होतें. त्यांतहि त्यानें आणखी हविर्द्रव्य अर्पण केलें कीं, मी अत्यंत प्रसन्न होऊन माझें सर्वस्व त्यांस अर्पण करितों. ४९ मला निरिच्छतेची मोठी आवड. त्यांच्या नुस्त्या हाताची मी वाट पहातों. त्यासाठीं मी नेहमीं दक्ष रहातों. ते जेव्हां आपल्या हातानें थोडासा ग्रास देतात, तेव्हां मी तृप्त होतों. १३५० त्यांच्या हातून मद्भावानें जें कांहीं गवत, काष्ठ, तिळ, तूप वगैरे निर्विकल्प चित्तानें अग्नीला अर्पण होतें तें सर्व मी चिद्रूपानें सेवन करितों. ५१ याप्रमाणें अग्नीची उपासना हा दुसऱ्या स्थानाच्या पूजेचा प्रकार मीं तुला सांगितला. आतां ब्राह्मणांची भक्ति कशी करावी, ते ऐक. ५२ उद्धवा ! ब्राह्मण हे माझ्या पूजास्थानांतील अति श्रेष्ठ स्थान आणि माझ्या शीघ्र प्राप्तीचें साधन आहे, असें समज. ५३ त्यांच्या भजनाचें आश्चर्य असें आहे कीं, त्यांना दुरून पाहूनच लोटांगण घालावें, त्यांच्या चरणावर मस्तक ठेवावें आणि त्यांच्या पायधुळीला शिरसा वंदन करावें. ५४ आवाहन व विसर्जन यांवांचूनच शालिग्रामांत मी नित्य रहातों. परंतु शालिग्राम अचेतन आहेत व ब्राह्मण सचेतन, म्हणून मद्रूप आहेत. ५५ अव्यक्तरूपानें असलेला मी जनार्दन ब्राह्मणरूपानें व्यक्त असतों. ब्राह्मणाच्या रूपानेंच मी नारायण पृथ्वीवर रहातों, म्हणून ब्राह्मणांना भूदेव म्हणतात. ५६ ब्राह्मणांच्या मुखांनीं वेदाचा महिमा वाढला. यज्ञ, दान, तप, तीर्थ इत्यादिकांस ब्राह्मणांमुळेंच महत्त्व आलें. ब्राह्मणांचें प्रेम देवांवर फार असतें. ब्राह्मणांच्या तोंडूनच ब्रह्माला ब्रह्मत्व आलें. ५७ अशा ब्राह्मणांचा अपमान केला असतां सर्व यज्ञदेवता, वेदादि, तप-दान-तीर्थ एवढ्यांनाच नव्हे तर साक्षात् परब्रह्माचाहि अपमान होतो. ५८ मी जरी त्रिलोकाहूनहि अधिक व्यापक आहें तरी माझे ब्राम्हण माझ्याहूनहि श्रेष्ठ आहेत. त्यांच्यामध्यें मी वेदरूप नारायण सगळाच समावलों आहें. ५९ ब्राह्मणाचें पाऊल हृदयावर धारण करण्यानें मला परमपावनत्व आलें आहे. त्यांनीं लक्ष्मीची उपेक्षा

उपेक्षितां। चरणतीर्थ माथां शिवू धरी ॥ १३६० ॥ यालागीं ब्राह्मण पूज्य जाण। अंगें मी करीं चरणक्षालन। त्यांचें उच्छिष्ट मी काढीं आपण। पाड कोण इतरांचा ॥ ६१ ॥ मुख्य म झें अधिष्ठान। सर्वोपचारपूजास्थान। दान मान मिष्टान्न। विधिपूजन विप्रांचें ॥ ६२ ॥ एका नेमू शालिग्रामाचा। एका स्थावर लिंगाचा। एका नेमू गणेशाचा। एका सूर्याचा दर्शननेमू ॥ ६३ ॥ एका नेमू तुळशीचा। एका बांधल्या अनंताचा। नित्य नेम ब्राह्मणाचा। सभाग्य तो भाग्याचा दुर्लभ ॥ ६४ ॥ नित्य नेमस्त द्विजपूजा। षोडशोपचार करी वोजा। माझे भक्तीचा तो राजा। आत्मा माझा तो एकू ॥ ६५ ॥ जो देवतांतरा नुपासित। जीवेंभावें ब्राह्मणभक्त। त्याचा चूकवूनियां अनर्थ। निजस्वार्थ मी कर्ता ॥ ६६ ॥ ऐसे जे ब्राह्मणभक्त। त्यांच्या पायीं पृथ्वी पुनीत। गंगा चरणतीर्थ वांछित। शिरीं वंदीत मी त्यांसी ॥ ६७ ॥ त्यांचे सेवेचा सेवक। मोलेंवीण मी झालों देख। ब्राह्मणसेवेचें मज सुख। अलोलिक अनिवार ॥ ६८ ॥ नित्य नेम द्विजपूजा। करी तो आवडे अधोक्षजा। त्यालागीं पसरूनि चारी भुजा। आलिंगनीं माजा जीवू निवे ॥ ६९ ॥ ब्राह्मणांच्या स्नानप्रवाहतळीं। जेणें भावार्थे केली आंघोळी। कोटि अवभृथें पायांतळीं। तेणें तत्काळीं घातलीं ॥ १३७० ॥ ब्राह्मणचरणतीर्थ देखतां। फळ सुटे दोषदुरिता। तें भावार्थे तीर्थ घेतां। दोष सर्वथा निमाले ॥ ७१ ॥ जो कोणी नित्य नेमस्त। सेवी ब्राह्मणाचें चरणतीर्थ। तो स्वयें झाला तीर्थभूत। त्याचेनि पुनीत जड जीव ॥ ७२ ॥ त्या ब्राह्मणाचे ठायीं जाण। अभ्यंगादि सुमन चंदन। आसन भोजन धन धान्य। शक्तिप्रमाण पूजेसी ॥ ७३ ॥ ब्राह्मणासी प्रिय भोजन। दानीं श्रेष्ठ अन्नदान। निपजवूनियां मिष्टान्न। द्यावें भोजन मद्भावें ॥ ७४ ॥ एक हेळसूनि देती अन्न। एक उबगल्यासाठीं जाण। एक देती निर्भर्त्सून। एक वसवसोन घालिती ॥ ७५ ॥ तैसें न करावें आपण। ब्राह्मण माझें स्वरूप जाण। त्यांसी देऊनियां सन्मान। द्यावें भोजन यथाशक्ति ॥ ७६ ॥ अज्ञान अतिथि आल्या समयीं।

केली असतांहि ती त्यांच्या पायीं लागते. शंकरहि त्यांच्या चरणाचें तीर्थ मस्तकावर धारण करितो. १३६० यास्तव ब्राह्मण पूज्य आहेत. मी स्वतः त्यांचे पाय धुतों. त्यांचें उष्टें काढितों मग इतरांचा काय पाड! ६१ माझें मुख्य अधिष्ठान, सर्वोपचारांनीं पूजास्थान, दान, मान, मिष्टान्न हें सर्व ब्राह्मणांचें यथाविधि पूजन आहे. ६२ कोणी शालिग्रामाच्या पूजेचा नेम धरितात, कोणी शिवलिंगाची उपासना करितात, कोणी गणपतीच्या पूजेचा नेम घेतात, तर कोणी सूर्यदर्शनाचा नेम धरितात. ६३ एखाद्याचा तुळशीच्या पूजेचा, एखाद्याच्या हाताला बांधलेल्या अनंताच्या पूजेचा नेम असतो. परंतु नित्य ब्राम्हणपूजेचा नेम धरणारा भाग्यवान् मात्र दुर्मिळ आहे. जो मोठ्या आवडीनें ब्राह्मणांची नित्य नियमानें षोडशोपचारानें पूजा करितो, तो माझ्या, भक्तीचा राजा, माझा आत्माच होय. ६५ इतर सर्व देवतांची उपासना सोडून जो भक्तिभावानें ब्राह्मणांना भजतो, त्याचे सर्व अनर्थ नाहींसे होतात व त्याचा मनोरथ मी पूर्ण करितों. ६६ असे जे ब्राह्मणभक्त आहेत, त्यांच्या चरणानेंच पृथ्वी पावन होते. गंगा त्यांच्या चरणतीर्थाची इच्छा करिते व मी त्यांना शिरसावंदन करितों ६७ मी वेतनावांचूनच त्यांच्या सेवेचा सेवक झालों आहें, मला ब्राह्मणसेवेंत अनिवार व अलौकिक सुख होतें. ६८ जो नियमानें ब्राह्मणांची पूजा करितो तो भगवानाला प्रिय होतो. त्याला चारहि हात पसरून आलिंगन दिलें असतां माझा जीव तृप्त होतो. ६९ ब्राह्मणांनी स्नान केलेल्या पाण्यांत जो भक्तिभावानें स्नान करितो. त्यानें तत्काल कोट्यवधि अवभृतस्नानेंहि तुच्छ केलीं आहेत, असें समजावें. १३७० ब्राह्मणांचें चरणतीर्थ पहातांच दोष व पातकें दूर पळून जातात. तें तीर्थ श्रद्धेनें घेतलें असतां सर्व दोष नाहींसे होतात. ७१ जो कोणी नित्य नियमानें ब्राह्मणांचें चरणतीर्थ घेतो, तो स्वतः तीर्थभूत होतो. त्याच्यायोगानें जडजीव पावन होतात. ७२ ब्राह्मणांस अभ्यंग स्नान घालून सुवासिक फुलें, चंदन यांनीं त्यांची पूजा करावी. सुखासन, भोजन व यथाशक्ति धन-धान्य अर्पण करावें. ७३ ब्राह्मणांना सर्वांत भोजन फार प्रिय आहे व सर्व दानांत अन्नदान श्रेष्ठ

खोडी काढूं नये त्याच्या ठायीं । तोही माझें स्वरूप पाहीं । अन्न ते समयीं अर्पावें ॥ ७७ ॥ अतिथि जातां पराङ्मुख । त्यासवें जाय पुण्य निःशेख । अन्न द्यावें समयीं अवश्यक । नातरी उदक तरी द्यावें ॥ ७८ ॥ ब्राह्मण बैसवूनि पंक्ती । जे कोणी पंक्तिभेद करिती । ते मोलें पाप विकत घेती । त्यांसी अधोगती निश्चितीं ॥ ७९ ॥ ब्राह्मणसेवेलागीं जाण । काया वाचा मन धन । यथासामर्थ्यें अवंचन । अतिथिपूजन त्या नांव ॥ १३८० ॥ त्रिपदा जपे पवित्र पूर्ण । यालागीं वेदांचें निवासस्थान । ब्राह्मण माझें स्वरूप जाण । श्रेष्ठ अधिष्ठान पूजेचें ॥ ८१ ॥ ब्राह्मणआज्ञेलागीं जाण । अतिसादर ज्याचें मन । देणें देववणें दान । श्रद्धासंपूर्ण या नांव ॥ ८२ ॥ ब्राह्मणसेवा धनेंवीण । न घडे ऐसें न म्हण । सेवेसी श्रद्धा प्रमाण । उल्हास पूर्ण भजनाचा ॥ ८३ ॥ एकाची शरीरसेवा जाण । एकाचें वाचिक पूजन । एकाचें मानसिक भजन । दया पूर्ण द्विजाची ॥ ८४ ॥ ब्राह्मणभक्तिलागीं जाण । हर्षनिर्भर अंतःकरण । श्रद्धायुक्त उल्हासपूर्ण । आतिथ्य जाण या नांव ॥ ८५ ॥ यापरी ब्राह्मणभजन । तिसरें पूजेचें अधिष्ठान । हें सांगीतलें जाण । गोशुश्रूणष तें ऐक ॥ ८६ ॥ जे गायीच्या कैवारा । घायें सहस्र-बाहो केला पुरा । तीन सप्तकें वसुंधरा । मुख्य धुरा म्यां मारिल्या ॥ ८७ ॥ रामावतारीं अतिमहिमान । तैं न घडेचि गोशुश्रूषण । यालागीं गोकुळीं जाण । गायींचें सेवन म्यां केलें ॥ ८८ ॥ गायीचे सेवें झाली पुष्टी । बाळपणीं मारिले जेठी कंस चाणूर मारिले हटी । बैसविला राज्यपटीं उग्रसेन

आहे. यास्तव स्वादिष्ट मिष्टान्न करून मदर्पण बुद्धीनें ब्राह्मणभोजन घालावें. ७४ कोणी ब्राह्मणांचा तिरस्कार करून अन्न देतात, कोणी कंटाळून देतात, कोणी निंदा करून देतात तर कोणी अंगावर ओरडून मग त्यांना भोजन घालितात. ७५ असें केव्हांहि करूं नये. ब्राह्मण माझेंच स्वरूप आहेत असें समजून त्यांना आदरपूर्वक आपल्या सामर्थ्याप्रमाणें भोजन द्यावें. ७६ जेवणाच्या वेळेला एखादा अज्ञान अतिथि आला, तर त्याच्यांत कांहीं दोष काढूं नयेत तो माझेंच स्वरूप आहे, असें समजून त्याला अन्न द्यावें. ७७ अतिथि विमुख झाला असतां सर्व पुण्य निःशेष नाहींसें होतें म्हणून त्याला भोजनसमयीं अवश्य अन्न द्यावें. किंवा निदान पाणी तरी द्यावें. ७८ जे कोणी ब्राह्मणांना पंक्तीला घेऊन वाढण्यांत पंक्तिभेद करितात ते पापच विकत घेतात व अधोगतीला जातात. ७९ ब्राह्मणसेवेंत यथाशक्ति काया-वाचा-मन व द्रव्य निष्कपटपणानें लावणें यालाच 'अतिथि-पूजन' म्हणतात. १३८० ते पूर्ण पवित्र गायत्रीमंत्राचा जप करितात. म्हणून ते वेदांचेंहि वसतिस्थान आहेत व माझेंच स्वरूप आहेत. यास्तव तेच पूजेचें श्रेष्ठ अधिष्ठान होत. ८१ ब्राह्मणांची आज्ञा ऐकण्यास ज्याचें मन अतिसादर असतें व जो श्रद्धेनें स्वतः त्यांना दान देतो व दुसऱ्यांकडून देववितो, त्यालाच दाता व तेंच दान असें म्हणतात. ८२ द्रव्यावांचून ब्राह्मणाची सेवा घडत नाहीं, असें मुळींच समजूं नकोस. सेवेला श्रद्धा प्रमाण आहे. भजनाचा पूर्ण उल्हास असावा. ८३ कोणी शरीरानें सेवा करितात, कोणी वाचेनें सेवा करितात, कोणी मनानें करितात. पण ब्राह्मणांची दया सर्वांवर सारखी असते. ८४ ब्राह्मणाच्या भक्तीसाठीं श्रद्धायुक्त, उल्हासपूर्ण, आनंदयुक्त अंतःकरण असणें यालाच आतिथ्य असें म्हणतात. याप्रमाणें ब्राह्मणाचें भजन हें पूजेचें तिसरें अधि-ष्ठान तुला सांगितलें. आतां गायीची सेवा कशी करावी, तें ऐक. ८६ गायीचा कैवार घेऊन मीं सहस्रार्जुनाचा एका घावानें वध केला (कार्तवीर्याचा पुत्र जो अर्जुन, त्यानें दत्ताची उपासना करून एक हजार हात मिळविले, म्हणून त्याला सहस्रार्जुन म्हणतात. तो एकदा जमदग्नीच्या आश्रमांत गेला असतां तेथें कामधेनूच्या प्रभावानें ऋषीनें त्याचा उत्तम सत्कार केला. त्या धेनूचें हें सामर्थ्य पाहून राजानें लोभामुळें तिचें हरण केलें. तेव्हां सहावा अवतार जो परशुराम त्यानें सहस्रार्जुनाबरोबर युद्ध करून त्याचा प्राण घेतला.) व एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली. ८७ रामावतारांत मीं फार मोठें कार्य केलें. त्या वेळीं मला गायींची सेवा घडली नाहीं, म्हणून मीं गोकुळांत अवतार घेऊन गायींची सेवा केली. ८८ गायींच्या सेवेनेंच मीं सदृढ होऊन बाळपणांतच कंस-चाणुरादि मोठमोठ्या मल्लांना बलात्कारानें मारून उग्रसेनाला

॥ ८९ ॥ गायीचे सेवेची अतिगोडी । तेणें माझी कीर्ति झाली चोखडी । फोडिली कंसाची बांदवडी । तोडिली बेडी पितरांची ॥ १३९० ॥ यालागीं गायी आणि ब्राह्मण । माझा जाण जीवप्राण । माझे पूजेचें अधिष्ठान । सुलभ जाण इयें दोन्हीं ॥ ९१ ॥ आपत्काळीं गोरक्षण । करी तो पढियंता मज जाण । त्यासवें मी आपण । गोरक्षण करीतसें ॥ ९२ ॥ गायीचे सेवेचें विधान । गोग्रास द्यावा जे तृण । करावें अंगकुरवाळण । इतुकेनि प्रसन्न मी होयें ॥ ९३ ॥ निर्लोभ गायीची सेवा । करितां माझी प्राप्ति उद्धवा । ऐक्य वैष्णवाची सेवा । पूजा सद्भावा विभागू ॥ ९४ ॥

वैष्णवसेवा अत्यंत कठिण । तेथें जाती नाहीं गा प्रमाण । न म्हणावा शूद्र ब्राह्मण । भक्तिप्राधान्य-भावार्थें ॥ ९५ ॥ विदुर दासीपुत्र प्रसिद्धु । त्यासी आवडला गोविंदु । झाला वैष्णवांमाजीं अतिशुद्धु । कैसेनि निंद्यु म्हणावा ? ॥ ९६ ॥ योनि जन्मला मर्कट । तो वैष्णवांमाजीं अतिश्रेष्ठ । हनुमंत म्हणावया कनिष्ठ । ऐसा पापिष्ठ कोण आहे ॥ ९७ ॥ राक्षसांमाजीं बिभीषण । दैत्यांमाजी प्रल्हाद जाण । भगवंतासी अनन्यशरण । वैष्णवपण तेणें त्यांसी ॥ ९८ ॥ जाती उत्तम भक्तिहीन । तो वैष्णव नव्हे जाण । अथवा करी दांभिक भजन । वैष्णवपण त्या नाहीं ॥ ९९ ॥ वैष्णवीं मानीं जातिप्रमाण । शालिग्राम मानी पाषाण । गुरूसी मानी माणुसपण । तो पापिष्ठ जाण सर्वथा ॥ १४०० ॥ जाणीव शाहणीव ज्ञातेपण । सांडूनि जातीचा अभिमान । जो मज होय अनन्यशरण । वैष्णव जाण तो माझा ॥ १ ॥ त्या वैष्णवाचें पूजन । बाह्य उपचारें नव्हे जाण । बंधुस्नेहें कळवळी मन । साचार पूजन त्या नांव ॥ २ ॥ ऐक सख्या बंधूचा स्नेहो । बंधूसी रणीं लागतां घावो । घायाआड स्वयें रिघोनि पहा हो । शत्रुसमुदावो विभांडी ॥ ३ ॥ तैसा पोटाआंतुल कळवळा । तोचि वैष्णवपूजेचा सोहळा । स्नेहेंवीण

राज्यावर बसविलें. ८९ मला गायीच्या सेवेची अतिशय आवड असल्यामुळेंच माझी उत्तम कीर्ति झाली व मी कंसाच्या बंदींतून पितरांना सोडवून त्यांच्या पायांतील बेडी तोडून टाकिली. १३९० यास्तव गायी आणि ब्राह्मण हे मला जीव कीं प्राण आहेत. म्हणून हे दोघे माझ्या पूजेचें सुलभस्थान झाले आहेत. ९१ जो आपत्काळीं गायींचें रक्षण करितो, तो मला फार प्रिय असतो. त्याच्याबरोबर मीहि गायींचें रक्षण करितो. ९२ गायीच्या सेवेचा प्रकार असा आहे. तिच्या तोंडांत गवताचा घांस द्यावा, तिचें अंग कुरवाळावें. म्हणजे मी प्रसन्न होतों. ९३ हे उद्धवा ! लोभ सोडून गायीची सेवा केली असतां माझी प्राप्ति होते. आतां वैष्णवाची सेवा व सद्भावानें त्यांच्या पूजेचा विभाग ऐक. १३९४.

वैष्णवांची सेवा अतिशय कठीण आहे. तेथें जातीचें प्रमाण मुळींच नाहीं. हा ब्राह्मण व हा शूद्र असा भेद मनांत न ठेवितां भक्तिभावच मुख्य समजावा. ९५ विदुर दासीपुत्र होता, हें प्रसिद्ध आहे. पण त्याला गोविंद आवडल्यामुळें तो सर्व वैष्णवांत अत्यंत पवित्र झाला. त्याला निंद्य कसें म्हणावें ! ९६ माकडांच्या योनींत जन्मलेल्या, पण वैष्णवांमध्यें अत्यंत श्रेष्ठ असलेल्या हनुमानाला कनिष्ठ म्हणेल असा पातकी कोणी तरी आहे का ! ९७ राक्षसामध्यें बिभीषण, दैत्यांमध्यें प्रल्हाद, यांना भगवानाला अनन्यशरण गेल्यामुळेंच वैष्णवत्व प्राप्त झालें. ९९ जो उत्तम जातींत जन्म घेऊनहि भक्तिहीन असतो, तो खरा वैष्णव नव्हे. किंवा जो दांभिकपणानें भजन करितो, तोहि वैष्णव नव्हे. ९९ जो वैष्णवाविषयीं जातीचें प्रमाण मानितो, शालिग्रामाला दगड समजतो, गुरूला सामान्य मनुष्य म्हणतो, तो खरोखर पातकी होय. १४०० जो आपली बुद्धिमत्ता, विद्वत्ता, शहाणपणा व जातीचा अभिमान यांना सोडून मला अनन्य शरण येतो, तोच माझा वैष्णव होय. १ त्या वैष्णवाचें पूजन बाह्य उपचारांनीं होत नसतें. बंधुस्नेहानें मन कळवळणें हेंच त्यांचें पूजन आहे. २ सख्या भावाचें प्रेम कसें असतें, तें ऐक. भावाला जर युद्धांत घाव लागला तर तो स्वतः त्याच्या आड जातो व शत्रुसमुदायाशीं भिडून त्याचा नाश करितो. ३ ज्याच्या मनांत असा कळवळा असतो तोच खरा वैष्णवपूजेचा विधि होय. प्रेमावांचून

टिळे माळा । सुख गोपाळा तेणें नव्हे ॥ ४ ॥ एका पितयाचे पुत्र साधु । अकृत्रिम होती बंधू । माजीं सापत्नविरोधू । स्नेह शुद्ध तो नव्हे ॥ ५ ॥ भक्ताअभक्तांची उत्पत्ती । मजपासूनि गा निश्चितीं । भावाभावसापत्नप्राप्ती । विरुद्ध स्थिति परस्परें ॥ ६ ॥ वैष्णव विष्णूचे उदरीं जाण । ते उदरीं उदरस्थ व्हावें आपण । तैं सहजें झालें सखेपण । अकृत्रिम जाण कळवळा ॥ ७ ॥ ऐसा बंधुस्नेहें जो कळवळा । तेचि पूजा वैष्णवकुळा । वैष्णवपूजकाजवळा । भावें भुलला मी तिष्ठें ॥ ८ ॥ वैष्णवपूजेचें लक्षण । तें पांचवें माझें अधिष्ठान । ऐक आकाशाचें पूजन । केवळ माझें ध्यान ते ठायीं ॥ ९ ॥ आकाश निर्लेप निर्विकार । अतिसूक्ष्म निराकार । तैसें माझें ध्यान निरंतर । हृदयीं साचार करावें ॥ १४१० ॥ ध्यानीं बैसोनि सावकाश । सगळें सर्व महदाकाश । जो आपुलें करी हृदयाकाश । तेणें मी परेश पूजिला ॥ ११ ॥ अतिसूक्ष्मनिर्विकार । हृदयीं माझें ध्यान सधर । तेचि पूजा गा साचार । अपरंपार मी पूजिलों ॥ १२ ॥ आकाशा लेप लावूं जातां । लावितां न लागे सर्वथा । तेवीं सर्व कर्मीं वर्ततां । आपुली मुक्तता जो देखे ॥ १३ ॥ आकाश सर्व पदार्थीं व्याप्त । व्याप्त असोनि अलिप्त । तेवीं सर्व कर्मीं मी वर्तत । कर्मातीत नभनिष्ठा ॥ १४ ॥ आकाश माझें पूजास्थान । तेथील पूजेचें हें विधान । हें सहावें पूजाअधिष्ठान । वायूचें अर्चन तें ऐक ॥ १५ ॥ वायूच्या ठायीं भगवद्बुद्धी । ज्याची ढळों नेणें कधीं । वायूचेनि भूतां चेतनसिद्धी । जगातें त्रिशुद्धी धरितां तो मी ॥ १६ ॥ वायुरूपें मीचि जाण । जालों सर्व भूतांचा प्राण । प्राणाचा मी मुख्य प्राण । मद्रूपें पवन या हेतू ॥ १७ ॥ वायू व्योमीं जन्म पावे । जन्मोनि व्योमावेगळा नव्हे । सर्व कर्मीं तेथेंचि संभवे । अंतीं स्थिरावे निजव्योमीं ॥ १८ ॥ तेवीं जन्मकर्मनिदान । पावोनि न सांडी अधिष्ठान । प्राणाचा जो होय प्राण । हेंचि पूजन वायूचें ॥ १९ ॥ प्राणाचें

नुसत्या बाह्य टिळे-माळांनीं गोपाळाला संतोष होत नाहीं. ४ साधू एकाच पित्याच्या दोन पुत्रांसारखे अकृत्रिम बंधु होतात. त्यांच्यांत सावत्रभावासारखा विरोध ठेवणें हा शुद्ध स्नेह नव्हे ५ वस्तुतः भक्त आणि अभक्त यांची उत्पत्ति मजपासूनच होते. पण त्यांची स्थिति एकमेकांच्या विरुद्ध असल्यामुळें भाव व अभाव या कारणानें सावत्रपणा प्राप्त होतो. ६ वैष्णव विष्णूच्या उदरांत रहातात. त्या उदरांतील उदरस्थ आपण व्हावें म्हणजे अनायासानें सख्खेपण प्राप्त होतें व निष्कपट कळवळा येतो. ७ त्याप्रमाणें बंधुस्नेहानें जो कळवळा तीच वैष्णवांची पूजा आहे. अशा वैष्णव पूजकांजवळ मी त्यांच्या भावाला मोहित होऊन रहातें. ८ वैष्णव पूजेचें लक्षण, हें माझें पांचवें पूजास्थान होय. आतां आकाशाचें पूजन ऐक. त्यांतच माझें ध्यान असतें. ९ आकाश जसें निर्लेप, निर्विकार, अतिसूक्ष्म व निराकार असतें, तसें हृदयांत माझें ध्यान निरंतर करावें. १४१० ध्यानामध्यें स्वस्थ बसून जो आपल्या हृदयाकाशाला सर्वच महदाकाश करितो, त्यानें मज परमेश्वराची पूजा केली, असें होतें. ११ हृदयामध्यें अतिसूक्ष्म व निर्विकार अशा माझें दृढ ध्यान करणें, हीच माझी खरी पूजा आहे. त्या पूजेनें मी अत्यंत पूजित होतों. १२ आकाशाला लेप लावूं गेल्यास तो कांहीं केल्या लागत नाहीं. त्याप्रमाणें तो सर्व कर्मांत वागत असूनहि स्वतः त्यापासून मुक्तच असतो. १३ आकाश सर्व पदार्थांना व्यापितें व स्वतः व्याप्त असूनहि अव्याप्तच रहातें. त्याप्रमाणें सर्व कर्मांत वागत असूनहि तो आकाशनिष्ठ कर्मातीतच असतो. १४ आकाश माझें पूजास्थान आहे व हा त्याच्या पूजेचा प्रकार आहे. हें सहावें पूजेचें अधिष्ठान झालें. आतां वायूचें अर्चन ऐक. १५ वायूमध्यें भगवद्बुद्धि ठेवावी. ती केव्हांहि ढळूं देऊं नये. कारण वायूमुळेंच प्राण्यांची चेतना सिद्ध होते. तोच खरोखर जगाचें धारण करणारा आहे. १६ मीच वायूरूपानें सर्व भूतांचा प्राण झालों आहें. मी प्राणांचाहि मुख्य प्राण आहें. यास्तव वायु मत्स्वरूपच आहे. १७ वायु आकाशांत उत्पन्न होतो, पण जन्मल्यावर आकाशापासून वेगळा रहात नाहीं. सर्व कर्मांत तो आकाशांतच रहातो व शेवटीं आकाशांतच स्थिर होतो. १८ त्याप्रमाणें जन्मकर्मांना प्राप्त होऊन अधिष्ठान न सोडतां प्राणाचाहि प्राण होणें; हेंच त्याचें वायुपूजन होय.

गमनागमन । तेथ सोहंहंसाचें नित्य ध्यान । तेंचि करितां नित्य सावधान । हेंचि पूजन वायूचें ।। १४२० ।। मद्रूपें दृढ भावन । वायूचें जो करी आपण । तें पवनाचे पूजन । पूजास्थान सातवें ।। २१ ।। जीवनें जीवनाची पूजा । जीवनेंचि निपजे वोजा । ते पूजा पावे अधोक्षजा । तो भक्त माझा पढियंता ।। २२ ।। ' आपोनारायणः साक्षात् ' । या मंत्राचा जो मंत्रार्थ । देवें देवोचि पूजिजेत । जाण निश्चित उद्धवा ।।२३।। क्षीरें पूजिला क्षीरसागरू । तेवीं द्रव्यें द्रव्योपचारू । हा जीवनपूजाप्रकारू । जाण निर्धारू उद्धवा ।।२४।। जीवा जीववी जीवन । त्या जीवना मी निजजीवन । जीवनें पूजिजे जीवन । जेवीं समुद्रपूजन तरंगीं ।।२५।। ' नद्यस्तृप्यन्तु समुद्रास्तुप्यन्तु ' । हें जळेंचि जळ पूजिजेतू । पूज्यपूजकां एकत्व येथू । हेतु वेदोक्तु विधिपूजा ।। २६ ।। जीवनें पूजिजें जीवन । हें आठवें पूजास्थान । ऐक पृथ्वीचें पूजन । श्लोकार्धें संपूर्ण सांगेन ।। २७ ।।

जळामाजीं धरा अधर । विरोनि हों पाहे तें नीर । तीमाजीं मी प्रवेशलों धराधर । अधर ते सधर तेणें झाली ।। २८ ।। यालागीं पृथ्वी माझें पूजास्थान । ऐक पूजेचें विधान । गोसदृश स्थंडिलीं जाण । आवाहन पैं माझें ।। २९ ।। गोसदृश स्थंडिलीं कां म्हणसी । पृथ्वी आहे गायीच्या ऐशी । जैं पूजा करावी पडे तिसी । तैं तदाकारेंसीं स्थंडिल ।। १४३० ।। ते स्थंडिलीं पूजावया धरा । आवाहन करावें धराधरा । तल्लिंग हृदयमंत्रा । मंत्रद्वारा पूजावी ।। ३१ ।। हृदय कवच शिखा नेत्र । शक्तिबीज मंत्रास्त्र । स्थंडिलीं रेखूनियां यंत्र । धराधर महापूजा ।। ३२ ।। यापरी पृथ्वीपूजन । साङ्ग सांगीतलें जाण । आपुलें आपण पूजास्थान । दहावें लक्षण तें ऐक ।। ३३ ।। आधीं एक पुढें पूर्ण । त्या नांव

---

१९ प्राणाचें जाणें-येणें चालू असतां त्यांत 'सोहं हंसाचें' सतत सावधान मनानें ध्यान केल्यास तेंच वायूचें पूजन होतें. १४२० माझ्यारूपानें जो वायूचें दृढचिंतन करितो त्याचें तेंच वायुपूजन व सातवें पूजास्थान आहे. २१ जलानेंच जलाची पूजा करावी. कारण ती जलानेंच सिद्ध होते व भगवानाला पावते. तो भक्त माझा आवडता होय. २२ 'आपो नारायणः साक्षात्' म्ह० जल हें साक्षात् नारायण आहे. या मंत्राचा खरोखर अर्थ असाच आहे कीं, देवानें देवालाच पूजावें. २३ उद्धवा! दुधानें जशी क्षीरसागराची पूजा करावी, किंवा द्रव्यानें जशी द्रव्याची पूजा करावी, त्याचप्रमाणें हा जलपूजेचा प्रकार आहे, हें निश्चित जाण. २४ जीवाला जलच जिवंत ठेवितें. त्या जलाचें मी जीवन आहे. तेव्हां समुद्राच्या तरंगांनींच समुद्राचें पूजन जसें करावें तसें जलानेंच जलाचें पूजन करावें. २५ 'नद्या तृप्त होवोत, समुद्र तृप्त होवोत' जशा अर्थांच्या मंत्रांनीं जलानेंच जलाची पूजा सांगितली आहे. यांत पूज्य व पूजक यांचें ऐक्य हेंच वेदोक्तपूजाविधीचें निमित्त आहे. २६ याप्रमाणें जलानें जलाचें पूजन हें आठवें पूजास्थान झालें. आतां पुढील अर्ध्या श्लोकानें पृथ्वीचें पूजन सविस्तर सांगतों, तें ऐक. १४२७.

जलामध्यें पृथ्वी अधर आहे. म्हणून ती विरघळून जलरूप होऊं पहात होती; तेव्हां मी त्यांत प्रवेश करून तिला आधार दिला व धराधर नांवानें प्रसिद्ध झालों. २८ यास्तव पृथ्वी माझी पूजास्थान आहे. त्या पूजेचें विधान आतां ऐक. गायीसारखें स्थंडिल करून त्यावर माझें आवाहन करावें. २९ गायीच्या आकाराचेंच स्थंडिल कां करावें असें जर म्हणशील तर ऐक. पृथ्वी गायीसारखी आहे. तेव्हां तिची पूजा करितेवेळीं गायीच्या आकाराचें स्थंडिल करावें. १४३० त्या स्थंडिलांत पृथ्वीचें पूजन करावयासाठीं धराधराचें आवाहन करावें व त्याचें चिन्ह ज्यामध्यें आहे अशा मंत्रांनीं तिची पूजा करावी. ३१ त्या स्थंडिलामध्यें हृदय, कवच, शिखा, नेत्र, बीज, मंत्र, अस्त्र इत्यादि यंत्र काढून धराधराची महापूजा करावी. ३२ याप्रमाणें मी तुला सांग पृथ्वीपूजन सांगितलें. आतां आपणच आपलें पूजास्थान आहोंत, हें दहावें लक्षण ऐक. ३३ पहिला आंकडा एक व त्याच्यापुढें पूज्य, त्याला दहावें लक्षण म्हणतात,

दहावें लक्षण । आपलें आपण पूजास्थान । विचित्र विंदान पूजेचें ॥ ३४ ॥ पूज्यापुढें पूज्यकोटी । केल्या गणितासी पडे तुटी । पहिल्या पूज्यासी जैं फांटा उठी । तैं गणितसृष्टी असंख्य ॥ ३५ ॥ पूर्णासी फांटा काढिजे । त्या नांव एक म्हणिजे । एकपणेंही पूर्ण असिजे । सहज निजे परिपूर्ण ॥ ३६ ॥ पूर्णापुढें पूर्ण पडे । तैं गणित काय आतुडे । जैं निचाडा चाड वाढे । तैं निजनिवाडें निजपूजा ॥ ३७ ॥ एकासी एक मेळविजे । तैं दोनीपणें होय दुजें । जैं एकें एक भागिजे । तैं देखिजे निज-पूज्यत्व ॥ ३८ ॥ आपणचि आपला देवो । आपुला पूजक आपण पहा वो । आपुला आपणचि भावो । नवल नवलावो पूजेचा ॥ ३९ ॥ हृदयीं भावूनि चैतन्यघन । स्वयें तद्रूप होऊनि जाण । मग जे भोग भोगी आपण । ब्रह्मार्पण सहजेंचि ॥ १४४० ॥ तो ग्रास घाली स्वमुखीं । तेणें मुखें मी होय सुखी । तृप्ति उपजे परमपुरुखीं । पूजा नेटकी हे माझी ॥ ४१ ॥ तो जे जे कांहीं भोग भोगी । ते अर्पती मजचि-लागीं । मी रंगलों त्याचे रंगीं । पावे श्रीरंगीं ते पूजा ॥ ४२ ॥ मुख्य पूजेमाजीं हे माझी पूजा । तेणेंचि पूजिलें मज अतिवोजा । पूजामिसें गरुडध्वजा । वश आधोक्षजा तेणें केलें ॥ ४३ ॥ हे आवडती माझी पूजा । अत्यंत प्रिय अधोक्षजा । हे भक्ति पढिये गरुडध्वजा । जाण तो माझा प्रिय भक्त ॥ ४४ ॥ हो कां सगुण अथवा निर्गुण । दोहीं रूपें मीचि जाण । तेथ जो करी निजभोग अर्पण । शुद्ध पूजन तें माझें ॥ ४५ ॥ निजात्मभोगीं अधोक्षजा । पूजिजे ते हे जाण पूजा । सर्व भूतांतें पूजिजे वोजा । समसाम्य समजा समभावें ॥ ४६ ॥ अकरावें पूजेचा विवेक । मागां पुढां एकएक । अकरा इंद्रियां पडे आंख । तोचि पूजक सर्व भूतां ॥ ४७ ॥ मगां पुढां एकएक कीजे । त्या नांव एकादश म्हणिजे । हाचि विवेक जेणें जाणिजे । तेणें पूजिजे सर्व भूतां ॥ ४८ ॥ आत्मभोग मदर्पणें पाहीं ।

तेंच आपलें आपण पूजास्थान होय. त्या पूजेचा प्रकार मोठा विचित्र आहे. ३४ नुसत्या पूज्यापुढें कोट्यवधि पूज्यें ठेविलीं तरी त्याचें गणित करितां येणार नाहीं; ३५ पण तेंच जर त्या पूज्याच्या मागें फांटा फोडून एक उभी रेघ ओढिली कीं, त्या संख्येचें गणित कल्पनातीत होईल. पूज्याच्या आरंभीं एक फांटा देऊन त्याला एक हें नांव देतात आणि त्या एकानें युक्त असला कीं तो परिपूर्ण होतो. ३६ पण पूज्यापुढें पूज्यच ठेविलें तर त्याचें गणित काय करणार ! त्याचप्रमाणें निरिच्छाला इच्छा झाली म्हणजे तो स्वतःची स्वतःच पूजा करितो. ३७ एकांत एक मिळविला कीं दुजेपणानें दोन होतात. परंतु एकांतून एक वजा केल्यास केवळ पूज्यच शिल्लक रहातें. ३८ आपणच आपला देव असल्यावर पूजा करणाराहि आपणच होतो व आपणच आपला भाव होतो. असें त्या पूजेचें आश्चर्य आहे. ३९ हृदयांत चैतन्यघनाची भावना करून व स्वतः तद्रूप होऊन जो भोग भोगितो तो सहजच ब्रह्मार्पण होतो. १४४० तो स्वतःच्या तोंडांत जो घास घालितो त्यानें मीच सुखी होतों व परम पुरुष तृप्त होतो. हीच माझी उत्तम पूजा होय. ४१ तो जेवढे भोग भोगितो, ते सर्व मलाच अर्पण होतात. मी त्याच्या रंगांत रंगतों. ती पूजा श्रीरंगाला प्राप्त होते. ४७ मुख्य पूजांपैकीं ही माझी पूजा आहे. त्यानें अत्यंत आवडीनें माझें पूजन करून पूजेच्या निमित्तानें भगवानाला वश करून घेतलें. ४३ माझी ही आवडती पूजा परमात्म्याला अत्यंत प्रिय आहे. ही भक्ति भगवानाला फार आवडते. तो माझा प्रिय भक्त आहे, असें जाण. ४४ सगुण किंवा निर्गुण हीं रूपें मीच आहें. त्यांस आपला स्वतःचा भोग अर्पण करणें, हेंच माझें शुद्ध पूजन होय. ४५ ही आत्मभोगानें केलेली परमात्म्याची पूजा व सर्व भूतें आत्मस्वरूपच समजून त्यांची एकात्मभावानें आवडीनें केलेली पूजा, या दोन्ही एकसारख्याच आहेत. ४६ आतां अकराव्या पूजेचा विचार केल्यास त्यांत मागें व पुढें एकेकच आहे. अकराहि इंद्रियांचा जो आंकडा पडतो तोच सर्व भूतांचा पूजक आहे. ४७ एकावर एक आंकडा लिहिला कीं त्याला अकरा म्हणतात. हा विवेक ज्याला कळेल त्यानेंच सर्व भूतांची पूजा करावी. ४८ जो सर्व आत्मभोग मदर्पणानें पहातो तोच

वस्तु जाणितली स्वदेहीं । तेचि सर्व भूतांच्या ठायीं । देहीविदेही समसाम्यें ॥ ४९ ॥ सर्व क्षेत्रांतें वागविता । मी क्षेत्रज्ञु जाण तत्त्वतां । देखतांही विषम भूतां । ज्यासी माझी ममता मोडेना ॥ १४५०॥ उंच नीच विषमता भूतां । वस्तूसी न देखे विषमता । ससमाम्यें समान समता । सर्व भूतां समत्वें ॥५१॥ माझिया साम्यें सर्व समता । तेचि पूजा सर्व भूतां । तोचि पूजक तत्त्वतां । ज्यासी विषमता बाधीना ॥ ५२ ॥ जो भावार्थें मजमाजीं आला । तैं सर्व भूतें तोचि झाला । सहजें समत्व पावला । पूजूं लागला आत्मत्वें ॥ ५३ ॥ पूजूं जाणे रंक रावो । परी पालटेना समभावो । न खंडितां समतेचा ठावो । यथायोग्य पहा वो पूजित ॥ ५४ ॥ ऐक यदुवंशध्वजा । सर्व भूतीं माझी पूजा । माझेनि समत्वें निपजे वोजा । या अकराही पूजा समत्वें ॥ ५५ ॥ इयें अकराही अधिष्ठानें । मत्प्राप्तिकरें अतिपावनें । म्यां सांगीतलेनि अनुसंधानें । पूजा करणें यथाविधी ॥ ५६ ॥ म्यां सांगीतलें ज्या निगुतीं । पूजा करावी त्याचि स्थिती । न कळे तरी माझी मूर्ती । सर्वांहिप्रती चिंतावी ॥ ५७ ॥

धिष्ण्येष्वेष्विति मद्रूपं शङ्खचक्रगदाम्बुजैः । युक्तं चतुर्भुजं शान्तं ध्यायन्नर्चेत्समाहितः ॥ ४६ ॥

निर्गुणाहूनि सगुण न्यून । म्हणे तो केवळ मूर्ख जाण । सगुण निर्गुण दोनी समान । न्यून पूर्ण असेना ॥ ५८ ॥ विघुरलें तें तूप होये । थिजलें त्यापरीस गोड आहे । निर्गुणापरीस सगुणीं पाहें । अतिलवलाहें स्वानंदू ॥ ५९ ॥ निर्गुणाचा बोध कठिण । मनबुद्धिवाचे अगम्य जाण । शास्त्रांसी न कळे उणखूण । वेदीं मौन धरियेलें ॥ १४६० ॥ वारा उमाणावा वावें । आकाश आकळावें खेंवें । भावना

आपल्या देहांतील आत्मतत्त्व जाणितो व तेंच सर्व भूतांच्या शरीरांत समसाम्यानें असतें. ४९ सर्व देहांना वागविणारा मीच क्षेत्रज्ञ आहें, असें तूं जाण. भिन्न भिन्न भूतें पहात असतांहि त्यांची मजवरील ममता नाहींशी होत नाहीं. १४५० उच्च, नीच इत्यादि विषमत्व भूतांमध्यें आहे, आत्मतत्त्वांत नाहीं, असें जो जाणितो त्यालाच सर्व भूतांचें समत्व कळतें. ५१ माझ्याच साम्यानें तो सर्व ठिकाणीं समभाव पहातो व समभावनेनें सर्व भूतांची पूजा करितो. तोच खरा पूजक होय. त्याला विषमत्व बाधत नाहीं. ५२ जो भक्तीनें माझ्यांत प्रवेश करितो तो तत्काल सर्व भूतेंच होतो व तो सहज समत्वाला प्राप्त होऊन त्यांची आत्मबुद्धीनें पूजा करितो. ५३ तो धनिक व निर्धन या दोघांचीहि पूजा करितो, पण त्याच्या मनांतील समभाव पालटत नाहीं. तो समत्वानेंच त्यांची यथायोग्य पूजा करितो. ५४ हे यदुकुळांतील श्रेष्ठ उद्धवा ! ऐक. सर्व भूतांची समत्वभावानें पूजा करणें, ही माझीच पूजा होय. असें माझ्याशीं एकरूप झालें कीं, माझीच आवड उत्पन्न होते. या अकराहि पूजा समत्वरूपच आहेत. ५५ हीं अकराहि पूजास्थानें अत्यंत पावन व माझी प्राप्ति करून देणारीं आहेत. तीं मीं तुला सांगतलीं. मीं सांगितलेल्या प्रकारानें माझी यथाशास्त्र पूजा करावी. ५६ मीं सांगितल्याप्रमाणें पूजा करण्याविषयीं जर समजूत पटत नसेल तर सर्वत्र माझीच प्रतिमा कल्पून तिचेंच चिंतन करावें. १४५७.

—आतां सर्व अधिष्ठानांतील ध्येय सांगतात—

—एषु धिष्णेषु—या अधिष्ठानांमध्यें, इति—या मंत्रप्रकारानें, शंख-चक्र-गदाम्बुजैः युक्तं चतुर्भुजं शान्तं मद्रूपं—शंख, चक्र, गदा, कमल यांनीं युक्त व शांत, चतुर्भुज अशा माझ्या रूपाचें, ध्यायन्—ध्यान करणारानें, समाहितः अर्चेत्—शांतचित्त होऊन पूजा करावी. ४६.

निर्गुणाहून सगुण गौण आहे, असें जो म्हणतो तो केवळ मूर्ख जाणावा. सगुण व निर्गुण हे दोन्ही सारखेच आहेत. त्यांत अधिक-उणें कांहींच नाहीं. ५८ वितळून पातळ झालेलें तूप पुनः थिजून घट्ट झालें कीं, तें जास्तच गोड लागतें. त्याप्रमाणें निर्गुणापेक्षांहि सगुणस्वरूपानेंच सत्वर आनंद होतो. ५९ निर्गुणाचा बोध होणें कठिण असतें. कारण तें मन, बुद्धि व वाणी यांना अतर्क्य आहे. शास्त्रांनाहि त्याचें लक्षण कळलें नाहीं. वेदांनीं त्याविषयीं मौन धरिलें. १४६० वावेनें वाऱ्याचा मोज घ्यावा, किंवा दोन हातांच्या परिघांत आकाशाला धरावें,

भांबावली धांवे । काय धरावें स्फुरेना ।। ६१ ।। तैशी सगुण मूर्ति नव्हे जाण । सुलभ आणि सुलक्षण । देखतां जाय भूकतहान । निवताहे मन सप्रेमें ।। ६२ ।। जो नित्यसिद्ध सच्चितानंद । प्रकृतिपरू परमानंद । सगुण जाला जी गोविंद । स्वानंदकंद । स्वलीळा ।। ६३ ।। साखरेची गोडी वाखाणिली । तिची नाबद तेचि भेली केली । गोडिये अधिक शोभा आली । तैशी मूर्ति झाली साकार ।। ६४ ।। लावूनियां कसवटी । उत्तम सुवर्णाची खोटी । बांधल्या नववधूच्या कंठीं । तेणें ते गोमटी दिसे काय ।। ६५ ।। त्याचींच करूनियां भूषणें । अंगीं प्रत्यंगीं लेवितां लेणें । नववधू अत्यंत शोभली तेणें । निंबलोण उतरिती ।। ६६ ।। तैसें जें निर्गुण निर्विकार । त्याची सगुणमूर्ति सुकुमार । चिन्मात्रैक अतिसुंदर । मनोहर स्वलीला ।। ६७ ।। घवघवित घनसांवळा । मुकुट कुंडलें मेखळा । कंठीं कौस्तुभ वनमाळा । सोनसळा झळकत ।। ६८ ।। आधींच तो अतिसांवळा । वरी टिळक रेखिला पिंवळा । आरक्तप्रांत दोहीं डोळां । कमलदळां लाजवी ।। ६९ ।। चिन्मात्रींचें देखणेपण । त्या डोळ्यां आलें शरण । सैराट हिंडतां शिणला पवन । हरीचें घ्राण ठाकिलें ।। १४७० ।। जैशा ओंकारामाजीं श्रुती । तैशा मुखामाजीं दंतपक्ती । चौकीचे चारी झळकती । सच्चिद्दीप्तीं सोलींव ।। ७१ ।। जेवीं शिव भिन्नपणीं । तेवीं अधऊर्ध्व अधर दोन्ही । हरिअंगीं मिनले मिळणीं । समानपणीं समत्वें ।। ७२ ।। देखोनियां कृष्णवदन । चंद्रमा कृष्णपक्षीं क्षीण । तो तंव पूर्णिमेसी पूर्ण । हा सदा संपूर्ण वदनेंदू ।। ७३ ।। दिवसा चंद्रासी क्षीण प्रभा । वदनेंदूची नवलशोभा । लोपोनि चंद्रसूर्यप्रभा । स्वयें स्वयंभा प्रकाश ।। ७४ ।। तो आर्तचकोरा अमृतपान । मुमुक्षुचातकां स्वानंदघन । सगुणपणें नारायण । भूषणां भूषण तो झाला ।। ७५ ।। चहूं

त्याप्रमाणें निर्गुणाचें ज्ञान संपादन करूं लागलें असतां चित्त भांबावून सैरावेरा धावूं लागतें. कशाला धरावें हें त्याला कळत नाहीं. ६१ पण सगुण मूर्ति तशी नाहीं. ती सुबक व देखणी असल्यामुळें तिला पहातांच तहानभूक नाहींशी होते. मन प्रेमानें तृप्त होतें. ६२ जो नित्यसिद्ध, सच्चिदानंद, प्रकृतीहून पर असलेला परमानंद तो सगुणरूप धारण करून आपल्या लीलेनें स्वानंदकंद गोविंद झाला. ६३ साखरेचा गोडपणा प्रसिद्धच आहे; पण तिचीच खडीसाखर केली कीं, गोडी अधिक वाढते. सगुण मूर्ति तशी आहे. ६४ कसोटीला लावून उत्तम ठरलेल्या सोन्याची लगडीच घेऊन ती जर नववधूच्या गळ्यांत बांधली तर ती शोभेल काय ! ६५ परंतु त्याच सोन्याचे अलंकार घडवून ते जर अंगावर निरनिराळ्या ठिकाणीं घातले तर तीच नववधू अत्यंत शोभते व तिच्यावरून लिंबलोण उतरून टाकितात, ६६ त्याचप्रमाणें जें निर्विकार निर्गुण स्वरूप तें अत्यंत सुंदर, सुकुमार, केवळ ज्ञानस्वरूप, मनोरम अशी सगुणमूर्ति स्वलीलेनेंच बनते. ६७ अतिशय शामसुंदर अंगकांति, मस्तकीं मुकुट, कानांत कुंडलें, कटीला मेखला, गळ्यांत कौस्तुभ व वनमाळा व कमरेला पिवळा पितांबर झळकत आहे. ६८ आधींच सावळी मूर्ति, त्यांत केशरी गंधाचा कपाळीं तिलक लावलेला, मग त्याची शोभा काय वर्णावी ! दोन्ही नेत्रांचे आरक्त प्रांत तर कमलाच्या पाकळीलाहि लाजवितात. ६९ चिन्मात्रांतील सौंदर्य त्या डोळ्यांना शरणच आलें आहे, असें वाटतें. यथेच्छ विहार करून वायु थकला व शेवटीं हरीच्या नाकांत येऊन राहिला. १४७० ओंकारांत जशा श्रुति, तशा भगवानाच्या तोंडांत दंतपंक्ति आहेत. पुढले चार दांत आपल्या स्वाभाविक तेजानें चमकत असतात. ७१ जीव आणि शिव हे जसे भिन्न दिसतात, त्याचप्रमाणें त्याचा वरचा व खालचा ओंठ आहे. ते हरीच्या शरीरांत एकमेकाला मिळाले कीं, समत्वानें एकरूप होतात. ७२ श्रीकृष्णाचें मुख पाहूनच चंद्र कृष्णपक्षांत क्षीण होतो. तो फक्त पौर्णिमेलाच काय तो पूर्णत्वानें प्रकाशतो. पण श्रीकृष्णाचा मुखचंद्र सदा सर्वकाल प्रकाशित असतो. ७३ चंद्राची कांति दिवसा अगदीं फिकट होते. पण याच्या मुखचंद्राची शोभा अवर्णनीय आहे. चंद्र-सूर्याच्या तेजाला लोपवून तो सर्वकाल स्वयंप्रकाश असतो. ७४ तो दर्शनोत्सुक भक्तरूपी चकोरांना अमृत पाजितो. मुमुक्षुरूपी चातकांना स्वानंदमेघाच्या वृष्टीनें तृप्त करितो. नारायण सगुणपणानें भूषणांचेंहि भूषण झाला आहे. ७५ जरायुज, अंडज, स्वेदज व उद्भिज या चार खाणी

खाणींच्या क्रिया विविधा । तैशा चहूं भुजींच्या चारी आयुधां । सगुण देखोनि गोविंदा । वेद निजबोधा आयुधें झाले ॥ ७६ ॥ देवो न कळे श्रुतींसी । लाज आली होती वेदांसी । जगीं मिरवावया प्रतापासी । आयुधें हरीपासीं ते झाले ॥ ७७ ॥ सामवेद झाला शंख । यजुर्वेद चक्र देख । अथर्वण गदा तिख । कमळ साजुक ऋग्वेदू ॥ ७८ ॥ साकारपणें सच्चिदानंदा । शंख चक्र पद्म गदा । चहूं करी चहूं वेदां । निववी सदा निजांगें ॥ ७९ ॥ जगीं मिरवावया उपनिषदें । झालीं बाहुभूषणें अंगदें । करीं कंकणें अतिशुद्धें । सोहं शब्दें रुणझुणती ॥ १४८० ॥ नख केश अंगुलिका । कराग्रीं जडित मुद्रिका । त्रिकोण षट्कोणी या देखा । उपासकां विधिपीठ ॥ ८१ ॥ अगम्य तेज हृदयींच्या पदका । गुणत्रिवळी उदरीं देखा । मध्यें कळसू नेटका । क्षुद्रघंटिका मेखळे ॥ ८२ ॥ कांतीव मरकतस्तंभ जाण । तैसे शोभताति दोन्ही चरण । ते केवळ अचेतन । हे सचेतन हरिअंगीं ॥ ८३ ॥ ध्वज वज्र अंकुश ऊर्ध्वरेखा । दोन्ही पायीं पद्में देखा । यवांतिक सामुद्रिका । अतिनेटका पदबंधू ॥ ८४ ॥ आरक्त रंग चरणतळां । वरील घनसांवळी कळा । नभीं इंद्रधनुष्यमेळा । तैसी लीळा हरिचरणीं ॥ ८५ ॥ सगुण देखोनियां जगन्नायका । दशदिशांसी चरणीं आवांका । पावावया निजसुखा । दशांगुलिका होऊनि ठेल्या ॥ ८६ ॥ चंद्र कृष्णपक्षीं क्षीण । तेणें ठाकिले हरिचरण । नखीं चंद्र जडोनियां जाण । परम पावन तो झाला ॥ ८७ ॥ हें जाणोनि त्रिनयनें । चंद्रमा मस्तकीं धरणें । पायवणी माथां वाहणें । जग उद्धरणें तेणें जळें ॥ ८८ ॥ सगुण देवो देखोनि पाहीं । चारी मुक्ती लागल्या पायीं । यालागीं संतचरणांच्या ठायीं । तत्पर पाहीं सर्वदा ॥ ८९ ॥ सलोकता समीपता । दोहीं पायीं वांकीं गर्जतां । अंदू झाली स्वरूपता । सायुज्यता तोडरू ॥ १४९० ॥ ज्या तोडराचा धाक पाहीं । अहंगर्वित असुर वाहती देहीं । सर्व

म्ह० योनि अनेक क्रिया करितात. त्याचप्रमाणें गोविंदाची सगुण मूर्ति पाहून चारहि वेद ज्ञानप्राप्तीसाठीं त्याच्या चार हातांतील चार आयुधें झालीं. ७६ श्रुतींना परब्रह्माचें स्वरूप कळलें नाहीं म्हणून वेदांना लाज आली होती. तेव्हां ते जगांत प्रौढी मिरवितां यावी म्हणून हरीच्या हातांत आयुधें होऊन राहिले. ७७ सामवेद शंख झाला. यजुर्वेद चक्र झाला. अथर्ववेद तीक्ष्ण गदा झाला व ऋग्वेद कोमल पद्म झाला. ७८ याप्रमाणें सच्चिदानंद देहधारी होऊन त्यानें आपल्या चारहि हातांत चारहि वेद शंख, चक्र, गदा, पद्म, या रूपानें धारण करून स्वतःच त्यांना शांत केलें. ७९ उपनिषदांना जगांत मिरवावयास मिळावें म्हणून तीं देवाची बाहुभूषणें झालीं व हातांतील शुद्ध सलकडीं होऊन पवित्र 'सोहं–' शब्दानें रुणझुण करूं लागलीं. १४८० नखें, केंस, बोटें व बोटांतील रत्नजडित आंगठ्या हीं त्रिकोणी, षट्कोणी इत्यादि उपासकांचीं विधिपीठेंच होत. ८१ हृदयावर रुळत असलेल्या गळ्यांतील पदकांचें तेज तर अलौकिक आहे. पोटाला त्रिगुणरूपी तीन वळ्या पडलेल्या आहेत. कमरेंतील मेखलेच्या बारीक घागऱ्या हाच वरील सुंदर कळस असून ८२ त्याच्या खालीं पाचूच्या कातीव खांबाप्रमाणें दोन्ही चरण शोभतात. प्रसिद्ध खांब निर्जीव व हे हरीच्या अंगभूत, म्हणून सजीव एवढाच भेद आहे. ८३ दोन्हीं पायांवरील ध्वज, वज्र, अंकुश ऊर्ध्वरेखारूप व पद्म आणि यवांच्या सामुद्रिक चिन्हांनीं युक्त असें चरणद्वय अतिशय शुभदायक आहे. ८४ चरणाच्या तळव्यांचा आरक्त वर्ण आणि वर सांवळी छटा त्यामुळें आकाशांत जसे इंद्रधनुष्याचे रंग मिश्र झालेले दिसतात तशी हरिचरणांची शोभा दिसते. ८५ जगन्नायकाचें सगुणरूप पाहून दशदिशांनींहि त्याच्या चरणांचा आश्रय करण्याचें धैर्य केलें व त्या दहा अंगुली होऊन राहिल्या. ८६ कृष्णपक्षांत चंद्र क्षीण होतो म्हणून, त्यानें हरीचे पाय धरिले व त्याच्या चरणांचीं नखें होऊन तो परम पावन झाला. ८७ शंकराला हें कळतांच त्यानें चंद्राला मस्तकावर धारण केलें व हरीच्या पायाचें तीर्थ जी भागीरथी तिला मस्तकावर बसवून तिच्या जलानें सर्व जगाचा उद्धार केला. ८८ देवाची सगुणमूर्ति पहातांच चारहि मुक्ति त्याच्या चरणीं लागल्या; त्यामुळेंच त्या संतचरणांजवळ सर्वदा तत्पर असतात. ८९ सलोकता व समीपता या दोघी पायांतील नूपुरें होऊन वाजूं लागतांच सरूपता सांखळी झाली व सायुज्यता पैंजण बनली. १४९० मी मी म्हणविणाऱ्या राक्षसांनाहि त्या

सुख तें हरीच्या ठायीं । त्याच्या पायीं समाधी ।। ९१ ।। धैर्य वीर्य उदारकीर्ती । गुणगांभीर्य शौर्य ख्याती । यांसी कारण माझी सगुण मूर्ति । जाण निश्चितीं उद्धवा ।। ९२ ।। माझे ये मूर्तीचेनि दर्शनें । होत डोळ्यां पारणें । जन्ममरणांचें उठवीं धरणें । खत फाडणें विषयांचें ।। ९३ ।। माझी मूर्ति देखिल्यापाठीं । न लगे योगयाग आटआटी । न लगे रिघावें गिरिकपाटीं । नाना संकटीं न पडावें ।। ९४ ।। न लगे आसन ध्यान । न लगे समाधिसाधन । माझिये प्राप्तीसी कारण । माझी भक्ति जाण उद्धवा ।। ९५ ।। एकादश पूजाअधिष्ठान । तेथें माझें करोनि आव्हान । म्यां सांगीतलें मूर्तीचें ध्यान । सावधान करावें ।। ९६ ।। माझें अर्चन माझें ध्यान । माझें करावें कीर्तन । माझ्या नामाचें स्मरण । माझे गुण वर्णावे ।। ९७ ।। अहर्निशीं माझी कथा । अहर्निशीं माझी वार्ता । अहर्निशीं मातें ध्यातां । भक्ति तत्त्वतां ती नांव ।। ९८ ।। दीपकळिका हातीं चढे । तैं घरभरी प्रकाशू सांपडे । माझी मूर्ति जैं ध्यानीं जडे । तैं चैतन्य आतुडे अवघेंची ।। ९९ ।। या उपपत्ति उद्धवा देख । सगुण निर्गुण दोन्ही एक । जाण पां निश्चयो निष्टंक । सच्चिदानंदसुख समत्वें ।। १५०० ।। जो कसू सुवर्णाचिये खोटीं । तोचि वाला एका कसवटीं । सगुणनिर्गुणपरिपाटीं । नाहीं तुटी चित्सुखा ।। १ ।। तेवीं सगुणनिर्गुण निःशेष । जाण निश्चयें दोन्ही एक । सगळे साखरेचे टेंक । ना नवटांक सम गोडी ।। २ ।। हें अंतरंग माझें ध्यान । तेथें मन करोनि सावधान । अतिहर्षें मदर्चन । मद्भक्तीं जाण करावें ।। ३ ।। उद्धवा ऐसें म्हणसी मनीं । हे भक्ति पाविजे कैसेनी । हें साध्य होय जिहीं साधनीं । तें तुजलागोनी सांगेन ।। ४ ।।

इष्टापूर्तेन मामेवं यो यजेत समाहितः । लभते मयि सद्भक्तिं मत्स्मृतिः साधुसेवया ।। ४७ ।।

तोडरांचा धाक वाटतो, पहा ! श्रीहरीमध्येंच सर्व सुख व त्याच्याच चरणांपाशीं समाधान आहे. ९१ हे उद्धवा ! धैर्य, पराक्रम, उदार कीर्ति, गुणगांभीर्य, शौर्य, ख्याति या सर्वांच्या प्रसिद्धीला माझी सगुण मूर्तीच कारण आहे, हें खात्रीनें जाण. ९२ या माझ्या मूर्तीच्या दर्शनानें डोळ्यांचें पारणें फिटतें, जन्म-मृत्यूचें धरणें उठून जातें आणि विषयांचा कर्जरोखा फाटून जातो. ९३ माझी मूर्ति एकदा दृष्टीस पडली कीं, योग, याग इत्यादिकांची दगदग रहात नाहीं, गिरिकंदरांत जावें लागत नाहीं किंवा अनेक प्रकारच्या संकटांत पडावें लागत नाहीं. ९४ हे उद्धवा ! माझ्या प्राप्तीसाठीं आसन नको, ध्यान नको व समाधीचें साधनहि नको. केवळ माझी भक्ति पुरे आहे. ९५ वर सांगितलेल्या अकरा प्रकारच्या पूजास्थानांत माझें आवाहन करून मूर्तीचें ध्यान सावधान चित्तानें करावें. ९६ माझी पूजा, माझें ध्यान, माझें कीर्तन, माझें नामस्मरण आणि माझें गुणवर्णन करावें. ९७ रात्रंदिवस माझी कथा, माझ्या गोष्टी व माझें ध्यान करणें यालाच वास्तविक 'भक्ति' असें म्हणतात. ९८ दिव्याची ज्योत लागतांच जसा घरभर प्रकाश पडतो, तसें माझ्या मूर्तीचें ध्यान जडतांच सर्वत्र परब्रह्म प्रकाशतें. ९९ उद्धवा ! या उपपत्तीवरून सगुण व निर्गुण हीं दोन्हीं रूपें एकच आहेत, याची खात्री होईल. तीं दोन्हीं एकरूपच असल्यामुळें दोहोंपासून सच्चिदानंदाचें सुखहि सारखेंच प्राप्त होतें, हें निश्चयानें जाण. १५०० कसोटीवर सोन्याची सबंध लगड जशी कसाला लागते, तसें एक वालभर सोनेंहि लावितां येतें. त्याप्रमाणें सगुण किंवा निर्गुण उपासनेनें आत्मसुखांत कांहींच फरक पडत नाहीं. १ यास्तव सगुण व निर्गुण हीं दोन्हीं एकच आहेत. साखरेच्या मोठ्या राशीला जी गोडी असते तीच त्यांतील छटाक, अर्धछटाकांतहि असतेच ! २ हें माझें अंतरंग ध्यान आहे. त्यांत मन स्थिर करून अत्यंत संतोषानें माझें पूजन आणि माझी भक्ति करावी. ३ उद्धवा ! तूं कदाचित् मनांत म्हणशील कीं, ही भक्ति कशी प्राप्त होणार ! तर ज्या साधनांनीं ती साध्य होते, तेंहि आतां तुला सांगतों. १५०४.

—उक्त भक्तीचें फल सांगतात—

यः समाहितः इष्टापूर्तेन मा एवं यजेत–जो शांतचित्त पुरुष याप्रमाणें यज्ञयागादि इष्ट व वापी-कूपादि पूर्त यांनीं माझें पूजन करितो, सः मयि सद्भक्तिं लभते–तो माझ्याविषयींच्या दृढभक्तीला प्राप्त होतो (या भक्तीचें अंतरंग साधन सांगतात–) व, साधुसेवया सत्स्मृतिः–साधूंच्या सेवेनें माझी स्मृति होते. [किंवा स्मृति म्हणजे ज्ञान. अर्थात् दृढभक्तिमान् पुरुषाला साधुसेवेनें माझें ज्ञान होतें, असा याचा भावार्थ.] ४७.

करितां नाना योगयाग । बापी कूप वन तडाग । श्रौतस्मार्त कर्में चांग । मदर्पणें साङ्ग जिंहीं केलीं ॥ ५ ॥ श्रौत अग्निहोत्र सोमयाग । स्मार्त वापी कूप तडाग । मज नार्पितां दोन्ही व्यंग । सत्कर्म साङ्ग मदर्पणें ॥ ६ ॥ कर्म करितां मदर्पण । अवचटें फळ वांच्छी मन । इतुकियासाठीं भक्तासी विघ्न । सर्वथा मी जाण येवों नेदीं ॥ ७ ॥ सकाम कर्मकर्त्यासी । जे प्राप्ति नव्हे अतिप्रयासीं । त्या उत्तमलोकगतिभोगांसी । मद्भक्तांसी मी देता ॥ ८ ॥ पोटांतूनि माझा भक्तू । दिव्य भोगांसी विरक्तू । ते भोग भोगितां मातें स्मरतू । भोगासक्तू तो नव्हे ॥ ९ ॥ साधू देवालया जातां । पर्जन्यें पीडिला धारावर्ता । वेश्यागृहासी नेणतां । आला अवचितां वोसरिया ॥ १५१० ॥ तो बसोनि वेश्येसी नातळे । तेवीं भक्त दिव्य भोगांसी कांटाळे । ठकलों म्हणे अनुतापबळें । पिटूनि कपाळें हरि स्मरे ॥ ११ ॥ ऐशिया अनुतापस्थितीं । तत्काळ भोग क्षया जाती । तो जन्म पावे महामती । माझी भक्ति जिये गृहीं ॥ १२ ॥ त्यासी पूर्वसंस्कारास्थितीं । सकळ विषयांची विरक्ती । उपतजचि लागे भक्तिपंथीं । भक्त आवडती जीवेंप्राणें ॥ १३ ॥ तो मुक्तीतें हाणोनि लातें । निजसर्वस्वें भजे मातें । यापरी मी निजभक्तातें । नेदीं विघ्नातें आतळूं ॥ १४ ॥ यापरी ज्यांस विषय विरक्ती । तेही इष्टापूर्त जें करिती । योग याग त्याग जें साधिती । माझी भक्ती तें उपजे ॥ १५ ॥ समाहित करोनि मन । श्रौतस्मार्त-कर्मानुष्ठान । योग याग त्याग साधन । निष्ठेनें जाण जें करिती ॥ १६ ॥ तेणें शोधित होय चित्तवृत्ती । झालिया चित्तशुद्धीची प्राप्ती । तें उपजे माझी सद्भक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १७॥ इतुकी न करितां आटाटी । माझे सद्भक्तीची होय भेटी । हें अतिगुह्य आहे माझे पोटीं । ते तुज मी गोठी सांगेन ॥ १८॥ सांडोनि

जे अनेप्रकारचे योगयाग करून विहिरी, आड, सरोवर बांधून श्रोत-स्मार्तादि उत्तम सत्कर्में मला अर्पण करितात ५ त्यांचीं तींच कर्में फलद्रूप होतात. परंतु मला अर्पण न करितां श्रौत अग्निहोत्र, सोमयाग करितात व स्मार्त तळीं, विहिरी बांधितात, तीं दोन्हीं व्यर्थच होतात. मदर्पण केल्यानेंच सत्कर्म यथासांग घडतें. ६ कर्म मदर्पण करीत असतां अवचित भक्ताचें मन फलाची इच्छा करितें. यास्तव मी त्याच्या कर्मांत कधींहि विघ्न येऊं देत नाहीं. ७ सकाम कर्म करणारांस अत्यंत प्रयासानेंहि ज्यांची प्राप्ति होत नाहीं, ते उत्तम लोकांतील भोग मी माझ्या भक्तांना देतों. ८ मनापासून जो माझा भक्त असतो, तो दिव्यभोगांविषयीं विरक्त असतो आणि यदृच्छेनें प्राप्त झालेले भोग भोगीत असतां जो माझें स्मरण करितो तो खरोखर भोगासक्त नव्हे. ९ कोणी एक साधु देवळांत जात असतां अकस्मात् पर्जन्यवृष्टींत सांपडला. तेव्हां तो जवळ असलेल्या एका वेश्येच्या घरांत न जाणतां निवाऱ्यासाठीं उभा राहिला. १५१० पण त्यानें त्या वेश्येला तिच्या घरांत राहूनहि स्पर्श केला नाहीं, त्याप्रमाणेंच भक्त दिव्य भोगांस कंटाळून अत्यंत पश्चात्तापनें 'मी केवळ फसलों' असें म्हणून कपाळ पिटून घेतो व हरीचें स्मरण करूं लागतो. ११ असा पश्चाताप झाला म्हणजे त्याच्या सर्व भोगांचा क्षय होतो आणि ज्या ठिकाणीं माझी भक्ति असेल तेथें तो बुद्धिवान् जन्म घेतो. (सु. गी. ६-४२. पृ. १४०) त्याला पूर्वसंस्कारानुरूप सर्व विषयांची स्वभावतःच विरक्ति असते व त्यामुळें तो उपजतांच माझ्या भक्तिमार्गाला लागतो आणि त्याला माझे सर्व भक्त जीव कीं प्राण वाटतात. १३ तो मुक्तीला लाथेनें दूर सारून आपल्या सर्वस्वानें माझें भजन करितो. अशाप्रकारच्या माझ्या भक्तांना मी विघ्नांचा स्पर्शहि होऊं देत नाहीं. १४ ज्यांना अशी विषयविरक्ति असते, तेहि जेव्हां यज्ञयाग किंवा तळीं, विहिरी इत्यादि लोकोपयोगी कार्यें करितात तेव्हां त्यांच्या मनांत मजविषयीं भक्ति उत्पन्न होते. १५ मन शांत करून श्रौत-स्मार्तकर्मानुष्ठान व योग-याग, त्याग इत्यादि साधनें मोठ्या श्रद्धेनें केल्यानें १६ चित्तवृत्ति शुद्ध होते. उद्धवा ! चित्तशुद्धि झाली म्हणजे माझी सद्भक्ति उत्पन्न होते, हें खात्रीनें समज. १७ इतकी सर्व खटपट न करितां माझ्या भक्तीची आवड कशी उत्पन्न होते, तें माझ्या मनांतील गुप्त रहस्य मी तुला सांगतों. १८ हे उद्धवा ! जो सर्व साधनें सोडून केवळ साधूंचें भजन करितो त्याचें चित्त तत्काल शुद्ध होतें,

सकळ साधन । जो करी साधुभजन । तेव्हांचि त्याचें शुद्ध मन । सत्य जाण उद्धवा ॥१९॥ म्हणसी साधु तो कैसा कोण । मागां सांगितलें लक्षण । बहु बोलावया नाहीं कारण । साधु तो जाण सद्गुरू ॥१५२०॥ त्या सद्गुरूचें भजन । जो भावार्थे करी आपण । सर्व शुद्धीचें कारण । सद्गुरु जाण सर्वांशीं ॥ २१ ॥ ज्याचे मुखींचें वचन । ब्रह्मसाक्षात्कारा पाववी जाण । त्याचे सेवितां श्रीचरण । शुद्धि कोणकोणा होईना ॥ २२ ॥ गुरुनाम घेतां मुखें । कळिकाळ पाहूं न शके । त्याची सेवा करितां हरिखें । पायां मोक्षसुखें लागती ॥ २३ ॥ ज्यासी सद्गुरूची आवडी चित्तीं । ज्याची सद्गुरुभजनीं अतिप्रीती । त्यासी भाळली माझी सद्भक्ती । पाठीं लागे निश्चितीं वरावया ॥ २४ ॥ जो गुरुभजनीं भावार्थी । जगामाजीं तोचि स्वार्थी । त्यापाशीं माझी सद्भक्ती । असे तिष्ठती आंखिली ॥ २५ ॥ सद्भक्ति बापुडी कायसी । अंगें मीही अहर्निशीं । तिष्ठतसें स्वानंदेंसीं । गुरुप्रेमासी भूललों ॥ २६ ॥ मज माझ्या भक्तांची थोडी गोडी । परी गुरुभक्तांची अतिआवडी । सत्संगेंवीण रोकडी । सद्भक्ति चोखडी न पविजे ॥ २७ ॥

प्रायणे भक्तियोगेन सत्संगेन विनोद्धव । नोपायो विद्यते सध्र्यङ् प्रायणं हि सतामहम् ॥ ४८ ॥

माझिये प्राप्तीलागुनी । भक्तिज्ञानमार्ग दोन्ही । ज्ञान अत्यंत कठिणपणीं । भक्ति निर्विघ्नीं पाववी मज ॥ २८ ॥ संसार तरावयालागीं । अनेक साधनें अनेगीं । बोलिलीं तीं जाण वाउगीं । उत्तम प्रयोगीं सद्भक्ती ॥ २९ ॥ उपयांमाजीं अतिप्रांजळ । निर्विघ्न आणि नित्य निर्मळ । माझा भक्तिमार्ग केवळ ।

हें अगदीं सत्य समज. १९ 'साधु कोण! तो कसा असतो!' असें जर विचारशील तर त्याचें सविस्तर लक्षण मीं मागेंच सांगितलें आहें. म्हणून आतां जास्त सांगावयाचें कांहीं कारण नाहीं. सद्गुरूच साधु समजावा. १५२० त्या सद्गुरूचें भजन जो भावार्थानें करितो तो सर्वप्रकारें शुद्ध होतो. साऱ्या शुद्धीचें कारण सद्गुरूच आहे. २१ ज्याच्या तोंडचा नुसता शब्दहि जर ब्रह्मसाक्षात्कार घडवितो, तर त्याच्या चरणाची सेवा केल्यानें कोणाची शुद्धि होणार नाहीं! २२ सद्गुरूच्या नांवाचा मुखानें उच्चार करितांच त्याच्याकडे कळी-काळ पाहूं शकत नाहीं. त्याची सेवा केली असतां सर्व मोक्षसुखें आनंदानें पायांशीं चालून येतात. २३ ज्याच्या मनाला सद्गुरूची आवड असते, त्याला सद्गुरुभजन अत्यंत प्रिय वाटतें. त्यावर माझी सद्भक्ति मोहित होऊन त्याला वरण्यासाठीं त्याच्या पाठीस लागते. २४ जो भक्तिभावानें गुरुभजन करितो, त्यानेंच जगांत खरा स्वार्थ साधिला. त्याच्यापाशीं माझी सद्भक्ति दासी होऊन तिष्ठत रहाते. २५ अहो! सद्भक्ति ती काय बिचारी! पण मी स्वतः देखील गुरुप्रेमाला भाळून रात्रंदिवस आनंदानें त्या भक्तापाशीं तिष्ठत रहातों. २६ मला माझ्या भक्तांपेक्षांहि गुरुभक्ताची अधिक आवड आहे. परंतु सत्संगतीवांचून उत्तम सद्भक्ति केव्हांहि प्राप्त व्हावयाची नाहीं. १५२७.

—वर ज्ञानमार्ग व भक्ति मार्ग असे दोन मार्ग सांगितले. त्यांतील ज्ञानमार्गाहूनहि भक्तिमार्ग श्रेष्ठ आहे, असें आतां सांगतात—

उद्धव–हे उद्धवा ! सत्संगेन भक्तियोगेन विना प्रायणे सध्र्यङ् उपायः न विद्यते–सत्संगानें प्राप्त होणारा जो भक्तियोग त्या दृढ भक्तियोगावांचून संसारांतून तरून जाण्यास दुसरा चांगला उपाय नाहीं. ('सत्संगेन०' याविषयीं हेतु सांगतात–)हि सतां अहं प्रायण–कारण मी साधूंचें प्रकृष्ट अयन म्ह० आश्रय आहें. म्हणून सत्संग हेंच माझ्या प्राप्तीचें अंतरंग साधन आहे.) ४८.

माझ्या प्राप्तीसाठीं ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग अशी दोन साधनें आहेत. त्यांतील ज्ञानमार्ग फार बिकट आहे. व भक्तिमार्ग सुलभ आहे. तो भक्ताला निर्विघ्नपणें माझ्याकडे आणून पोंचवितो. २८ संसार तरून जाण्यासाठीं अनेक साधनें अनेकांनीं सांगितलीं आहेत. पण तीं सर्व व्यर्थ आहेत. सर्वांत माझी भक्तीच उत्तम साधन आहे.

ज्ञान तें विकळ मध्यपाती ।। १५३० ।। मळा शिंपावयालागुनी । मोट पाट उपाय दोन्ही । मोटां काढिजे विहीरवणी । बहुत कष्टोनी अतिअल्प ।। ३१ ।। मोटनाडा बैल जोडी । अखंड झोडितां आसुडीं । येतां जातां बोढावोढी । भोय भिजे थोडी भाग एक ।। ३२ ।। तेथही मोट फुटे का नाडा तुटे । बोडव पडे बैल अवचटे । तरी हातां येतां पीक आटे । बोल तुटे तत्काळ ।। ३३ ।। तैसा नव्हे सरितेचा पाट । एक वेळ केल्या वाट । अहर्निशीं घडघडाट । चालती लोट जीवनाचे ।। ३४ ।। मोटेचें पाणी तैसें ज्ञान । करूनि वेदशास्त्रपठण । नित्यानित्यविवेकासी जाण । पंडित विचक्षण बैसती ।। ३५ ।। एक कर्माकडे बोढी । एक संन्यासाकडे बोडी । एक म्हणती हे गोष्टी कुडी । देहो बोढावोढीं न घालावा ।। ३६ ।। एक म्हणती प्रारब्ध प्रमाण । एक म्हणती सत्य शब्दज्ञान । एक म्हणती धरावें मौन । अतिजल्पन न करावें ।। ३७ ।। एक म्हणती सांड व्युत्पत्ती । ज्याची चढे अधिक युक्ती । तोचि ज्ञाता निश्चितीं । सांगों किती मूर्खांसी ।। ३८ ।। एक म्हणती तप प्रमाण । एक म्हणती पुरश्चरण । एक म्हणती वेदाध्ययन । द्यावें दान एक म्हणती ।। ३९ ।। एक तो हें अवघेंचि मोडी । घाली योगाचिये कडाडीं । लावी आसनमुद्रेची बोढी । बैसवी रोकडी वारयावरी ।। १५४० ।। ऐसें नाना वाद करितां । एक निश्चयो नव्हे सर्वथा । ज्ञानाभिमान अतिपंडितां । ज्ञान तत्त्वतां कळेना ।। ४१ ।। ऐसी ज्ञानमार्गींची गती । नाना परींचीं विघ्नें येती । विकल्पें नासल्या व्युत्पत्ती । माझी निजप्राप्ती तेथें नाहीं ।। ४२ ।। तैसी नव्हे माझी भक्ती । नाममात्रें मज पावती । नामें उद्धरिलें नेणों किती । हेंचि भागवतीं बोलिलें ।। ४३ ।। माझें करितां गुणवर्णन । कां हरिकथा नामसंकीर्तन । तेथें रिघों न शके विघ्न ।

---

२९ अनेक उपायांमध्यें माझा भक्तिमार्गच अतिशय सरळ, निर्विघ्न व नित्य शुद्ध आहे. ज्ञानांत तेवढें सामर्थ्य नाहीं. तें एखादे वेळीं मध्येंच सोडितें. १५३० शेत, मळा शिंपण्यासाठीं मोटेचा व पाटाचा उपयोग करितात. मोटेनें विहिरींत सांचलेलें पाणी अतिश्रमानें थोडेंसें मिळतें. ३१ मोटेला नाडा व बैलाची जोडी इतकें साधन आरंभीं जमवावें लागतें. नंतर बैलांना चाबकानें झोडून त्यांना मागें-पुढें चालवून जेव्हां यातायात करावी तेव्हां थोडीशी जमीन भिजते. ३२ त्यांत जर कां मध्येंच मोट फुटली, नाडा तुटला किंवा अकस्मात् मोट ओढणारा बैल पडला कीं, लगेंच जमिनीचा ओलावा सुकून पिकास आलेलें शेत करपून जातें. ३३ परंतु नदीचा पाट तसा नसतो. त्याला एकदा बंधारा बांधून पाट काढून दिला कीं, पाण्याचा प्रवाह रात्रं-दिवस सारखा वाहूं लागतो. ३४ ज्ञान मोटेच्या पाण्यासारखें आहे. विद्वान् पंडित वेदशास्त्राचा अभ्यास करून नित्यानित्यविवेक करीत बसतात. ३५ एक कर्माकडे ओढवतो तर दुसरा संन्यासाचें समर्थन करून मुंडण करणेंच योग्य म्हणतो. कोणी म्हणतात ही गोष्ट खोटी आहे. देहाला यातायातींत घालूं नये. ३६ कोणी प्रारब्धच खरें मानितात, तर कोणी शब्दज्ञान प्रमाण समजतात. कोणी फार बडबड न करितां मौन धरणेंच उत्तम म्हणतात. ३७ कोणी म्हणतात विद्वत्ता सोडून द्यावी. ज्याची युक्ति श्रेष्ठ तोच ज्ञाता. त्या मूर्खांचें आणखी किती वर्णन करूं ! ३८ कोणी तप श्रेष्ठ म्हणतात तर कोणी गायत्रीपुरश्चरणाला महत्त्व देतात. कोणी वेदाध्ययन करावें म्हणतात. तर कोणी दान द्यावें असें सांगतात. ३९ एखादा हें सर्व सोडून द्या आणि योगाभ्यास करा असें म्हणतो, साधकाला आसन-मुद्रेची ओढ लावितो व वायुभक्षण करून रहा, म्हणतो. १५४० याप्रमाणें अनेक प्रकारचे वाद करून त्याचा अखेर एक निश्चय कधींच होत नाहीं. ज्ञानाभिमानानें अतिपंडित बनलेल्या त्यांना वस्तुतः खरें ज्ञान कळतच नाहीं. ४१ अशी ही ज्ञानमार्गी लोकांची स्थिति आहे. त्यांत अनेक प्रकारचीं विघ्नें येतात. विकल्पानें शब्दार्थज्ञान नाहींसें होतें व माझी प्राप्ति होत नाहीं. ४२ माझी भक्ति मात्र तशी नाहीं. केवळ नामस्मरणानेंच भक्त मला प्राप्त होतात. नामानें किती उद्धरून गेले, त्याची गणती नाहीं. भागवतांत त्यांचें वर्णन केलें आहे. ४३ माझें गुणवर्णन किंवा

गडगर्जन हरिनामें ॥ ४४ ॥ जेथें हरिनामाचे पवाडे । तेथें विघ्न कैंचें बापुडें । विघ्न पळे मद्भक्तापुढें । उघडती कवाडें मोक्षाचीं ॥ ४५ ॥ माझे भक्त अतिनिराश । न धरिती मोक्षाची आस । यालागीं मी हृषीकेश । त्यांच्या भावार्थास भूललों ॥ ४६ ॥ एवं निर्विघ्न मजमाजीं सरता । मार्ग नाहीं भक्तिपरता । त्रिसत्य सत्य गा सर्वथा । भक्ति तत्त्वतां मज पढिये ॥ ४७ ॥ ऐशी निजभक्ति सुलभ फुडी । देवो सांगे अतिआवडीं । उद्धवासी हरिभक्तीची गोडी । हर्षाची गुढी उभारिली तेणें ॥ ४८ ॥ जें उद्धवाच्या जीवीं होतें । तेंचि निरूपिलें श्रीअनंतें । हरिखें नाचों लागला तेथें । जीवें श्रीकृष्णातें वोवाळी ॥ ४९ ॥ ऐशी तुझी सुलभ भक्ती । तरी अवघेचि भक्ति कां न करिती । देवो म्हणे भाग्येंवीण माझी भक्ती । न घडे निश्चितीं उद्धवा ॥ १५५० ॥ कोटि जन्मांची पुण्यसंपत्ती । जरी गांठीं असेल आइती । तैं जोडे माझ्या संतांची संगती । सत्संगें भक्ती उल्हासे ॥ ५१ ॥ सत्संगें भक्तीची प्राप्ती । उद्धवा जाण तूं निश्चितीं । संतांपाशीं माझी भक्ती । वास पाहती उभी असे ॥ ५२ ॥ हो कां तूं संत माझे म्हणसी । येर लोक सांडिले कोणापाशीं । तुझी भक्ती अहर्निशीं । संतांपाशीं कां असे ॥ ५३ ॥ उद्धवा ऐसा विकल्पभावो । येथें धरावया नाहीं ठावो । संतभजनीं माझा सद्भावो । केवा कोण पाहावो भक्तीचा ॥ ५४ ॥ संतसेवा करावयासी । कोण कारण तूं मज म्हणसी । अनावरा मज अनंतासी । तिंहीं निजभावेंसी आकळिले ॥५५॥ मज आकळिले ज्या हेतू । तेही सांगेन तुज मातू । मजवांचोनि जगाआंतू । दुसरा अर्थू नेणती ॥ ५६ ॥ आपुलें जें स्वकर्म । मज अर्पिले सर्व धर्म । देह गेह रूप नाम । आश्रमधर्म मदर्पण ॥ ५७ ॥ कल्पांतींचेनि कडकडाटें । जैं धाकें धाके विराट आटे । ऐसीं बोढवल्या अचाटें । मजवेगळे नेटें न ढळती ॥ ५८ ॥ तुटोनि पडतां आकाश । आणिकाची ते न पाहती वास । यालागीं मी

हरिनामसंकीर्तन केलें असतां तेथें विघ्न प्रवेशहि करूं शकत नाहीं. हरिनामाची गर्जना किल्ल्याप्रमाणें रक्षण करिते. ४४ जेथें हरिनामाचें गायन चालतें तेथें विघ्नें तीं काय बापडीं ! माझ्या भक्ताच्या पुढून तीं पळून जातात आणि मोक्षाचीं द्वारें भक्तांना खुलीं होतात. ४५ पण माझे भक्त अत्यंत निरिच्छ असतात. ते मोक्षाचीहि कधीं इच्छा करीत नाहींत. यास्तव मी परमात्मा त्यांच्या भावार्थाला भुलतों. ४६ निर्विघ्नपणें माझ्या प्राप्तीचा भक्तीवांचून दुसरा सरळ मार्ग नाहीं, हें त्रिवार सत्य समज. सर्वांत मला भक्ति अतिशय प्रिय आहे. ४७ अशी सुलभ भक्ति देवानें मोठ्या प्रेमानें सांगतांच उद्धवानें हरिभक्तीच्या गोडीमुळें तत्काल आनंदाची गुढीच उभारली. ४८ उद्धवाच्या मनांत जें होतें त्याचेंच श्रीहरीनें निरूपण केलें. तेव्हां तो अति हर्षानें नाचूं लागला व श्रीकृष्णावरून आपला जीव त्यानें ओवाळून टाकिला. ४९ उद्धवानें विचारिलें कीं, तुझी भक्ति जर इतकी सोपी आहे तर मग सगळेच ती कां करीत नाहींत. तेव्हां देवांनीं उत्तर दिलें कीं, हे उद्धवा ! भाग्यावांचून माझी भक्ति केव्हांहि घडत नाहीं, हें लक्षांत ठेव. १५५० कोट्यवधि जन्मींचा पुण्यसंग्रह जर पदरीं असेल तरच माझ्या संतांचा सहवास घडतो आणि सत्संगानें भक्तीला ऊत येतो. ५१ उद्धवा ! सत्संगामुळेंच भक्ति प्राप्त होते, हें तूं खात्रीनें समज. संतांच्या जवळ माझी भक्ति वाट पहात उभी असते. ५२ तूं कदाचित् असें म्हणशील कीं, संतांना तेवढें तूं आपलें म्हणवून इतर लोकांना कोणांवर सोंपविलें आहेस. तुझी भक्ति रात्रंदिवस संतांच्याजवळ कां असते, ५३ तर हे उद्धवा ! असा विकल्प मनांत आणण्याचें कांहीं कारणच नाहीं. कारण संतांच्या भजनांत माझा अत्यंत सद्भाव आहे. मग भक्तीची गोष्ट दूरच राहिली. ५४ 'संतसेवा करण्याचें तरी काय कारण ? ' असें जर तूं म्हणशील तर उद्धवा ! मज अनंताचें कोणालाहि आकलन करितां येत नाहीं, मी संतांच्या भक्तीनें अगदीं बांधला गेलों आहें. ५५ त्यांनीं मला ज्या हेतूनें बांधिलें, तेंहि कारण तुला सांगतों, ऐक. त्यांना सृष्टीमध्यें मजवांचून दुसरें कांहींच दिसत नाहीं. ५६ ते आपलें स्वकर्म, देह, घर, स्वरूप, नांव, आश्रमधर्म, हें सर्व मलाच अर्पण करितात. ५७ ज्यावेळीं कल्पांतींच्या कडकडाटानें भयभीत होऊन विराटदेहहि आटून जातो, त्यावेळीं म्ह० तसा कठिण प्रसंग ओढवला असतांहि माझे भक्त मोठ्या धैर्यानें मजपासून दूर होत नाहींत. ५८ त्यांच्यावर

हृषीकेश । त्यांचा दास झालों असें ॥ ५९ ॥ नवल भावार्थाचा महिमा । मज विश्वात्म्याचे झाले ते आत्मा । ऐसे लाहाणें तया आम्हां । मज पुरुषोत्तमा वश केलें ॥ १५६० ॥ संतांसी मज भिन्नपण । कल्पांतींही नाहीं जाण । हे जिव्हारींची उणखूण । तुज संपूर्ण सांगीतली ॥ ६१ ॥ संत माझे झाले माझ्या भक्ती । येर लोक मज न भजती । तें म्यां दिधले काळाच्या हातीं । अदृष्टगतीं बांधोनि ॥ ६२ ॥ माझिया संतांपाशीं । यावया प्राप्ती नाहीं काळासी । मी सदा संरक्षिता त्यांसी । ते कळिकाळासी नागवती ॥ ६३ ॥ यापरी संतांचें सर्व काज । करितां मज नाहीं लाज । उद्धवा माझें अत्यंत निजगुज । तें मी तुज सांगेन ॥ ६४ ॥

अथैतत्परमं गुह्यं शृण्वतो यदुनन्दन । सुगोप्यमपि वक्ष्यामि त्वं मे भृत्य सुहृत्सखा ॥ ४९ ॥

ऐकें यदुवंशकुळटिळका । तूं स्वगोत्र भृत्य सुहृद सखा । तुज न सांगिजे हा आवांका । सर्वथा देखा न धरवे ॥ ६५ ॥ मज गुप्ताचें गुप्त सार । साराचें गुप्त भांडार । तें भांडारींचें निजसार । तुज मी साचार सांगेन ॥ ६६ ॥ ऐसें गुह्याचें गुह्य निश्चितीं । नाहीं सांगीतलें कोणाप्रती । तूं सखा जिवलग सांगाती । अनन्य प्रीती मजलागीं ॥ ६७ ॥ केवळ कोरडी नव्हे प्रीती । तैसीच माझी अनन्य भक्ती । भक्तीसारिखी विरक्ती । अवंचकस्थिति तुजपाशीं ॥ ६८ ॥ यादववंशीं पाहतां देख । मजसमान तूंचि एक । समान सगोत्र आणि सेवक । हें अलोलिक उद्धवा ॥ ६९ ॥ नव्हेसी कायार्थी सेवक । सर्वभावें विश्वासुक । किती वाणूं गुण एकएक ।

आकाश जरी कोसळून पडलें तरी ते दुसऱ्या कोणाची आशा करीत नाहींत. यास्तव मी हृषीकेश त्यांचा दास होऊन राहिलों आहें. ५९ भावार्थाचा महिमा असा विलक्षण आहे. मज विश्वात्म्याचे ते आत्मा झाले आहेत. याप्रमाणें त्यांचें व आमचें ऐक्य आहे. त्यांनीं मज पुरुषोत्तमाला वश केलें आहे. १५६० संतांचा व माझा भेदभाव कल्पांतींहि होत नाहीं. ही माझ्या अंतःकरणांतील गुप्त गोष्ट मीं तुला सविस्तर सांगितली. ६१ माझ्या भक्तीनें संत माझे झाले. इतर लोक माझी भक्ति करीत नाहींत, म्हणून मी त्यांना दैवाच्या फेऱ्यांत बांधून काळाच्या स्वाधीन करितों. ६२ माझ्या संतांपाशीं येण्याची काळाची छाती नाहीं. मी त्यांचें सर्वस्व रक्षण करणारा असल्यामुळें तेच उलट कळिकाळाला नागवितात. ६३ हे उद्धवा ! याप्रमाणें संतांचें कोणतेंहि काम करण्यास मला मुळींच लाज वाटत नाहीं. आतां मी तुला माझें अत्यंत गुह्य रहस्य सांगतों. १५६४

आतां सांख्ययोगादि जीं इतर साधनें आहेत त्यांना दुसऱ्या साधनांची अपेक्षा असते व तीं सव्यभिचारहि असतात. म्ह० तीं माझी प्राप्ति करून देतातच असें नाहीं. पण सत्संग स्वतंत्रच समर्थ आहे व त्याचें फल अव्यभिचारी म्हणजे नियत आहे, असें वर्णन करण्यासाठीं भगवान् म्हणतात—

अथ अतः—आतां असें असल्यामुळें, यदुनंदन—हे उद्धवा, एतत् परमं गुह्यं शृणु—हें पुढील अध्यायांत सांगितलें जाणारें परम गुह्य ऐक. सुगोप्यं अपि वक्ष्यामि-तें अत्यंत गुह्य असलें तरी सांगेन. त्वं मे भृत्यः सुहृद् सखा—कारण तूं माझा भक्त, सुहृद व सखा आहेस. ४९.

यदुकुलास भूषण असलेल्या हे उद्धवा ! ऐक. तूं माझा आप्त, सेवक, सुहृद् आणि स्नेही आहेस. तेव्हां तुला न सांगण्याइतका धीर माझ्यानें धरवत नाहीं. ६५ करितां माझ्या गुप्ताचें गुप्त सार, त्या सारांतील गुप्त भांडार आणि त्या भांडारांतील हें गुप्त रहस्य मी तुला आतां सांगतों. ६६ असें गुह्यांतीलहि गुह्य आतांपर्यंत मीं कोणालाहि सांगितलेलें नाही. पण तूं माझ्या जीवाचा सखा आणि अत्यंत आवडता आहेस. तुझें मजवर अनन्य प्रेम आहे. ६७ नुस्तें कोरडें प्रेमच नाहीं, तर त्याबरोबर अनन्य भक्ति व त्या भक्तीसारखीच विरक्ति आहे. मजपासून तूं कांहींहि लपवून ठेवणारा नाहींस ६८ हे उद्धवा ! यादवकुलांत पाहूं गेलें असतां माझ्यासारखाच तूंच कायतो एक आहेस. तूं माझ्याच गोत्राचा आणि माझा सेवकहि आहेस. ६९ केवल काम करणारा सेवकच नाहींस, तर सर्वप्रकारें विश्वासु आहेस. तुझ्या एकेका गुणाचें वर्णन तरी किती करावें ? मला अतिशय संतोष

परम हरिख मज झाला ॥ १५७० ॥ यालागीं गुह्य तेंही तुझ्या ठायीं । वंचावया मज धीरु नाहीं । हृदय आलिंगिलें हृदयीं । चिदानंदू पाहीं तुष्टला ॥ ७१ ॥ मग म्हणे सावधान । सादर आइक माझें वचन । तुज फावल्या माझें गुह्य ज्ञान । वंशउद्धरण तुझेनी ॥ ७२ ॥ जे वंशीं होय ब्रह्मज्ञानी । तो वंश पवित्र त्याचेनी । हे सत्य जाण माझी वाणी । विकल्प मनीं न धरावा ॥ ७३ ॥ म्हणसी स्वयें तूं ब्रह्म पूर्ण । वंशीं अवतरलासी नारायण । तेणें वंश उद्धरला जाण । माझें ज्ञान तें किती ॥ ७४ ॥ तरी नाम रूप जाति गोत । या अवघ्यांसी मी अलिप्त । सकळ कुळेंसीं मी कुळवंत । गोत समस्त जग माझें ॥ ७५ ॥ ऐसें जाणोनि निजगुह्यसार । तुज मी सांगेन साचार । तेणें होईल जगाचा उद्धार । ऐसें शार्ङ्गधर बोलिला ॥ ७६ ॥ तें ऐकावया गुह्य ज्ञान । उद्धवें मनाचे उघडिले कान । सावध पाहतां हरीचें वदन । नयनीं नयन विगुंतले ॥ ७७ ॥ यापरी उद्धव सावधान । त्यासी कृष्ण सांगेल गुह्य ज्ञान । पुढिले अध्यायीं अतिगहन । रसाळ निरूपण हरीचें ॥ ७८ ॥ एका विनवी जनार्दन । संतीं मज द्यावें अवधान । श्रोतीं व्हावें सावधान । मस्तकीं चरण वंदिले ॥ ७९ ॥ तुमचेनि पदप्रसादें । श्रीभागवतींचीं श्लोकपदें । वाखाणीन अर्थावबोधें । संत स्वानंदें तुष्टलिया ॥ १५८० ॥ यालागीं एका शरण जनार्दनीं । तंव जनार्दनचि एकपणीं । जेवीं का सागरींचें पाणी । तरंगपणीं विराजे ॥ १५८१ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे एकाकारटीकायां श्रीकृष्णोद्धवसंवादे एकादशपूजाविधानयोगो नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे भगवदुद्धवसंवादे एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

झाला आहे. ७० नेव्हां माझें परम रहस्य तुझ्यापासून लपवून ठेवण्यास मला धीर निघत नाहीं. असें म्हणून त्यानें उद्धवाला आलिंगन दिलें. त्यामुळें तो चिदानंद कृष्ण संतुष्ट झाला. ७१ नंतर श्रीकृष्ण म्हणाला, आतां नीट लक्ष देऊन ऐक. तुला जर माझें गुह्यज्ञान प्राप्त झालें तर तुझ्यामुळें वंशाचा उद्धार होईल. ७२ कारण ज्या कुलांत ब्रह्मज्ञानी उत्पन्न होतो, तें कुल त्याच्यामुळें पवित्र होतें. हें माझें वचन सत्य समज. मनांत मुळींच विकल्प धरूं नकोस. ७३ आतां तूं म्हणशील कीं, तूं स्वतःच पूर्ण परब्रह्म नारायण या वंशांत अवतार घेऊन वंशाचा उद्धार केला आहेस, तुझ्यापुढें माझें ज्ञान तें किती ! तर ऐक. ७४ नांव, रूप. जाति, कुल या सर्वांपासून मी अलिप्त आहें. सर्व कुलें माझीच आहेत आणि सर्व जगत् माझें गोत्र आहे. ७५ हें माझ्या आत्मज्ञानाचें सार मी तुला सांगेन. त्याच्यायोगें सर्व जगाचा उद्धार होईल, असें श्रीकृष्ण बोलला. ७६ तें गुह्यज्ञान ऐकण्यासाठीं उद्धवानें सर्व लक्ष तेथें लाविलें आणि श्रीहरीच्या मुखाकडे पहातांच त्याची दृष्टि एक झाली. ७७ याप्रकारें उद्धवानें सावधान चित्त केल्यावर श्रीकृष्ण पुढील अध्यायांत त्याला आपलें गुह्य ज्ञान सांगेल. तें हरीचें निरूपण अति गहन व रसाळ आहे. ७८ एका-जनार्दन नम्रपणें म्हणतो कीं, संतांनीं मजकडे अवधान द्यावें आणि श्रोत्यांनीं सावधान चित्त करावें. मी आपलें मस्तक तुमच्या चरणांवर ठेवितो. ७९ संत स्वानंदानें संतुष्ट झाल्यावर त्याच्या चरणप्रसादानें भागवतांतील श्लोकांच्या पदाचा अर्थ सर्वांना सुगम होईल, असा सांगेन १५८० यास्तव एकनाथ जनार्दनाला शरण जातांच समुद्रांतील पाणी जसें तरंगरूपानें शोभतें, तसा तो जनार्दन एकत्वानें म्ह० एकनाथाच्यारूपानें शोभूं लागला. १५८१.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील
पूजाविधान नांवाचा अकरावा अध्याय समाप्त झाला.